# चंदगडी बोली, समाज आणि संस्कृती

## (भाषाशास्त्रीय अभ्यास)

प्रकल्प प्रमुख

**डॉ. नंदकुमार मोरे**

भाषाविकास संशोधन संस्था, कोल्हापूर

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

**राज्य मराठी विकास संस्था, मुंबई**

ऑक्टोबर, २०२२

# चंदगडी बोली, समाज आणि संस्कृती

(भाषाशास्त्रीय अभ्यास)

**डॉ. नंदकुमार मोरे**

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई

डॉ. गणेश देवी
आणि
त्यांच्या कल्पकतेतून साकारलेल्या
‘भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण’ प्रकल्पास...

*नव्हे शब्द एक देशी। सांडी गवशी कोणाला॥*
*जाली माझी वैखरी। विश्वंभरी व्यापक॥*

- संत तुकाराम



मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

## दोन शब्द...

चंदगडी बोलीच्या संकलन, संशोधनाची सुरुवात डॉ. गणेश देवी यांच्या 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण' प्रकल्पापासून झाली. तत्पूर्वी या बोलीवर फारसा कोणी प्रकाश टाकलेला नव्हता. ही बोली जवळजवळ अपिरिचित राहिली होती. कोल्हापूर जिल्ह्यात चंदगडी नावाची एक प्रादेशिक बोली आहे, हे समजताच या प्रकल्पाचे मुख्य संपादक डॉ. गणेश देवी आणि महाराष्ट्र खंडाचे अरुण जाखडे यांनी नोंद लिहिण्याची सूचना केली. ही माझी स्वत:चीही बोली असल्याने मी होकार दिला. वास्तविक बोलीच्या अभ्यासापेक्षा यानिमित्ताने देवी सरांसारख्या विख्यात भाषाभ्यासकांबरोबर काम करण्याची संधी मिळतेय, हाच मोठा आनंद होता. या प्रकल्पाच्या निमित्ताने चंदगडी ही मराठीची एक वैशिष्ट्यपूर्ण आणि स्वतंत्र बोली असल्याचे देवीसरांसह अनेकांचे अभिप्राय आले. ही बोली सर्वदूर परिचित झाली. त्यामुळे चंदगडी बोलीची यथोचित नोंद घेण्याचे पहिले श्रेय 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण'ला आहे.

दरम्यान राज्य मराठी विकास संस्थेने भाषाविकास संशोधन संस्थेकडे 'चंदगडी बोलीचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास' हा प्रकल्प सोपवला. भाषाविकास संशोधन संस्थेने प्रकल्पाची संपूर्ण जबाबदारी माझ्याकडे दिली. त्यामुळे जवळपास २०१२ पासून सुरू असलेल्या कामाला गती मिळाली. यानिमित्ताने चंदगडी बोलीचा सविस्तर अभ्यास करता आला. समाजभाषावैज्ञानिक अभ्यासपद्धती बोली अभ्यासासाठी अधिक फलदायी ठरू शकते, याचा प्रत्यय या प्रकल्पातून आला. कोणतीही बोली ती बोलणाऱ्या भाषकांच्या संदर्भातच अभ्यासावी लागते. बोली ही समाजाची निर्मिती असल्याने समाज-संस्कृतीचा बोलीच्या घडणीतील सहभाग त्यातून उलघडता येतो. चंदगडी बोली ही कोल्हापूर जिल्ह्यातील एका टोकाला असलेल्या चंदगड परिसरात बोलली जाते. या प्रदेशाला कर्नाटक, गोवा या राज्यांच्या आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याची सीमा लाभली आहेत. शिवाय हा प्रदेश गोवा आणि तळकोकणच्या घाटमाथ्यांवर वसलेला असल्याने भौगोलिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण आहे. अशा स्थानामुळेच या प्रदेशाला एक इतिहास लाभला आहे. पर्यायाने या सर्वाचा परिपाक येथील बोली घडण्यात झाला. या घडणीचा शोध हा या अभ्यास प्रकल्पाचा एक उद्देश होता.

अशा वैशिष्ट्यपूर्ण प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या बोलीचा अभ्यास समाजभाषाविज्ञानातील विविध संकल्पनांच्या परिप्रेक्ष्यात केलेला आहे. त्यातून या बोलीचा विस्तृत आणि सूक्ष्म अभ्यास करता आला. चंदगडी बोलीच्या प्रदेशातील लोकांचा भाषासंपर्क कानडी, गोमंतकीय कोकणी, मालवणी-कुडाळी अशा भिन्न भाषा बोली बोलणाऱ्या लोकांशी आहे. शिवाय येथील ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहता इंग्रजी, पोर्तुगीज, फारसी भाषांचाही संपर्क या प्रदेशाशी राहिला आहे. त्यातून पडलेला प्रभाव या अभ्यासात सूक्ष्मपणे मांडता आला. एकूणच या प्रकल्पाच्या निमित्ताने बोली अभ्यासासाठीचे एक प्रारूप तपासून पाहण्याचा प्रयत्न केला आहे. एका वर्षाच्या मुदतीत हा अभ्यास पूर्ण करणे तारेवरची कसरत होती. परंतु, बोलीच्या संकलनासाठी भाषाविकास संशोधन संस्थेच्यावतीने रणधीर सुतार, परसू गावडे, हणमंत पाटील, डॉ. अरविंद शेनोळकर, रामदास बिर्जे, संजय साबळे, बी. एन. पाटील, विश्वास पाटील, अवधूत भोसले, भारत गावडे, सचिन पाटील आणि इंद्रजीत मोरे यांनी सहकार्य केले. त्यामुळे या प्रकल्पाचे काम वेळेत पूर्ण होऊ शकले.

हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अनेकांचे हात लागले आहेत. त्यामध्ये राज्य मराठी विकास संस्थेचे तत्कालीन प्रभारी संचालक डॉ. आनंद काटीकर यांचे बहुमोल सहकार्य लाभले. सध्या संचालक म्हणून कार्यरत असलेले संजय कृष्णाजी पाटील यांनी प्रकल्पाबद्दल आस्थेने चौकशी केली. परीक्षण समितीच्या सूचनांचा विचार करून हा प्रकल्प योग्य ते बदल करून नव्याने सादर करण्यासाठी त्यांनी बहुमोल सहकार्य केले. प्रत्यक्ष लेखन सुरू असताना अनेक कामांमध्ये माझे

विद्यार्थिमित्र डॉ. तेजस चव्हाण आणि डॉ. आप्पासो बुडके यांनी हरतऱ्हेची मदत केली आहे. अनेक लहानसहान कामांना त्यांनी हात दिला. आदरणीय गुरुवर्य राजन गवस, डॉ. रमेश वरखेडे, डॉ. दिलीप धोंगडे आणि प्रवीण बांदेकर यांच्या सूचनांमुळे अभ्यासाला दिशा मिळाली. शिवाय डॉ. प्रमोद मुनघाटे, डॉ. अनिल गवळी, डॉ. रणधीर शिंदे आणि डॉ. अवनीश पाटील यांनी अभ्यासाला प्रोस्ताहन दिले. डॉ. अवनीश पाटील यांनी चंदगड प्रदेशातील अनेक ऐतिहासिक संदर्भ पुरवले. त्यामुळे कामाला गती मिळाली. तसेच या संशोधनकामी अनेकांचे अप्रत्यक्ष सहकार्य मिळाले आहे. प्रकल्पासाठी सहकार्य केलेल्या अशा प्रत्येकाच्या ऋणात राहणे मला आवडेल.

**- डॉ. नंदकुमार मोरे**

**संशोधन संस्था**

भाषाविकास संशोधन संस्था, हलकर्णी,
ता. चंदगड, जि. कोल्हापूर : ४१६५५२

**बोली संकलन साहाय्य**

रणधीर सुतार, परसू गावडे, हणमंत पाटील, रामदास बिर्जे, संजय साबळे, बी. एन. पाटील, विश्वास पाटील, भारत गावडे, सचिन पाटील आणि डॉ. अरविंद शेनोळकर

# अंतरंग

दोन शब्द... । सात
बोली अभ्यास । ११
चंदगड : समाज, संस्कृती आणि भाषा । ३६
चंदगडी बोली : भाषिक भांडार आणि लघुक्षेत्रे । ५०
चंदगडी बोली : भाषाव्यवहार । ७५
चंदगडी बोली : भाषासंपर्क । ९४
चंदगडी बोली : उच्चारण आणि व्याकरण । ११३
उपसंहार । १३२

**परिशिष्टे**

संदर्भग्रंथ सूची । १३७
वाक्प्रचार । १३९
नकाशे । १४७
प्रश्नावली । १४९
परिभाषा सूची । १५१

॥ एक ॥

# बोली अभ्यास

अलीकडची दीडदोनशे वर्षे आधुनिक भाषाभ्यासाच्या वाटचालीत फार महत्त्वाची आहेत. कारण या काळात भाषेबद्दलचे काही मूलभूत प्रश्न निकाली निघाले. यापैकी एक महत्त्वाचा प्रश्न, जगभरातील माणूस इथूनतिथून सारखा असूनही तो सर्वत्र एकसारखी भाषा का वापरत नाही, हा होता. तर याच्या नेमका उलटा प्रश्न, परस्परांपासून शेकडो मैल दूर राहणाऱ्या माणसाच्या परस्परभिन्न भाषांमध्ये काही साम्यस्थळे कशी दिसतात?, अशा काही प्रश्नांच्या सोडवणुकीपर्यंत हा प्रवास झाला. भाषेसंदर्भातील अशा अनेक प्रश्नांची उकल माणसाने आपल्या बुद्धिसामर्थ्याने करायला सुरुवात केली. इ.स.पूर्व कालखंडातील पाणिनींसारखे अपवाद वगळता भाषेबद्दलचा सारा अभ्यास तर्क, अनुमानावर चालला होता. विसाव्या शतकामध्ये हा अभ्यास आणि भाषेबद्दलचे संशोधन मात्र वैज्ञानिक संशोधनाच्या कोटीला जाऊन पोहोचले. त्यासाठी अठराव्या शतकाच्या शेवटी म्हणजे २ फेब्रुवारी, १७८६ रोजी कलकत्त्याला एशिॲटिक सोसायटीमध्ये सर विल्यम जोन्स या विद्वानाने दिलेले भाषण महत्त्वाचे ठरले. या भाषणात जोन्स यांनी युरोपातील ग्रीक, लॅटिन, मध्य आशियातील अवेस्तन, फारसी, भारतातील संस्कृत या एकमेकींपासून भौगोलिकदृष्ट्या दूर असणाऱ्या भाषांमध्ये साम्यस्थळे का आहेत, याचे तर्कसुसंगत उत्तर दिले. ज्यामुळे जगभरात नव्या दृष्टिकोनातून भाषाभ्यासाची सुरुवात झाली आणि ऐतिहासिक भाषाभ्यासाचा पाया घातला गेला. दिनेश माहुलकर याबद्दल असे म्हणतात, ‘जोन्स यांनी मांडलेली ही उपपत्ती आधुनिक भाषाविज्ञानाची कोनशिला बनली. इतकेच नव्हे तर आधुनिक तत्त्वज्ञानातील एका महत्त्वाच्या ज्ञानमीमांसेची ती जननी ठरली आहे.’(दिनेश माहुलकर : २०००, पृष्ठ ६) या भाषणापासून आजअखेर भाषाभ्यासात झालेली स्थित्यंतरे थक्क करणारी आहेत. तथापि, जवळजवळ १९६० पर्यंत भाषाभ्यासकांचे सारे लक्ष भाषांच्या ऐतिहासिक, तौलनिक अभ्यासावर आणि पुढे फेर्दिनां द स्योस्यूर यांच्या भाषाभ्यासाबाबत क्रांतिकारी मांडणीनंतर भाषेच्या व्यवस्थेवर केंद्रित झालेले दिसते. भाषाभ्यासाची थक्क करणारी ही सारी वाटचाल गतीने विकसित झालेल्या ‘भाषाविज्ञान’(Linguistics) या अभ्यासशाखेत अभ्यासली जाते.

भाषाविज्ञानाची वाटचाल पाहता अभ्यासकांचे लक्ष प्रामुख्याने प्रमाणभाषांवर केंद्रीत झालेले दिसते. याची दोन कारणे असल्याचे रमेश धोंगडे सांगतात, ‘एक, भाषाविज्ञानाच्या क्षेत्रात काम करणारे अभ्यासक प्रमाण भाषा बोलणारे होते. दोन, प्रमाण भाषेच्या अभ्यासाची जास्त निकड वाटली आणि त्याला प्रतिष्ठाही जास्त होती.’(रमेश धोंगडे : २००६, पृष्ठ १५१) त्यामुळे भारतासह जगभरात प्रमाण भाषांची व्याकरणे लिहिली गेली. ज्या प्रमाणात प्रमाण भाषांची व्याकरणे लिहिली गेली, त्या प्रमाणात बोलींची व्याकरणे लिहिली गेली नाहीत. समाजात बोलींना असणारी अप्रतिष्ठा आणि प्रमाण भाषेच्या अभ्यासात असलेला व्यावहारिक दृष्टिकोनही याला कारणीभूत होता. तथापि, भाषाविज्ञानाच्या विकासातूनच बोलीच्या अभ्यासाला पार्श्वभूमी तयार झाली. जी पुढे बोलींच्या अभ्यासाला पुरक ठरली. त्यातूनच प्रमाण भाषांबरोबर बोलींचाही अभ्यास सुरू झाला आणि बोलीअभ्यासातून भाषाभ्यासाची दिशा बदलत गेली. इ. स. १८७६ ला एडवर्ड सैव्हर्स (Eduard Sievers) या भाषाभ्यासकाने भाषेतील उच्चारांचा सूक्ष्म विचार करणारा *Elements of Phonetics* हा ग्रंथ लिहिला. मूळ जर्मन भाषेतील हा ग्रंथ भाषाभ्यासासाठीचे महत्त्वाचे तंत्र ठरला. याच दरम्यान नवव्याकरणकारांनी ‘ध्वनी परिवर्तनाचे नियम निरपवाद असतात’, हे सूत्र मांडले. या तत्त्वांचा बोलीअभ्यासासाठी उपयोग महत्त्वपूर्ण ठरला. बोलीअभ्यासाचा प्रारंभ यातून झाला असे दिसते. या मांडणीनंतर बोली तिच्या प्रमाणभाषेपासून आणि इतर बोलीपासून कशी वेगळी आहे, याचा विचार



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

होऊ लागला. त्यातून समोर येणारे वेगळेपण हेच बोली अभ्यासाचे क्षेत्र बनत गेले. प्रारंभी भाषा आणि बोली यामधील फरक अधोरेखित करण्याचा प्रयत्न झाला. परंतु, या दोन्हीमध्ये सीमारेषा आखता येते का, हाही विचार प्रारंभीच्या अभ्यासात झालेला दिसतो.

वरती म्हटल्याप्रमाणे भाषाभ्यासात बोलीपेक्षा प्रमाणभाषांचा अभ्यास केंद्रवर्ती होता याचे कारण बोलीबद्दलचे गैरसमज आणि अप्रतिष्ठा हे आहे. अप्रतिष्ठित, मागास समाजाची भाषा म्हणजे बोली असाही दृष्टिकोन बोलीकडे पाहाण्याचा होता. शिवाय बोलीला एखाद्या भाषेची पोटभाषा म्हटले जात होते. बोलीकडे समाज कसे पाहात होता यासंदर्भात ना. गो. कालेलकर लिहितात, 'पोटभाषा म्हणजे शुद्ध व प्रमाणभूत भाषेचे अपभ्रष्ट स्वरूप, संस्कारहीन मागासलेल्या लोकांनी शुद्ध भाषेला दिलेले विकृत आणि रोगट रूप, असा समज बहुतेक सर्व समाजांत पूर्वी होता. म्हणून व्याकरणाच्या आणि शिक्षणाच्या द्वारे शुद्ध भाषेचा प्रसार करणे हे काही लोक आपले कर्तव्य मानतात' (ना. गो. कालेलकर, १९८५ : पृष्ठ ६८) त्यामुळे प्रारंभीच्या काळात बोली अभ्यास मागे पडला. बोलीचा अभ्यास सुरू झाला तेव्हा प्रथम भाषा आणि बोलीतील भेद स्पष्ट करणे अभ्यासकांना आवश्यक वाटू लागले. त्यादृष्टीने अभ्यासकांनी प्रयत्न केले. परंतु, संकल्पना म्हणून दोन्हीमध्ये विशेष फरक सांगण्यासारखा नसला तरी, भाषा आणि बोलीमधील अंतर खूपच गुंतागुंतीचे असून ते स्पष्ट करण्यासंदर्भात अनेक अडचणी आहेत, हे अभ्यासकांच्या लक्षात येऊ लागले.

प्रमाण भाषा ही एक कल्पनाच असते, हेही अभ्यासकांच्या ध्यानात आले. कारण ज्या समाजाची बोली प्रमाणभाषा या मान्यतेला पोहोचलेली असते, त्या समाजातील सर्व लोक सर्वकाळी एकच भाषा वापरत नाहीत. तेही दैनंदिन व्यवहारात भाषेची अनेक रूपे वापरतात. कार्यालयांमध्ये, घरी, मित्रमंडळीत त्यांचीही भाषा एकसारखी नसते. म्हणजे ज्यांची भाषा प्रमाणभाषा म्हणून ओळखली जाते, तेही ती सर्वत्र वापरत नाहीत. याचा अर्थ प्रमाणभाषा ही कोणाचीच भाषा नसते. ती केवळ व्यापक व्यवहाराचे, व्यापक संपर्काचे साधन असते. बोली मात्र ना. गो. कालेलकर म्हणतात तसे,'दैनंदिन व्यवहाराचे स्वाभाविक साधन आहे. परिस्थितीला अनुरूप अशा भाषिक सामग्रीचा ती उपयोग करते. मुखपरंपरेने आल्यामुळे तिच्या अंगी एक प्रकारचा जिवंतपणा असतो. ती साधी पण परिणामकारक असते. आपले रूप प्रतिष्ठेच्या आरशात पाहून इतरांना ते आकर्षक वाटेल असे करण्याचा प्रयत्न करायला तिला वेळ नसतो. तिची स्वाभाविकता हेच तिचे वैशिष्ट्य. काहींना ते मोहक वाटेल, काहींना ते ओंगळ वाटेल. हा ज्याच्यात्याच्या मनोवृत्तीचा आणि संस्कारांचा प्रश्न आहे.' (ना. गो. कालेलकर, १९८५ : पृष्ठ ७०) भाषा आणि बोलीसंदर्भातील अभ्यासकांची चर्चा पाहता, भाषा आणि बोली ही नावे त्यांच्या राजकीय, सामाजिक कार्यावर ठरत असल्याचे दिसते. भाषा बोलणाऱ्या समाजाचा सामाजिक, राजकीय दर्जा काय आहे, यावर त्यांच्या भाषेचा दर्जा आणि कार्यक्षेत्र ठरते. भारतात इंग्रजी भाषेने मिळवलेले स्थान यासंदर्भात उदाहरण म्हणून पाहता येईल.

वास्तविक पुढारलेल्या आणि मागास समाजाची भाषा असा विचार करताना पुढारलेला आणि मागास समाज कसा ठरवायचा, हाही प्रश्न महत्त्वाचा आहे. आधुनिक शिक्षण घेऊन नोकरीधंदा करणाऱ्यांना पुढारलेले आणि जे शिक्षणाच्या प्रवाहात आले नाहीत ते मागास, असा समज सार्वत्रिक झालेला आहे. वास्तविक पारंपरिक ज्ञानाची समृद्धता असलेले परंतु, शिक्षणाच्या प्रवाहात न आलेले समाज मागास हे कोणत्या निकषावर ठरवायचे. अलीकडील काही वर्षांमध्ये परंपरेला, जुन्या गोष्टींना, पारंपरिक ज्ञानसंचिताला महत्त्व प्राप्त झालेले आहे. पाश्चात्त्य समाजाच्या अंधानुकरणातून आपण आपल्याच ज्ञानाला मागास ठरवले. त्यांच्या प्रभावात येऊन आपल्या भाषा टाकून दिल्या. त्यांची भाषा स्वीकारली. त्यातूनच बोली पंगू होण्याची प्रक्रिया सुरू झाली. वास्तविक आपली बोली आपल्या जगण्याचा आधार असते. ती अनेक गोष्टी आपल्याला शिकवते. जगाचे ज्ञान करून देते. वास्तू, कल्पनांची ओळख करून देते. त्यामुळे आपली बोलीच आपली जडणघडण करीत असते. त्यामुळेच बोली अभ्यासाची गरज आहे, हे लक्षात येते.

बदलत्या जीवनप्रवाहात बोली मागे पडण्याची अनेक कारणे आहेत. त्यामध्ये शिक्षणाचा सर्वदूर झालेला प्रसार, नवनवीन नोकरीउद्योगांचा उदय, पारंपरिक उद्योग-व्यवसायाबद्दलचे बदलते दृष्टिकोन अशा अनेक गोष्टी कारणीभूत आहेत. त्यामुळे बदलत्या जीवनाबरोबर बोली बदलणार, नष्ट होणार ही त्यांची नैसर्गिक प्रक्रिया आहे, असे समाज मानतो. बोलींमध्ये बदल

होणे हा तिचा नैसर्गिक धर्म आहे. परंतु, तिच्या स्वरूपाचा आणि बदलांचा अभ्यास का गरजेचा आहे, हेही समजून घेणे फार महत्त्वाचे आहे. बोलींच्या अभ्यासामुळे समाजातील अनेक घटकांची ओळख करून घेण्यास मदत होते. समाजाची ओळख करून घेण्यासाठी त्यांची बोली हे सर्वात महत्त्वाचे साधन असते. म्हणूनच समाजाच्या जीवनपद्धती आणि सवयी समजून घेण्यासाठी बोली अभ्यास आवश्यक आहे. विशिष्ट वर्गाचे, समूहाचे लोक कसे जगतात, त्यांची खाद्यसंस्कृती कशी आहे, पोशाख कोणता, ते आपला चरितार्थ कसा चालवितात, त्याची कुटुंबपद्धती कशी आहे, त्यांच्या विविहसंस्थेचे स्वरूप कसे आहे, जातीतील परस्पर व्यवहार कसे चालतात, याबरोबरच रूढी, परंपरा, श्रद्धा आणि एकूणच त्यांची संस्कृती समजून घेण्यासाठी बोलीचा अभ्यास महत्त्वाचा असतो.

बोलीचे मानवी जीवनातील स्थान सहज लक्षात येत नाही. वास्तविक आपले भरणपोषण आपल्या आजूबाजूच्या मौखिक वाङ्मयावरच चाललेले असते आणि हे वाङ्मय बोलीत असते. यादृष्टीने बोलीकडे पाहिले गेले नाही. अद्यापही पाहिले जात नाही. त्यामुळे बोलीवर प्रमाणभाषेचे आक्रमण वाढत गेले. तिची प्रतिष्ठा सतत कमी कमी होत गेली. वास्तविक तिचे अंतकरण अभ्यासकांनी वेळीच समजून घेतले असते, तर अनेक बोली आज मृत्यूपंथाला लागल्या नसत्या. त्यातून मानवी संस्कृतीचा, मानवाच्या आदिम वाटचालीचा एक इतिहास गडप झाला नसता. यादृष्टीने प्रस्तुत पुस्तकात चंदगडी बोलीची चर्चा करायची आहे. ही बोली कर्नाटक, गोव्याच्या सीमेवर आणि कोकणच्या घाटमाथ्यावर विस्तृत प्रदेशात बोलली जाते. या बोलीचे संकलन, विश्लेषण अद्याप अप्रकाशित आहे. त्यामुळे या बोलीचे स्वरूप समाजभाषावैज्ञानिक दृष्टिकोनातून समजून घेण्याचे उद्दिष्ट आहे. त्यादृष्टीने तिचे स्वरूप समजून घेऊ.

**प्रमाण भाषा आणि बोली**

प्रमाण भाषा ही व्यापक व्यवहाराची सोय असते. तर बोली अभिव्यक्तीचे माध्यम असतात. दैनंदिन जीवनात बोलींचा वापर होतो. तर औपचारिक कामांसाठी प्रमाण भाषा वापरली जाते. कोणत्याही समाजाची बोली एक सामाजिक-सांस्कृतिक संचित असते. बोलीतूनच आपल्या परंपरा, श्रद्धा, रीतीरिवाज पुढील पिढीकडे संक्रमित होतात. जागतिकीकरणानंतर बदलणारा समाज विचारात घेतला तर अनेक बोलींचे अस्तित्व धोक्यात असल्याचे दिसते. त्यामुळे बोली अभ्यासाला एक सांस्कृतिक महत्त्व आहे. बोलींच्या अभ्यासातून सांस्कृतिक विविधता, चालीरीती, जीवनपद्धती, भौगोलिक विविधता इत्यादीच्या अनुषंगाने नवी माहिती उपलब्ध होते. अनेक नवीन शब्दांची, म्हणी, वाक्प्रचारांचा परिचय होतो. हा परिचय प्रमाण भाषेच्या विकासाला चालना देणारा असतो.

बोलीला 'पोटभाषा' असे देखील म्हटले जाते. पोटभाषा असे म्हणताना बोलीचा समावेश कोणत्यातरी भाषेत होतो हे सूचित होते. भाषा ही कालपरिमाणाच्या अंगाने जशी अभ्यासता येते तशी भूगोलाच्या अंगानेही अभ्यासता येते या विचारातून एकोणीसाव्या शतकात बोलीभूगोलाची (Dialect Geography) परंपरा विकसित झाली. याची चर्चा पुढे करणारच आहोत. ज्या भाषेला आपण मराठी म्हणून ओळखतो, तिला आजचे रूप प्राप्त होण्यासाठी अनेक संक्रमणातून जावे लागले आहे. अनेक भाषा-बोली, संस्कृती यांचे ऋण घेऊनच तिला आजचे रूप आणि सामर्थ्य प्राप्त झालेले आहे. मराठी भाषेचे प्रमाणभाषा म्हणून जे रूप ओळखले जाते, ती पूर्वाश्रमीची पुणेरी बोली होय. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय वर्चस्व आणि तिला लाभलेली भौगोलिक पार्श्वभूमी इत्यादी कारणांमुळे ही बोली 'प्रमाणभाषा' या मान्यतेपर्यंत पोहोचली. एखादी बोली प्रमाणभाषा या मान्यतेपर्यंत कशी पोहोचते, या प्रक्रियेचा शोधही समाजभाषाविज्ञानाच्या कक्षेत येतो. महाराष्ट्र हे बहुसंख्येने मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचे राज्य आहे. मराठी भाषा असे म्हणताच आपल्यासमोर जे रूप येते, ते मराठीचे 'प्रमाण' म्हणून मान्यता मिळालेले रूप होय. तथापि संपूर्ण महाराष्ट्रामध्ये व्यवहारात सर्वत्र मराठीचे हे एकच रूप वापरले जात नाही. महाराष्ट्राच्या विस्तृत भूमीवर मराठीची अनेक बोलीरूपे अस्तित्वात आहेत. त्याचबरोबर एका विशिष्ट प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या बोलीमध्येही त्या प्रदेशातील सामाजिक-भौगोलिक वैशिष्ट्यांनुसार विविध भेद आढळतात.

भौगोलिक, सांस्कृतिक, राजकीय परिस्थिती, शासन, भाषिक प्रदेशाला असलेली ऐतिहासिक पार्श्वभूमी इत्यादी विविध कारणांनी एकाच भाषेची भिन्न-भिन्न रूपे निर्माण होतात. भौगोलिक दृष्टीने एकसारख्या प्रदेशामध्ये जाती, धर्म,

व्यवसाय इत्यादी कारणांनी भाषा बदलताना दिसते. यासंदर्भात तळकोकणातील कोकणी बोलीचे उदाहरण घेता येईल. कोकणीच्या दक्षिण कोकणी पोटभेदामध्ये जाती धंद्यानुसार; आगरी, भंडारी, धनगरी, कऱ्हाडी, किरिस्ताँव, कोळी, कुणबी, परभी, ठाकरी इत्यादी भेद दिसतात. त्याचबरोबर भिन्न भाषासंपर्क, भौतिक विकास, नागरीकरण, परकीय आक्रमणे, राज्यक्रांती, भूकंप, दुष्काळ, महापुरासारख्या नैसर्गिक आपत्ती, नव्या गोष्टीचा ध्यास, माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा झपाट्याने होणारा विकास, शिक्षण अशा किती तरी कारणांनी भाषा-बोली नेहमी बदलत राहातात. गोव्यात आलेल्या पोर्तुगीजांमुळे तेथील कोकणीत झालेले अमूलाग्र बदल आणि पोर्तुगीजांनी सुरू केलेल्या धर्मछळाच्या काळात (inquisition period) स्थलांतरित झालेल्या लोकांमुळे सीमावर्ती प्रदेशातील भाषा-बोलींवर झालेले परिणाम चंदगडी बोलीच्या संदर्भाने पुढे आपण पाहणार आहोतच. भाषा ही स्वयंसिद्ध सामाजिक संस्था असल्यामुळे बदलत्या समाजजीवनाबरोबर ती बदलत राहते. त्यामुळे 'बदलणे' हा प्रत्येक विकसनशील भाषेचा नैसर्गिक गुणधर्म बनला आहे. मराठी ही देखील अशा परिवर्तनाच्या प्रक्रियेतूनच उत्क्रांत झालेली भाषा आहे. तथापि, परिवर्तन हा भाषेचा नैसर्गिक गुणधर्म असला तरी, हे परिवर्तन विशिष्ट भाषा बोलली जाणाऱ्या प्रदेशामध्ये सर्वत्र एकसारख्या पद्धतीने होत नाही. म्हणूनच एका भाषेमध्ये अनेक स्थानिक भेद पाहावयास मिळतात. हे भेद बऱ्याचवेळा एवढे वैशिष्ट्यपूर्ण आणि त्या प्रदेशाची स्वतंत्र वैशिष्ट्ये घेऊन तयार झालेले असतात की, तिला त्यामुळे स्वतंत्र बोलीचे रूप प्राप्त होते.

बोली या जीवनव्यवहाराचे माध्यम असतात. त्यामुळे प्रमाणभाषेच्या तुलनेत त्या अधिक जिवंत वाटतात. चैतन्यमय असे त्यांचे स्वरूप असते. झऱ्याच्या ताज्या पाण्याचा खळाळ त्यांच्यामध्ये असतो. त्यामानाने प्रमाणभाषा रूक्ष वाटतात. त्यांच्यामध्ये एकप्रकारची स्थिरता आलेली असते. नवे बदल प्रमाण भाषा सहजासहजी स्वीकारत नाही. बोली जीवनाबरोबर प्रवाही राहात असल्याने त्या रसरशीत असतात. ऐकणाऱ्याला आकर्षक वाटतात. बोलीची उच्चारणे स्वाभाविक असतात. प्रमाणभाषा प्रमाणबद्धपणे उच्चारावी लागते. तिच्या लेखन, उच्चारणाचे नियम बनवलेले असतात. ती व्यापक व्यवहाराची भाषा बनल्याने हे नियम पाळणे बंधनकारक होते. बोलीचे तसे नसते. ती दैनंदिन व्यवहाराचे माध्यम असल्याने आणि केवळ बोलण्यासाठी वापरली जात असल्याने तिला अशी कृत्रिम बंधणे नसतात. हे वास्तव समोर ठेऊनच बोलीचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

**मराठीच्या बोली आणि बोली अभ्यासाची पूर्वपीठिका**

मराठी ही सुमारे अकरा कोटीहून अधिक लोकांची भाषा आहे. ती व्यवहार, ज्ञाननिर्मिती, साहित्यनिर्मिती, शिक्षण अशा कोणत्याही बाबतीत मागे नाही. महाराष्ट्र हे बहुसंख्येने मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचे राज्य आहे. परंतु, ही मराठी म्हणजे आपण ज्या भाषेला प्रमाण मराठी म्हणतो ती नाही. समाजात प्रत्यक्ष अस्तित्वात असतात, त्या भाषेच्या बोली. यासंदर्भात ना. गो कालेलकर लिहितात, 'भाषा अशी स्वतंत्रपणे नसतेच. खरे अस्तित्व असते ते बोलींनाच. निरनिराळ्या ठिकाणच्या, निरनिराळ्या जातींच्या, निरनिराळ्या व्यवसायांच्या, कोणत्या तरी कारणांने वारंवार एकत्र येणाऱ्या मानवसमुहाच्या, स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या, वृद्धांच्या आणि मुलांच्या बोलींना. स्थलभिन्नत्वामुळे ज्याप्रमाणे बोलींचे स्वरूप बदलते त्याचप्रमाणे एकच व्यक्ती निरनिराळ्या समूहांत वावरतानाही तिच्या भाषेत वेगवेगळ्या छटा दिसून येतात. कारण जीवनच असे लवचिक आहे. आणि जीवनप्रवाह अखंड राहून सुसह्य करणाऱ्या व्यवहाराचे जे अपरिहार्य साधन भाषा तीही याचमुळे टणक, सर्वत्र सारखी असू शकणार नाही. कारण ती तशी असेल तर अखंड गतिमान आणि विविधतामय मानवी जीवनाचे यथार्थ चित्रण तिला करता येणार नाही, एवढेच नव्हे तर नित्याचे व्यवहारही चालवणे तिला अशक्य होईल.'(ना. गो. कालेलकर, १९९९, पृष्ठ ६४) त्यामुळेच मराठी भाषेच्या संदर्भातही भाषेची अनेक रूपे अस्तित्वात असल्याचे दिसतात. वरती उल्लेखिलेल्या महाराष्ट्रातील कोकण, मराठवाडा, खानदेश, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र या पाच विभागांमध्ये व्यवहारात सर्वत्र मराठीचे एकच रूप वापरले जात नाही. महाराष्ट्राच्या विस्तृत भूमीवर मराठीची अनेक बोलीरूपे अस्तित्वात आहेत. त्याचबरोबर एका विशिष्ट प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या बोलीमध्येही त्या प्रदेशातील जाती, धर्म, आर्थिक स्तर आणि व्यवासायांनुसार म्हणजेच सामाजिक-भौगोलिक वैशिष्ट्यांनुसार विविध भेद आढळतात. यापुढे जावून बोलीचा सूक्ष्म विचार केल्यास, बोलीरूप


मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

व्यक्तिगणिक भिन्न असल्याचे दिसून येते. एखाद्या भाषेच्या बोलींचा अभ्यास हा अभ्यासकांसमोरील आव्हान असतो. कारण बोली निर्माण होण्याची कारणे अनेक असतात. बोली ही प्रमाणभाषेपेक्षा कितीतरी अधिक परिवर्तनशील असते. त्यामुळे समाजातील बदल ती नैसर्गिकपणे स्वीकारताना दिसते. महाराष्ट्रभर मराठीच्या सत्तरहून अधिक बोली आहेत. यापैकी काही बोलींचा अभ्यास झाला आहे. तर काही बोली अद्याप प्रकाशातही आलेल्या नाहीत. परंतु, अलीकडच्या काही वर्षांमध्ये खेडोपाडी वास्तव्य असलेल्या अनेक जाती-धर्मातील, विविध धंदा-व्यवसाय करणाऱ्या लेखकांकडून आणि काही जमातीमधील सुशिक्षित लोकांच्याकडून साहित्यनिर्मितीची प्रक्रिया सुरू झालेली आहे. अशा वेगवेगळ्या स्तरातून लिहित्या झालेल्या लेखकांकडून या अप्रकाशित बोली सर्वांसमोर येत आहेत. त्याचबरोबर बोली अभ्यासाचे काही प्रकल्प हाती घेतले जात आहेत. मराठी भाषेचे स्वरूप ध्यानात यायचे असेल तर; तिच्या सर्वच बोलींचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

हा अभ्यास समाजभाषाविज्ञानाच्या परिप्रेक्ष्यामध्ये होऊ लागला, तर महाराष्ट्राची सांस्कृतिक विविधता, चालीरीती, जीवनपद्धती, भौगोलिक विविधता इत्यादीच्या अनुषंगाने नवी माहिती उपलब्ध होईल. अनेक नवीन शब्दांची, म्हणी, वाक्प्रचारांचा परिचय मराठी भाषेला होईल. पर्यायाने मराठी भाषेच्या विकासाला चालना मिळेल.

बोली अभ्यासांच्या पारंपरिक अभ्यासपद्धतींमध्ये बोलीचे केवळ संकलन होत असे. सर जॉर्ज ग्रिअर्सन यांनी केलेले मराठीच्या बोलींचे संकलन आणि अलीकडेच प्रकाशित झालेल्या 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण : महाराष्ट्र' या प्रकल्पांमध्ये बोलीचा अभ्यास हा त्या बोलीचा संक्षिप्त इतिहास, भौगोलिक नकाशा, भौगोलिक क्षेत्र, बोलीतून आविष्कृत होणारी लोकगीते, लोककथा याबरोबरच मूलभूत शब्दांचे म्हणजेच नातेसंबधवाचक, रंग, काळ-वेळ, ऋतू-दिनचर्या, महिने, अवयववाचक शब्द, अंक, वार, मोजमापवाचक शब्द, सर्वनाम आणि क्रियापदे अशा शब्दांचे संकलन केलेले आहे. या अभ्यासातून महाराष्ट्रातील बोलीभाषांचे एक चित्र प्रथमच एकत्रितपणे समोर आलेले आहे. परंतु, हे काम केवळ संकलनाच्या पातळीवर थांबलेले दिसते. या कामाने महाराष्ट्रातील अनेक अलक्षित बोलींची पद्धतशीर नोंद घेतली. वास्तविक बोलींच्या अभ्यासात बोलीचे समाजभाषावैज्ञानिक विश्लेषण महत्त्वाचे ठरते. या विश्लेषणातून ती बोली बोलणाऱ्या समाजाविषयी, त्या समाजाच्या परंपरांविषयी, रूढी-प्रथा आणि एकूणच जीवनाविषयी बरीच माहिती हाती लागते. त्यामुळे तिचे विश्लेषण होणे आवश्यक आहे. असे विश्लेषण झाले तरच प्रमाण भाषेच्या विकासात बोली साहाय्यक ठरू शकतात. म्हणजेच झालेल्या अभ्यासाचे उपयोजन शक्य होते.

समाजभाषाविज्ञानामध्ये भाषेचा अभ्यास सामाजिक भेदांना समोर ठेऊन केला जातो. उच्चारण, शब्दसंग्रह इत्यादी संदर्भातील चिकित्सा सामाजिक भेदांना समोर ठेऊन होते. यापैकी उच्चारणाचा म्हणजेच पराखंडकीय तत्त्वांचा विचार आजअखेर बोली अभ्यासात फारच त्रोटक झालेला आहे. आतापर्यंत झालेल्या बोली अभ्यासात शब्दसंग्रह आणि व्याकरणिक वैशिष्ट्यांवर विशेष भर देण्यात आलेला आहे. वास्तविक उच्चारण हे बोलीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. बोलीचे वेगळेपण सकृतदर्शनी उच्चारणावरूनच ठरत असते. त्यामुळे बोली अभ्यासात उच्चारणाचा विचारही झाला पाहिजेत. कारण उच्चारणांचा आणि भौगोलिक परिस्थितीचा जवळचा संबंध आहे. समाजभाषाविज्ञानाच्या दृष्टीने बोलीचा अभ्यास केल्यास विशिष्ट बोली बोलणारा समाज आणि त्या समाजाची सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी, परंपरा सारेच अभ्यासकांना उपलब्ध होते. त्यादृष्टीने येथे चंदगडी बोलीची चर्चा करू.

समाज गट आणि जाती, व्यवसायांनुसार बदलणाऱ्या भाषेचे भान देणारे चिंतन याआधीही मराठीत सुरू होते. विसाव्या शतकाच्या प्रारंभीच हा विचार काही विद्वान मराठीत करताना दिसतात. प्रारंभी वि. का. राजवाडे यांनी आपल्या 'प्राकृतिक भाषांचा व वाङ्मयाचा इतिहास' या लेखातून भाषा अभ्यासाची आणि भाषेचा इतिहास लिहिण्याची एक व्यापक दृष्टी दिलेली होती. मराठी भाषेच्या अभ्यासासंदर्भात लिहिताना ते, 'महाराष्ट्री भाषेला प्राकृत म्हटलें म्हणजे तिजपासून निघालेल्या अपभ्रंशांना आम्ही प्राकृतिक म्हणतो. प्राकृतिक भाषा म्हणजे नागर मराठी भाषा आणि महाराष्ट्रांतील इतर प्रांतिक व जातिक मराठी भाषा. ह्या सर्व भाषांचा इतिहास म्हणजे मराठी प्राकृतिक भाषांचा इतिहास.' (लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), १९५८ : पृष्ठ ९६) असे सांगतात. ते पुढे भाषेच्या अभ्यासात 'ज्या समाजांत, संस्कृतींत व हवापाण्यांत मातृभाषा जन्मली व वाढली त्या समाजाहून, संस्कृतीहून किंवा हवापाण्याहून निराळ्या परिस्थितींत अपत्यभाषा जन्मल्यामुळे व वाढल्यामुळें अपत्याचें रूप कसें व किती बदललें वगैरे प्रश्नही याच इतिहासांत पडतात.' (लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), १९५८ : पृष्ठ १०१) असा विचार



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

नोंदवून या भाषेला असलेले समाज, संस्कृतीचे आणि इतिहास, भूगोलाचे संदर्भ विचारात घेतलेले आहेत. त्यामुळे तत्कालीन काळात लिहिले जाणारे भाषांचे इतिहास यासंदर्भाने लिहिले जावेत ही अपेक्षा राजवाडे यांनी व्यक्त केली आहे. त्यासाठी त्यांनी अभ्यास कोणत्या पद्धतीने प्रकरणे पाडून व्हावा हेही सांगितले आहे.

राजवाडे यांच्याप्रमाणेच श्री. म. माटे यांनीही भाषाभ्यासाची सामाजिक दृष्टी दिली. जी समाजभाषाविज्ञानाला जवळची आहे. त्यांनी १९४३ साली यासंदर्भाने 'भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टी' या शीर्षकाचा एक निबंध लिहून हा विचार स्पष्ट केला आहे. या निबंधामध्ये त्यांनी भाषेला असलेले सामाजिक, सांस्कृतिक आणि जातीधर्माचे संदर्भ, तसेच भाषेला असलेला इतिहास आणि भूगोलाचा संदर्भ विचारात घेऊन भाषांच्या घडणीची प्रक्रिया उलगडून दाखवली आहे. त्यांनी आपल्या निबंधाला दिलेले 'भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टी' हे शीर्षक बरेच बोलके आणि सूचक आहे. ते या संदर्भाने लिहितात, 'मराठी भाषेत शब्दांचा भरणा व्हावयास हवा असेल तर, निरनिराळ्या पेशातील, धंद्यातील रूपके भाषेत प्रविष्ट व्हावयास हवी; व ती प्रविष्ट करून देण्यास त्या त्या पेशातील, धंद्यातील माणसे वाङ्मयलेखनाच्या प्रांगणात उतरावयास हवी.' (श्री. म. माटे, १९६६ : पृष्ठ ४) त्यासंदर्भाने त्यांनी अनेक उदाहरणे दिली आहेत. 'धाबे दणाणले' असा शब्दप्रयोग आपण नेहमी करतो, पण या शब्दांमागचा संदर्भ आपण कधी विचारात घेत नाही. या शब्दाला असलेला सामाजिक संदर्भ स्पष्ट करताना ते लिहितात,"नगराकडे धाब्याची घरे असतात. वीज पडणे किंवा दुसरा कसला तरी उत्पात होणे याने जर वस्ती हादरली तर हे घरावरचे धाबे अर्थातच दणकणार. हा प्रकार लक्षात ठेवणाऱ्या कोणी रसिकाने आपत्तीमुळे किंवा भयामुळे नखशिखांत घाबरून गेलेल्या माणसाचे वर्णन करताना काव्यगुणाने म्हटले की, त्याचे धाबे दणाणून गेले."(श्री. म. माटे, १९६६ : पृष्ठ ३) याचबरोबर श्री. म. माटे यांनी चांभारवाड्यातील 'इंगा फिरवणे' सुतारखान्यातील 'ठिय्या' (ठिय्या देऊन बसणे) अशी काही निरनिराळ्या पेशातील उदाहरणे दिली आहेत. ही सर्व उदाहरणे पाहता, भाषा समाजाच्या संदर्भात कशी घडते याची प्रचिती येते. त्यामुळे भाषेचा अभ्यास असा समाजाच्या संदर्भाने केल्यास त्या भाषेचे अंतरंग अधिक नेमकेपणाने समोर येते. याबरोबर समाजाच्या अभ्यासाचे साधन म्हणूनही बोलीचा अभ्यास महत्त्वाचा असतो. याबाबतीत ना. गो. कालेलकर म्हणतात, 'समाजाच्या वेगवेगळ्या घटकांची ओळख करून घेणे, वेगवेगळ्या प्रदेशांत विखुरलेल्या समाजातील वर्गांची ओळख करून घेणे, म्हणजे त्यांच्या जीवनाचा, त्यांच्या सवयींचा अभ्यास करणे. अमुक ठिकाणचे, अमुक जातीचे, अमुक वर्गाचे लोक कसे वागतात, ते पोषाख कसा करतात, काय जेवतात, चरितार्थ कसा चालवतात, त्यांची कुटुंबपद्धती कशी आहे, त्यांच्या विवाहसंस्थेचे स्वरूप कसे आहे, शिक्षण, न्यायदान, जातींतील परस्परांचे व्यवहार, इत्यादी बाबतींत ते कोणत्या रूढी पाळतात, हा अभ्यास पुष्कळ लोक करतात; संस्कृतीच्या या सर्व अंगाचे स्वरूप ज्यातून व्यक्त होते त्या अपरिहार्य माध्यमाचा, म्हणजे भाषेचा अभ्यास मात्र कोणी करत नाही. ज्यांना आपण मागासलेले समजतो त्या धंद्यातील व्यक्तींच्या तोंडी असणारी शब्दसंपत्ती, जीवनानुभवाला व्यक्तकरण्यासाठी लागणाऱ्या साधनसामग्रीची समृद्धता, त्यांच्याजवळ जाऊन, त्यांच्याविषयी उत्सुकता दाखवून जर आपण पाहिली, तर आश्चर्य वाटल्यावाचून राहणार नाही. अशा रीतीने इतर गोष्टींबरोबर वेगळ्या स्वरूपाची भाषा-ध्वनी, शब्दसंपत्ती, शब्दप्रयोग, वाक्यरचना, या दृष्टींनीही वैशिष्ट्य असणारी भाषा-हेही संस्कृतीचे अंग असते.' (ना. गो. कालेलकर, १९९९ : पृष्ठ ६४) त्यामुळे भाषेचा आणि समाजाचा अभ्यास परस्परपुरक ठरतो. भाषेच्या माध्यमातून समाज आणि समाजाच्या माध्यमातून भाषेचे अंतरंग उलगडून पाहता येते.

**मराठीच्या बोली : पूर्वाभ्यास**

बोली अभ्यासाच्या इतिहासात सर जॉर्ज ग्रिअर्सन यांनी राबविलेला भारतीय भाषा आणि बोलींच्या अभ्यासाचा प्रकल्प सर्वात मोठा आणि महत्त्वपूर्ण असा आहे. सर जॉर्ज ग्रिअर्सन यांनी इ.स. १८९४ ते १९२८ या कालखंडात भारतीय भाषांच्या सर्वेक्षणाचा प्रकल्प पूर्ण केला होता. ग्रिअर्सन यांच्या सर्वेक्षणात भारतातील इतर भाषा, बोलींबरोबर मराठी आणि मराठीच्या बोलींचा सर्वप्रथम अभ्यास करण्यात आला. तो या प्रकल्पाचे नाव "Linguistic Survey of India' असे असून या प्रकल्पाच्या *'Volume VII, Indo-aryan family, southern group'* मध्ये हा अभ्यास *"Speicmens of the*


मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

*Marathi Language'* या नावाने १९०५ साली प्रकाशित झाला आहे. या अभ्यासामध्ये प्रत्येक बोलीचे भौगोलिक क्षेत्र, बोली बोलणाऱ्या लोकांची संख्या, काही भाषिक वैशिष्ट्ये याची नोंद घेऊन मूलभूत शब्दांचा विचार झाला. त्यामध्ये संख्यावाचक विशेषणे, नातेवाचक शब्द, अवयववाचक शब्द, सर्वनामे, क्रियापदे आणि काही वाक्ये अशा स्वरूपाचा हा अभ्यास आहे. तत्कालीन ब्रिटिश राज्यकर्त्यांना प्रशासकीय कामकाजात मदत व्हावी आणि ब्रिटिश सत्तेच्या प्रदेशातील भाषांचे एक चित्र समोर यावे म्हणून या कामाकडे पाहता येईल. अर्थात हा अभ्यास परिपूर्ण आहे असे नाही. तथापि, या प्रकल्पाचे भाषाभ्यासात एक ऐतिहासिक महत्त्व आहे.

याशिवाय मराठी भाषा आणि तिच्या बोलींसंदर्भात डॉ. अ. मा. घाटगे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने १९६२ साली हाती घेतलेला प्रकल्प आणि डॉ. शं. गो. तुळपुळे यांच्या पुढाकाराने पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाने हाती घेतलेला 'मराठी बोली कोश' हे दोन्ही प्रकल्प अपूर्ण राहिले. डेक्कन महाविद्यालयाचे भूतपूर्व संचालक सु. मं. कत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठीच्या बोलींचे संकलन आणि संशोधन झाले आहे. तर स्वतंत्रपणे झाडीबोलीचे संशोधन डॉ. हरिश्चंद्र बोरकर, पोवारी बोलीचे संशोधन डॉ. सु. बा. कुलकर्णी, खानदेशी बोलीचे संशोधन डॉ. विजया चिटणीस आणि नागपुरी बोलीचे संशोधन डॉ. व. कृ. वऱ्हाडपांडे यांनी केलेले आहे. अलीकडे सामवेदी, तावडी, वऱ्हाडी, खानदेशी, कोरकू, कातकरी, भिलाऊ, मालवणी, आगरी अशा बोलींचे अभ्यासही प्रकाशित झाले आहेत. त्याशिवाय स्वतंत्रपणे पीएच. डी. प्रबंधांच्या निमित्ताने काही बोलींचा अभ्यास झालेला आहे. यापैकी काही प्रबंध प्रकाशित झाले आहेत. मराठीच्या जवळपास सत्तर बोलींचा अभ्यास समाविष्ठ असलेला 'भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण' हा पूर्ण झालेला अलीकडचा एक महत्त्वाचा प्रकल्प आहे. बडोदा येथील 'भाषा संशोधन आणि प्रकाशन' संस्थेमार्फत संपूर्ण देशातील भाषा-बोलींचा अभ्यास करण्यात आलेला आहे. 'People Language Survey of Indian Languages' असे या प्रकल्पाचे नाव आहे. त्यातील महाराष्ट्र खंडात (पद्मगंधा प्रकाशन, पुणे : २०१३) मराठीच्या बहुतांश बोलींचा अभ्यास संक्षेपाने प्रकाशित झाला आहे. यामध्ये चंदगडी बोलीचाही समावेश आहे.

समाजभाषाविज्ञानामध्ये बोलीचा अभ्यास पारंपरिक अभ्यासापेक्षा बराच वेगळा आहे. या अभ्यासपद्धतीमध्ये बोलीचा अभ्यास सामाजिक भेदांना समोर ठेवून केला जातो. उच्चारण, शब्दसंग्रह इत्यादी संदर्भातील चिकित्सा सामाजिक भेदांना समोर ठेऊन होते. वरती उल्लेख केलेले आणि इतर बोली अभ्यासामध्ये अभ्यासाची रूढ पद्धत वापरलेली दिसते. त्यामुळे हे अभ्यास संकलनाच्या पातळीवर थांबतात. या अभ्यासामध्ये शब्दसंग्रह आणि व्याकरणिक वैशिष्ट्यांवर विशेष भर देण्यात आलेला आहे. एखाद्या विस्तृत प्रदेशातील बोली सर्वत्र एकसारखी आढळत नाही. ती प्रदेश, व्यवसाय, भौगोलिक-सांस्कृतिक परिस्थितीनुसार बदलत राहते. त्यामुळे विविध कारणांनी बदलणारे बोलीचे रूप बोलीअभ्यासात विचारात घेतले पाहिजे. त्याचबरोबर बोलीवापरामध्ये रूढी महत्त्वाची असते. या रूढी बऱ्याच वेळा सामाजिक संकेतही असतात. त्यांचाही विचार झाला पाहिजे.

### बोली आणि सामाजिक संदर्भ

भाषा आणि बोलींना असलेल्या सामाजिक संदर्भाचा शोध चंदगडी बोलीच्या संदर्भात घेणे, हे या अभ्यासाचे उद्दिष्ट आहे. कोणतीही बोली शेकडो वर्षांच्या प्रवासातून आणि ती बोलणाऱ्या लोकांच्या जीवनव्यवहारातून विकसित झालेली असते. त्यामुळे ती बोली त्या समाजाच्या आणि प्रदेशाच्या अभिव्यक्तीचे साधन बनते. त्यातूनच त्या समाजाची संस्कृती अभ्यासता येते. बोलीला असलेले सामाजिक संदर्भ अनेकविध पद्धतीने दाखवता येतात. हे सामाजिक संदर्भ पडताळून पाहण्यासाठी आजूबाजूला पुष्कळ उदाहरणे सापडतात. भारतीय समाजात लिंग, धर्म, जाती आणि उपजाती, विविध जातींचे परंपरागत व्यवसाय, उद्योग, समाजातील समजुती, समाजातील विविध स्तर, तसेच नागरीकरणानंतर उदयाला आलेले आर्थिक स्तर, या आर्थिक स्तरांनुसार अस्तित्वात आलेले नवे वर्ग, श्रेष्ठ-कनिष्ठत्वाच्या पारंपरिक आणि आधुनिक कल्पना, असे बहुस्तरीय भेद समाजात पाहायला मिळतात. भाषावापरातही या भेदांचे प्रत्यक्षाप्रत्यक्ष प्रतिबिंब पडलेले असते. व्यक्तीला

समाजीकरण (Sociolization) प्रक्रियेतून भाषा प्राप्त होताना त्या समाजाच्या सर्व संदर्भांसहित प्राप्त होते. त्यामुळे प्रत्येकाच्या भाषावापरावर समाजाअंतर्गत भेदांचे परिणाम जाणवतात.

कोणत्याही समाजाची संस्कृती, ज्ञान, परंपरा, श्रद्धा आणि समजुतींचा अभ्यास त्या समाजाचा अभ्यास असतो. समाजभाषाविज्ञान यासाठी महत्त्वपूर्ण कार्य करते. देशाचे, राज्यांचे भाषिक नियोजन करण्याच्या अनुषंगाने आणि भाषिक ध्येयधोरणे ठरवण्यासाठी बोलीचा अभ्यास अतिशय महत्त्वाचा ठरतो. बोली त्या समाजाशी संबंधित परंपरा, रूढी, समजुती, त्या समाजाची संस्कृती, समाजांतर्गत असलेले व्यवसाय इत्यादी गोष्टींमुळे समृद्ध बनलेली असते. भाषाभ्यासकाला हे सर्व संदर्भ बाजूला करून बोलीचा विचार करता येत नाही. समाजांतर्गत दिसून येणारे हे संदर्भ ज्या त्या समाजाच्या भाषेमध्ये खोलवर रुजलेले आणि त्या भाषेत एकजीव झालेले असतात. एखाद्याचा 'घुगुळळ काढणे', 'कामाची लगीनघाई असणे', 'घरात गावगोंधळ घालणे', 'एखाद्या स्त्रीला गावभवानी म्हणणे', 'कामाचा शिमगा करणे' यासारखे शब्दप्रयोग पाहिले असता हे संदर्भ लक्षात येतील. श्रद्धा समजुतीतून प्रत्येक समाजाचे भाषा वापराचे काही संकेत ठरलेले असतात. उदाहरणार्थ, 'कुंकू पुसले', 'बांगड्या फुटल्या' या वाक्यप्रयोगांचा अशुभसूचक अर्थ असल्यामुळे ही वाक्ये कुंकू वाढले, बांगड्या वाढल्या अशी उच्चारली जातात. एवढेच नाही आपण ज्या चंदगडी बोलीचा अभ्यास येथे करणार आहोत त्या बोलीमध्ये गंभीर आजारांची नावे घेणे, सापाचे नाव उच्चारणे यालाही अशुभ मानले जाते. संध्याकाळी झोपणे, उंबऱ्यावर शिंकणे, दाराची कडी वाजवणे, अंगावर पाल पडणे, पालीने चुकचुकणे, सकाळी परड्यात कावळे प्रमाणापेक्षा जास्त वेळ ओरडणे किंवा एकच कावळा ओरडत राहणे हे सर्व अशुभ सूचकच मानले जाते. या सर्व गोष्टींशी निगडित भाषा चंदगडी बोलीत तयार झालेली दिसते. अशा पद्धतीचे भाषावापराचे संकेत समाजाच्या परंपरा, श्रद्धा आणि समजुती अभ्यासल्याशिवाय लक्षात येत नाहीत. बोलीभाषेत अशा पद्धतीचे भाषावापराचे संकेत असतात. हे भाषावापराचे सामाजिक संकेत त्या बोली अभ्यासाबरोबर समाजाच्या अभ्यासासाठी फलदायी असतात.

### समाजभाषावैज्ञानिक दृष्टिकोन

प्रमाण भाषा आणि बोली याबद्दल आपण पुढे सविस्तर चर्चा करणार आहोतच. तथापि, मराठीच्या संदर्भाने बोलायचे झाल्यास महाराष्ट्र हे बहुसंख्येने मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचे राज्य आहे. परंतु, ही मराठी म्हणजे आपण ज्या भाषेला प्रमाण मराठी म्हणतो ती नाही. समाजात प्रत्यक्ष अस्तित्वात असतात, त्या बोली असतात. यासंदर्भात ना. गो कालेलकर लिहितात, 'भाषा अशी स्वतंत्रपणे नसतेच. खरे अस्तित्व असते ते बोलींनाच. निरनिराळ्या ठिकाणच्या, निरनिराळ्या जातींच्या, निरनिराळ्या व्यवसायांच्या, कोणत्या तरी कारणांने वारंवार एकत्र येणाऱ्या मानवसमूहाच्या, स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या, वृद्धांच्या आणि मुलांच्या बोलींना. स्थलभिन्नत्वामुळे ज्याप्रमाणे बोलींचे स्वरूप बदलते त्याचप्रमाणे एकच व्यक्ती निरनिराळ्या समूहांत वावरतानाही तिच्या भाषेत वेगवेगळ्या छटा दिसून येतात. कारण जीवनच असे लवचिक आहे. जीवनप्रवाह अखंड राहून सुसह्य करणाऱ्या व्यवहाराचे जे अपरिहार्य साधन भाषा तीही याचमुळे टणक, सर्वत्र सारखी असू शकणार नाही. कारण ती तशी असेल तर अखंड गतिमान आणि विविधतामय मानवी जीवनाचे यथार्थ चित्रण तिला करता येणार नाही, एवढेच नव्हे तर नित्याचे व्यवहारही चालवणे तिला अशक्य होईल.' (ना. गो. कालेलकर, १९६२ : पृष्ठ ६४) त्यामुळेच मराठी भाषेच्या संदर्भातही भाषेची अनेक रूपे अस्तित्वात असल्याचे दिसतात.

वरती उल्लेखिलेल्या महाराष्ट्रातील कोकण, मराठवाडा, खानदेश, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र या पाच विभागांमध्ये व्यवहारात सर्वत्र मराठीचे एकच रूप वापरले जात नाही. महाराष्ट्राच्या विस्तृत भूमीवर मराठीची अनेक बोलीरूपे अस्तित्वात आहेत. त्याचबरोबर एका विशिष्ट प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या बोलीमध्येही त्या प्रदेशातील जाती, धर्म, आर्थिक स्तर आणि व्यवसायांनुसार म्हणजेच सामाजिक-भौगोलिक वैशिष्ट्यांनुसार विविध भेद आढळतात. यापुढे जाऊन बोलीचा सूक्ष्म विचार केल्यास, बोलीरूप व्यक्तिगणिक भिन्न असल्याचे दिसून येते. एखाद्या भाषेच्या बोलींचा अभ्यास हा अभ्यासकांसमोरील आव्हान असतो. कारण बोली निर्माण होण्याची कारणे अनेक असतात.

बोली अभ्यासांच्या पारंपरिक अभ्यासपद्धतींमध्ये बोलीचा संक्षिप्त इतिहास, भौगोलिक नकाशा, भौगोलिक क्षेत्र, बोलीतून अविष्कृत होणारी लोकगीते, लोककथा याबरोबरच मूलभूत शब्दांचे संकलन केलेले असते. वास्तविक यातील बरेच अभ्यास संकलनाच्या पातळीवर थांबलेले असतात. पुढे या अभ्यासाचे विश्लेषण होणे महत्त्वाचे असते. हे विश्लेषण समाजभाषावैज्ञानिक दृष्टीने केल्यास बोली आणि ती बोलणाऱ्या समाजासंदर्भात महत्त्वपूर्ण माहिती समोर येऊ शकते. अशा विश्लेषणातून ती बोली बोलणाऱ्या समाजाविषयी, त्यांच्या संस्कृतीविषयी, म्हणजेच परंपरा, रूढी-प्रथा आणि एकूणच जीवनाविषयी बरीच माहिती हाती लागते. त्यामुळे बोलीचे केवळ संकलन होऊन चालत नाही, तिचे विश्लेषण होणे आवश्यक आहे. असे विश्लेषण झाले तरच प्रमाण भाषेच्या विकासात बोली सहायक ठरू शकतात.

समाजभाषाविज्ञानामध्ये भाषेचा अभ्यास सामाजिक भेदांना समोर ठेवून केला जातो. मराठीच्या संदर्भाने विचार करता, बोलींच्या उच्चारणाचा विचार फारच त्रोटक झालेला दिसतो. झालेल्या बोली अभ्यासात शब्दसंग्रह आणि व्याकरणिक वैशिष्ट्यांवर विशेष भर दिलेला दिसतो. वास्तविक उच्चारण हे बोलीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. बोलीचे वेगळेपण सकृतदर्शनी उच्चारणावरूनच ठरत असते. त्यामुळे बोली अभ्यासात उच्चारणाचा विचारही झाला पाहिजे. कारण उच्चारणांचा आणि भौगोलिक परिस्थितीचा जवळचा संबंध आहे. समाजभाषाविज्ञानाच्या दृष्टीने बोलीचा अभ्यास केल्यास विशिष्ट बोली बोलणारा समाज आणि त्या समाजाची सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी, परंपरा सारेच अभ्यासकांना उपलब्ध होते. बोलीच्या माध्यमातून एका समाजाचाच अभ्यास समोर येतो.

बोली प्रमाणभाषेच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात किंवा त्या प्रमाणभाषेला पोषक असतात. याबाबत काही अभ्यासक साशंक असतात. त्यांचा या विधानाला आक्षेप असतो. त्यांचे म्हणणे असते की, प्रमाणभाषेत प्रत्येक शब्दाची जागा असते किंवा एखादी भावना, कल्पना व्यक्त करण्यासाठी प्रमाणभाषेची स्वत:ची व्यवस्था असते. अशावेळी बोलीभाषेतील शब्द प्रमाणभाषेला स्वीकारण्याची गरज काय?, ती बोलीतील शब्द कसे काय घेईल? इत्यादी. यासंदर्भात डॉ. रमेश धोंगडे यांचे मत येथे विचारात घेऊन चर्चा करता येईल. ते लिहितात, ‘काही लोकांना बोलींच्या अभ्यासाने प्रमाण बोली संपन्न होते, असे वाटते. बोली बोलणाऱ्या समाजात विशिष्ट मानवनिर्मित वस्तूंना बोलीतच वापरली जाणारी नावे असतात. उदाहरणार्थ, रातांब्याच्या बिया गाळण्यासाठी असणाऱ्या बांबूच्या टोपलीला मालवणीत ‘गाळणा’ म्हणतात, तर लग्नात वापरायच्या रोवळीला ‘यरवान’ म्हणतात. तसेच भात वेळायचे आयताकृती लाकडी भांडे या वस्तूला ‘डोणो’ असा शब्द आहे. हे शब्द प्रमाण मराठीत घ्यायचे म्हणजे काय करायचे? ज्या वस्तूच प्रमाण मराठीच्या परिघात नाहीत त्यांची नावे प्रमाण बोली कशासाठी घेईल. भाषेचा शब्दनिधी म्हणजे महाग जपून ठेवलेल्या पण वापरले न जाणाऱ्या भरजरी कपड्यांचे गाठोडे नव्हे. उलट ‘मुटी’, ‘वाळमाड’, ‘झाळा’ या मालवणी शब्दांना प्रमाण मराठीत अनुक्रमे ‘मक्याचे कणीस’, ‘झाकण’ आणि ‘शिके’ असे शब्द असताना प्रमाण मराठी मालवणीचे शब्द कशासाठी घेईल? बोलींच्या शब्दसंग्रहाने प्रमाण मराठीचा शब्दनिधी वाढेल, ती जास्त श्रीमंत होईल यासारखे समज भाषाविषयक अज्ञानाचे गमक आहेत, मराठी विचारवंतात दुर्दैवाने ते आहेत!’ (पगारे/पाटील (संपा.), २०१२ : पृष्ठ १५) असे प्रश्न उपस्थित होणे रास्त आहे. हे प्रश्न उपस्थित होण्यामागे विविध बोलीचे यापूर्वी झालेले मोठ्या प्रमाणात कारणीभूत आहेत. शिवाय एखादी बोली मातृभाषा असलेली व्यक्ती आणि शहरी मध्यमवर्गीय कुटुंबात जन्म घेतलेली, प्रमाणभाषेतूच जडणघडण झालेली व्यक्ती यांच्या दृष्टिकोनातही खूप फरक असू शकतो. बोलीचे अभ्यास केवळ संकलनाच्या, सर्वेक्षणाच्या पातळीवर थांबणे किंवा हौस म्हणून संकलन प्रकाशित करण्याचे जे पायंडे पडले आहेत, त्यामुळे अभ्यासाची आणि बोलींची हानी होते. बोलीचा भाषाविज्ञानाच्या दृष्टीने शास्त्रशुद्ध अभ्यास महत्त्वाचा आहे. बोलीतील शब्दांमुळे मराठी समृद्ध होईल. बोलींचा अभ्यास समाजभाषावैज्ञानिक दृष्टीने सुरू झाल्यानंतर बोलीतील शब्दांचे सांस्कृतिक संदर्भ उलगडतील. नव्या अर्थछटा लक्षात येतील. तेव्हा बोलीतील शब्दांचा प्रमाण मराठीकडे येण्याचा मार्ग सुकर होऊ शकतो. जे शब्द प्रमाण मराठीत आहेत आणि त्याच अर्थाचे बोलीतील अधिक अर्थघन, अर्थसखोल शब्दांबाबत हे निरीक्षण आहे. कारण असे काही शब्द प्रमाण मराठीतील शब्दांपेक्षा प्रभावी, अधिक अर्थघन शब्द बोलीत सापडू शकतात. त्या शब्दांची अर्थवलय अद्याप अपरिचित असल्याने आणि तसा प्रभावी वापर न झाल्याने ते शब्द मुख्य


मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

प्रवाहात येत नाहीत. परंतु, अलीकडे बोलीतील कथा, कादंबरीतून असे पुष्कळ शब्द येणाचा मार्ग सुकर झालेला आहे. त्यासाठी बोलीतील चांगल्या, प्रभावी शब्दांचा मोठ्या समूहाकडून वापर सुरू होणे अपेक्षित असते. ती प्रक्रिया काही शब्दांबाबत घडलेली आहे. मराठीच्या बोलींचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास अद्याप होत नाही. रमेश धोंगडे म्हणतात तसे, ‘संशोधनाचे हे क्षेत्र अद्याप अस्पर्श आहे.’ त्यासाठी असे अभ्यास प्रकल्प हाती घेतले पाहिजेत.

श्री. म. माटे त्यांच्या ‘भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टी’ या निबंधाचा यासंदर्भाने मागे उल्लेख येऊन गेला आहेच. माटे यांनी बोलीभाषेतील शब्दांनी प्रमाण भाषा कशी समृद्ध होते; हे अनेक उदाहणांच्या आधाराने स्पष्ट केले आहे. समाजभाषाविज्ञानाच्या दृष्टीने बोलीच्या अभ्यासामध्ये शब्दांच्या अर्थछटा समोर येऊ शकतात. उदाहरणार्थ, चौमाळ, झोंबी, भंकस, लई, ध्यान, ध्यानात यासारखे प्रादेशिक शब्द आज प्रमाण मराठीने पर्यायी शब्द असतानाही स्वीकारलेले दिसतात. बोलीच्या अभ्यासात समाजभाषावैज्ञानिक दृष्टी ठेवली तर, श्री. म. माटे वरील लेखात म्हणतात, तसे भाषासमृद्धीसाठी ते पोषक ठरणारे आहे.

बोलीचा अभ्यास प्रमाण मराठीच्या विकासाला साहाय्यभूत व्हायचा असल्यास; बोलीतील शब्दसंग्रहाची चिकित्सा समाजभाषाविज्ञानाच्या अंगाने होणे गरजेचे आहे. तसे झाल्यास बोलीतील शब्दांची सामाजिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी समोर येईल. त्या शब्दाचे अर्थवत्तेच्या दृष्टीने असलेले सामर्थ्य लक्षात येईल. असे झाले तर प्रमाण मराठीला आवश्यक वाटेल तेव्हा समर्पक, अर्थघन शब्द स्वीकारण्याला हा अभ्यास मदत करील. यादृष्टीने बोलींचे शब्दसंग्रह निर्माण होणे आवश्यक आहेत. अशा अभ्यासाच्या आवश्यकतेबाबतचे सूचन यापूर्वी काही अभ्यासकांनी करूनही अभ्यासक अशा अभ्यासाकडे वळलेले नाहीत. शब्दांच्या पातळीवर विचार करता असे काही अभ्यास झालेले दिसतात. उदाहारणार्थ, राजन गवस यांनी सकाळ सप्तरंगसाठी लिहिलेले *‘कुळकथा शब्दांची’* हे सदर, द. ता. भोसले यांनी लिहिलेला *‘ग्रामीण बोलीचा शब्दकोश’* (मेहता पब्लिकेशन, पुणे : २०१५) आणि सदानंद कदम यांचे *‘कहाणी शब्दांची’* (मनोविकास प्रकाशन, २०१९) इत्यादी कामे यासंदर्भात पाहता येतील. यातील अनेक शब्दांचे त्यांनी केलेले विश्लेषण समाजभाषाविज्ञानाच्या अंगाने जाणारे आहे. अशा शब्दसंग्रहांची निर्मिती झाल्यास मराठी समाजातील प्रथा, रूढी, परंपरा, श्रद्धा आणि एकूणच संस्कृती आणि समाजाविषयी बरीच माहिती प्रकाशात येईल. शिवाय बोलीतील अनेक अर्थपूर्ण शब्दांची ओळख होईल.

सामाजिक भाषाविज्ञानातील बोली अभ्याससंदर्भात रमेश वरखेडे लिहितात, ‘सामाजिक बोलीविज्ञानात विशिष्ट बोलीकडे पाहण्याचा निजभाषिकांचा व अन्य भाषकांचा दृष्टिकोन, तसेच त्या बोलीची सामाजिक प्रतिष्ठा लक्षात घेऊन बोलीचा अभ्यास केला जातो. नमुने गोळा करताना बोलणाऱ्याचे सामाजिक स्थान आणि परिस्थितीचा संदर्भ लक्षात घेतला जातो. व्यवसायविशिष्टता, आर्थिक-सामाजिक स्तर यामुळे त्या बोलीत जी भाषिक वैशिष्ट्ये (Register) किंवा शैलिका निर्माण होतात त्यांचा अभ्यास सामाजिक बोलीविज्ञानात केला जातो. त्यामुळे व्यापक क्षेत्रीय सर्वेक्षणाऐवजी मर्यादित उपयोजनक्षेत्रावर लक्ष केंद्रित करून भाषिक पाहणी करण्याकडे या अभ्यासकांचा कल असतो. उपयोजन क्षेत्रानुसार भाषिक विकल्पनाचे नमुने गोळा करून त्या सामाजिक बोलीचे वर्णन देणे हे या अभ्यासपद्धतीचे उद्दिष्ट आहे.’ (रमेश वरखेडे, २००१ : पृष्ठ ५०) बोलीचे असे समाजभाषाविज्ञानाच्या दृष्टीने विश्लेषण केल्यास, ती बोली बोलणारा समाज आणि त्या समाजाची सामाजिक, सांस्कृतिक पार्श्वभूमी, परंपरा हे सारेच अभ्यासकांना उपलब्ध होते. एका समाजाचाच अभ्यास अशा अभ्यासातून समोर येतो.

चंदगडी बोलीच्या विश्लेषणासाठी येथे समाजभाषाविज्ञानातील संकल्पनांचा आधार घेतला आहे. यासाठी चंदगडी बोलीतील भाषिक व्यवहार आणि परिस्थितीचा संदर्भ समजून घ्यायचा आहे. भाषेचा अभ्यास केवळ भाषेच्या संरचनेचे विश्लेषण करून होणारा नसून, भाषिक व्यवहारामागील परिस्थितीचा संदर्भ विचारात घेतल्याशिवाय तो पूर्ण होत नाही, हा मॅलिनोवस्की यांचा विचार आहे. बोलीचा अभ्यास एकांगी झाल्यास तिचे अंतरंग लक्षात येत नाही. अहिराणी बोलीच्या अनेक भेदांपैकी काही भेद हे आदिम जमातींच्या बोलीचे आहेत. या जमातींमध्ये भाषा ही त्यांच्या वर्तनाचा भाग असते.

त्यामुळे त्यांच्या भाषेचा विचार त्यासंदर्भानेच करावा लागतो. चंदगडी बोलीच्या संदर्भात हा विचार आपण विस्ताराने चर्चेला घेणार आहोत.

या संकल्पनेबरोबर चंदगडी बोलीची 'संदेशवहनाची क्षमता' अभ्यासायची आहे. संदेशवहन हेच भाषेचे मुख्य कार्य असते. संरचनावादी भाषाभ्यासामध्ये भाषेच्या संरचनेचा अभ्यास करताना भाषिक क्षमतेचा विचार झालेला होता. परंतु, भाषिक संरचनेवरच निजभाषिकाच्या सामाजिक संरचनेचा अंमल चालतो, असा विचार समाजभाषाविज्ञानातून पुढे आला. यासंदर्भात रमेश वरखेडे लिहितात, 'भाषा आणि समाज यात सातत्याने होत असलेल्या क्रिया-प्रतिक्रियात्मक संज्ञापन व्यवहारात भाषिक क्षमतेइतकेच सामाजिक नियमांच्या ज्ञानालाही महत्त्व असते. आतापर्यंत भाषाविज्ञानात केवळ भाषेच्या संरचनेचा म्हणजेच 'रूपा'चा विचार होत होता; परंतु, सामाजिक भाषाविज्ञानात 'भाषेच्या कार्या'चा विचार महत्त्वाचा ठरविण्यात आला. डेल हाइम्स यांची 'संदेशवहनक्षमतेची संकल्पना' (Communicative competence) या भूमिकेतूनच पुढे आली. त्यामुळे भाषा शिकताना कोण, कुणाशी, कुठे, कशाविषयी बोलतो याच्याशी संबंधित सामाजिक नियमांचे ज्ञान आवश्यक ठरते.' (रमेश वरखेडे, २००१ : पृष्ठ २२-२३) या संकल्पनेबरोबर 'भाषिक भांडार' आणि 'लघुक्षेत्राची' संकल्पना बोलीच्या विश्लेषणासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकते. एखाद्या समाजाची बोली किती समृद्ध आणि अर्थअभिव्यक्तीच्या दृष्टीने किती संपन्न आहे, हे त्या बोलीतील भाषिक भांडारावरून ठरते. भाषिक भांडाराची समृद्धता तपासण्यासाठी कोणतीही बोली बोलणाऱ्या लोकांचा भाषिक कोश तपासावा लागतो. या भाषिक कोशावर असलेल्या त्या समाजाच्या प्रभावाचे स्वतंत्र विश्लेषण झाले पाहिजेत. त्याशिवय भाषिक भांडाराचे विश्लेषण पूर्ण होत नाही. बोलीभाषकांच्या समाजाचे विशेष, व्यवसायविशेष, आर्थिक-सामाजिक स्तर या सर्वाचा बोलीवरील प्रभाव बोलीच्या निर्मितीमधील महत्त्वाचे घटक असतात. त्यामुळे त्यांचा विचार बोलीअभ्यासात महत्त्वाचा ठरतो.

भाषिक भांडारातील शब्दांचा वापर संपल्पनाक्षेत्रानुसार केला जातो. कारण संकल्पनाक्षेत्रानुसार कोणती भाषा (शब्दरूपे) वापरावीत हे ठरत असते. ही त्या त्या क्षेत्राची स्वतंत्र अशी भाषा असते, त्या भाषेला त्या क्षेत्राचे लघुक्षेत्र म्हणून समाजभाषाविज्ञानात ओळखले जाते. ही लघुक्षेत्रे समाजाच्या स्वरूपानुसार बदलतात. त्यामुळे संकल्पनाक्षेत्रानुसार बदलणाऱ्या भाषेचे स्वरूपही वैविध्यपूर्ण असते. बोलीभाषेचे विश्लेषण करण्यासाठी भाषिक भांडाराची आणि लघुक्षेत्रांची विभागणी अभ्यासाच्या सूसुत्रतेसाठी महत्त्वाची ठरते. उद्योग-व्यवसाय, जातीनुसार वेगळी दिसणारी भाषा या संकल्पनेआधारे नोंदविता येते आणि विश्लेषण करता येते.

बोली अभ्यासामध्ये सर्वात महत्त्वाचा विचार ती बोली बोलणाऱ्या समाजाच्या सामाजिक घडणीचा आहे. बोलीमध्ये जाती-जमातीनुसार दिसणारे विविध भेद या सामाजिक घडणीच्या आधारानेच अभ्यासावे लागतात. कोणत्याही बोलीत असे भेद अभ्यासता येतात. यासाठी कोकणी बोलीत दिसणारे जाती आणि पोटजातीतील भेद उदाहरणासाठी पाहता येतील. चंदगडी बोलीत जाती-जमातीनुसार भेद विशेष दिसत नाहीत. याचे कारण ही बोली मर्यादित क्षेत्रात बोलली जाते. शिवाय जाती-जमातीचे प्रभावी गट या बोली प्रदेशात दिसत नाहीत. या प्रदेशात बेरड समाज मोठ्या संख्येने आहे. त्यांच्या बोलीची काही स्वतंत्र वैशिष्ट्ये नोंदविता येतील. मात्र पारंपरिक व्यवसाय करणारे सुतार, लोहार, कुंभार, चांभार, सोनार इत्यादी लोकांची भाषा व्यवसायविशिष्ट बनते याचे विश्लेषण सामाजिक घडणीच्या आधारानेच करता येते.

### बोली अभ्यासाचे पद्धतिशास्त्र

जगभरात बोलीच्या अभ्यासात दिडशे वर्षात बरीच स्थित्यंतरे झाली आहेत. या स्थित्यंतरांना भाषाविज्ञानाची प्रगती कारणीभूत ठरली आहे. भाषाभ्यासात झालेली परिवर्तने बोलीअभ्यासाची दिशा बदलायला कारणीभूत ठरल्याचे मागे आपण नोंदविले आहेच. बोलीभूगोलापासून बोलीच्या सामाजिक बोलीविज्ञानापर्यंत हा अभ्यास अनेक टप्प्यांतून पुढे सरकला आहे. बोलीभूगोलावरील टीका, संरचनात्मक बोलीअभ्यास, त्यावरील टीका आपण समजून घेतल्यानंतर या स्थित्यंतराची कल्पना येते. अर्थात या प्रक्रियेत मागे पडलेल्या अभ्यासपद्धती पूर्णत: टाकावू आहेत असे नाही. आजही बोलीअभ्यासात या



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

सर्वपद्धतींचा कमीअधिक वापर करावा लागतो. सर्व अभ्यासपद्धती आजही महत्त्वाच्या आहेत. त्याशिवाय बोलीअभ्यासात सूक्ष्मता येऊच शकत नाही. बोलीचा समाजभाषावैज्ञानिक अभ्यास करताना तिचे व्याकरण, तिची व्यवस्था समजून घेण्यासाठी संरचनावादी अभ्यासाची मदत लागतेच. समाजातील विविध वर्ग, जाती, जमाती उच्चारणे कशी करताना हे सूक्ष्म स्तरावर समजून घेण्यासाठी संरचनावादी भाषाभ्यासाची पद्धती माहिती असावीच लागते.

बोली भूगोलामध्ये बोलींचा अभ्यास स्थलपरिमाणाच्या अंगाने केला जातो. या अभ्यासासाठी प्रशिक्षित अभ्यासक अधिक उपयुक्त ठरू शकतात. कारण प्रशिक्षणामुळे त्यांच्या अभ्यासात वस्तुनिष्ठता येते. ते योग्य दिशेने अभ्यास करू शकतात. ध्वनिशास्त्राचे प्रशिक्षण घेतलेले क्षेत्रसंशोधक या कामासाठी सर्वात उपयोगी ठरतात. कारण बोली अभ्यासात लिखित पुराव्यापेक्षा प्रत्यक्ष निरीक्षणाने घेतलेली बोलीच्या उच्चारणातील तपशिलांची नोंद अधिक महत्त्वपूर्ण ठरत असते. अशा अभ्यासातूनच 'बोली भूगोल' या अभ्यास शाखेने भाषेच्या अभ्यासाला वास्तवलक्ष्यी स्वरूप प्राप्त करून दिले आहे. या अभ्यासाने दिलेल्या वास्तवलक्ष्यी दृष्टिकोनामुळेच पुढे 'समाजभाषाविज्ञान' या अभ्यासपद्धतीचा उदय होऊ शकला. समाजात प्रत्यक्ष भाषा कशी वापरली जाते हे पाहाणे, त्या भाषावापरामागील सामाजिक संदर्भ शोधणे आणि त्याचे विश्लेषण देणे हे काम समाजभाषावैज्ञानिक अभ्यासपद्धतीमध्ये केले जाते. या स्वरूपाच्या अभ्यासाचा प्रारंभ बोली भूगोलाच्या मर्यादेतून सुरू झालेला दिसतो. प्रारंभी बोली भूगोल या अभ्यासपद्धतीमध्ये ध्वनिपरिवर्तन आणि शब्दसंग्रहाचा विचार प्राधान्याने होत होता. समाजभाषाविज्ञानाच्या उदयानंतर या अभ्यासाला निश्चित स्वरूप प्राप्त झाले आणि भाषा-बोलीच्या सर्व अंगाचा असा व्यापक विचार होऊ लागला.

समाजभाषाविज्ञानामध्ये भाषेचा अभ्यास सामाजिक भेदांना समोर ठेवून केला जातो, हे आपण पाहिलेले आहेच. बोली भूगोलामध्ये प्रथम बोलीची क्षेत्रनिवड आणि सीमानिश्चिती करण्यासाठी बोलीचा शब्दसंग्रह, वाक्यप्रयोग, क्रियापदांची रूपे, नाम, सर्वनाम, विशेषणे, वाक्प्रचार, म्हणी, लोकगीते, लोककथा, बोलीचे प्रातिनिधिक नमुने इत्यादीचे संकलन कौशल्यपूर्वक करावे लागते. संकलित माहिती आणि नमुन्यांच्या आधाराने बोलीचे विश्लेषण करावे लागते. त्याचबरोबर क्षेत्राचा इतिहास अभ्यासावा लागतो. या संकलनाच्या आधाराने बोलीच्या सीमा निश्चित होतात आणि त्यावरून बोलीचा नकाशा तयार होतो.

**बोली भूगोल**

बोलीअभ्यासाची सुरुवात युरोपात १८७६ सालापासून झाली, असे अभ्यासक सांगतात. बोलीअभ्यास युरोपनंतर अमेरिकेत गेला आणि अलीकडे १९६० नंतर तो जगभर होऊ लागला. ही बोलीअभ्यासाची वाटचाल आपल्या चर्चेचा विषय नसली तरी, १९६० नंतरच्या बोलीअभ्यासाची चर्चा ओघाने येत राहणारच आहे. कारण याच काळात भाषेच्या सामाजिक अभ्यासाची दृष्टी विकसित होऊ लागली. त्याचा परिणाम बोलींकडे सामाजिक दृष्टीने पाहणारे अभ्यासक पुढे आले आणि बोलीअभ्यासाला नवे वळण मिळाले. माणसाच्या जशा अनेक भाषा आहेत, तशाच एकाच भाषेच्या परस्परांहून भिन्न अशा बोली आहेत. या बोली अनेक पातळ्यांवर एकमेकींपासून भिन्न असतात, याची जाणीव अभ्यासकांना झाली. त्यातूनच 'बोलीभूगोल' या संकल्पनेची रुजुवात झाली. पारंपरिक बोलीअभ्यासात बोलीभूगोल ही महत्त्वाची संकल्पना होती. भाषा कालसापेक्ष बदलते हा विचार भाषाभ्यासात रुजला होताच. परंतु, ती स्थलसापेक्षही बदलते हे बोलीभूगोलाने अधोरेखित केले. भाषा आणि बोलींच्या सीमा निर्धारणासंदर्भातील विचार या अभ्यासातून पुढे आला. बोलींच्या सीमा निश्चितीसंदर्भात ठोस विधाने करता येत नाहीत. राजकीय किंवा प्रशासनिक सीमा निश्चीतीप्रमाणे भाषा-बोलीच्या सीमा निश्चित करता येत नाहीत. एक बोली संपून दुसरी कोठे सुरू झाली, हे सांगणे कठीण काम असते. याबाबत रमेश धोंगडे लिहितात, 'कुलसाम्य असलेल्या भाषा किंवा एखाद्या भाषेच्या बोली यांचा भूभाग सांगताना एक प्रकारे फक्त त्यांचा केंद्रबिंदू दाखवता येतो. नेमक्या भौगोलिक सीमारेषा दाखविता येत नाहीत, हे लक्षात घ्यायला हवे.' (रमेश धोंगडे, २००६, पृष्ठ ३३) म्हणजेच एखाद्या बोलीचे क्षेत्र किती मोठे आहे, हे निश्चितपणे सांगता येत नाही. एखाद्या स्वनिमाच्या उच्चारणामध्ये स्थान किंवा क्षेत्रानुसार

पडणारा फरक क्षेत्रपाहणी करून दाखविता येतो. एकसारखे उच्चारण असलेले आणि विशिष्ट ध्वनिसानिध्यातून होणारे उच्चारणातील बदल दाखविण्याचे तंत्र बोलीभूगोलात विकसित करण्यात आलेले दिसते. एकाच किंवा वेगवेगळ्या प्रदेशात एकसारखी आणि परस्परभिन्न उच्चारणे दाखवण्यासाठी समवाक् आरेखन दाखवण्याची पद्धत बोलीभूगोलात विकसित झाली.

**बोलींचे नकाशे**

बोलीभूगोल या अभ्यासपद्धतीतून बोलींचे नकाशे तयार करण्याची पद्धती विकसित झाली. हे नकाशे दोन प्रकारचे असतात. १. दर्शक नकाशे, आणि २. स्पष्टीकरणात्मक नकाशे. संकलित माहितीच्या आधारे हे नकाशे बनविण्यात येतात. दर्शक नकाशामध्ये प्रदेशानुसार भाषिक विविधता दाखवली जाते. त्यामुळे कोणते भाषिक वैशिष्ट्य कोणत्या प्रदेशात आहे ते स्पष्ट होते. तर स्पष्टीकरणात्मक नकाशे दर्शक नकाशातील माहितीच्या आधारे तयार केले जातात. परंतु, हे नकाशे कामचलावू असतात. त्यावरून बोलीचे एक वास्तव समोर येत असले तरी, ते वस्तुस्थितीचे यथार्थ चित्र नसते. कोणत्याही बोलीच्या सीमा निश्चित करताना अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागते. एखादी बोली एका विशिष्ट ठिकाणी (आरेखन रेषेवर) बदलत नसते. त्यामुळे तिची सीमा सांगणे शक्य नसते. कोणत्याही बोलीच्या केंद्रापासून आपण दूरदूर जातो तसा तिचा प्रभाव हळूहळू कमी होत गेलेला दिसून येतो. याचा अर्थ एका विशिष्ट बिंदूपाशी तिचा प्रभाव संपतो, असे दिसत नाही. तिच्यातील अनेक रूपे तिच्या सीमावर्ती बोलीत दिसायला लागतात. त्यामुळे बोलीचा प्रभाव तिच्या केंद्राच्या दिशेने वाढत जातो. तर विरुद्ध बाजूने घटत जातो. पुढे सीमावर्ती प्रदेशातील दुसऱ्या बोलीच्या प्रभावात तिच्यातील अनेक ध्वनी, शब्द रूप बदलतात, उच्चारणे बदलतात. त्यामुळे विशिष्ट प्रदेश द्विबोली प्रदेश वाटायला लागतो. परंतु, वास्तव तसे नसते. कारण असा प्रदेश द्विबोली नसून तेथे एक वेगळीच बोली असू शकते. अगदी कुलसाम्य असलेल्या भाषा, बोलींच्या भौगोलिक सीमारेषा दाखवणे अवघड असते. त्यामुळेच रमेश धोंगडेंसारखे अभ्यासक 'बोलींच्या भौगोलिक सीमा ठरवण्यात अर्थ नाही. खरे म्हणजे 'बोली' असे एखाद्या 'वाणी'ला म्हणणे हेही योग्य नाही. वास्तवात 'बोली' नसतात. माणसं आणि भाषाबाबी असतात.'(रमेश धोंगडे, २००६ : पृष्ठ ३४) असा विचार मांडतात. तो या पार्श्वभूमीवर बोलीबद्दलचे एक वास्तव अधोरेखित करतो.

बोलीभूगोलाच्या अभ्यास पद्धतीत सर्वेक्षणाला केंद्रवर्ती स्थान आहे. दोन उच्चारणातील वेगळेपण आणि सारखेपण दाखवून देणे, त्यासाठी योग्य पद्धतीच्या प्रश्नावली तयार करणे, त्या योग्य व्यक्तींकडून आणि योग्य पद्धतीचा अवलंब करून भरून घेणे आणि नंतर भाषिक नकाशा तयार करणे, अशी अभ्यासाची पद्धती विकसित झाली. या अभ्यासातही अनेक फटी शोधता येतील. तरीही कोणतीही अभ्यासपद्धती ही कधीच पूर्ण टाकावू नसते. तशी बोलीभूगोल ही अभ्यासपद्धती बोलीअभ्यासाला उपकारच ठरलेली आहे. या अभ्यासपद्धतीने बोलीचे नकाशे (Dialect atlas) ही संकल्पना दिली. बोलीच्या सीमा निश्चिती आणि क्षेत्रनिर्धारण यासंदर्भात भाष्य करणारी ही शास्त्रीय पद्धतीच मानली जात होती. हे काम क्षेत्रिय सर्वेक्षणाच्या माध्यमातून केले जात होते. अशा पद्धतीची नकाशे बोलीचे वस्तुस्थितीदर्शक चित्र समोर आणत नसले तरी, त्यातून बोली वास्तवाबद्दल काहीएक अंदाज येत होता. ही अभ्यासपद्धती कामचलावू होती. कारण बोलीच्या सीमा सांगताना शास्त्रीय आधार देता येत नव्हता. कोणती बोली कोठून सुरू होते आणि कोठे संपते, हे शास्त्र ठरवू शकत नव्हते. बोली केंद्र निश्चिती, केंद्रापासून बोलीचा क्षेत्र विस्तार, तिचे वाढलेले आणि घटत गेलेले क्षेत्र, बोली विरळ होत जाणे, दुसऱ्या बोलीच्या प्रभावात येणे, नवी बोली सुरू होणे या सर्वांमध्ये निश्चित सीमारेषा आखता येत नाही. हे या अभ्यासातून पुढे आलेले वास्तव आहे.

**सीमा निश्चिती आणि बोली सर्वेक्षण**

बोलीअभ्यासात सर्वेक्षणाला खूप महत्त्व आहे. बोलीचे क्षेत्र आणि सीमा निश्चित करताना सर्वेक्षण हाच आधार असतो. कोणती बोली कोणत्या क्षेत्रामध्ये बोलली जाते, तिचे केंद्रवर्ती स्थान कोणते, तिच्यावर कोणत्या भाषेचा प्रभाव आहे, या सर्व प्रश्नांचा आधार सर्वेक्षण हाच असतो. बोलींशी संबंधित अशा अनेक प्रश्नांची उत्तरे सर्वेक्षणाधारेच शोधावी लागतात.

त्यामुळे सर्वेक्षणासाठी अवलंबली जाणारी पद्धत खूप महत्त्वाची ठरते. कारण, बोलीसंदर्भातील विश्वसनीयता सर्वेक्षणाच्या पद्धतीवर अवलंबून असते.

सर्वेक्षणाच्या आधारेच बोलीचे क्षेत्र निश्चिती करावी लागते. तिचे केंद्रवर्ती स्थान शोधून काढावे लागते. त्यासाठी बोलीचे योग्य निजभाषक शोधून त्यांच्याकडून बोलीचे नमुने प्राप्त करून घ्यावे लागतात. हे नमुने प्राप्त करण्यासाठी अनेक गोष्टींबाबत काळजी घ्यावी लागते. निवडलेला निजभाषक हा शक्यतो सामान्य नागरिक असावा लागतो. म्हणजे तो कोणत्याही एका वर्गाचे, जातीचे, धर्माचे प्रतिनिधित्व करण्यापेक्षा सर्वसामान्य समाजाचा प्रतिनिधी असावा. तो कोणत्याही एका वर्गाचे ठळक प्रतिनिधित्व करणारा असल्यास त्याच्याकडून प्राप्त होणाऱ्या नमुन्यांबाबत प्रश्न उपस्थित होऊ शकतात. चंदगडी बोलीचे सर्वेक्षण करताना चंदगडी बोली बोलणारे परंतु, धर्माने ख्रिश्चन किंवा बेरड समाजातील अशिक्षित व्यक्तीची उच्चारणे सर्वसामान्य नागरिकापेक्षा वेगळी दिसतात. ख्रिश्चन लोकांच्या बोलीवर गोवन कोकणी उच्चारणांचा प्रभाव दिसतो. तर बेरड समाजातील लोकांच्या बोलीची उच्चारणे काही ठिकाणी कन्नडच्या प्रभावातून तर काही ठिकाणी स्वतंत्रच तयार झालेली आहेत. त्यामुळे ती अनेक बाबतीत वेगळी दिसून येतात. उच्चारणांबरोबर यांच्या बोलीत काही शब्दही वेगळे येतात. हे दोन्ही लोक चंदगडीच्या केंद्रवर्ती स्थानाच्या जवळपासचे असले तरीही हे वेगळेपण दिसून येते. त्यामुळे सर्वेक्षणासाठी कोणते निजभाषक निवडले आहेत, ही गोष्ट फार महत्त्वाची आहे.

कोणत्याही प्रदेशातील सुशिक्षित व्यक्तीच्या बोलीवर प्रमाण भाषेचा किंवा शिक्षणाचे माध्यम असलेल्या इतर भाषांचा प्रभाव असतो. यासंदर्भात आपल्याकडे त्या त्या प्रदेशातील प्रमाण भाषा आणि इंग्रजी, हिंदीचा प्रभाव उदाहरण म्हणून पाहता येईल. शिक्षणाच्या प्रवाहात आलेल्या व्यक्तीच्या बोलीवर प्रमाण भाषेचे संस्कार सुरू होतात. बोलीबद्दलचे अनेक गैरसमजही याला कारणीभूत आहेत. यातील सर्वात मोठा गैरसमज बोली मागास ठरविण्याबद्दलचा आहे. त्यामुळे बोलीत बोलणारी व्यक्ती गावंढळ, मागास ठरवली जाते. त्यामुळे बोली टाकून देण्याकडे सुशिक्षित लोकांचा कल दिसतो. परिणामी सुशिक्षितांची बोली बदलते. त्यामुळे बोली संकलनासाठी, सर्वेक्षणासाठी शक्यतो अशिक्षित व्यक्तीच अधिक योग्य ठरू शकते. भारतीय समाजजीवन सामाजिकदृष्ट्या अनेक गटात विभागलेले आहे. त्यामुळे येथे सामाजिक आणि आर्थिक भेद खूप ठळकपणे दिसून येतात. विविध धर्म, वंश, जाती, लिंग, वय यानुसार अनेक वर्ग समाजात आहेत. या वर्गांनुसार भाषा बदलताना दिसते. त्यामुळे सर्वेक्षणासाठी व्यक्ती निवडताना या सर्व गोष्टींचा विचार प्राधान्याने करावा लागतो. त्यामुळे एखाद्या बोलीचे सर्वेक्षण करण्यासाठी निश्चित केलेल्या प्रत्येक क्षेत्रात एकाच गटातील स्त्री, पुरुषाची निवड करावी लागते. अन्यथा प्रत्येक गटातील व्यक्तीचे, त्याच्या गटानुसार नमुने जमा करावे लागतील. सर्वेक्षणाच्या कामात इतरांवर अवलंबून राहण्यापेक्षा सर्वेक्षण हाती घेतलेल्या आणि संकलनाचे योग्य प्रशिक्षण घेतलेल्या व्यक्तीनेच सक्रियपणे काम करणे आवश्यक असते. नमुने संकलनात दुसऱ्यावर अवलंबून केलेले सर्वेक्षण विश्वसनीय असू शकत नाही.

बोली संकलनात प्राप्त होत जाणारी सामुग्री यथायोग्य पद्धतीने नोंदवून घेतली पाहिजेत. विशेषत: उच्चारणांच्या बाबतीत दक्ष असायला हवे. त्यासाठी पुरेसे नमुने योग्य लिपीचा अवलंब करून नोंदवले पाहिजेत. यासाठी अभ्यासकांनी रेकॉर्डरचा वापर करून आणि IPA सारखी लिपी शिकून योग्य पद्धतीने उच्चारणे लिहून घेण्याचे कौशल्य आत्मसात केले पाहिजे. अशा योग्य पद्धतीचा अवलंब केल्यास सर्वेक्षणातून हाती येणारे निष्कर्ष योग्य असू शकतात. इतकी काळजी घेऊनही विसंगत निष्कर्ष येत असतील तर निजभाषक बदलून पुन्हा नमुने घेतले पाहिजेत. अशा वेळी शक्यतो त्या क्षेत्रातील योग्य व्यक्तीच्या शोधासाठी आवश्यक त्यांचे मार्गदर्शन घेणे गरजेचे आहे.

बोली सर्वेक्षण करण्यासाठी काही पद्धती रूढ आहेत. त्यापैकी प्रश्नावली पद्धत आणि रेकॉर्डींग अशा दोन पद्धती विशेषत्वाने वापरल्या जातात. या दोन्ही पद्धती योग्य असल्या तरी, प्रश्नावली आणि रेकॉर्डिंग कोणाचे करावे याबाबतीत योग्य ती काळजी घेतली पाहिजेत. प्रश्नावली तयार करताना प्रश्नांचे स्वरूप काय असावे, याबाबत जाणीवपूर्वक काही विचार केलेला असावा. आपल्याला जे शोधायचे आहे, त्याबद्दलची योग्य माहिती उत्तरांमधून मिळायला हवी. या प्रश्नांमध्ये निजभाषिकाकडून उत्तरे घेताना बोलीअभ्यासकाला त्या बोलीतील स्वनिम, पदिम आणि वाक्य या तिन्ही पातळीवरील योग्य



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

मजकूर हाती लागायला हवा. त्याचबरोबर शब्दस्तरावरील पुरेशी माहिती उपलब्ध व्हायला हवी. त्यामध्ये दैनंदिन व्यवहारातील शब्द, कृषीविषयक शब्द, खाद्यपदार्थ, कपडे, सण-उत्सव, नातीवाचक शब्द, रंग, संख्यावाचक शब्द, म्हणी, वाक्प्रचार, लोकगीते, लोककथा, विशेषणे, क्रियापदे, लिंग, वचन, काळ इत्यादी माहिती उपलब्ध करण्याच्या दृष्टीने प्रश्नांची निर्मिती करायला हवी.

त्याशिवाय रेकॉर्डरचा वापर करून बोलीच्या भाषकांचे नमुने जमा करायला हवेत. या नमुन्यांमधून लिंग, सामाजिक स्तर, वर्गानुसार उच्चारांची वैशिष्ट्ये, प्रत्यय उपलब्ध झाले पाहिजेत. यासंदर्भात लबव या अमेरिकन बोलीअभ्यासकाने न्यूयॉर्क शहरातील भाषिक वैविध्याचा आणि डिपार्टमेंट स्टोअरचा केलेला अभ्यास समोर ठेवला तरी अशा अभ्यासाची कल्पना येईल. लबव यांच्या या अभ्यासातून कोणती कौशल्ये वापरून नमुने कसे मिळवायचे याचे दिशादर्शन होते. बोलीभूगोलाच्या अभ्यास पद्धतीत बोलीच्या सीमा निश्चित करताना या पद्धतीने जमा केलेले नमुने अतिशय उपयुक्त ठरतात. बोली वापराबाबतच्या समवाक् आरेखन रेषांची (Isogloss) आणि सीमांची निश्चिती करताना ध्वनी, ध्वनीतील अंतर, शब्द, शब्दांचा वापर, प्रत्ययपद्धत, क्रियापदे, वाक्यरचना, काळजीपूर्वक नोंदवावी लागतात. म्हणजेच बोलींच्या सीमांबाबत भाष्य करताना स्वनिम, पदिम पातळीवर फार सूक्ष्म स्तरावरची निरीक्षणे उपयोगात येत असतात. त्यासाठी या उच्चारणांचा सूक्ष्म विचार बोलीअभ्यासात अतिशय महत्त्वाचा आहे. यासंदर्भात निरीक्षणे नोंदविताना समवाक आरेखन रेषांबद्दलचे वास्तवही ध्यानात घ्यावे लागते. याबाबत औदुंबर सरवदे लिहितात, ‘बोलीचे अभ्यासक बोलींच्या सीमा निश्चित करताना विविध भाषिक बाबींचे वेगळेपण दर्शविणाऱ्या परंतु, एकाच ठिकाणी कमीअधिक प्रमाणात समांतरपणे आढळणाऱ्या समवाक आरेखन रेषांना अधिक महत्त्व देतात. परंतु, जेव्हा आपण एकापेक्षा अधिक समवाक आरेखन रेषा एकत्र येऊन झालेला त्यांचा एक संच शोधतो आणि त्या माध्यमातून दोन बोलींमधील सीमा निश्चित करण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा समोर येणाऱ्या समस्या अधिक असतात. अत्यंत क्वचित प्रमाणातच दोन समवाक आरेखन रेषा तंतोतंत जुळताना दिसतात.’ (औदुंबर सरवदे, २०२० : पृष्ठ ३८) म्हणून पूर्वसुरींच्या कल्पना, मागील अभ्यासही तार्किक पद्धतीने अवलंबावा लागतो. त्या त्या पद्धतीतील उणिवांची जाणीवही अभ्यासकाजवळ असावी लागते. त्यामुळेच बोलीअभ्यासात नोंदी योग्य पद्धतीने होऊ शकतात.

तथापि, बोलीभूगोलातून विकसित झालेल्या बोलीअभ्यासाच्या मर्यादा काही अभ्यासकांच्या लक्षात आल्यानंतर अभ्यासाची दिशा बदलली. कारण वरील चर्चेप्रमाणे बोलींच्या सीमा निश्चित करताना अनेक प्रश्न उभे राहतात. बोलीच्या नेमक्या सीमारेषा दाखवता येत नसल्याने भूभागाच्या आधारे बोली ठरविण्यापेक्षा सामाजिक वर्गाच्या आधारे बोली निश्चितीचा प्रयत्न पुढे समाजभाषाविज्ञानात झाला. अभ्यासकांना समाजात भाषा व्यक्तीच्या सामाजिक प्रतिष्ठेनुसार, वर्गानुसार बदलताना दिसल्यामुळे हा नवा दृष्टिकोन रुजला. भारतासारख्या सामाजिक उतरंडीत अनेकविध प्रकारची विविधता असलेल्या देशात हा दृष्टिकोन बोलीअभ्यासाच्या दृष्टीने अधिक फलदायी ठरतो. यासाठी बोलीतील सूक्ष्म स्तरावचा ध्वनीबदलही अभ्यासावा लागतो. यासंदर्भातील वर चर्चिलेले संशोधन सर्वप्रथम लबव यांनी केले आहे. ते अभ्यासकांनी ध्वनीस्तरावरील स्तरबदलाच्या अभ्यासासाठी समजून घेतले पाहिजेत. त्यातून समाजातील विविध स्तर, वर्ग बोलीतील उच्चारणे कशी बदलतात हे लक्षात येते आणि उच्चारणांवरून सामाजिक स्तर ठरवण्याला मदत होते. लबव यांचा हा प्रारंभिक अभ्यास बोलीअभ्यासाची दिशा बदलवणारा ठरला आहे.

### ध्वनी व वाक्यस्तरीय रचनांचे विश्लेषण

संरचनावादी भाषा अभ्यासात भाषेच्या संरचनेच्या विविध स्तरांचा सूक्ष्म अभ्यास केला जातो. संरचनेचे ध्वनी, शब्द, वाक्य आणि अर्थ हे स्तर अभ्यासकांनी सांगितले आहेत. पैकी ध्वनी, शब्द आणि वाक्य स्तरावरचा सूक्ष्म विचार आधुनिक भाषाभ्यासात झालेला आहे. समाजभाषाविज्ञानामध्येही या स्तरांचा विचार होतो. सामाजिक भाषाविज्ञानात भाषिक उच्चारणातील परिवर्तित पर्यायांचा अभ्यास केला जातो. याबद्दल संक्षिप्त चर्चा वरती आलेली आहे. हा अभ्यास स्योस्यूर प्रणित भाषेच्या संरचनावादी अभ्यासात होत नव्हता. रमेश धोंगडे म्हणतात तसे, ‘भाषेचा एककालिक अभ्यास करताना


मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

सस्यूर भाषेची एक विशिष्ट काळातील स्थिर अशी संरचना मानतो. भाषेत होणारे बदल हे ऐतिहासिक भाषाविज्ञानामध्ये लक्षात घेतले जातात. भाषेची संरचना तपासताना या बदलांना स्थान नसते. उदाहणार्थ, इंग्रजीत thou च्या जागी you येणे हा बदल भाषेच्या इतिहासाशी संबंधित आहे पण you चा एकवचनी व अनेकवचनी वापर हा इंग्रजीच्या आजच्या संरचनेचा भाग आहे. आजच्या इंग्रजीचे विश्लेषण करताना पूर्वी you ऐवजी thou वापरत या निरीक्षणाला स्थान नाही. सामाजिक भाषाविज्ञानातील परिवर्तनीय घकांच्या अभ्यासात संरचनेतील हे पर्याय एक प्रकारे पुढे होणाऱ्या बदलांची पूर्वचिन्हे असतात. एककालिक अभ्यासामध्ये दुर्लक्षित होणारा भाषा बदल हा विषय सामाजिक भाषाविज्ञानामुळे नव्याने अभ्यासला जातो आहे' (डॉ. रमेश धोंगडे, पृष्ठ १३८)

भाषाभ्यासात सामाजिक दृष्टी येण्याची प्रक्रिया १९६० च्या दरम्यान आल्याचे वरती आपण नोंदविले आहेच. हा काळच समाजभाषाविज्ञानाच्या उदयाचा काळ मानला जातो. यासाठी जी. एन. पूतनम, ई. एम. ओर्हेन, जे. एल. फिश्चर, विल्यम लबव, पिटर ट्रॅजिल अशा अभ्यासकांनी केलेले नवे संशोधन कारणीभूत ठरले. भाषिक व्यवहारात सामाजिक स्तरांनुसार येणारे परिवर्तित पर्याय या अभ्यासकांनी समोर आणले. त्यातून व्यक्तीच्या भाषिक व्यवहाराचे, बोलण्याचे निरीक्षण करून त्याचा सामाजिक स्तर ठरविता येतो, हा निष्कर्ष समोर आला. त्यासाठी त्या व्यक्तिच्या भाषिक उच्चारणाचा सूक्ष्म अभ्यास करण्यात आला.

पूतनम, ओर्हेन यांनी वॉशिंग्टन शहरातील झोपडपट्टीचा अभ्यास केला. तर फिश्चर यांनी बोली अभ्यासात 'मुक्त वैविध्या'ची संकल्पना मांडली. ते म्हणतात, 'एखाद्या वैविध्याला मुक्त वैविध्य असे संबोधणे म्हणजे त्या वैविध्याचे स्पष्टीकरण केले असे होत नाही. तसेच संकलित माहितीचे पद्धतशीरपणे विश्लेषण केल्यानंतर अशी मुक्त वैविध्ये कोणत्या ना कोणत्या सामाजिक बाबींच्या आधारे स्पष्ट करता येऊ शकतात.' (औदुंबर सरवदे, २०२० : पृष्ठ १२७) तर सामाजिक स्तर समोर ठेऊन विल्यम लबव्ह याने मार्थाझ व्हेनयार्ड या बरोबरच न्यूयॉर्क शहरातील बोली वैविध्याचा अभ्यास केला. या अभ्यासांमधून बोलीच्या सामाजिक वैविध्याबद्दलची नवी अभ्यासदृष्टी मिळाली. स्योस्यूर प्रणित भाषाभ्यासात भाषेच्या संरचनेचे स्तर अभ्यासताना सामाजिक दृष्टी नव्हती. ती लबव्हच्या संशोधनानंतर आली. याबाबत डॉ. औदुंबर सरवदे लिहितात, 'यापूर्वीच्या कोणत्याही बोली अभ्यासाच्या तुलनेत लबोवने मार्थाझ व्हेनयार्ड या ठिकाणच्या केलेला संमिश्र (द्विस्तर) स्तरांचा अभ्यास अगदी सुस्पष्ट आणि पद्धतशीरपणे केला असल्याचे दिसतो' (१३१) तर त्यांनी न्यूयॉर्क शहरातील विविध डिपार्टमेंट स्टोअर्सच्या माध्यमातून अनेक भाषिक नमुने जमा करून केलेला बोलीतील उच्चारणांचा अभ्यास उच्चारण आणि सामाजिक स्तर यावर प्रकाश टाकतो. लबव्ह यांनी निम्न कामगार वर्ग, उच्च कामगार वर्ग, निम्न मध्यम वर्ग, उच्च मध्यम वर्ग असे गट कल्पून भाषिक उच्चारणांचा सूक्ष्म अभ्यास केला. भाषेच्या अभ्यासामध्ये समाजाच्या सामाजिक, आर्थिक गोष्टींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, हे लबव्ह याने या अभ्यासातून अधोरेखित केले. वरील विविध वर्गांच्या उच्चारणांचा सूक्ष्म अभ्यास करून लबव्ह यांनी काढलेले निष्कर्ष महत्त्वाचे आहेत. लबव यासंदर्भात म्हणतात, 'शक्यतो निम्न वर्ग आणि उच्च वर्गातील लोक एकदा का पौगंडावस्थेत त्यांची उच्चारणे निश्चित झाली की ती बदलताना दिसत नाहीत. परंतु, मध्यमवर्गातील लोक मात्र अधिक चांगल्या सामाजिक-आर्थिक भवितव्यासाठी आपले उच्चार बदलण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यांच्या भाषिक असुरक्षिततेमुळे औपचारिक संदर्भामध्ये मध्यमवर्गीय लोकांच्या उच्चारणांमध्ये अनिश्चितता पाहायला मिळते. त्यामुळेच लबव दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या स्थानिक बोलीचाच (Vernacular) अभ्यास करण्यास प्रोत्साहन देतो.'(औदुंबर सरवदे, २०२० : पृष्ठ १३७)

समाज अनेक प्रकारच्या लोकांनी बनलेला असतो. त्यातूनच विविध बोली अस्तित्वात आलेल्या आहेत. समाजातील विविध स्तर, वर्ग, धर्म-जाती, पारंपरिक उद्योग-व्यवसाय इत्यादीमुळे एक बोली बोलणाऱ्या संपूर्ण समाजाची संस्कृती एकसारखी नसते. पर्यायाने या स्तर, वर्ग, जाती आणि व्यवसायांनुसार त्यांची बोलीही परस्परांपासून वेगळी असते. तिच्यात अनेक सूक्ष्म भेद पाहायला मिळतात. हे भेद उच्चार म्हणजेच ध्वनी, शब्दसंपत्ती, शब्दप्रयोग, वाक्यरचना अशा अनेक दृष्टीने अभ्यासता येतात. हे बोलीतील वैविध्य अभ्यासणे प्रारंभीच्या बोलीअभ्यासात महत्त्वाचे मानले गेले. ज्या पद्धतीने भाषेमध्ये स्वन

(ध्वनी), पदिम, वाक्य, अर्थ या पातळ्यांवर असणारी वैविध्यता शोधण्याचे काम झाले, त्या पद्धतीनेच बोलीतील वैविध्यता शोधण्याचा प्रयत्न होऊ लागला. ही वैविध्यता शोधताना बोलीतील स्वनिमांची संख्या, स्वनिमांची वैशिष्ट्ये, व्याकरणिक विशेष, पदविचार, वाक्यविचार असा सूक्ष्म अभ्यास होऊ लागला. या अभ्यासातून बोली प्रमाणभाषेपासून किती वेगळी हे अभ्यासकांच्या लक्षात येत गेले. भाषा आणि बोलीतील वेगळेपण शोधणे हेच या अभ्यासाचे स्वरूप होते. हा अभ्यास भाषाविज्ञानाची एक शाखा म्हणून पाहिला जातो. बोलीअभ्यासाचे क्षेत्र त्यातून विकसित होत आणि विस्तारत गेले. या अभ्यासक्षेत्राला 'बोलीविज्ञान' (Dialectology) या नावाने ओळखले जाते.

बोलीविज्ञानात बोली ही प्रमाणभाषा आणि इतर बोलींपासून कशाप्रकारे वेगळी आहे, हे अभ्यासले जाते. म्हणजेच कोणतीही बोली ही इतर बोली आणि तिच्या प्रमाणभाषेपासून वेगळी असते, हे गृहितक बोलीविज्ञानाने मान्य केलेले आहे. हे वेगळेपण अभ्यासताना तिच्यातील शब्द वैविध्य, उच्चार वैविध्य आणि व्याकरणिक वेगळेपण अभ्यासले जाते. प्रदेशानुसार बदलणारी ही वैशिष्ट्ये, लिंग, जात, व्यवसायानुसारही कशी बदलतात ते पाहिले जाते. हे वेगळेपण अभ्यासण्यासाठी बोलीतील ध्वनी, पदिम किंवा रूपिम, शब्द, वाक्य आणि त्याचे अर्थ काळजीपूर्वक तपासले जातात. ध्वनींचा अभ्यास करताना स्वनिमांची संख्या, शब्दांचे अर्थ, त्यांना लागणारे प्रत्यय, त्या बोलीची वाक्यनिर्माणाची पद्धती पाहिली जाते. बोलीची निर्मिती सामाजिक कार्ये पार पाडण्यासाठी झालेली असल्याने बोलीचे सामाजिकत्व फार महत्त्वाचे आहे. त्यामुळे एकच बोलीत ती बोलणाऱ्या समाजाच्या संदर्भाने दिसणारी वैविध्यता वरील पद्धतीने अभ्यासली जाते.

**व्यावसायिक बोली**

मराठी समाजाचा पारंपरिक 'गावगाडा' पाहता त्यात अलुतेदारी बलुतेदारी पद्धतीला किती महत्त्वाचे स्थान होते, हे ध्यानात येते. वैज्ञानिक प्रगतीनंतर पारंपरिक उद्योग-व्यवसाय मागे पडले. पर्यायाने अलुतेदारी-बलुतेदारी पद्धती संपुष्टात आली. 'गावगाडा' संपुष्टात आला. खेडी नागरीकरणाकडे वाटचाल करू लागली. गावातील भाषा बदल लागली. तथापि या भाषेवर शेकडो वर्षे प्रचलित असणाऱ्या गावगाड्याचा प्रभाव आजही कायम असल्याचे दिसून येते. गावगाड्यातील पारंपरिक व्यवसायांतील अनेक शब्द, शब्दप्रयोग भाषेमध्ये रूढ झालेले आहेत. उदाहरणार्थ, 'टाका घालणे','पाचर मारणे', 'पाणी पाजणे', 'डाग देणे', 'कान टोचणे', 'सुतात घेणे', 'वळंबा घालणे' यासारख्या अनेक शब्द विशिष्ट जातीच्या पारंपरिक व्यवसायातून आलेले असल्याने या शब्दांची चिकित्सा त्या संदर्भात होणे आवश्यक असते. कारण या शब्दांना त्या व्यवसायातूनच अर्थ प्राप्त झालेला आहे. अर्थात अशा शब्दांचा वापर पुढे त्या-त्या जातींपुरता मर्यादित न राहता, तो अधिक व्यापक होत जातो.

समाजभाषाविज्ञानात क्षेत्रविशिष्ट बोलीचा अभ्यास करताना उद्योग आणि व्यवसायविशिष्ट बोलीचा अभ्यास केला जातो. व्यवसायविशिष्ट कामांमधून बोली कशी घडलेली असते, हे पाहणे उद्बोधक ठरते. एखादे काम व्यवस्थित पूर्ण केले नाही तर, 'तो माझी हजामत करेल' असे लोक सहज म्हणतात. एखाद्याला दिल्या जाणाऱ्या 'एऽऽ हजामा' सारख्या शिवीतून न्हाव्याच्या व्यवसायाला समाजाने दिलेले स्थान दिसून येते. त्या प्रमाणेच मांगा, चांभारा, भंग्या हे शब्द देखील एखाद्याचा वाईट अर्थाने उद्धार करताना वापरले जातात. या जातीतील लोकांना परंपरेने दिलेल्या कामांमुळे ही नावे शिव्यांच्या स्थानी आलेली आहेत. यातून अशा पद्धतीच्या जातीवाचक शिव्या देण्याला कायद्याने अटकाव करण्यात आलेला आहे. अर्थात याबद्दल आत बरीच जागृती झाली असून हे सर्व समाज अशा पद्धतीने बोलण्यावर आज आक्षेप घेतात. अशा पद्धतीने बोलण्याला पूर्णत: मनाई आहे. कायद्याचे पालन आणि या समाजबांधवांच्या भावनांचा विचार करून अनेक वर्तमानपत्रांनी, प्रकाशन संस्थांनी या शब्दांबरोबरच 'घिसाडघाई', 'बेरड' सारखे जातीवाचक शब्द वापर बंद केला आहे. भाषावापराची आपली आपली संहिता ठरवली आहे. तथापि, या पद्धतीची भाषा नैसर्गिकपणे मराठीत तयार झालेली दिसते. या भाषेचा समाजभाषावैज्ञानिक विचार महत्त्वाचा आहे. शिंप्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळल्यास 'तार तुटली' असा शब्दप्रयोग होत असे. हा शब्दप्रयोग आता विस्तारित अर्थाने वापरला जातो. तो केवळ त्या समाजापुरता राहिलेला नाही. या

शब्दप्रयोगांप्रमाणेच चप्पल शिवण्याच्या व्यवसायातून 'टाका घालणे', सुतार समाजातून 'पाचर मारणे', लोहारांकडून 'पाणी पाजणे', सोनार समाजातील सोन्याचांदीचे दागिणे बनवण्याच्या व्यवसायातून 'डाग देणे', 'कान टोचणे' हे शब्दप्रयोग मराठीत रुजले आहेत. अशा पद्धतीचे 'सुतात घेणे', 'वळंबा घालणे' हे अर्थसमृद्ध शब्द बांधकाम व्यवसायातून मराठीत प्रविष्ट झालेले आहेत.

डॉ. रमेश वरखेडे यांनी सामाजिक बोलीअभ्यासात व्यावसायिकांच्या बोलींचे स्थान अधोरेखित केले आहे. त्यांनी भिक्षुकी, सोनार, तेली, न्हावी, बुरुड, चांभार, ज्योतिषी अशा काही व्यवसायातील शब्दांची यादी देऊन व्यवसायविशिष्ट शब्द हे बृहत संज्ञापन व्यवहाराचे घटक बनतात आणि त्यांचे उपयोजन लक्षणेने होऊ लागते, असे सांगितले आहे. यासंदर्भाने, 'इंगा फिरवणे' (साहेबाचा इंगा फिरला = नरम पडला) हा वाक्प्रयोग चांभाराच्या व्यवसायात कातडे ढिले पाडण्यासाठी किंवा नरम करण्यासाठी, कातड्यावर करावयाच्या प्रक्रियेकरिता योजला जातो. 'ठिय्या देणे' हा वाक्यप्रयोग सुतारांच्या व्यवसायातील रंधण्याच्या प्रक्रियेत फळी निसटू नये म्हणून ठोकलेल्या आडव्या पट्टीसाठी योजला जातो. 'समेवर येणे' (गवयी), 'खरडपट्टी काढणे' (रंगारी), 'पाणी पाजणे' (लोहार-पांचाळ) यासारखे कितीतरी वाक्प्रयोग हे व्यवसायविशिष्ट शब्दांचा अर्थविस्तार होऊन मराठीच्या बृहत भाषिक भांडारात समाविष्ट झालेले दिसतात.' असे नोंदवतात. (रमेश वरखेडे : २००१, पृष्ठ ५४-५५) अशा पद्धतीने भाषा आणि समाजाचा संदर्भ उलगडताना व्यवसायविशिष्ट शब्दांचा विचार महत्त्वाचा आहे. चंदगडी बोलीच्या संदर्भाने पारंपरिक गावरहाटीतील बोलीत रुजलेले शब्द स्पष्टीकरणासाठी घेतलेले आहेत. खेड्यात शेती हा मुख्य व्यवसाय आहे. त्या व्यवसायाला जोडून असणारे सुतार, लोहार, कुंभार, चांभार असे अनेक व्यवयाय, उद्योगातील भाषा आपण चंदगडी बोलीच्या संदर्भाने विचारात घेतलेली आहे. सारे व्यवसाय परस्परांवर अवलंबून असल्याने प्रत्येकाचा संपर्क अटळ होता. त्यातून परस्परांच्या दैनंदिन व्यवहारात रुजलेले शब्द अभ्यासता येतील.

**लिंगविशिष्ट बोली**

समाजातील लिंगभेद हा सर्वात ठळक दिसणारा भेद आहे. त्याचा भाषेवर खोलवर परिणाम झालेला असतो. जगभरातील भाषांमध्ये याचा प्रत्यय येतो. पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत तयार झालेली भाषा पुरुषकेंद्री दिसते. त्यातून जगभरात पद, पदनामे या वर्चस्वादी शब्दसंग्रहात पुरुषवाचक शब्दांचे प्राबल्य दिसते. म्हणूनच भाषेच्या अभ्यासात स्त्री-पुरुष हा लिंगभेद समाजभाषाविज्ञानामध्ये महत्त्वाचा मानला जातो. नर आणि मादी हा भेद निसर्गनिर्मित आहे. परंतु, या भेदाचे रूपांतर समाजाने स्त्री-पुरुष या सामाजिक भेदामध्ये केले आहे. या भेदाचा व्यापक परिणाम भाषेवर झालेला आढळतो. स्त्री-पुरुषांचे समाजातील स्थान, जातिजमातीनुसारही बदलताना दिसते. भारतीय समाजजीवनामध्ये बहुतांश समाजात पुरुषसत्ताक समाजव्यवस्था प्रभावी असल्याचे दिसते. या वर्चस्ववादी व्यवस्थेचा स्त्री-पुरुषांच्या भाषेवर सूक्ष्म आणि खोलवर परिणाम झालेला आहे. स्त्रियांचे समाजातील दुय्यमत्व अधोरेखित करणारी काही उदाहरणे देता येतील. स्त्रीच्या बाबतीत सर्वसामान्य समाज सहजपणे बोलताना 'पायातली वहाण पायातच बरी' किंवा 'आपलं जनावर आपल्या ताब्यात हवं' अशी भाषा वापरतो. स्त्रीसंबंधी भाषा वापरताना स्त्री ही वापरावयाची वस्तू, उपभोग, आस्वाद घ्यावयाची वस्तू या स्वरूपाची भाषा वापरलेली दिसते. ही भाषा समाजाच्या पुरुषी मानसिकतेशी जखडली गेली आहे. स्त्रियांबाबत पुरुषांच्या तोंडी येणारे शब्द अनेकदा विकृत, अश्लिल, घाणेरडे असतात. शिक्षणाचा प्रसार सर्वदूर झालेला असला तरी समाजातील पुरुषी मानसिकता अद्याप संपुष्टात आलेली नाही. समाजातील स्त्रीचे दुय्यम स्थान कायम आहे. भाषेतही आपणास हे जाणवते. समाज, कुटुंबातील स्त्री-पुरुषांच्या स्थानानुसार भाषा आकाराला आलेली असते. मराठी भाषिक समाजामध्ये पुरुषसत्ताक समाजरचनेचा प्रभाव स्पष्ट जाणवतो. यासंदर्भाती उदाहरण म्हणून काही पदनामे पाहू शकतो. या पदनामांमध्ये पुल्लिंगी शब्दांचे आधिक्य नजरेत भरते. उदाहरणार्थ, प्राध्यापक, अध्यक्ष, चेअरमन, खजिनदार, सचिव, सेक्रेटरी, मॅनेजर, विभागप्रमुख, संपादक, वार्ताहर, पत्रकार, सूत्रसंचालक, ग्रंथपाल, संचालक, संयोजक, सभासद, सदस्य, ड्रायव्हर, इंजिनिअर, डॉक्टर, अभियंता, वैद्य इत्यादी.

भाषा वापराबाबत स्त्री फार सौम्य शब्दांचा वापर करीत असते. तिच्या भाषेमध्ये अश्लिल, शिवराळ शब्दांचा वापर जवळ-जवळ नसतो. मात्र विशिष्ट जाती-जमातींच्या बोली अभ्यासात हा अपवाद ठरू शकतो. चंदगडी बोलीच्या अभ्यासात बेरड समाजाच्या भाषेचा अभ्यास करताना ही गोष्ट जाणवते. या समाजातील वयस्क स्त्रिया शिवराळ भाषा नैसर्गिकपणे वापरताना दिसतात. भाषा वापरावरून व्यक्तीचा दर्जा, चारित्र्य ठरविण्यात येते. उच्चभ्रू समाजातील स्त्रिया स्वत:च्या भाषेमध्ये अश्लिल शिवराळ शब्द येणार नाहीत याची काळजी घेतात. योनिशुचिता, श्रेष्ठ-कनिष्ठता, चारित्र्य याबाबतीत अवाजवी महत्त्व नसलेल्या काही विशिष्ट जातींमधील, निम्नस्तरीय भटक्या जातीमधील स्त्रियांच्या तोंडी अश्लील, शिवराळ भाषा पाहावयास मिळते. त्यांच्या बोलण्यातच पुरुषी ढंग दिसतो. ग्रामीण भागातील स्त्रियांच्या बाबतीत बऱ्याचदा नादमय, सूत्रमय भाषेतून संवाद चालतो. ही स्त्री आपले दु:ख बऱ्याचदा काव्यमय भाषेतून सांगते. याबाबतीत रमेश वरखेडे लिहितात की, 'नादमय शब्दयोजना ही तिच्या जगण्याच्या वृत्तीचीच द्योतक असते.' (वरखेडे रमेश, २००१ : पृष्ठ ४१) समाजभाषावैज्ञानिकांनी स्त्री-पुरुषाच्या भाषेचे निरीक्षण करून वस्तुनिष्ठ विवेचन केलेले आहे. समाजातील स्तरानुसार स्त्री-पुरुषांच्या भाषेमध्ये फरक पडतो. समाजातील स्तरांमुळे भाषेचा वापर स्तरविशिष्ट दिसतो.

बोलीभाषांच्या अभ्यासात स्त्रियांची भाषा आणि पुरुषांची भाषा असा विचार वेगळ्या पद्धतीने करता येतो. प्रमाण भाषेत व्याकरणाचे नियम काटेकोरपणे पाळण्याकडे व्यक्तीचा कल असतो. तसे नियम बोलीत पाळण्याची आवश्यकता नसते. चंदगडी बोलीत स्त्रिया मी यल्लो, मी गेल्लो अशी पुरुषवाचक रूपे वापरतात. कोल्हापुरी बोलीतही मी जेवलो असे म्हणण्याची पद्धत स्त्रियांच्या भाषेत रूढ होऊन गेलेली आहे. त्याशिवाय पुढे आपण भाषिक भांडार आणि लघुक्षेत्रांचा विचार करताना रेणूका देवीशी संबंधित मोठा भाषिक व्यवहार अभ्यासणार आहोत. हा सर्व व्यवहार पुरुषांपेक्षा स्त्रियांचा म्हणूनच पाहावा लागतो. कारण या देवीशी संबंधित तयार होणाऱ्या देवदासी, तिच्या भक्त पुरुषांपेक्षा स्त्रिया अधिक असतात. त्यातून त्यांची म्हणून एक भाषा घडते.

**सांस्कृतिक स्वनिम आणि बोलींची संस्कृतीविशिष्टता**

सीमा निश्चितीसाठी बोलीतील स्वनिम, पदिम स्तरावरची निरीक्षणे महत्त्वाची आहेत. त्यादृष्टीने या निरीक्षणाचा विचार करू. प्रत्येक भाषेचे काही भाषाध्वनी असतात. बोलीचीही स्वत:ची ध्वनीव्यवस्था असते. ते उच्चारणदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण असतात. उदाहरणार्थ, चंदगडी ही मराठी भाषेची बोली असे म्हणत असलो तरी तिची ध्वनिव्यवस्था प्रमाण मराठीतील ध्वनींपेक्षा कितीतरी वेगळी दिसते. उदाहरणार्थ, मराठीतील कोठे (क्+ओ+ठ्+अ+ए) चंदगडीतील या अर्थाचे उच्चारण खलेटे (ख्+अ+ल्+ए+ट्+ए) असे आहे. माझ्याकडे (माझेडे), त्याच्याकडे (त्यचेडे), जाण्यासाठी (जाऊस), येण्यासाठी (यऊस) अशा पद्धतीने काही शब्दांमधील ध्वनी पाहिले तरी, प्रत्येक बोलीची ध्वनिव्यवस्था कशी स्वतंत्र असते, हे लक्षात येते. शिवाय ध्वनींच्या उच्चारणातील चढउतार, आरोह, अवरोह, बलाघात याचाही स्वतंत्र विचार करता येईल. हा विचार पुढे उच्चारण आणि व्याकरणाचा विचार करताना केलेला आहे. बोलीतील ध्वनी नोंदवण्याची पारंपरिक पद्धत म्हणजे, स्वर, व्यंजने यांची नोंद घेणे होय. बोली भूगोल या अभ्यासपद्धतीत ध्वनींचा यापेक्षा अधिक सूक्ष्म विचार अपेक्षित आहे.

कोणते ध्वनी कोणत्या क्षेत्रात कसे उच्चारले जातात हे पाहण्याकडे कटाक्ष असतो. त्यावरूनच बोलीच्या सीमा निर्धारणाचे काम केले जाते. अमूक एखादा ध्वनी अमूक क्षेत्रातील बोलीरूपामध्ये दिसत नाही. परंतु, तिच बोली वापरणाऱ्या दुसऱ्या क्षेत्रात तो ध्वनी वापरला जात असतो. अशा निरीक्षणातून त्या बोलीतील भिन्न रूपांचा अंदाज घेता येतो. चंदगडी बोलीमध्ये पूर्व आणि पश्चिम अशा दोन विभागातील ध्वनी भिन्न पद्धतीने वापरले जाताना दिसतात. उदाहरणार्थ, कुटेऽ (पश्चिम) तर हाच उच्चार *खटे* (पूर्व) असा होतो. *कशास* (पश्चिम), *कास* (पूर्व), *कव्व* (पश्चिम), *कन्न* (पूर्व) हाच उच्चार किणीकर्याद भागात कदी असा होताना दिसतो. याबरोबचच *यल्लेस* (प) - *यल्ल्यास* (पू), *गेल्लेस* (प)- *गेल्ल्यास* (पू), *कव्वपासनं* (प) - *कन्नच्यान* (पू), *त्यनी* (प) - *त्यनानी* (पू), *ह्यनी* (प) - *ह्यनानी* (पू) अशा उच्चारणांच्या, शब्दांच्या आधाराने सीमा निर्धारणाला मदत होते. अर्थात मागे म्हटल्याप्रमाणे सीमानिर्धारण ही गुंतागुतीची आणि ठोस भाष्य करता येण्यासारखी गोष्ट नाही. तरीही

बोली बदलाचे सूचन त्यातून दाखवता येते. त्याशिवाय सर्वनामांचा वापर हाही यासंदर्भात महत्त्वाचा ठरतो. चंदगडी बोलीच्या संदर्भात 'मी'साठी पूर्व विभागात 'मिणं', पश्चिम विभागात 'मिय्या', तर मालवणी-कुडाळी बोलीसंपर्कातील क्षेत्रामध्ये 'माज' अशा पद्धतीने सर्वनामे बदलताना दिसतील. विशेषणांबाबतही असे विशेष दाखवता येतात. 'चॅप्टर' या विशेषणासाठी चंदगडीच्या वेगवेगळ्या क्षेत्रात बिलंदर, बेरकं, बाटकं, मस्तअशी विशेषणे वापरात असलेली दिसतील. याच अर्थासाठी बारबोडं, मस्त्यालवड्याचं अशी विशेषणेही वापरात आहेत. अशा उच्चारणातून बोलीची संस्कृती विशिष्टता ध्यानात येते.

**संरचनावादी बोलीअभ्यास**

बोली अभ्यासाची पारंपरिक दृष्टी ते समाजभाषावैज्ञानिक अभ्यासपद्धती अशी एक चर्चा आपण केली. ही चर्चा आवरती घेण्यापूर्वी भाषाभ्यासातील सर्वात प्रभावी ठरलेल्या संरचनावादी अभ्यासाबद्दल चर्चा करून पुढे जाऊ. पारंपरिक बोली अभ्यासातील त्रूटी दूर करण्याच्या हेतूने पुढे बोलीचा संरचनावादी अभ्यास सुरू झाला. अर्थात ही वाटचाल बरीच विस्ताराने सांगता येते. परंतु, तो आपल्या चर्चेचा विषय नाही. विसाव्या शतकात आधुनिक भाषाविज्ञानात झालेल्या विकासाचा प्रभाव बोलीअभ्यासावर पडला. त्यातून बोलीअभ्यासाची दिशा बदलत गेली. यादरम्यानच विज्ञान आणि इतर सामाजिकशास्त्रांच्या अभ्यासातही प्रगती झाली होती. यासर्वांचा परिणाम भाषाअभ्यासावर झाला आहे. कारण या प्रगतीमुळे काही अभ्यासक भाषाविज्ञानाकडे आणि पूर्वसुरींनी केलेल्या कामाकडे चिकित्सकपणे पाहू लागले. त्यातून त्यांना ज्या त्रुटी जाणवल्या त्या त्यांनी परखडपणे दाखवून दिल्या. त्याबद्दलचे आक्षेप त्यांनी नोंदवले. त्यामुळे भाषाअभ्यास नवे वळण घेतले. त्याचा बोलीअभ्यासावरही परिणाम झाला. बोलीमधील वैविध्ये तिच्या प्रत्येक स्तरावर पाहता येतात ही गोष्ट लक्षात आल्यानंतर पारंपरिक बोलीअभ्यास मागे पडला. आधुनिक भाषाविज्ञानाच्या विकासाबरोबर बोलीअभ्यासातही विविध स्थित्यंतरे येत गेली. भाषाविज्ञानात स्योस्यूर यांच्या सिद्धांतनानंतर भाषेचा अभ्यास संरचनावादी पद्धतीने सुरू झाला. या अभ्यासाच्या प्रभावातून बोलीअभ्यासातही या अभ्यासपद्धतीचा उपयोग करण्यात येऊ लागला. संरचनावादी भाषाअभ्यासात भाषेचे ध्वनी, शब्द, वाक्य, अर्थ या स्तराबरोबर तिचे व्याकरण म्हणजे शब्द आणि वाक्यरचना अशा स्तरावर अभ्यास होऊ लागला. या अभ्यासपद्धतीचा बोलीअभ्यासावर इतका प्रभाव पडला की काही अभ्यासक, 'अशा प्रकारे बोली वैविध्यता संकलित करणे आणि सुव्यस्थितपणे ती दर्शविणे हेच बोलीविज्ञानाचे अंतिम उद्दिष्ट आहे.' (औदुंबर सरवदे, २०२० : पृष्ठ १०१) असे मानू लागले.

बोलीअभ्यासाला अशी नवी दिशा मिळाली असली तरी, प्रारंभीच्या काळात बोलीविज्ञानामध्ये केवळ स्वनिम आणि शब्द स्तरावरीलच अभ्यास मोठ्या प्रमाणात झाला. तिचे इतर स्तर दुर्लक्षित राहिले. ते समाजभाषावैज्ञानिक अभ्यासपद्धतीत अतिशय बारकाव्यानिशी पुढे विचारात घेतले जाऊ लागले. याची सुरुवात १९५० नंतर झालेली आहे. १९५० नंतर बोलीविज्ञानामध्ये भाषाविज्ञानातून विकसित झालेल्या शास्त्रशुद्ध पद्धतींचा अवलंब करण्यात येऊ लागला. या नव्या अभ्यासपद्धतीमुळे तोपर्यंत दुर्लक्षित राहिलेल्या बाबींचा अंतर्भाव अभ्यासात झाला. याबाबत सरवदे लिहितात,'संरचनात्मक बोलीविज्ञानामध्ये प्रत्येक बोलीची स्वतंत्र ध्वनीव्यवस्था असते, असे ग्राह्य धरले जाते. त्यानुसार संबंधित बोलीतील ध्वनींचा आणि उच्चारांचा वर्णनात्मक दृष्टीने अभ्यास केला जातो. तसेच इतर बोलींच्या ध्वनी आणि उच्चारांपासून विचाराधीन बोलीतील ध्वनी आणि उच्चार कशा प्रकारे विभिन्न आहेत, याचा विचार केलेला आढळतो.' (औदुंबर सरवदे, २०२० : पृष्ठ १११) संरचनावादी बोलीअभ्यासाने प्रत्येक बोली ही एक स्वतंत्र व्यवस्था असते, हे ग्राह्य मानले आणि या व्यवस्थेतील प्रत्येक भाषिक बाबींचे विश्लेषण त्या भाषिक बाबींमधील परस्पर भेद आणि त्यांचे संबंधित बोलीतील कार्य यानुसार करण्यात येऊ लागले.

संरचनावादी अभ्यासाच्या दृष्टीमुळे भाषेबरोबर बोलींचाही अभ्यास सुरू झाला. बोलीविज्ञानामध्ये बोली तिच्या प्रमाणभाषेपासून आणि तिच्या इतर बोलींपासून कशा आणि किती वेगळ्या आहेत, याचा अभ्यास केला जाऊ लागला. त्यातूनच पारंपरिक बोलींचा अभ्यास, संरचनात्मक बोलीविज्ञान, जननशील बोलीविज्ञान ते सामाजिक बोलीविज्ञान अशी


मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

बोलीअभ्यासाची वाटचाल झाली. पारंपरिक बोलीअभ्यासात सिद्धान्त आणि संकल्पनांच्या पातळीवर वानवा दिसते. पुढे संरचनावादी अभ्यासाने बोलीअभ्यासात आणि विश्लेषणात सूक्ष्मता आली. तसेच हा अभ्यास बऱ्याच व्यापक क्षेत्रातील भाषाभेदांसंदर्भात होऊ लागला. समाजभाषाविज्ञानामुळे संकल्पनात्मक चौकटीबरोबर हा अभ्यास लहान आणि मर्यादित क्षेत्रातील भाषिक रूपांचाही होऊ लागला. त्यामुळे भाषाअभ्यासात मुख्य भाषेबरोबर तिच्या बोलींचे अस्तित्व अधोरेखित झाले. मुख्य बोली आणि तिच्या बोलींचे परस्परांपासूनचे वेगळेपण हेच 'बोलीविज्ञाना'चे अभ्यासक्षेत्र बनले.

**संरचनावादी भाषाभ्यासाची मर्यादा**

एकोणिसाव्या शतकात ऐतिहासिक भाषाभ्यासाचा विकास झाला. या अभ्यासातून जगभरातील भाषांचे वंशवृक्ष हाती आले. त्यातून मानवाचे जगभरातील स्थलांतर आणि त्याची संस्कृती याबद्दलचे एक चित्र समोर आले. ऐतिहासिक भाषाभ्यास केवळ भाषेचा अभ्यास न राहता, तो मानवी संस्कृतीच्या अभ्यासाचे साधन बनला. पुढे विसाव्या शतकात भाषेच्या संरचनावादी अभ्यासाची भरभराट झाली. भाषेच्या संरचनेचा सूक्ष्मतेने केलेला अभ्यासही अनेक विद्याशाखांसाठी फलदायी ठरला. विशेषत: साहित्याभ्यासात या अभ्यासपद्धतीची बरीच मदत झाली. परंतु, फेर्दिना द स्योस्यूर यांच्यापासून सर्वच संरचनावादी भाषाभ्यासकांनी आपले लक्ष भाषेच्या व्यवस्थेवर केंद्रित केलेले दिसते. यासाठी स्योस्यूर यांनी मांडलेली मते महत्त्वाची ठरली. याबाबत मिलिंद मालशे असे लिहितात, 'भाषेच्या एककालिक विश्लेषणाला अग्रक्रम देण्याचे श्रेय स्योस्यूरकडे जाते. परंतु, केवळ या विश्लेषणाला अग्रक्रम मिळवून देण्यापुरते स्योस्यूरचे कार्य मर्यादित नव्हते, तर या एककालिक भाषिक विश्लेषणामध्ये पायाभूत ठरणाऱ्या काही संकल्पनादेखील प्रथम स्योस्यूरनेच मांडल्या. यांपैकी सर्वात महत्त्वाची संकल्पना म्हणजे "व्यवस्था" किंवा "संरचना" होय.' (मिलिंद मालशे, १९९५/तिसरी आवृत्ती २००४ : पृष्ठ ४५) स्योस्यूर यांच्या या संकल्पनेमुळे चल आणि व्यक्तीव्यक्तीनुसार भिन्न, वैयक्तिक अशा लकबी, सवयी असणाऱ्या भाषा व्यवहारामागे व्यक्तिनिरपेक्ष, अचल आणि एकजिनसी भाषिक व्यवस्था असते आणि ही भाषिक व्यवस्थाच भाषाभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाची असते, असे मत दृढ झाले. त्यामुळे भाषाभ्यासाच्या या वाटचालीत भाषा ज्या संप्रेषण व्यवहारासाठी जन्मलेली आहे, त्याच व्यवहाराकडे अभ्यासकांचे दुर्लक्ष झाले. भाषिक व्यवहार हा गुंतागुंतीचा आणि व्यक्तिसापेक्ष असल्याने तो भाषाभ्यासकांनी जाणीवपूर्वक दूर ठेवल्याचे चित्र आहे. त्यामुळेच भाषेच्या अभ्यासात भाषेच्या सामाजिक अंगाकडे दुर्लक्ष झाले. वास्तविक भाषा ही स्वयंसिद्ध सामाजिक संस्था असल्याने समाज, संस्कृती आणि भाषेचा सहसंबंध घनिष्ठ असतो, तो समजून घेणे आवश्यक आहे.

संरचनावादी बोली अभ्यासाच्या काही मर्यादा लक्षात येऊ लागल्यानंतर या सहसंबंधाची जाणीव हळूहळू अभ्यासकांना होऊ लागलेली होती. युरोपातील भाषाविज्ञानी ग्रीम यांच्या शतसंवत्सरीनिमित्त जॉन वॉटरमन यांनी *भाषाविज्ञानातील दृष्टिकोन* हे पुस्तक प्रकाशित केले. या पुस्तकात युरोपातील एका शतकाच्या भाषाभ्यासाची वाटचाल सांगण्यात आली आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या आधारे दिनेश माहूलकरांनी (*वृद्धि : भाषेचे आणि भाषाभ्यासाचे विकसन* ) 'समाजभाषाविज्ञान'(Sociolinguistics) या नव्या अभ्यासशाखेच्या बीजखुणा नोंदविल्या आहेत. त्यानुसार १९६३-६४ च्या सुमारास विल्यम ब्राइट यांनी 'सामाजिक भाषाविज्ञान' नावाचा नवा भाषाभ्यास आता रूढ करायला हवा, असा विचार मांडला आहे. या संदर्भात ब्राइट लिहितात ते महत्त्वाचे आहे. ते म्हणतात,'१९४९ च्या उत्तरार्धात वा १९५० च्या सुरुवातीस मी जेव्हा भाषाविज्ञानाचा विद्यार्थी होतो तेव्हा जे भाषाविज्ञान रूढ होतं ते मुख्यत्वे नव-ब्लुमफील्ड-वादींचं, मन किंवा अर्थ असल्या कल्पांना दुरूनही स्पर्श न करणारं होतं. सुदैवानं मी जिथं शिकत होतो तिथं म्हणजे बार्कली विद्यापीठात सपीर याच्या विचारांचं मोहन आम्हांला दिल्या जाणाऱ्या भाषाविषयक विचारांच्या पावरोटीत घातलेलं असायचं... माझं अमेरिकेतलं शिक्षण संपल्यानंतर १९५६ ते १९५८ ही दोन वर्षं मी भारतात राहिलो. १९५६ मध्ये एके दिवशी पुण्यात जॉन गम्पर्झ यांच्याशी विचार-विनिमय करीत असता भाषांच्या अभ्यासात त्यांच्या सामाजिक स्वरूपाचा विचार प्रामुख्यानं दाखल करायला हवा ही कल्पना मला चाटून गेली.' (दिनेश माहुलकर : २०००, पृष्ठ ८७) हा विचार पुढे विस्तारत गेलेला आहे.



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

विल्यम लबव यांनी ‘भाषा ही ऐतिहासिक परिमाणात घडली जाणारी व्यवस्था असून तिचा अभ्यास सामाजिक दृष्टीनंच व्हायला हवा,’ हा विचार १९६६ साली उरिएल वेइनरेइख, मार्विन हेरझोग यांच्यासमवेत लिहिलेल्या निबंधातून मांडला आणि भाषाभ्यासाची दृष्टी बदलण्यास सुरुवात झाली.

दिनेश माहुलकरांनी भाषेच्या सामाजिक अभ्यासाच्या प्रारंभासंदर्भात घेतलेल्या दोन नोंदी येथे थोडक्यात पाहता येतील. ते सांगतात, स्योसूर यांच्या १९१६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या *कोर्स इन जनरल लिंग्विस्टिक* मध्ये ते भाषेच्या सामाजिक स्वरूपाच्या अभ्यासाकडे वळल्याचा निर्वाळा देतात. तसेच ब्लुमफिल्ड यांनी आपल्या *Language* या ग्रंथात भाषेचे स्वरूप समजून घेण्यासाठी तिच्या ऐतिहासिक परिवर्तनशीलतेचा अभ्यास आवश्यक असल्याचे नोंदविले आहे. याचा अर्थ, भाषाभ्यासाच्या एका विशिष्ट टप्प्यावर अभ्यासकांना भाषेच्या ऐतिहासिक अभ्यासाबरोबर सामाजिक अंगाकडे आपले लक्ष वळवणे महत्त्वाचे वाटू लागले होते.

एकाच समाजामध्ये अस्तित्वात असणाऱ्या विविध भाषिक रूपांमागे भौगोलिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थिती कारणीभूत असते. त्यामुळे भाषेचा आणि भाषाव्यवहाराचा अभ्यास ती भाषा बोलली जाते त्या समाजाच्या संदर्भातच करावा लागतो, हा विचार पुढे भाषाभ्यासात रुजला. भाषाव्यवहारामध्ये शब्दांना प्राप्त होणारे अर्थ हे समाजाकडून निश्चित झालेले असतात. त्यामुळे त्या अर्थांचे अन्वयन हे त्यांना ‘अर्थ’ प्राप्त करून देणाऱ्या समाजाच्या संदर्भातच होणे आवश्यक आहे. विविध स्तर, वर्ग, धर्म, जाती, प्रदेश, नोकरी-व्यवसाय, वय, लिंग इत्यादींमुळे समाजात दिसणारे भेद भाषेमध्येही पाहायला मिळतात. या भाषिक भेदांचा आणि आधुनिक भाषाविज्ञानामध्ये भाषाभ्यासासाठी गृहीत धरलेल्या ध्वनी, शब्द, वाक्य या भाषेच्या स्तरांचा विचारही या अभ्यासपद्धतीमध्ये केला जातो. भाषिक संरचनेच्या अभ्यासात ध्वनी, शब्द आणि वाक्यरचना या तीन गोष्टींना महत्त्व आहे. यासंदर्भात डॉ. रमेश धोंगडे लिहितात, ‘सामाजिक भाषाविज्ञानात भाषेच्या वापराचा अभ्यास करताना या तीनही गोष्टींच्या वापराचा विचार प्रामुख्याने होतो. उदाहरणार्थ, ‘विचका होणे’, ‘बावचा होणे’ हे शब्दस्तरावरील परिवर्तित पर्याय, विषय शब्दातला प्रतिवेष्टीत ‘ष’ किंवा तालव्य ‘श’ हे ध्वनीस्तरावरचे परिवर्तित पर्याय किंवा येणार का?, येणार काय? आणि येणार ना? हे वाक्यस्तरावरचे परिवर्तित पर्याय यांचा विचार परिवर्तनीय घटक या सामाजिक भाषाविज्ञानातील महत्त्वाच्या भागामध्ये होतो. सामाजिक भाषाविज्ञानातील अशा स्वरूपाचे संशोधन हे संरचनावादी भाषाविज्ञानाच्या सैद्धांतिक भूमिकेला पूरक ठरते’ (रमेश धोंडगे : २००६, पृष्ठ १३८) त्यामुळेच बोलीतील ध्वनी, शब्द, वाक्यांबरोबर धातू, धातूला लागणारे प्रत्यय, सर्वनाम, नाम, विशेषणे, क्रियापदे, अव्यये यांचाही विचार होतो. हा विचार सामाजिक संदर्भाच्या आधाराने होत असला तरी, तो संरचनावादी भाषाभ्यासाला पूरक ठरतो.

माणसाचा भाषाव्यवहार व्यापक आणि संदर्भबहुल असतो. एखाद्या समाजाच्या भाषाव्यवहाराचे निरीक्षण केल्यानंतर अभ्यासकांसमोर येणारे निष्कर्ष दुसऱ्या समाजाच्या भाषाव्यवहाराशी तुलना करू पाहता संदिग्ध आणि अपुरे वाटू शकतात. कारण प्रत्येक समाजानुसार भाषावापराचे संकेत बदलतात. एकंदरीत मानवी भाषाव्यवहाराचे जेवढे व्यापक स्वरूप अनुभवास येईल; तेवढे या अभ्यासपद्धतीचे स्वरूप व्यापक होत जाणार आहे. मानवाच्या व्यापक आणि संदर्भबहुल भाषाव्यवहाराचे निरीक्षण केल्यानंतर भाषेची असंख्य रूपे आणि नानाविध प्रकारचे भेद अस्तित्वात असल्याचे आढळतात. अशा भाषाव्यवहाराचे स्वरूप तपासणे आव्हानात्मक आहे. त्यामुळेच भाषेच्या सामाजिक अंगाची जाणीव असूनही भाषेच्या पारंपरिक अभ्यासापासून संरचनावादी भाषाभ्यासामध्ये भाषेच्या या अंगाकडे दुर्लक्ष करण्यात आले होते. समाजभाषाविज्ञानाच्या उदयापर्यंत ही स्थिती कायम होती. समाजभाषाविज्ञानामध्ये भाषेच्या सामाजिक बाजूचा व्यापक आणि सूक्ष्म अभ्यास सुरू झाला. या अभ्यासपद्धतीचे सूत्र भाषेला असलेला सामाजिक-सांस्कृतिक संदर्भाचा अभ्यास हे आहे. ही अभ्यासाची दृष्टी व्यवहार भाषा म्हणून आजही सर्वत्र वापरल्या जाणाऱ्या बोलींच्या अभ्यासासाठी सर्वात महत्त्वाची ठरणार आहे. बोली एका मर्यादित प्रदेशात, जाती, व्यवसायांमध्ये बोलली जात असल्याने समाजभाषाविज्ञानाच्या दृष्टीने बोलीअभ्यासात सूक्ष्मता आणता येते. बोलीच्या उच्चारप्रक्रियेपासून शब्दसंग्रह, शब्दार्थ, वाक्यांची रचना, आघात, आरोह, अवरोह, नाम, सर्वनाम, शब्दजाती, क्रियापदांची रूपे ते प्रत्यय साऱ्याच गोष्टींचा विचार सामाजिक संदर्भात करता येतो.

त्यातून बोलीचे स्वरूप स्पष्ट करता येते. बोलीची निर्मिती होण्यामागे जी ऐतिहासिक, राजकीय, भौगोलिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थिती कारणीभूत असते, तिची सविस्तर आणि सूक्ष्मतेने चर्चा या अभ्यासपद्धतीच्या आधाराने करता येते.

**चंदगडी बोली**

चंदगडी बोलीचा यासंदर्भाने विचार करताना भौगोलिक स्थानामुळे चंदगडी बोलीची घडण कशी झाली, तिच्यावरील प्रभाव आणि इतर गोष्टी अभ्यासणार आहोत. गोमंतकीय कोकणी, मालवणी-कुडाळी, तसचे कन्नड भाषांच्या प्रभावाचे क्षेत्र या बोली प्रदेशात ठळकपणे दाखवता येते. हा प्रभाव शेजारामुळे पडलेला असून तो भाषाव्यवहार आणि संपर्क प्रक्रिया अभ्यासताना लक्षात येतो. त्यामुळे शेजार भाषांचा संपर्क आणि त्यातून पडलेला प्रभाव बोलीनिर्मितीत महत्त्वाचा असतो. चंदगडी बोली बोलली जाणाऱ्या प्रदेशात पडणारा मुसळधार पाऊस, येथील सरासरी पावसाचे प्रमाण, त्या नुसार येथे ‘कसली’ जाणारी शेती, भात, नाचणी, रताळी, काजू यासारखी पिके आणि त्या अनुषंगाने तयार झालेली भाषा यासंदर्भात अभ्यासता येईल. याचे अजून एक उदाहरण म्हणून भारतीय समाजामध्ये धर्म आणि धार्मिकतेला असलेले विशेष स्थान पाहता येईल. पर्यावरण आणि भाषिक प्रभावाचा अभ्यास करताना भारतीय भाषा, बोलींच्या बाबतीत धर्म, देव, परमेश्वर, स्वर्ग, नरक, पाप, पुण्य यासारख्या कल्पनांशी संबंधित भाषा मोठ्या प्रमाणात पाहता येते. भारतीय समाजामध्ये या सर्व कल्पना खोलवर रुजलेल्या आहेत. त्यामुळे त्या भाषेमध्येही एकजीव झालेल्या दिसून येतात. तीर्थक्षेत्रांना, काही नद्यांना उदाहरणार्थ, काशी, गंगा यांना धार्मिक जीवनात विशेष स्थान आहे. त्यातूनच ‘दारात गंगा आली’, ‘ज्ञानगंगा’, ‘गंगाजळी’, ‘गंगेत घोडे न्हाले’ असे भाषाप्रयोग मराठीत रूढ झाले आहेत ते यासंदर्भात पाहता येतील.

चंदगडी ही प्रमाण मराठीशी नाते सांगणारी परंतु, शब्दसंग्रह, व्याकरणिक व्यवस्था, उच्चारवैशिष्ट्ये इत्यादी संदर्भात स्वत:चे वेगळेपण जपलेली बोली आहे. चंदगडी बोलीचे क्षेत्रही विस्तृत आहे. संपूर्ण चंदगड तालुका, बेळगाव परिसरातील अनेक गावे, दोडामार्ग-सावंतवाडी तालुक्यातील काही गावे आणि आजरा तालुक्याच्या दक्षिण भागाकडील काही गावे एवढ्या विस्तृत प्रदेशात ही बोली बोलली जाते. त्यामुळे या बोली प्रदेशविशिष्ट भेद दिसतात आणि ते ठळकपणे दाखवता येतात. असे चार भेद पुढे दाखविलेले आहेत. चंदगड तालुक्याचा पश्चिम भाग, दोडामार्ग-सावंतवाडी तालुक्याच्या सीमालगतची सर्व गावे, आजरा तालुक्याच्या दक्षिण भागातील गावे व्यवहारासाठी ज्या बोलीचा वापर करतात ती पूर्णत: कोकणीच्या प्रभावाने तयार झालेली बोली आहे. तर चंदगडच्या पूर्व भागात आणि बेळगाव परिसरातील गावांमधून कन्नड भाषेच्या प्रभावाने तयार झालेली बोली वापरली जाते.

चंदगडी बोलीमध्ये निर्माण झालेला शब्दसंग्रह, या बोलीचे व्याकरणिक विशेष पाहाता या बोलीच्या निर्मितीमागील कारणांचा शोध घेता येतो. कोणत्याही भाषेत घडून येणाऱ्या भाषिक परिवर्तनामागील कारणांचा शोध ज्या-त्या परिसरात शोधावा लागतो. कोणत्याही विस्तिर्ण प्रदेशातील भाषा त्या प्रदेशाच्या वेगवेगळया भागात कमी-अधिक प्रमाणात आपले रूप बदलताना दिसते. दळणवळण, संपर्क, प्रभाव, संस्कृती, लोकांचे राहणीमान, व्यवसाय इत्यादी गोष्टींमुळे हा बदल घडून येतो.

प्रमाण भाषेपेक्षा बोली जिवंत आणि अधिक प्रवाही असतात. त्यामुळे एखाद्या विस्तृत प्रदेशातील बोली सर्वत्र एकसारखी आढळत नाही. ती प्रदेश, व्यवसाय, भौगोलिक-सांस्कृतिक परिस्थितीनुसार बदलत राहते. त्याचबरोबर बोलीवापरामध्ये रूढी महत्त्वाची ठरते. बोलीतील शब्दांचे उच्चार, हेल, बलाघात यांची तुलना प्रमाण भाषेशी करता बोलीचे वेगळेपण ध्वनीत होते. बोलीतील एखादा वाक्यप्रयोग प्रमाण मराठीच्या तुलनेत चुकीचा वाटत असला तरी, विशिष्ट पद्धतीने बोलणे समाजात रूढ होऊन गेलेले असते. उदाहरणार्थ, चंदगडी बोलीमध्ये स्त्रिया ‘मिय्या जेवलो’, ‘मिय्या बाजारास गेल्लो’ असे बोलतात. या वाक्यातील क्रियापदे पुलिंगी आहेत. परंतु, असे बोलणे या बोलीत रूढ होऊन गेलेले आहे. त्यामुळे बोली विचारात रूढीचाही विचार महत्त्वाचा ठरतो.

चंदगडी बोलीचा शब्दसंग्रह विपुल आहे. संपूर्ण शब्दसंग्रहाचा आणि इतर वैशिष्ट्यांसंदर्भातील विस्तृत विचार समाजभाषाविज्ञानाच्या परिप्रेक्ष्यात करता येईल. या शब्दसंग्रहाचा सामाजिक, भौगोलिक संदर्भ शोधता येईल. उदाहरणार्थ,



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

पोर्तुगीजांनी या प्रदेशात काजू, बटाटा, रताळी ही पिके आणली. रताळ्याला चंदगडीत ‘चिन्न’ म्हणतात. ‘म्हेर’ हा शब्द या परिसरातील ‘रताळी’ या पिकामुळे बोलीत समाविष्ठ झालेला आहे. तर काजू पिकामुळे ‘मुरटा’, ‘तोर’, ‘तॉर’, ‘तोरं’, ‘डांब’ असे काही शब्द प्रविष्ठ झाले. या परिसरात झालेल्या धर्मांतरामुळे ‘बाटका’ हा शिवीसदृश्य शब्द तयार झालेला आहे. असा संदर्भ अनेक शब्दांच्या बाबतीत नोंदविता येईल. या बोलीतील शब्दांचा प्रमाण मराठीतील शब्दांशीही तुलनात्मक विचार नोंदविता येतो. उदाहरणार्थ, ‘वसूला’ हा शब्द प्रमाण मराठीतील वसूल, वसूली या शब्दाशी संबंधित नाही. चंदगडी बोलीत ‘वसूला’ हा शब्द ‘वशिला’ या अर्थाने वापरला जातो. ‘वट’ हा शब्द ‘हुकमत’ या अर्थाने वापरला जातो. तर ‘वट्टात’ हा शब्द हा शब्द चंदगडी बोलीत दोन भिन्न अर्थाने प्रचलित आहे. ‘मिय्या वट्टात वाटणी देऊसकी न्हाय’ या वाक्यामध्ये तो ‘अजिबात’ या अर्थाने येतो. तर ‘आमी वट्टात श्यात करूलावात’ या वाक्यात तो ‘एकत्र’ किंवा ‘मिळून’ या अर्थाने येतो. असे पुष्कळ विशेष या बोलीतील शब्दसंग्रहाचे सांगता येतील.

बोली कितीही लहान किंवा मोठ्या समूहाची असली तरी त्या बोलीतील मूलध्वनींची संख्या मर्यादित असते. बोलीचा अंतर्भाव कोणत्या ना कोणत्या भाषेच्या अंतर्गत केला जातो. म्हणजे, अहिराणी, वऱ्हाडी, कोकणी, चंदगडी या मराठीच्या बोली असे म्हटले जाते. याचे कारण त्या मराठी भाषेशी अनेक पद्धतीने नाते सांगत असतात. तरीही या बोलींची उच्चारणे मराठीतील मूलध्वींपेक्षा कितीतरी वेगळी असतात. त्यामुळे मराठी भाषेतील ‘स’ आणि अहिराणी, चंदगडी बोलीतील ‘स’ एकसारखा मानता येत नाही. त्यांच्या उच्चारणामध्ये सूक्ष्म स्तरावचा भेद असतो. हा भेद अनेक कारणांनी पडतो त्यापैकी त्या बोलीतील वैशिष्ट्यपूर्ण अशा आजूबाजूच्या ध्वनींमुळेही पडू शकतो. चंदगडी बोलीबाबत हा विचार करताना प्रमाण मराठीतील जायला, यायला किंवा जाण्यासाठी, येण्यासाठी हे शब्द अनुक्रमे जाऊस, यऊस असे होतात. या दोही शब्दांतील ‘स’ हा ध्वनी सुरावटीचा आहे. ‘स’च्या आधी येणाऱ्या ‘ऊ’मुळे ‘स’चे उच्चारण वैशिष्ट्यपूर्ण होते. त्याला एक सुरावट प्राप्त होते, जी प्रमाण मराठीतील ‘स’ मध्ये नाही.

चंदगडी बोलीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तिचे उच्चारण हे आहे. ही बोली एका विशिष्ट उच्चाराने, हेल काढून बोलली जाते. ‘जाऊलेसाय...’ हा एक शब्द वाटत असला तरी, हा शब्दप्रयोग ‘तू जात आहेस?’ या अर्थाने वापरला जातो. या शब्दातील ‘ऊ’ ‘सा’ आणि शेवटी ‘य’ या तीन ध्वनींचा उच्चार सुरावटीत केला जातो. अशा प्रकारे या बोलीमधील जवळजवळ प्रत्येक शब्दात ही सुरावट दिसून येते. त्यामुळे व्यवहारात या बोलीलाच एक सुरावट प्राप्त होते. ‘तिया यल्लीस’ हे वाक्य प्रश्नार्थक आहे. परंतु, ही प्रश्नार्थकता या बोलीच्या सुरावटीतून, सूर ओढण्याच्या पद्धतीतून प्राप्त होते. ‘तू आली होतीस का?’ हे प्रश्नार्थक वाक्य वरील केवळ दोन शब्दातून विशिष्ट सुरावटीमुळे बोलता येते. ‘यल्लीस’ या शब्दातील ‘ई’ आणि ‘स’ या दोन्ही ठिकाणी सूर ओढला जातो. ‘ई’ ची सुरावटत दीर्घ आहे. ही सुरावट दीर्घ असली तरी शेवटी पुन्हा ‘स’ उच्चारण्यापूर्वी ‘ई’ वर जोर दिला जातो. ‘तिय्या जाऊललीसाय’ या वाक्यामध्ये ‘तू’ हे सर्वनाम ‘तिय्या’ असे होते. शिवाय ‘तिय्या’चा उच्चार पुन्हा खास सुरावटीमध्ये होतो. ही सुरवाट, उच्चारविशेष कोकणीच्या जवळची आहे. अशी विशिष्ट सुरावटीमध्ये बोलली जाणारी बोली तालुक्याच्या पश्चिम विभागात दिसते.

पूर्व विभागात बोलीची सुरावट कन्नडच्या प्रभावाने तयार झालेली आहे. कव्वा (केव्हा), कास (कशाला), खट्टे (कोठे), गसली (गेल्यावर्षी), तण्ण (तेव्हा), तवरस्क (तोपर्यंत), चकोट (चांगले), बळयान (खोटे), माज (मला), मिय्या (मी) असे शब्द पूर्वविभागात दिसतात. ‘कासनी ते’ ‘खट्टे गेल्ल्यास’, ‘कन्नच्चान सोदूलोय मसोटीत गेल्ल्यास काय’ अशी वाक्ये प्रत्यक्ष ऐकणे हा एक अनुभव असतो. या विभागात तूज, माज, त्यास, तिण्ण, मिण्ण, त्यण्णाणी, हयणाणी अशी सर्वनामे वापरली जातात.

चंदगडी बोलीतील विशेषणेही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. दांडगा (मोठा), व्हलस (घाणा), बुरसा (घाणेरडा), आंबरसुका (ओलासर), कळकोटा (भांडणे काढणारा), कळखोचरा (भांडणे उकरून काढणारा), काटकोळा (बारीक), धबला (जाडा), हुसभुरक्या (लाजनसलेल्या), व्हळके (होय होय म्हणणारे) अशी विपुल विशेषणे या बोलीत सापडतात. रंगवाचक विशेषणेही अभ्यासनीय आहेत. तांबूस, हिरवट, तांबडाभडक, मातकट, तपकीरी, पिवळाधम्मक अशी ही रंगवाचक विशेषणे आहेत. तर

नकाडा (लहान), नकबर (चिमुटभर), हिजडा, देवचार, जोगता, जोगती अशी विशेषणे शिवीसदृश्य आहेत. ही विशेषणे या बोलीत का रूढ झाली, याचे कारण या परिसरातील सामाजिक संदर्भाधारेच शोधावे लागते. या बोलीवर असणारे भिन्न भाषांचे प्रभाव, प्रभावाची कारणे, बोलीचा प्रदेश आणि परभाषिकांचा संपर्क, संपर्काची कारणे अशा अनेक अंगाने समाजभाषाविज्ञानातील संज्ञा-संकल्पनांचा आधार घेऊन या बोलीचे विश्लेषण करता येईल.

एकूणच, बोलीचे आजअखेर झालेले आणि अलीकडचे काही अभ्यास पाहता या बोली अभ्यासाच्या अनेक मर्यादा समोर येतात. बोलीचा अभ्यासक भाषाविज्ञानाचा जाणकार असल्यास बोलीचा अभ्यास भाषाशास्त्रीय, व्याकरणिक किंवा संरचनावादी पद्धतीने भाषेचे यथायोग्य संकलन होते. त्या बोलीची योग्य पद्धतीने नोंद घेता येते. परंतु, ती घेताना मराठी भाषेत उच्चारप्रक्रिया नोंदविण्यासाठी योग्य आणि स्वतंत्र लिपी नसल्याने काही अडचणी जाणवतात. बोलीचे वेगळेपण तिच्या उच्चारातून अधोरेखित होते. चंदगडी बोलीची उच्चारणे तर खूपच वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ते उच्चार लिहिताना देवनागरी लिपीतील अक्षरांचे पाय मोडून आणि काही उपलब्ध चिन्हे वापरून कसरत करावी लागते. रोमन लिपीत 'आयपीए' ही आंतरराष्ट्रीय उच्चारलेखनाची वर्णमाला आहे. त्यामुळे या लिपीत मुळाबरहुकूम उच्चार नोंदवता येतात. देवनागरीत ही सोय नाही. त्यामुळे यथायोग्य नोंद घेण्यात काही अडचणी येतात. मराठीत झालेल्या बोलीअभ्यासाला अशा काही मर्यादा आहेत. त्यामुळे अनेक अभ्यास बोलीची नोंद म्हणूनच पाहावे लागतात. समाजभाषावैज्ञानिक अभ्यासपद्धतीकडे केवळ नोंद घेणारी अभ्यासपद्धती म्हणून पाहता येत नाही. तर हा अभ्यास समाज, संस्कृतीचा अभ्यास ठरतो. शब्दांची, उच्चारणांची सामाजिक चिकित्सा होत असल्याने शब्द समाजाच्या अभ्यासाचे साधन बनतात. पर्यायाने या अभ्यासाला एक परिमाण लाभते.

कोणत्याही समाजाची बोली एक सामाजिक-सांस्कृतिक संचित असते. बोलीतूनच आपल्या परंपरा, श्रद्धा, रीतिरिवाज पुढील पिढीकडे संक्रमित होतात. जागतिकीकरणानंतर बदलणारा समाज विचारात घेतला तर अनेक बोलींचे अस्तित्व धोक्यात असल्याचे दिसते. त्यामुळे आज बोली अभ्यासाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. समाजभाषावैज्ञानिक अभ्यासपद्धतीने बोलींचा अभ्यास सिद्ध झाल्यास आपल्याला बोली निर्मितीच्या नेमक्या कारणांचा शोध घेता येईल. त्यातून त्या प्रदेशातील लोकांच्या जीवनव्यवहाराचा, संस्कृतीचा सविस्तर अभ्यास समोर येईल. अशा व्यापक अभ्यासातून महाराष्ट्राची सांस्कृतिक विविधता, चालीरीती, ज्ञानपरंपरा, लोकांच्या जीवनपद्धती, भौगोलिक विविधता इत्यादीच्या अनुषंगाने नवी माहिती उपलब्ध होईल.

❑❑❑

॥ दोन ॥

# चंदगड : समाज, संस्कृती आणि भाषा

महाराष्ट्रातील एक दुर्गम आणि डोंगराळ प्रदेश म्हणून चंदगड परिसर परिचित आहे. तिलारी आणि आंबोली या दोन घाटमाथ्यांवर वसलेला हा प्रदेश सह्याद्रीच्या पर्वतरांगांमधून येणाऱ्या आल्हादायक हवेसाठी प्रसिद्ध आहे. महाराष्ट्रातील सर्वाधिक पावसाचे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली हे ठिकाण चंदगडपासून केवळ पंधरावीस किलोमीटर अंतरावर आहे. त्यामुळे हा प्रदेश अतिपावसाळी म्हणून प्रसिद्ध आहे. येथील डोंगरीशेते, अतिवृष्टी, जंगलझाडी आणि भिन्न सांस्कृतिक प्रदेशांच्या सीमारेषेमुळे वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती उदयाला आली आहे. या प्रदेशाचा पूर्व इतिहास पाहाता, या परिसरावर मौर्य, सातवाहन, शिलाहार, कदम्ब, राष्ट्रकुट, यादव अशा घराण्यांनी राज्य केल्याचे दाखले मिळतात. चंदगड परिसरातील राजकीय स्थित्यंतराचा आढावा घेताना कोकण, गोवा, कारवार, बेळगाव, म्हैसूर-बेंगलोर, विजापूरपर्यंतच्या राजवटींचा विचार करावा लागतो. कारण या राजवटींचा अंमल कमी-अधिक काळ या भूभागावर होता. या राजवटी भिन्न-भिन्न भाषिकांच्या होत्या. गोवा आणि कोकणातील सागर किनारे आणि बंदरे या प्रदेशानजीक आहेत. त्यामुळे प्राचीन काळापासून मालवाहतुकीच्या निमित्ताने या परिसरातून व्यापारी-विदेशी लोकांचे येणे-जाणे होत राहिले आहे.

या तालुक्याच्या पश्चिमेला असलेले विस्तृत वनक्षेत्र, कोकण-गोव्याशी सलग्न असलेल्या तिलारी आणि आंबोली अशा दोन घाटांमुळे थेट कोकणशी संपर्क. यामुळे मराठी भाषेपेक्षा येथील लोकांचा संपर्क कन्नड, कोकणी, मालवणी-कुडाळीशी आहे. केवळ शिक्षणाच्या प्रसारामुळे येथील समाज प्रमाण मराठीशी जोडला गेला. कारण शेजारी असलेले बेळगाव वैशिष्ट्यपूर्ण मराठी वापरासाठी प्रसिद्ध आहे. तेथील मराठी वर असलेला कन्नड भाषेचा प्रभाव आणि त्यातून निमार्ण झालेली स्वतंत्र उच्चार वैशिष्ट्ये असलेली बोली सर्वपरिचित आहे. तर कोल्हापूर या जिल्ह्याच्या ठिकाणापासून हा प्रदेश जवळपास दिडशे किलोमीटर दूर आहे. येथील शेती आणि इतर व्यापारी संबंध कोल्हापूरपेक्षा बेळगाव शहराशी आहेत. शिवाय कोकणहीही व्यापारी संबंध खूप शतकांपासून आहेत. ते आजही अनेक बाबतीत सुरू असल्याचे दिसतात. शेजारपणामुळे कन्नड, कोकणी आणि मालवणी-कुडाळीच्या रूपाने भिन्न भाषा-बोलींचा शेजार आणि नित्यसंपर्क या प्रदेशातील लोकांचा आहे. महाराष्ट्राच भाषावार प्रांतरचनेपर्यंत येथे असलेले विविध भाषिकांचे राजकीय अंमल ततून झालेला भाषासंपर्क अशा अनेक गोष्टींच्या पार्श्वभूमीवर येथील बोली तयार झाली आहे.

गोव्यातील धर्मप्रसारक पोर्तुगीज यांचाही या परिसरातील वावर दखल घेण्याइतका होता. येथून गोवा केवळ साठ-सत्तर किलोमीटर अंतरावर असल्याने या परिसरात त्यांनी धर्मप्रसाराचे बरेच कार्य केलेले आहे. आज अनेक गावांमधून उभी असलेली चर्चीस् हे त्यांच्या या कार्याचे द्योतक आहे. शिवाय गोव्यातील धार्मिक छळाच्या काळात (inquisitio period) सीमावर्ती सुरक्षित प्रदेश म्हणून अनेक हिंदू लोक गोव्यातून येऊन स्थायिक झाले आहेत. अशा विविध कारणांमुळे येथील भाषिकांचा परकीय भाषा, फारसी, उर्दू, हिंदीसह शेजारभाषा म्हणून कोकणी-कन्नड इत्यादी भाषांशी नित्य संपर्क येत राहिला आहे. केवळ भाषिक प्रभाव म्हणून नाही, तर येथील संस्कृतीवरही या संपर्काचा खोलवरचा प्रभाव आहे.

चंदगडला जवळपास शहाण्णव लाख हेक्टर्स एवढे विस्तृत क्षेत्रफळ लाभले आहे. या विस्तृत क्षेत्रफळावर सर्वत्र एकसारखी भौगोलिक परिस्थिती आढळत नाही. साधारणपणे तालुक्याची पश्चिम आणि पूर्व अशा दोन विभागामध्ये सरळ-

सरळ विभागणी करता येते. ही विभागणी नैसर्गिकपणेच पडली आहे. कानडी प्रदेशालगतच्या पूर्वेकडील भागाला 'किणी-कर्याद' भाग म्हणून ओळखले जाते. या भागात तुलनेने सुपीक जमीन असल्याने आणि शिक्षणाची सुविधा लवकर उपलब्ध झाल्याने लोकांचा आर्थिकदृष्ट्या स्तर उंचावलेला दिसतो. सर्व प्रकारच्या चळवळी या परिसरात झाल्या. महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर सत्यशोधकीय विचाराचे अनेक वर्षे थंडावलेले कार्य कोल्हापूर संस्थानात आणि पाठोपाठ बेळगावमध्ये पुनरुज्जीवित झालेले दिसते. चंदगड हा तत्कालीन बेळगाव तालुक्याचा भाग असल्याने ही चळवळ चांगली रुजली. ती रुजवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका असणारे बहुतांश कार्यकर्ते किणीकर्यात भागातील होते. त्यामुळे धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रात या परिसरात चांगलीच जागृती निर्माण झाली. पर्यायाने या परिसरातील बोलीतील परिवर्तन गतीमान बनले. तुलनेने मागास असलेल्या पश्चिमेकडील भागाला लोक 'कोकणा' भाग म्हणून ओळखतात. वास्तविक या प्रदेशातील लोकांची 'कोकणे' म्हणून किणीकर्याद भागातील लोकांकडून 'केंडले' (हेटाळणी) जात असे. एवढा या दोन्ही भागातील लोकांच्या जीवनमानात फरक पडला होता.

पश्चिम भाग अतिपावसाळी, डोंगराळ आणि वनक्षेत्र असलेला आहे. पश्चिमेला डोंगराळ भागाबरोबर मातीही कमी पिकावू 'तांबडी' (लाल) आणि खडकाळ. तर पूर्वेला तुलनेत कमी पाऊस आणि सुपीक 'काळवांड' (काळी) जमीन लाभली आहे. त्यामुळे दोन्ही विभागात शेती करण्याच्या पद्धतीमध्ये आणि घेतल्या जाणाऱ्या पिकांमध्येही थोडाफार फरक दिसून येतो. पूर्वेला कोरड्या मातीत कुरीने भातपेरणी केली जाते. याला धुळवाफ म्हटले जाते. तर पश्चिमेला लोणीदार चिखल करून रोप लागण केली जाते. त्याला चिखलरोप म्हटले जाते. पश्चिम प्रदेश कोकणी भाषिक प्रदेशाशी सलग्न आहे, तर पूर्व भाग कानडी भाषिक प्रदेशाशी संलग्न आहे. त्यामुळे दोन्ही विभागात काही प्रमाणात सांस्कृतिक भिन्नत्वही दिसून येते. याचे एक महत्त्वाचे उदाहरण म्हणजे, तालुक्याच्या पूर्वेला कर्नाटकी बेंदूर आणि पश्चिमेला महाराष्ट्रीय बेंदूर हा सण साजरा केला जातो.

या तालुक्यातील अनेक गावे म्हणजे लहान लहान वाड्या आणि वस्त्या आहेत. या प्रदेशात होणाऱ्या अतिवृष्टीमुळे आजही पावसाळ्यात अनेक गावांचा संपर्क तुटतो. बेळगावच्या पश्चिमेला असलेल्या यरतनहट्टी, राजगोळी, दिंडलखोप या गावांपासून पश्चिमेकडील सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सीमेलगत असलेल्या मिरवेल, इसापूर, वाघोत्रे या गावांमधले भौगोलिक अंतर सुमारे शंभर किलोमीटरहून अधिक आहे. भिन्न संस्कृती, भौगोलिक परिस्थिती दूरत्व, संपर्कक्षेत्रांची भिन्नता, भिन्न शेजारभाषा इत्यादी कारणांमुळे चंदगडी बोलीची तालुक्याच्या या दोन्ही विभागात दोन भिन्न रूपे स्पष्ट दिसतात. सूक्ष्म निरीक्षण केल्यास चार, पाच प्रकारची उच्चार वैशिष्ट्ये दाखवता येतात. परंतु बहुतेक ठिकाणी काही शब्द स्वतंत्र वापरले जात असलेले सोडता; बहुतांश शब्दसंग्रह एकसारखा आहे. या तालुक्याच्या पूर्वेकडून पश्चिमेला प्रवास करीत जाताना; कन्नड भाषेचा प्रभाव असलेल्या बोलीरूपाकडून कोकणीचा प्रभाव असलेल्या बोलीरूपाकडे सरकत जात असल्याचा अनुभव येतो. पूर्वेकडील बोली कन्नड भाषेच्या प्रभावात आहे. पूर्वेकडे असलेल्या कन्नड भाषिकांच्या संपर्काचा तो परिणाम आहे. ही बोली बेळगाव परिसरात गेल्यानंतर 'बेळगावी' म्हणून ओळखली जाते.

वास्तविक सन १९५६ पर्यंत चंदगड आणि बेळगाव स्वतंत्र नव्हते. हा प्रदेश सलग आणि एकच होता. पश्चिमेकडील प्रदेशात शंभर टक्के मराठी भाषिक समाज होता. तर पूर्वकडील प्रदेशात वीस ते पंचवीस टक्के समाज कानडी होता. त्या काळातील येथील मराठी आणि कन्नड भाषिकांची आकडेवारी उपलब्ध आहे. त्यामुळे पुढे बेळगावातील मराठी भाषिकांची सं‘या कमी करण्याचा एक राजकीय निर्णय म्हणूनच चंदगड हा स्वतंत्र तालुका निर्माण केला गेला. बेळगावकडील बोलीरूप 'बेळगावी बोली' म्हणून ओळखले जाते. ते योग्यही आहे. कारण चंदगडी बोलीतील शब्दसंग्रह, उच्चारवैशिष्ट्यापेक्षा हे रूप बऱ्याच अंशी वेगळे आहे. ते चंदगडी बोलीतील पूर्वेकडील बोलीरूपाच्या जवळचे आहे. चंदगडमध्ये दिसणारी दोन भिन्न रूपे शब्दसंग‘ह, उच्चाराचा विशिष्ट हेल, व्याकरणिक विशेष या सर्वच बाबतीत वैशिष्ट्यपूर्ण आहेत. कोणत्याही विस्तृत प्रदेशात भाषा-बोली एकसारख्या आढळत नाहीत. त्याप्रमाणेच चंदगड तालुक्यामध्येही आढळणारे बोलीरूप सर्वत्र एकसारखे दिसत नाही. तथापि, या विस्तृत प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या बोलीला मात्र 'चंदगड बोली' या एकच नावाने ओळखणे योग्य ठरेल; एवढी साम्यस्थळे या दोन रूपांमध्ये आहेत.

**मराठी आणि चंदगडी**

चंदगडी ही प्रमाण मराठीशी नाते सांगणारी परंतु, शब्दसंग्रह, म्हणी, वाक्प्रचार, व्याकरणिक व्यवस्था, उच्चारवैशिष्ट्ये आणि स्वत:चे मौखिक वाङ्मय इत्यादी संदर्भात स्वत:चे वेगळेपण जपलेली बोली आहे. प्रमाण भाषेचा आणि प्रमाण मराठीच्या रूपाशी जवळच्या बोली रूपांचा व्यवहारात वापर होणारी ठिकाणे ही विशेषत: मोठी शहरे असतात. सुशिक्षित वर्गाच्या घनतेमुळे अशा ठिकाणी सर्वच लोक प्रमाण मराठीशी सर्वपरिचित असतात. तसे ग्रामीण परिसराबाबत सांगता येत नाही. चंदगड ज्या कोल्हापूर जिल्ह्यामध्ये येतो; त्या कोल्हापूरपासूनही सुमारे एकशेपन्नास किलोमीटर अंतरावर तो वसला आहे. दूरत्वामुळे या बोलीची स्वत:ची स्वतंत्र वैशिष्ट्ये दिसतात.

चंदगडी बोलीचा अभ्यास मराठीची बोली म्हणूनच करावा लागतो. कोणत्याही भाषा-बोलीची पूर्वपरंपरा अभ्यासण्यासाठी लिखित-मुद्रित पुराव्यांना विशेष महत्त्व असते. चंदगडी ही बोली स्वतंत्रपणे अभ्यासताना अशा लिखित, मुद्रित पुराव्यांची वानवा जाणवते. प्रस्तुत बोलीच्या अभ्यासाठी मागील पाचसहाशे वर्षांचा इतिहास उलगडून पाहता, या परिसरातून या बोलीचा प्रभावी वापर करून कोणी लेखन केल्याचा पुरावा उपलब्ध होत नाही. मराठीच्या बहुतांश बोलीचे पहिले भाषिक पुरावे जॉर्ज ग्रिअर्सन यांच्या महत्त्वकांक्षी प्रकल्पातच मिळतात. हा प्रकल्प तीस हून अधिक वर्षे चालला होता. या देशभरातील सर्वेतून १७९ भाषा आणि ५४४ बोली भारतात असल्याचे नोंदवले आहे. अनंत अडचणींना तोंड देत केलेला हा सर्वे ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचाच आहे. या सर्वेतील त्यामधील १९०५ साली कलकत्त्याहून प्रकाशित झालेल्या ‘Linguistic Survey of India, Volume VII, Indo-aryan family, southern group’ च्या ‘Speicmens of the Marathi Language’ मध्ये मराठीच्या इतर काही बोलींप्रमाणे चंदगडी बोलीचा संदर्भ सापडत नाही. मुळात गि‘अर्सनची निरीक्षणे तत्कालीन काळाच्या संदर्भात तपासावी लागतात. त्यांच्याकडून अनेक गफलती झालेल्या आहेत. परंतु, मराठीच्या अनेक बोलींची घेतलेली पहिली नोंद म्हणून या प्रकल्पाकडेच पाहावे लागते. या प्रकल्पात चंदगडी बोलीचा उल्लेख नाही. हा प्रदेश तत्कालीन बेळगाव जिल्ह्यात आणि बेळगाव तालुक्यातही येत होता. या जिल्ह्यात मराठी भाषिकांची तत्कालीन संख्या २,६५,००० इतकी दिलेली आहे. यामध्ये ग्रिअर्सन यांनी कोकणी, गोवणीज, बारदेस्करी, धनगरी अशा बोली कल्पून त्यांची संख्या स्वतंत्र नोंदवली आहे. अर्थात इतरत्र नोंदवलेली कुणबी लोकांची स्वतंत्र बोली येथे नोंदवली नाही. ती सर्व ‘Standard Marathi’ या गटात घालून ठेवलेली दिसते. वास्तविक बेळगाव जिल्ह्यात ‘Standard Marathi’ पेक्षा मराठीच्या काही बोली बोलल्या जातात. आज बेळगावी बोली म्हणून परिचित असलेली आणि आपला अभ्यास विषय असलेली चंदगडी बोली यापैकीच आहेत. या परिसरात मराठीची विविध बोलीरूपे आहेत.

ग्रिअर्सनने दाखवलेली येथील मराठी भाषिकांची संख्या पुढे वर्षांनी ४,५०,००० इतकी झाली. एकूण लोकसंख्येच्या शेकडा एकाहत्तर टक्के लोक मराठी भाषिक असल्याचे भाषिक अहवाल सांगतात. याबाबत आमदार व्ही. एस. पाटील यांनी महाराष्ट्र विधानसभेत तत्कालीन भाषिक सर्वेच्या आधाराने सीमाप्रश्नावर केलेल्या भाषणात असे म्हटले आहे की, ‘कारवार आणि बेळगांव जिल्ह्यातील ह्या मराठी भागाची एकूण लोकसंख्या ६,४५,५०० इतकी आहे व त्यापैकी मराठी भाषिकांची लोकसंख्या ४,५०,००० इतकी आहे आणि कानडी लोकांची संख्या १,२२,००० आणि इतर ७३,४०० इतकी आहे. ह्या लोकसंख्येचे शेकडा प्रमाण मराठी भाषिक ७१ टक्के, कानडी भाषिक १८ टक्के आणि बाकी राहिलेले इतर लोक ११ टक्के आहेत.’ (प्राचार्य एस. वाय. पाटील, २००३ : पृष्ठ २४४) ही लोकसंख्याया वरती म्हटल्याप्रमाणे मराठीचे प्रमाणित रूपाची नसून मराठीच्या बोलींचीच आहे. या लोकसंख्येत ‘चंदगडी बोली’ बोलणाऱ्या लोकांचाही समावेश आहे. कारण १९५२ पर्यंत चंदगड तालुका अस्तित्वाच नव्हता. तो बेळगाव तालुक्याचा भाग होता. या भाषेचे नेमके वर्णन ग्रिअर्सनच्या सर्वेआधीच प्रकाशित झालेल्या गॅझेटिअरमध्ये नोंदवण्यात आले आहे. इ. स. १८८४ प्रसिद्ध करण्यात आलेले Gazetteer of Bombay Presidency, Volume XXI (Belgaum) हे आहे. या गॅझेटिअरमध्ये या प्रदेशात बोलली जाणारी भाषा ब्राह्मणांच्या मराठीपेक्षा वेगळी आहे, आणि ती स्वतंत्र बोली आहे हे नोंदवण्यात आले आहे. या गॅझेटिअरमध्ये या बोलीची अशी नोंद आहे. "The Maráthi spoken by the Kulvádis is rougher and less clear than Bráhman



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

Maráthi. Among the peculiarities of their dialect may be noticed, máj, to me; tuj, to you; jevos, to eat; lai, much; khateor khalete, where; vaich or ullas, a little; gont (Kánarese), to know; háya, is; nháya, is not; and mula (Kánarese), a corner Detale Kunbis speak the Konkani which prevails in Goa and in the north of Kánara. In towns and large villages most Maráthi Kunbis live in houses with mud walls and tiled roofs. (Page No. ११०) येथे उल्लेख केलेली ब्राह्मणांची मराठी म्हणजेच प्रमाणित मराठी होय. प्रमाण मराठीपेक्षा ही कशी वेगळी आहे, हे सांगण्यासाठी या गॅझेटिअरमध्ये अनेक शब्द आणि त्यांचे अर्थ देण्यात आले आहेत. ही बोली स्वतंत्र बोली आहे, हे या गॅझेटिअरमध्ये उदाहरणांसह नोंदवण्यात आले आहे. James M. Campbell या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी १८८४ ला हे गॅझेटिअर प्रकाशित केले आहे. हा अपवाद वगळता या बोलीचा ऐतिहासिक मागोवा घेता येत नाही. तथापि, शब्दसंग्रह, उच्चारविशेष यांच्या आधारे या बोलीच्या निर्मितीची ऐतिहासिक कारणमीमांसा करता येऊ शकते.

चंदगड तालुका सध कोल्हापूर जिल्ह्यामध्ये आहे. परंतु राजकीयदृष्ट्या तो करवीर संस्थानाचा भाग कधीही नव्हता. त्यामुळे कोल्हापूरच्या वाटचालीचा विचार करता, चंदगड अनेक बाबतीत मागे राहिला. हा तालुका छत्रपती शाहू महाराजांच्या संस्थांनात न आल्याने शिक्षण आणि इतर सुविधांपासूनही अनेक वर्षे वंचित राहिला. सावंतवाडीच्या सावंतभोसल्यांचे एक पाते चंदगड येथील हेरे येथे येऊन स्वतंत्र राज्यकारभार करत होते. त्यांनी हेरे येथे स्थापन केलेल्या संस्थानात या प्रदेशातील ७८ गावे होती. बाकी गावांवर कुरुंदवाड आणि सांगली अशा दोन संस्थानांचा ताबा होता. अशा प्रतिकूल परिस्थितीत राजर्षी शाहू छत्रपतींच्या प्रेरणेतूनच बेळगाव आणि चंदगडच्या हरहुन्नरी कार्यकर्त्यांमुळे स्वतंत्र्योत्तर काळात येथे सामाजिक-शैक्षणिक क्षेत्रात जागृती निर्माण झाली. तत्पूर्वी मात्र हा परिसर सर्वच बाबतीत मागास होता. त्यामुळे या बोलीच्या जुन्या रूपाविषयी विशेष साधने हाती लागत नाहीत.

आज चंदगडी बोली बऱ्याच विस्तृत क्षेत्रावर बोलली जाते. यासाठी या बोलीची क्षेत्रमर्यादा निश्चित करून व्यवहारात प्रचलित बोलीचे विश्लेषण करणे सयुक्तिक ठरेल. चंदगड तालुका, बेळगाव परिसरातील अनेक गावे, दोडामार्ग-सावंतवाडी तालुक्यातील काही गावे आणि आजरा तालुक्याच्या दक्षिण भागातील काही गावे, असा विस्तृत प्रदेश या बोलीच्या विश्लेषणासाठी विचारात घेता येतो. चंदगड तालुक्याचा पश्चिम भाग, दोडामार्ग-सावंतवाडी तालुक्याच्या सीमालगतची सर्व गावे, आजरा तालुक्याच्या दक्षिण भागातील गावे व्यवहारासाठी ज्या बोलीचा वापर करतात ती पूर्णत: कोकणीच्या प्रभावाने तयार झालेली बोली आहे. तर चंदगडच्या पूर्व भागात आणि बेळगाव परिसरातील गावांमधून कन्नड भाषेच्या प्रभावाने तयार झालेली बोली वापरली जाते.

चंदगडी बोलीमध्ये निर्माण झालेला शब्दसंग्रह, या बोलीचे व्याकरणिक विशेष पाहाता; या बोलीच्या निर्मितीमागील कारणांचा शोध घेता येतो. कोणत्याही भाषेत घडून येणाऱ्या भाषिक परिवर्तनामागील कारणांचा शोध ज्या-त्या परिसरात शोधावा लागतो. कोणत्याही विस्तीर्ण प्रदेशातील भाषा त्या प्रदेशाच्या वेगवेगळ्या भागात कमी अधिक प्रमाणात आपले रूप बदलताना दिसते. दळणवळण, संपर्क, प्रभाव, संस्कृती, लोकांचे राहणीमान, व्यवसाय इत्यादी गोष्टींमुळे हा बदल घडून येतो.

चंदगडच्या पश्चिम आणि पूर्व भागातील भाषिक नमुने आणि निवडक शब्दसंग्रह आपण पुढे स्वतंत्रपणे विचारात घेणार आहोत. तत्पूर्वी चंदगडी बोलीच्या वैशिष्ट्यांबाबत येथील प्राचीन इतिहासाचा अभ्यास महत्त्वाचा आहे. येथील विविध राजकीय अंमल आणि त्यांच्या भाषा यांचा यामुळे चंदगडी बोलीतील शब्दसंग्रह समृद्ध बनला आहे. विविध कारणांमुळे येथील भाषिकांचा परकीय इंग'जी, पोर्तुगीज या भाषा, उर्दू, पर्शियन, शेजारभाषा म्हणून कोकणी, मालवणी-कुडाळी आणि कन्नड इत्यादी भाषांशी नित्याचा संपर्क येत राहिला आहे. त्याचबरोबर हा परिसर ऐकेकाळी द्रविडी वंशाच्या लोकांचा असल्याचेही पुरावे सापडतात. या परिसरातील देवदेवता द्रविडी आहेत. महात्मा फुले यांच्या मते म्हसोबा, चाळोबा, चव्हाटा, मरगूबाई, पवनाई, थळ, महारथळ अशा देवता म्हणजे द्रविडी सरदार होत. हे सर्व सरदार गावचे रक्षणकर्ते होते. आजही या

परिसरात गावची यात्रा (चंदगडी बोलीत यात्रांना ‘म्हायी’ म्हणतात) आणि इतर सण, विधींच्या निमित्ताने सारे गाव मिळून या देवतांकडे गावातील लोकांच्या, जनावरांच्या आणि शेतीपिकांच्या रक्षणासाठी गाऱ्हाणे घालते. यावरूनही या गोष्टीची वास्तविकता पडताळून पाहाता येते. त्याचबरोबर मालवण, वेंगुर्ला, गोवा आणि कारवार ही प्राचीन काळापासून विदेशी व्यापाराची केंद्रं होती. कोल्हापूर-बेळगाव या व्यापारी ठाण्यांना माल पुरविण्याचा एक मार्ग चंदगड तालुक्यातून होता. या बंदरावर येणारा विदेशी माल या मार्गाने ने-आण करीत असताना रात्र झाली तर अनेक व्यापारी सुरक्षिततेसाठी वाटेत लागणाऱ्या गावांमध्येच मुक्काम करीत. अशा अनेक गोष्टींमुळे होत राहिलेला भाषासंपर्क संस्कृतीसंपर्क या बोलीच्या निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण ठरलेला आहे.

शिवा अलीकडच्या काळासंदर्भात येथील ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासता; स्वात्र्यंपूर्व काळात हा तालुका कोल्हापूर संस्थान आणि या तालुक्याच्या उत्तरेकडील महाराष्ट्राच्या भूमीशी संलग्न असल्याचे दिसत नाही. हा तालुका काही काळ कुरुंदवाड (सिनिअर) संस्थानात होता. शिवाय बेळगाव जिल्ह्यातील मराठी भाषिकांचा प्रदेश म्हणून प्रसिद्ध होता. तालुक्याचा पूर्व भाग आजही कन्नड भाषेच्या प्रभावाखाली आहे. तर पश्चिम भाग कोकणी, मालवणी-कुडाळी प्रदेशाशी संलग्न आहे. पश्चिम भागाची सर्व सीमा कोकणीबोली बोलल्या जाणाऱ्या प्रेदशालगत आहे. कोकणी भाषिक सिंधुदुर्ग जिल्हा आणि गोवा राज्याच्या सीमा या पश्चिम भागाला लागून आहेत. या परिसरातील अनेक लोक रोजगारासाठी गोव्याला जातात. आजही सुगीच्या दिवसात भात कापणीच्या कामांसाठी येथून मोठ्या संख्येने मजूर लोक गोव्यात जातात. तेथे एक-दोन महिने राहून ते परत येतात. अशा अनेक कारणांमुळे या परिसरातील लोकांचा संपर्क कोकण आणि गोव्याशी राहिला आहे. त्यामुळे पश्चिम भागातील लोकांच्या भाषेवर कोकणीचा प्रभाव जाणवतो. या बोलीचा शब्दसंग‘ह आणि व्याकरणिक विशेष पाहताना ही बाब ध्यानात येते.

‘चंदगडी’ ही मराठीचीच एक वैशिष्ट्यपूर्ण बोली आहे. तथापि तिने स्वतंत्र शब्दसंग्रह, व्याकरणिक व्यवस्था, उच्चारवैशिष्ट्ये इत्यादी संदर्भात वेगळेपण जपलेले आहे. चंदगड तालुका, बेळगाव परिसरातील अनेक गावे, दोडामार्ग-सावंतवाडी तालुक्यातील काही गावे आणि आजरा तालुक्याच्या दक्षिण भागाकडील काही भाग असा विस्तृत प्रदेश या बोलीच्या विश्लेषणासाठी विचारात घेता येतो.

**डोंगरी शेत आणि अतिवृष्टी**

चंदगड तालुक्यातील बहुतांश भाग डोंगराळ असल्याने अतिकष्टाखेरीज येथील शेती पिकत नाही. चांगल्या उत्पादनासाठी करावे लागणारे कष्ट आणि अतिवृष्टीमुळे केलेल्या कष्टावर पडणारे पाणी यामुळे येथील शेतकरी हतबल होतो. पुरुषांपेक्षा या भागातील स्त्रिया फार कष्टाळू आणि मेहनती आहेत. डोंगरी शेतात कष्ट खूप आणि उत्पन्न कमी अशी अवस्था असते. शेतकरी वर्षभर कामात गुंतून पडतो. त्याला शेतीवर उदरनिर्वाह चालवण्यासाठी सतत कामात राहावे लागते. शेतीच्या सोबतीने गाईम्हैशी, शेळयामेंढ्या पाळाव्या लागतात. जंगलातून मिळणाऱ्या लाकूड-फाट्यासह निसर्गावर जास्त अवलंबून राहावे लागते. ही स्थिती चंदगडच्या पश्चिमेला दिसते. पूर्वेकडे सुपीक जमिनीमुळे शेतकऱ्यांना इतके कष्ट करावे लागत नाहीत. त्यांच्या तोंडी शेतामध्ये काम करताना श्रमपरिहारासाठी आणि अनेक सण-विधींच्या निमित्ताने म्हटली जाणारी गीते विपुल प्रमाणात आढळतात. पावसाळयामध्ये रोप लावणीच्या वेळी, दिवाळी, गौरी-गणपती, नागपंचमी या सणांना स्त्रिया आजही मोठ्या प्रमाणात गाणी म्हणतात. या गाण्यांना या बोलीत ‘गित्ती’ म्हणतात. या गित्ती परंपरागत एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे चालत येताना भाषिक बदल होण्याचा संभव अधिक असतो. त्यामुळे बोलींच्या जुन्या रूपांसाठी अशा गींतावर अवलंबून राहाणे फलदायी ठरत नाही. या गीतांच्या तुलनेत ‘कहाण्या’ची (लोककथा) संख्या या परिसरात खूपच नगण्य आहे. या कथांची कथनपरंपरा या परिसरात जवळजवळ संपुष्टात आलेली दिसते. त्यामुळे बोलीच्या परंपरेसंदर्भात भाष्य करण्यासाठी काही मर्यादा पडतात.

चंदगड परिसरात मृगाचा पाऊस वेळेत पडतो. पाऊस सुरू होताच कामांची 'धांदल' सुरू होते. 'ल्हवे' आणि 'तरवे' पेरणे हे शब्द डोंगरी शेतीच्या खुणा आहेत. येथील शेतकरी स्त्रिया या पेरणीसाठी उन्हाळ्यात मोठ्या आकाराच्या 'शेणी' थापून (गोवऱ्या तयार करणे) ठेवतात. 'शेणी थापणे' पावसाळी पेरणीची 'बेजमी' (योजना) करणे असते. 'ल्हवा' म्हणजे नाचणीचे तरू आणि 'तरवा' म्हणजे भाताचे तरू. हे ज्या जागेत पेरून तयार केले जाते, ती जागा शेणी पेटवून गरम करून घेतली जाते. याला 'लव्हे जाळणे' म्हणतात. यातून दोन गोष्टी हातात, एक जमीन गरम होऊन तरू तरारून येते. दुसरे लव्हा जाळलेल्या जागेतील तण आणि त्याचे बी जळून गेल्याने तरू 'निर्धोक' येते. त्यामध्ये तण नसते. 'ल्हवे' आणि 'तरवे' पेरून झाल्यानंतर इतर पिकांची लागवड सुरू होते. या परिसरात सर्वसाधारणपणे भुईमूग, पावसाळी मिरची, रताळी ही पिके घेतली जातात. रताळ्यांना 'चिन्नी' म्हणातात. लव्हे-तरवे पेरणी बरोबर रताळ्याचे वेल एखाद्या वाफ्यात रुजवले जातात. या वेलांना 'याल' म्हणतात. याल लावणे म्हणजे रताळ्याचे वेल लावणे. हे वेल वाढले की यथावकाश 'म्हेरा' लावल्या जातात. 'म्हेरा लावणे' म्हणजे रताळ्याचे वेल लावणे. या परिसरातील डोंगराळ शेतीमुळे शेजारच्या पोर्तुगीज लोकांनी काजू आणि रताळ्याचे पीक या प्रदेशात रुजवले.

चंदगड परिसरात भात, नाचणी, रताळी ही मुख्य पिके होती. या पिकांबरोबर दुय्यम पिके म्हणून ऊस, भुईमूग, सावा, जोंधळा, गहू, मिरची, बटाटे इत्यादी पिकं पावसाच्या पाण्यावर घेतली जात. पाणी साठवणुकीचे लहानमोठे तलाव आणि धरणे झाल्यानंतर तालुक्यातील नद्या बारमाही वाहत्या झाल्या आहेत. शिवाय साखर कारखाने झाल्यानंतर ऊसाचे पिक मु'य झाले आहे. ऊस आणि उन्हाळी मिरची ही दोन मुख्य पिके तालुक्यात सध्या दिसतात. भात आणि नाचण्याचे प्रमाण खाण्यापुरते झाले आहे. उन्हाळ्यात काजू हे दुसरे महत्त्वाचे आणि मुख्य पीक झाले आहे. डोंगर उतारावरच्या शेतांची धूप थोपवण्यासाठी पोर्तुगीजांकडून कधीकाळी या भागात आलेली काजू आणि मुख्य पिके झाली आहे. हजारो टन काजूचे उत्पादन तालुक्यात होते. त्यातून शेकडो काजूप्रक्रिया उद्योग उभा राहिले आहेत. या उद्योगांमधून हजारो लोकांचा रोजगाराचा प्रश्न मिटला आहे.

**चंदगड : सांस्कृतिक जीवन**

चंदगडचे भौगोलिक स्थान वैशिष्ट्यपूर्ण असल्याने येथील सांस्कृतिक जीवन समृद्ध असलेले दिसते. एकीकडे कर्नाटक राज्य, दुसरीकडे गोवा आणि तिसरीकडे कोकणची सीमा अशा तीन भिन्न सांस्कृतिक सीमारेषांवर हा तालुका वसला आहे. येथील परिसर डोंगराळ. त्यामुळे डोंगर उताराची शेती कष्टप्रद शेती हे येथील जीवनवास्तव आहे. येथील जमिनीत राबणूक खूप पण उत्पन्न कमी. त्यामुळे लोक कष्टाळू आणि ममताळू दिसतील. जंगल आणि मुख्य प्रवाहापासून लांबचे अंतर त्यामुळे आलेली दुर्गमता हे या परिसराचे अजून एक महत्त्वाचे वैशिष्ट्य. येथील अनेक गावांमधील लोक दुर्गम आणि मागास परिस्थितीत राहाताना दिसतात. तथापि, ते सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न दिसतात. अनेक सण, उत्सव, म्हाया (जत्रा), विविध विधींची प्रथा, भजन, कीर्तने, नाटक, दशावतारी नाटके, सोंगी भजने याची समृद्ध परंपरा या परिसराला आहे. सण आणि त्याअनुषंगाने रुजलेल्या अनेक प्रकारच्या परंपरा, प्रसंगानुरूप म्हटली जाणारी लोकगीते, विधीगीते येथे मोठ्या प्रमाणात ऐकायला मिळतात.

चंदगडच्या सांस्कृतिक जीवनाचा विचार करताना स्त्री केंद्रवर्ती ठेवावी लागते. या प्रदेशातील स्त्री प्रचंड चिवट आणि कष्टाळू आहे. डोंगरी शेतांमुळे तिच्या वाट्याला प्रचंड कष्ट आलेले आहेत. अलीकडे वाढत्या ऊस शेतीमुळे तिची कष्टातून थोडी मुक्तता झालेली दिसते. परंतु, येथील शेतीत स्त्रीच खूप महत्त्वाची आहे. पहाटे उठून झाडलोट करण्यापासून सर्व स्वयंपाक उरकून सकाळी दहाच्या सुमारास ती शेताकडे जाते. या परिसरात शेतकऱ्याला शेतात 'आळा'ने (मजुरीने) कामावर येणाऱ्या स्त्रियांबरोबर सर्वांचेच दुपारचे जेवण द्यावे लागते. त्यामुळे ऐवढ्या सर्व माणसांचे जेवण पहाटेपासून तयार करून, सोबत बांधून घेऊन स्त्रिया शेतावर जातात. तेथील कष्टप्रद कामे त्या चिवटपणे करतात. ह्यंडे (ढेकळं) फोडून, शेताची बांधबंधस्ती करण्यापासून (रान) तण काढणे, पेरणे, कापणे ते मळणीपर्यंत सर्वच कामात ती पुरुषांच्या पुढे असते. मळणीनंतर



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

धान्य घरी आले तरी ती एकाग्रतेने मातेऱ्यातील धान्य शोधत खळ्यावरचा प्रत्येक दाणा वेचून घरी आणते. पुरुष मंडळी थोडी मेहनतीची, अवघड कामं करून दुपारी सुट्टी घेऊन घरी जाऊ शकतात. परंतु, बायकांची सुटका नाही. जेव्हा बेलांनी (औताने) शेती केली जायती, तेव्हा पुरुष मंडळी किमान औत धरायचे, बैलांच सारे काही त्यांना करावे लागायचे. ट्रॅक्टर आल्यानंतर त्या कामातूनही त्यांची सुटका झालेली आहे. आता पिकांना पाणी देण्याचे (पाजण्याचे) काम पुरुष मंडळी करताना दिसतात. स्त्रिया दिवसभर काम करून रात्रीचे जेवण करायला धावत घराकडे येतात. सर्वांचे जेवण करून, वाढून, उष्टी-खरकटी काढूनच त्यांची पाठ जमिनीला टेकते. दरम्यान शेतीबरोबर घरासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टीचा संचय करण्यातही तिच पुढे असते. लाकूडफाटा जमवणे, शेणी करून ठेवणे, धान्य सुरक्षित ठेवणे, ते लागेल तसे काढून दळून-कांडून आणणे, घरी आलेल्या पैपाहुण्यांचे बघणे, सणवारी पूजाअर्चाचे बघणे, नैवेद्यापासून गोडधोड करणे सारे सारे येथील स्त्रिया करताना दिसतात. पुरुष या सर्व गोष्टींत फक्त त्यांच्या सोबत असतो. जनावरांची 'पेंढी' (वैरण) आणणे, दूध काढणे आणि डेअरीत नेऊन घालणे असली कामे शक्यतो पुरुष मंडळी करताना दिसतात. अर्थात या कामातही स्त्री मागे नाही.

त्यामुळे या परिसरात स्त्रीगीतांची रेलचेल दिसते. श्रमपरिहारासाठी शेतात म्हटल्या जाणाऱ्या गाण्यांपासून प्रत्येक सणाला स्त्रियांची गाणी दिसतात. त्यांचे भावविश्व पुरुषांपेक्षा समृद्ध असल्याने आणि ते व्यक्त करण्याचे गीतांशिवाय साधन नसल्याने कधीकाळी ही गीते स्त्रीजीवनाचा भाग होती. आज स्त्रिया थोड्या शिकलेल्या, काही प्रमाणात मुक्त आणि मनमोकळ्या बोलू लागल्या आहेत. शिवाय मनोरंजनाची इतर अनेक साधने उपलब्ध झाली आहेत. त्यामुळे त्यांच्या गाण्यांचे प्रमाण बरेच कमी होत चालले आहे.

प्रत्येक गावात वेगवेगळ्या देवदेवतांची मंदिरे आहेत. यातील काही ग्रामदैवते असतात. काही सीमांचे रक्षण करणाऱ्या शूद्र देवता आहेत. या देवांविषयीच्या मजेशीर दंतकथाही गावोगावी ऐकायला मिळत असतात. देवदेवतांचे परस्परसंबंध सांगितले जातात. त्यांच्या भेटीविषयीच्या कथा आणि प्रत्यक्ष भेट घालून देण्याचे कार्यक्रमही गावोगावी होतात. ग्रामदेवतांची बांधिव मंदिरे, गावाबाहेर चोहोबाजूंनी सीमदेव, गावांपासून दूर डोंगरातील देवही वेगवेगळे आहेत. काही देवतांचे फक्त चौथरे आहेत. भैरोबा, जोतीबा, खंडोबा आदि देवतांच्या मूर्ती असल्या तरी अनेक ग्रामदेवता केवळ पाषाणरूपात आहेत. यमाई, यल्लम्मा, चामुंडी, सातेरी या देवतांचे स्वरूप एक असले तरी भिन्न प्रदेशामुळे त्यांच्या नावात फरक पडला आहे. ग्रामदेवता या स्त्री व पुरुष अशा दोन्ही रूपात आढळतात. उदाहरणार्थ, भैरोबा, सिदोबा, नाथभैरव, जोतिबा, दातनदेव, रवळनाथ, वैद्यनाथ या पुरुष ग्रामदेवता तर एकवीरादेवी, मांढरदेवी, काळूबाई, मरिआई, यल्लम्मा, दुर्गम्मा, भवानी, लक्ष्मी इत्यादी स्त्रीदेवता होत.

चंदगड परिसरातील दैवते प्रदेशानुसार बदलताना दिसतात. कर्नाटक सीमेजवळील भागात वैद्यनाथ, यल्लम्मा, मरगुबाई, चव्हाटा, भैरवनाथ, खंडोबा, जोतिबा इत्यादी देवदेवतांची मोठ्या प्रमाणात पूजा केली जाते. तर पश्चिमेकडील भागात, रवळनाथ, ब्रदीनाथ, मारुती इत्यादी देवतांची आराधना केली जाते. चंदगड येथील भव्य रवळनाथ मंदिर, देवरवाडी येथील वैद्यनाथ मंदिर, तर कोदाळी येथील माऊली मंदिर या तालुक्यातील प्रसिद्ध देवस्थानांना प्राचीन वारसा आहे. शिवाय इब्राहिमपूर आणि कोदाळी येथे प्राचीन जैन मंदिरे आहेत.

या परिसरात देवदेवतांच्या जत्रा, यात्रांसह लक्ष्मीच्या जत्रा प्रसिद्ध आहेत. त्या काही गावांमध्ये दरवर्षी होतात. तर काही गावांमध्ये अनेक वर्षांनी होत असतात. ज्या गावांमध्ये अनेक वर्षांनंतर लक्ष्मीची जत्रा होते, तेथे प्रत्येक घरी लाखो रुपयांचा खर्च केला जातो. तर ग्रामदैवतांच्या जत्रांनाही जत्रेच्या स्वरूपावर खर्च होतो. काही दैवतांच्या जत्रा म्हणजे म्हाया शाकाहारी (गोड्या) तर काही दैवतांच्या मासांहारी (खाऱ्या) असतात. तर गुढीपाडव्यापासून बेंदुर, नागपंचमी, गौरी-गणपती, दिवळी ते शिमगा सर्वच सण मोठ्या उत्साहात आणि खास पदार्थांचे जेवण करून साजरे केले जातात.

चंदगडकरांचे सण (गुढीपाढवा) चैत्र पाडव्यापासून सुरू होतात. या सणादरम्यान रानोमाळ जंगली मेवा बहरून आलेला असतो. नाना प्रकारचे आंबे, करवंदे, चुरणं, फणस, धामणं, जांभळं ही या प्रदेशात मुबलक प्रमाणात पिकणारी फळं. या फळांवर ताव मारणे हा येथील प्रत्येकाचा दिनक्रम. यातीलच काही फळांचा नैवैद्य चैत्रात वाटला जातो. प्रत्येक घरासमोर

चिव्या गुढी उभारून नव्या वर्षाचे स्वागत केले जाते. गुढी पाटावर विधीवत पुजली जाते. गुढीच्या वरच्या टोकाला चोळीचा खण, हळद कुंकू, कडुनिंबाची पानं, साखरमाळ आणि फुलांचा हार आणि लोटा टांगला जातो. या सणाला पुरणपोळीचा नैवैद्य दाखवला जातो. ही गुढी संध्याकाळी दिवस मावळायच्या आधी उतरली जाते.

यानंतर येणारा सण बेंदूर. बैलांची पूजा हा या सणाचा महत्त्वाचा भाग. तांदुळ भरडून बनवलेले 'उंडे' आणि 'उंडऱ्या' हे या सणाचे विशेष. उंड्याची माळ करून बैलांच्या गळयात बांधली जाते. चंदगडमध्ये कर्नाटकी आणि महाराष्ट्रीयन बेंदूर असे दोन्ही सण दोन विभागात साजरे केले जातात, याबद्दल वरती लिहिले आहेच. या दिवशी शेतीकामांना सुट्टी असते. अशा सुट्टीला 'पाळक' म्हणतात. बेंदूर सणाला घराच्या चौकटींना पिंपळाच्या पानांचे तोरण बांधले जाते. शेतात बांधावर उगवणाऱ्या विशिष्ट गवतापासून ती बनवली जाते. या गवताला चंदगडी बोलीत 'मोळ' म्हणतात. या मोळाची दोरी त्यादिवशी वळायची आणि त्या दोरीत पिंपळाची पानं गुंफायची. ही पानं गुंफून तयार झालेली तोरणं सर्वत्र बांधली जातात. ही तोरणं सर्वांच्या घरी बैलांच्या गळयात, शेतीच्या औजारांना, दरवाजांच्या चौकटींना बांधलेली दिसतात. यानिमित्ताने घरातील सर्वच जनावरांच्या शिंगाना रंग लावला जातो. या रंगाला 'वारणेस' म्हणतात. काही गावांमध्ये बैलांची मिरवणूक काढली जाते. गल्लीतून बैल पळवले जातात. रात्री मटण आणि उंडे हे या दिवसाचे औचित्य असते. या दिवशी घरी लग्न होऊन गेलेल्या मुलीला जावयासह बोलवले जाते. जावयाला आहेर आणि छत्री भेट दिली जाते. हा प्रदेश अतिपावसाळी असल्याने छत्री देण्याची प्रथा रुजली असावी.

पुढे येणारा नागपंचमी हा सण खास स्त्रियांचाच. या सणाला घरोघरी पाळणे बांधून गित्ती गाण्याचा कार्यक्रम असे. अलीकडे ही प्रथा कमी होत चालली आहे. जोंधळयाच्या 'लाह्या', हरबऱ्याचे 'भेजाणे' आणि 'तंबिट' हे यानिमित्ताने केले जातात. गौरीगणपती हा या परिसरातील सर्वात मोठा सण. दिवाळीपेक्षा उत्साह गणपतीच्या सणात असतो. गणेश विसर्जनापर्यंत पाच ते सात दिवस फार उत्साहाचे वातावरण सर्वत्र असते. या सणाला घरोघरी आरास बनवणे, ती सजवणे हे महत्त्वाचे काम. जणू स्पर्धाच असते याबाबतीत. जंगलझाडी असल्याने आणि पावसाळयात मुबलक पाऊस पडून गेलेला असल्याने रानोमाळ वेगवेगळी फुलं, पानं आणि वेली बहरलेल्या असतात. रंगीत कागद आणि इतर गोष्टी नसलेल्या दिवसात ही फुले, पाने आणि वेली लावूनच 'आरास' बनवला जात असे. ही प्रथा आजही 'मकर' बनवून त्याला हा जंगली 'फुलारा' बांधून पाळली जाते. या फुलाऱ्यात वाळूक, वेगवेगळया रंगाची थेट जमिनीतून आलेली फुले, कांगुण्या, कवंडाळ, किर्यादी, कच्चरकांदा, पाचबोटं, तीनबोटं, शेवरा याचा समावेश असतो. गणपतीच्या सणात झिम्मा फुगडी, सूप खेळवणे, घागर घुमविणे असे खेळ स्त्रिया खेळतात. कधीकाळी काटवटीवर गाणी म्हटली जात. ही प्रथा जवळजवळ मोडीत निघाली आहे.

गणपतीनंतर येतो दसरा. दसऱ्यामध्ये सोनं लुटायचं आणि वाटायचं. 'सोनं घ्या सोन्यासारखं राहा' म्हणत ते घरोघरी जाऊन वाटले जाते. दसऱ्याच्या दरम्यान शेतात पांडवपूजेचा एक प्रकार सर्वत्र असतो. दसऱ्यानंतर दिवाळी येते. चंदगडकरांची दिवाळी कामात जाते. दिवाळीत शेणाचे 'बेनके' पूजणे, बहिणीकडून ओवाळून घेणे, गवळणी पुजणे, वाडा बांधणे अशा काही प्रथा खूप प्राचीन आहेत. या सणात मुली घरोघरी जाऊन गाणी म्हणतात. या गाण्यांना 'गित्ती' गाणे म्हणतात. दिवाळीनंतरचा या परिसरातील मोठा सण म्हणजे शिमगा, होळीपूजन. होळीच्या दुसऱ्या दिवशी 'धुळवड' असते. यादिवशी कोणी पायात चप्पल घालत नाहीत. तसेच दिवसभर लाकडावर बसत नाहीत. कोणी बसलाच तर त्याच्यासमोर जाऊन बोंब मारली जाते. दंड म्हणून त्याच्याकडून एक नारळ घेतला जातो. या सणात सोंगे काढली जातात. ही सोंगे पाहणे हा या सणातील सर्वात आनंददायी भाग असतो. या सणात 'खेळे' खेळतात. खेळयांच्या नृत्यातून एकादी कथा साकारली जाते. त्याला 'घाय' म्हणतात. खेळयातील वैशिष्ट्यपूर्ण नृत्यानंतर एकत्र उभे राहून गीते सादर करतात. या गीतांना 'जत' म्हणतात. शिमग्याचा शेवटच्या दिवशी 'शिपणे' खेळतात.

या सर्व सणांचे अशिक्षित लोकांचे एक वेळापत्रक असते. ते अमावस्या आणि पौर्णिमेवर बेतलेले असते. त्यातून चंदगड परिसरात काही शब्द निर्माण झाले आहेत. पोर्णिमेला 'पूणव' हा शब्द आहे. चैत्र महिन्यात येणारी पोर्णिमा 'दवण्याची पूणव' म्हणून ओळखली जाते. बहुतांश लोकांचे दैवत रत्नागिरी डोंगरावरचा जोतिबा हे आहे. जोतिबाला दवणा वाहिला

जातो. म्हणून ही दवण्याची पूणव. वैशाखातील ‘उरडं पूणव’. वैशाखात नवी पालवी फुटते. ही पालवी म्हणजे ‘उरडं’. बंदूर सणादरम्यान येणारी ‘चिखल बेंदर पूणव’. श्रावणातील ‘नारळीपूणव’. अश्विनातील प्रसिद्ध कोजागिरीला ‘भिंबेची पूणव’ म्हणतात. कार्तिक महिन्यात येणाऱ्या पोर्णिमेला ‘तुळशी पूणव’ म्हणतात. कारण या पौर्णिमेला तुळशीची लग्ने लावली जातात. पौष महिन्यात येणाऱ्या पौर्णिमेला ‘चुडी पूणव’ म्हणतात. या पौर्णिमेला देव बाहेर जातात असा समज आहे. माघ महिन्यात ‘म्हाईची पूणव’ येते. या पौर्णिमेपासून म्हाया भरतात. शेवटी फाल्गुन महिन्यात येणारी ‘होळीपूणव’ होय. होळी हा वर्षातील शेवटचा सण. चंदगड परिसरात पूर्वजांच्या आत्म्यांना शांत करण्यासाठी ‘म्हाळ’ वाढले जातात. हे म्हाळ वाढणे हे या परिसराचे एक विशेष आहे. प्रत्येकाचे म्हाळ वेगवेगळया दिवशी असतात.

**चंदगडी लोक**

चंदगडी बोली बोलली जाणाऱ्या प्रदेशातील बहुसंख्य लोक शेतकरी आणि जातीने मराठा, कुणबी आहेत. त्याबरोबरच या प्रदेशात महार, मांग, सुतार, लोहार, गुरव, तेली, न्हावी, चांभार, कुंभार, परीट, शिंपी, सोनार, कासार या बलुतेदार आलुतेदारांसह बेरड, धनगर, हनबर, महादेव कोळी याती आणि ख्रिश्चन, मुसलमान, जैन, लिंगायत (वाणी) या विविध धर्मातील लोक एकत्र राहतात. हे सर्वच लोक जवळजवळ काही किरकोळ फरक सोडता एकसारखी भाषा वापरतात. ख्रिश्चन लोक बारदेस्करी, मुसलमान दखणी, लिंगायत कन्नड तर काही ठिकाणी बेरड जातीचे लोक कन्नड आणि चंदगडी बोली बोलतात. बेरड, महार, मांग या जातीतील लोकांच्या चंदगडी बोलीच्या उच्चारणात किरकोळ भेद दिसतो. त्यांच्या ठराविक शब्दसंग्रह देखील वेगळा पाहायला मिळतो.

या प्रदेशात बहुसंख्य लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. सर्व जाती, धर्माचे लोक या प्रदेशात दिसतात. शिवाय ते गुण्यागोविंदाने राहतात. तुर्केवाडी, चंदगड, कोवाड या गावांमध्ये हिंदू, ख्रिश्चन, मुसलमान अशा धर्माचे लोक एकोप्याने राहतात. त्याचबरोबर लिंगायत धर्माचे लोकही या परिसरात मोठ्या संख्येने दिसतात. ब्राह्मण, मराठा, कुणबी, बेरड, मांग, महार, चांभार, हनबर, महादेव कोळी, डंगे धनगर, शिंपी, कासार, सुतार, लोहार, परीट हे गावगाड्यातील महत्त्वाचे लोक जवळजवळ तालुक्यात सर्वत्र दिसतात. महादेव कोळी जातीचे लोक चिंचण्यासारख्या नदीकाठावरील गावात, तर येथील दाट जंगलांमध्ये डंगे धनगरांच्या वस्त्या आहेत. या सर्वांच्या संस्कृतीचा आणि व्यवसायविशिष्ट जगण्याचा प्रभाव येथील भाषेवर आहे.

भाषेचा इतिहास अभ्यासताना समाज हा महत्त्वाचा घटक असतो. कारण इतिहासाचे सर्वात महत्त्वाचे परिमाण समाज हेच असते. त्यामुळे कोणत्याही इतिहास लेखनात समाजाचा अभ्यास फार महत्त्वाचा ठरतो. समाज बदलत असतो. त्यामुळे समाजाधीन असलेली भाषाही बदलत राहते. परंतु, भाषा कधी, कोठे, कशी, किती आणि का बदलली याची समाधानकारक उत्तरे देता येत नाहीत. कारण त्यासंदर्भातले पुरावे उपलब्ध नसतात. भाषिक परिवर्तनाची प्रक्रिया सुप्त, सूक्ष्म आणि नकळत सुरू असते. या परिवर्तनामागे समाजातील बदल ही सर्वात महत्त्वाची गोष्ट असते. समाजात होणाऱ्या बदलांचा अभ्यास करताना समाजाचा संपर्क, नैसर्गिक, राजकीय बदल अभ्यासावे लागतात. या सर्व घडामोडींचा अभ्यास करताना काळाचा विचार महत्त्वाचा आहे. समकालीन कालखंडात ज्या गतीने समाजजीवन बदलत आहे, त्या गतीने यापूर्वी कधीच समाजात बदल घडले नव्हते. परिवर्तनाची गती मंद होती. पर्यायाने भाषिक बदलही मंद गतीने होत होते. जागतिकीकरणानंतरच्या गतीमान काळात रोज नवी गोष्ट घडते आहे. पर्यायाने भाषाही गतीने बदलते आहे.

विशिष्ट प्रदेशातील नावे, गावे, झाडे-झुडपे, जाती, जमाती, सणवार, विधी, परंपरा, अन्नधान्य, शेती, जंगल, पशूपक्षी, वृक्षवेली, दागदागिने, प्रथा, व्यवसाय या सर्व गोष्टींची नोंद भाषिक अभ्यासासाठी महत्त्वपूर्ण ठरते. ‘देश तसा वेश’ या म्हणीनुसार त्या त्या प्रदेशातील संस्कृती तेथील लोकांच्या जगण्यातून प्रतिबिंबित होत असते. प्रदेशात पिकणाऱ्या धान्यांपासून बनवलेले अन्न आणि सणसणावारांना केले जाणारे खाद्यपदार्थ हे याचेच द्योतक आहे. जे पिकते ते लोक खातात. चंदगड परिसरात भात हे मुख्य पिक. त्यामुळे येथील भाकरी तांदळापासून बनतात. वेगवेगळ्या सणांसाठी बनवलेले

खाद्यपदार्थ तांदळापासून बनतात. निवऱ्या, उकड्या निवऱ्या, दिवशी, आंबोळी, गव्हाण, उंडे, उंडऱ्या अशी काही खाद्यपदार्थांची नावे सांगता येतील. हे खाद्यपदार्थ इतरत्र क्वचितच दिसून येतील.

**शेतकरी समाज**

चंदगड परिसरात सर्वाधिक शेतकरी समाज आहे. या परिसरात शेती जातीधर्माचे लोक करतात. परंतु, बहुतांश मराठा जातीतील लोक शेती व्यवसायात आहेत. त्यांना कुळवाडी किंवा कुणबी असेही म्हणतात. हे येथील सर्वाधिक लोकसंख्या असणारे लोक आहेत. ते मराठी बोलणारे असून या प्रदेशातील चंदगडी बोली ही त्यांची दैनंदिन व्यवहाराची भाषा आहे. यांचा मुख्य देव 'केदारलिंग' म्हणजे 'जोतिबा' आहे. तो कोल्हापूर राज्यात आहे. निजाम राजवटीत असलेली 'तुळजाभवानी', कर्नाटकातील 'सोमनाथ' आणि 'यल्लम्मा' आणि पुण्याच्या पुरंदर परगण्यातील जेजुरीचा 'खंडोबा' हे देखील अनेकांचे देव आहेत. या जातीतील आडनावे अडीचशेहून अधिक आहेत. त्यामध्ये गायकवाड, साबळे, मोरे, सावंत, देसाई, भोसले, गावडे, चव्हाण इत्यादी आडनावांचा त्यामध्ये समावेश आहे. इ. स. १८८४ प्रसिद्ध करण्यात आलेल्या Gzetteer of Bombay Presidency, Volume XXI (Belgaum) मध्येही येथील सर्व आडनावांची सविस्तर यादी देण्यात आली आहे. या समाजातील लोकांचे वर्णन करून त्यांच्या भाषेबद्दल लिहिलेला मजकूर फार महत्त्वाचा आहे. त्यामध्ये ही भाषा ब्राह्मणांच्या मराठीपेक्षी वेगळी असून ती या समाजाची 'बोली' (dialect) असल्याचे स्पष्ट नोंदवले आहे. ही बोली म्हणजेच आपण चर्चा करीत असलेली 'चंदगडी बोली' होय. यासंदर्भातील येथील विश्लेषण असे आहे, "The Maráthi spoken by the Kulvádis is rougher and less clear than Bráhman Maráthi. Among the peculiarities of their dialect may be noticed, máj, to me; tuj, to you; jevos, to eat; lai, much; khateor khalete, where; vaich or ullas, a little; gont (Kánarese), to know; háya, is; nháya, is not; and mula (Kánarese), a corner Detale Kunbis speak the Konkani which prevails in Goa and in the north of Kánara. In towns and large villages most Maráthi Kunbis live in houses with mud walls and tiled roofs. (Page No ११०) हा मजकूर येथील समाज, संस्कृती आणि बोलीच्या चर्चेसाठी फार महत्त्वाचा आहे. आजही या बोलीत वरील सारे शब्द दिसतात.

पश्चिमेकडील कर्नाटक सीमेवर असणारी यरतनहट्टी, राजगोळी, दिंडलखोप, किटवाड, होसूर, कौलगे, महिपाळगड, देवरवाडी, शिनोळी, सुरुते, ढेकोळी, हाजगोळी, तुडये, म्हाळूंगे, या गावांसह कडलगे ते कुदनूर या 'किणी-कर्यात' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सुपीक पट्ट्यात ही बोली बोलली जाते. हा सर्व प्रदेश चंदगडचा असल्याने या बोलीरूपाला 'चंदगडी' बोलीचे एक रूप म्हणूनच ओळखले जाते. या पद्धतीचे परंतु, कानडी बोलीच्या अधिक प्रभावात असलेले आणि उच्चारणदृष्ट्या कानडी वळणाचे बोलीरूप बेळगाव परिसरात बोलले जाते. त्या बोलीरूपाला 'बेळगावी बोली' म्हणूनही ओळखले जाते.

वरील उताऱ्यात सुमारे दिडशे वर्षांपूर्वीचे काही शब्द आलेले आहेत. ते चंदगडी बोलीच्या या दोन्ही रूपांचे स्वरूप उलगडून दाखवणारे आहेत. या विश्लेषणात स्पष्टपणे दोन्ही रूपे अधोरेखित करण्यात आलेली आहेत. उदाहरणार्थ, 'माजं', 'तुजं', 'खटे', 'लई', 'वाईच' ही शब्दरूपे पश्चिमेकडे दिसतात. तर 'जेऊस', 'खलेटे', 'उलासा', 'वाईच' ही शब्दरूपे पूर्वकडे दिसतात. बोलीची पूर्व रूपे उपलब्ध होणे ही फार अशक्य गोष्ट असते. कारण बोली व्यवहारात केवळ बोलण्यासाठी वापरली जाते. तिच्यातून लेखन झालेले नसते. त्यामुळे बोलीचे पूर्वरूप उपलब्ध होऊ शकत नाही. चंदगडी बोलीत स्वतंत्र लेखन झालेले नसल्याने या बोलीतील प्राचीन पुरावे जवळजवळ सापडत नाहीत. त्यामुळे वरील गॅझेटिअरमधील अभ्यासकांचे बोलीबाबतचे निरीक्षण म्हणून खूप महत्त्वाचे आणि ऐतिहासिक ठरते.

येथील बोलीच्या अभ्यासातून समाज, संस्कृतीचे एक चित्र समोर येते. उदाहणार्थ, बोलीतील शब्दांच्या अभ्यासातून येथील खाद्यसंस्कृती, कृषिसंस्कृती, विधी, परंपरा यांचे एक चित्र अभ्यासता येते. याची सविस्तर चर्चा पुढे आपण



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

करणार आहोतच. येथील बोलीचे वरील गॅझेटीअरमधील रूप शोधताना येथील संस्कृतीवर प्रकाश टाकता येतो. घरात वापरात असलेल्या वस्तू, सणांना केले जाणारे पदार्थ, जीवनपद्धतीसंबंधी काही शब्द या गॅझेटीअरमध्ये आलेले आहेत. कुणबी जातीबद्दल लिहिताना आलेला पुढील मजकूर यादृष्टीने अभ्यासता येईल.

The only household goods are field tools, one or two brass or copper pots, and a number of earthen vessels used in cooing and for storing grain and oil, one handmill ukhal-musal, a grinding slab or páta-varvanta, and a few bamboo baskets. They generally have one or more pairs of bullocks and buffaloes and one or two cows or she-buffaloes. Most of them rear hens and keep a dog. They rarely own goats, and never have sheep. Among Detale Kunbis, the grown members o a family generally live in one house. As one of these undivided Kunbi families includes fifty to a hundred and fikty members, their oblong thatched houses are rery large and are divided into separate lodgings by wattled walls of kárvi or Strobilanthus stems. The furniture in a Konkani Kunbi's house is much the same as in a Maráthi Kunbi's, and like the Maráthi Kunbis they keep dogs and cattle; but they do not rear domestic fowls as they neither eat nor sell them. They have separate houses for their cattle. Both classes are eating and drinking, their every-day food being náchni bread and náchni gruel or ámbil. The well-to-do take a little rice every day, and the poor take rice on holidays. Their holiday dishes are round cakes of rice, wheat, and pulse called vadas; fried cakes of wheat, gram, and coarse sugar called telchiás; sweet cakes of rice balls or undes; plantain-shaped wheat or rice cakes illed with coarse sugar, boiled gram or parched rice flour or rájgira (Amaranthus tristis) seed boiled in steam; rice vermicelli or shevaya; rice cakes called ghávan; broad round cakes of wheat filled with boiled gram and coarse sugar called polyás; and milk boiled with rice and coarse sugar called khir. The Maráthi Kunbi eats fish, crabs, sheep and goats, the wild hog, the deer, and the hare. They do not eat beef. They eat eggs, and cocks and hens, but pot ducks, geese, peacocks, guincafowls, or turkeys. Of wild birds they eat the partridge, snipe, quail, wild duck, and pigeon. When the Kunbis, whether Maráthás or Konkanis, visit the temple of the village god and pray for success. If they kill they lay the game before the village god, offer him a piece, and take the rest home. The flesh offered to the god becomes the property of the temple-ministrant or pujári. (Page No. १११)

या उताऱ्यामध्ये येथील सुमारे दिडशे वर्षांपूर्वीची जीवनपद्धती आणि त्यानुसार आकाराला आलेली भाषा पाहता येते. या प्रदेशातील त्या काळात तांदुळ, नाचणी ही मुख्य पिके आहेत. त्यानुसार 'उंडा', 'उंडे', 'उंडऱ्या', 'तेलची', 'राजगिरी', 'शेवया', 'गव्हाण', 'पोळ्या', 'खीर', 'आंबिल' हे वरील उताऱ्यात नोंदवलेले पदार्थांबरोबर 'आंबोळ्या', 'उकड्या निवऱ्या', 'दिवशी', 'वडा' हे तांदळाच्या पिकांपासून बनणारे पदार्थ हेच येथील संस्कृतीत रुजलेले दिसतात. आजही या प्रदेशात हेच पदार्थ सणांना विशेषत्वाने केले जातात. अतिपावसामुळे आणि डोंगर उताराच्या शेतीमुळे आकाराला आलेल्या शेती-पिकांसंबधीत भाषिक व्यवहाराची चर्चा आपण पुढील प्रकरणात विस्ताराने करणार आहोत. परंतु, शेकडो वर्षांपासूनची येथील खाद्यसंस्कृती येथील शेतीने आकारलेली दिसते. येथील हवामानच पेहराव ठरवते. कारण भौगोलिक वातावरणामुळेच वेशभूषा ठरते. 'लंगोटी', 'बंडी', 'धोतर', 'अंगरखा', 'साडी', 'चोळी' याबरोबरच उन्हाळा, हिवाळा आणि पावसाळा या सर्व ऋतूंमध्ये वापरता येणारे 'घोंगडे' हे या समाजातील लोकांकडे असतेच. शिवाय जोडवी, मोती, घंटण,

बुगडी, टिक्की, मंगळसूत्र, काकणे, तोडबंदी, पट्टा, पाटली या दागिण्यावरून राहणीमान जसे कळते तसे या लोकांची भाषाही समजते.

**चंदगडची लोकभाषा**

कोणत्याही भाषेच्या बोलीचे उच्चारण हे त्या बोलीचे खास वैशिष्ट्य असते. शब्दसंग्रह, वाक्यांची रचना, व्याकरणिक विशेषांबरोबरच तिच्या उच्चारणाचे वेगळेपण अभ्यासने महत्त्वपूर्ण ठरते. त्याचबरोबर बोलीवापरामध्ये रूढी महत्त्वाची ठरते. बोलीतील शब्दांचे उच्चार, हेल, बलाघात यांची तुलना प्रमाण भाषेशी करता बोलीचे वेगळेपण ध्वनीत होते. बोलीतील एखादा वाक्प्रयोग प्रमाण मराठीच्या तुलनेत चुकीचा वाटत असला तरी, विशिष्ट पद्धतीने बोलणे समाजात रूढ होऊन गेलेले असते. उदाहरणार्थ, चंदगडी बोलीमध्ये स्त्रिया 'मिय्या जेवलो', 'मिय्या बाजारास गेल्लो' असे बोलतात. या वाक्यातील क्रियापदे पुलिंगी आहेत. परंतु, असे बोलणे या बोलीत रूढ होऊन गेलेले आहे. त्यामुळे बोली विचारात रूढीचाही विचार महत्त्वाचा ठरतो.

चंदगडी बोलीमध्ये आपण पश्चिम विभाग आणि पूर्व विभाग असे दोन विभाग कल्पून बोलीचा नमुना आणि शब्दसंग्रहाचा विचार करता येतो. थोडा सूक्ष्म विचार केल्यास अजून दोन उच्चारविशेष सांगता येतील असे या बोलीतील भेद दर्शवता येतात. या चारही उच्चारणांचा विचार पुढे चर्चेला येईलच. तथापि, पश्चिम विभागामध्ये कोकणी भाषा आणि तळकोकणातील मालवणी-कुडाळी बोलीच्या प्रभावाने तयार झालेली बोली ऐकायला मिळते. 'गसाली पावसान दांडगा धुमाकुळ घाटल्यान. दुकनं पडो, थेंबा तुटोस तयार न्हाय. नी आवंदू नीसता कोंडा. कट्टाळा यलाय निसता. काय काम सुधरोस दिना' अशा पद्धतीने ही बोली ऐकू येते. तर पूर्व विभागामध्ये कन्नड भाषेच्या संपर्कामुळे उच्चार कानडी वळणाचे झालेले आहेत. 'बायले सांच्याळान पाचास म्हटल्या भाताची वळी खळ्यावर पडे. मानं सात-आठ बैलांची पात पोरं हांबडीत. बैला भोवत्यान फिरताना पोरांची दांडगी धुंबड उडे.' अशी बोली बोलली जाते. या दोन्ही रूपांमध्ये मूलभूत फरक उच्चारणांचा आहे. शब्दसंग्रहाच्या पातळीवर अनेक शब्द सारखे दिसतील. मात्र त्या शब्दांचे उच्चारण भिन्न असते. पश्चिम विभागातील 'मुगळ' साठी पूर्व भागात 'चंदी', 'हुलगा'साठी 'ढगाटा', 'जवळ, लगट'साठी 'बदिस', 'सुतार'साठी 'बडगी', 'न्हंगड'साठी 'कसारकी' असे वैशिष्ट्यपूर्ण शब्द वापरले जातात. ही उदाहरणे केवळ बोलीचे वेगळेपण ध्यानात येण्यासाठी विचारात घेतलेले आहेत. चंदगडी बोलीचा स्वतंत्र शब्दसंग्रह विपुल आहे. शब्दसंग्रहाचा विचार भौगोलिक, सामाजिक संदर्भातही करता येतो. उदाहरणार्थ, चंदगडी बोलीचा भाषिक प्रदेश कोकण, गोवा आणि कर्नाटक राज्याच्या सीमांना लागून आणि त्रिकोणी कात्रीत सापडलेला असल्याने येथे अनेक वैशिष्ट्यपूर्ण शब्द तयार झाले आहेत. येथील भूगोलाचा विचार केल्यास नैसर्गिक जंगले, त्यातील झाडेझुडपे, वेली त्यापासून मिळणारी फळे, फुले आणि इतर उत्पादने, जंगली श्वापदे, त्यांचा सहवास, भौगोलिक परिस्थितीनुरूप येणारी येथील पिके, पिकांच्या जाती, अतिवृष्टीमुळे येणारी तणे या सर्वांमधून तयार झालेली चंदगडी बोलीतून अभ्यासता येते. भिन्न भाषिक प्रभावांमुळे तयार झालेली भिन्न भिन्न उच्चारवैशिष्ट्ये, येथून जवळ असणाऱ्या बंदरांमुळे तयार झालेले व्यापारी मार्ग, येथील ऐतिहासिक काळातील सत्ता अशा अनेक कारणांनी तयार झालला शब्दसंग्रह या बोलीत अभ्यासता येतो. व्यापरी मार्गावरून तयार झालेला मारग, जंगलतोडीतून तयार झालेला कटीन, कटीनात, शिरं, बेंदणे, घळी, किटाण सारखे शब्द याची उदाहरणे आहेत.

चंदगडी बोलीचे काही विशेष सांगता येतील. त्यामध्ये उच्चारण आणि व्याकणिक विशेषांची चर्चा भाषिक व्यवहाराची चर्चा करताना केलेली आहे. येथे संक्षेपाने काही विशेष नोंदवू. चंदगडी बोलीत स्त्रिया पुरुषवाचक क्रियापदांचा वापर मोठ्या प्रमाणात करतात. मिया गेल्लो, मिया यल्लो, मिया जेवलो अशा पद्धतीने क्रियापदांचा वापर हे एक या बोलीचे वैशिष्ट्य सांगता येईल. भाषालघुत्व हेही या बोलीचे महत्त्वाचे विशेष आहे. उदाहरणार्थ, जात आहेस काय? असे विचारण्यासाठी 'जातलेसऽऽ' असे विचारले की काम भागते. यातील 'लेस'चा उच्चार दीर्घ सुरावटीचा असतो. शब्दांना लावला जाणारा 'स' आणि 'ली' हा प्रत्यय सर्वाधिक दिसतो. याबद्दल भाषाव्यवहाराच्या प्रकरणात चर्चा केलेली आहे.



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

सर्वनामांनाही वैशिष्ट्यपूर्ण प्रत्यय लागतात. उदाहरणार्थ, मी-मिय्या, तू-तिय्या, तो, ते-त्यनी, हा, हे-ह्यनी इत्यादी. चंदगडी बोलीतील विशेषणेही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. दांडगा (मोठा), व्हलस (घाण), बुरसा (घाणेरडा), आंबरसुका (ओलसर), कळकोटा (भांडणे काढणारा), कळखोचरा (भांडणे उकरून काढणारा), काटकोळा (बारीक), धबला (जाडा), हुसभुरक्या (लाजनसलेल्या), व्हळके (होय होय म्हणणारे) अशी विपुल विशेषणे या बोलीत सापडतात. रंगवाचक विशेषणेही अभ्यसनीय आहेत. तांबूस, हिरवट, तांबडाभडक, मातकट, तपकीरी, पिवळाधम्मक अशी ही रंगवाचक विशेषणे आहेत. नकाडा (लहान), नकबर (चिमुटभर), दांडगा (मोठा), वावभर (एक मीटर), उलासका (थोडासा) अशी आकारमान वाचक विशेषणे दिसतात. तर हिजडी, देवचार, जोगता, जोगती, खज्जाळी, हूसभुर्की, उंडगी अशी विशेषणे शिवीसदृश्य आहेत.

चंदगडच्या पूर्वेकडे असणाऱ्या कडलगेपासून राजगोळीपर्यंतच्या भागात बोलली जाणाऱ्या बोलीरूपावर कन्नड भाषेचा प्रभाव जाणवतो. या प्रदेशाला 'किणी-कर्यात' म्हणून ओळखले जाते. पूर्व विभागात बोलीची सुरावट कन्नडच्या प्रभावाने तयार झालेली आहे. कण्णं (केव्हा), कास (कशाला), खट्टे (कोठे), गसली (गेल्यावर्षी), तण्णं (तेव्हा), तवरस्क (तोपर्यंत), चकोट (चांगले), बळ्यान (खोटे), माज (मला), मिय्या (मी) असे शब्द पूर्वविभागात दिसतात. 'कासनी ते' 'खट्टे गेल्ल्यास', 'कन्नच्चान सोदूलोय मसोटीत गेल्ल्यास काय' अशी वाक्ये प्रत्यक्ष ऐकणे हा एक अनुभव असतो. या विभागात तूज, माज, त्यास, तिण्ण, मिण्ण, त्यण्णाणी, ह्यणाणी अशी सर्वनामे वापरली जातात. या विभागातील उच्चारणे ही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. 'कोठे' ऐवजी येणाऱ्या 'खट्टे' या शब्दातील 'ट्टे'चा लांबवलेला  उच्चार हे या बोलीचे वैशिष्ट्य आहे. 'कास तूण पड्यात गल्ल्यास' (तू परसात का गेला होतास?) या वाक्यातील 'ण्ण, ड्या, ल्ल्या' या जोडाक्षरी शब्दांचे दीर्घ उच्चारण नवीन व्यक्तीला सहज न उमगणारे आहे.

चंदगडच्या पश्चिम विभागातील बोलीरूपावर कोकणीसह मालवणी-कुडाळी बोलीचा खोलवरचा प्रभाव आहे. चंदगडला गोवा-सिंधुदुर्ग जिल्ह्याची बरीच मोठी सीमा चंदगड तालुक्याच्या हद्दीशी सलग असल्याने या परिसरातील अनेक गावांतून चंदगडी भाषा कोकणीमिश्रीत बोलली जाते. तालुक्यातील कानूर, पिळणी, सडेगुडवळे, बिज्जूर यांसह कोदाळी, पारगड, मिरवेल, नामखोल आदी भागांतील लोक कोकणी बोलतात. वरील बहुतांश गावांतील रोटीबेटी व्यवहार आंबोली, सावंतवाडी विभागामधून होत असल्याने कोकणी बोली ही दैनंदिन व्यवहारामधून बोलली जाते.

चंदगड तालुक्यातील भौगोलिकतेत खूप वेगळेपण आहे. शिवाय अतिवृष्टीमुळे शेती करण्याची पद्धत आणि अवजारे निराळीच आहेत. याचा प्रभाव येथील बोलीवर पडलेला दिसतो. भाताचे पीक हे चिखल रोप पद्धतीने घेतले जाते. चिखल रोप करताना 'घुट्टा' हे अवजार महत्त्वाचे असते. हे फक्त अतिप्रवर्षण भागातच वापरले जाते. असे अवजार देशावर सापडत नाही. या बरोबरच तिरवाड, गोराब, ह्यंडोरं, खुट्ट्या, दादरांचा कोळपा, अशी काही वस्तू व अवजारे वापरली जातात. कोणतीही बोलीवर अन्य भाषांचा, बोलीचा, संस्कृतींचा प्रभाव प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे पडत असतो. काळानुरूप मूळच्या भाषा-बोलीत विविध पातळीवर बदल व परिवर्तन होत असते. जगातील, भारतातील बोली ही त्यास अपवाद नाही. चंदगडी बोलीवर गोवा-कोकणी बोली, पोर्तुगीज बोली, प्रमाण मराठी इत्यादीचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. चंदगडी बोलीचा अभ्यास करताना या प्रभावाचा विचार करणे महत्त्वाचे वाटते. १५१० साली पोर्तुगीजांनी गोव्यावर आक्रमण केल्यानंतर गोव्याच्या संस्कृतीवर व जीवनावर त्याचा फार मोठा परिणाम झाला. चंदगड हा गोव्याशी अनेक संबंधांने जोडलेला प्रदेश आहे. येथील लोक आजही भात पेरणी, कापणी आणि मळणी कामाला गोव्यात जातात. गोव्यात व्यापारी मार्गामुळे व्यापारी संबंधही आहेत. शिवाय गोव्यातील धर्मप्रसारकांनी चंदगडमध्ये मोठे काम उभारले असून त्यानिमित्ताने हा प्रदेश गोव्याशी जोडला गेला. चंदगड तालुक्यातील अनेक गावांमध्ये चर्च आहे. अनेक लोकांनी धर्मांतर केले आहे. हा प्रभाव दुहेरी आहे. रोजगारासाठी जाऊन धर्मांतरीत झालेले लोक आणि गोव्यात धर्मांतराचे वारे जोरदार वाहू लागल्यानंतर 'इन्क्लिजिशन पिरेड'मध्ये अनेक लोक गोव्यातून चंदगड परिसरात येऊन स्थिर झाले. या कालखंडात गोव्यातील पोर्तुगीजांचा धर्मछळाचा काळ म्हटले जाते. या काळात गोव्यातील अनेक हिंदू लोक गोव्याबाहेर जेथे आसरा मिळेल तेथे जाऊन राहिले. गोव्याबाहेर बऱ्याच मोठ्या प्रदेशावर अदिलशाची राजवट होती. अदिलशहा अशा लोकांना आश्रय देण्यास अनुकूल नव्हता परंतु,

लोकाश्रयावर हे लोक गोव्याबाहेरच्या प्रदेशात स्थिरस्थावर झाले. त्यामुळे ते येताना घेऊन आलेली आपली भाषा येथे आल्यानंतर एकजीव झाली. त्यातून शब्दांचे आणि उच्चारणांचे अनुकरण होत गेले.

हा प्रभाव थोडा विस्ताराने अभ्यासल्यास, इ. स. १५१० ला गोव्यावर पोर्तुगीजांनी आक्रमण केले. गोव्याच्या संस्कृतीवर व जीवनावर त्याचा फार मोठा परिणाम झाला. जेत्या पोर्तुगीजांच्या भाषेचा तेथील मूळ भाषेवर संस्कार होऊन तिच्यात शब्दांचा भरणा मराठीमध्ये झाला आहे. चंदगड तालुक्याच्या हद्दीशी संलग्न असल्यामुळे गोव्यातील, कोकणी पोर्तुगीज शब्द चंदगडी बोलीत मिसळले आहेत. पोर्तुगीज बोलीचा कोकणी बोलीवर कसा प्रभाव पडला आहे. या प्रभावासंदर्भात अ. का. प्रियोळकरांनी, 'कोकणी बोलीवर पोर्तुगीज भाषेचा परिणाम झाला आहे. उच्चार, शब्द व वाक्यरचना यांच्या बाबतीत गोवा प्रांतातील ख्रिस्ती लोकांची कोकणी बोली इतकी पोर्तुगीज वळणावर गेली की तिला मराठीची बोली म्हणावी की पोर्तुगीजांची बोली मानावी असा संभ्रम पडतो. आई, बाप, यांच्याबद्दलही त्यांनी 'माय', 'पाय', असे पोर्तुगीज शब्द उचलले आहेत. हिंदी भाषेवर 'पारशी-अरबी' भाषांचा परिणाम होऊन ज्याप्रमाणे उर्दू भाषा बनली आहे. त्याप्रमाणे गोमंतकी बोलीवर पोर्तुगीज भाषेचा परिणाम होऊन 'गोवानीज' बोली बनली आहे.' (अ. का. प्रियोळकर, १९६६ : पृष्ठ १०) असे म्हटले आहे. या प्रभावातून चंदगडी बोलीत रुजलेल्या शब्दांची सविस्तर चर्चा संपर्क प्रक्रियेच्या संदर्भात केलेली आहे.

बोलीच्या समाजभाषावैज्ञानिक अभ्यासपद्धतीत समाज आणि संस्कृतीचा अभ्यास फार महत्त्वाचा मानला जातो. समाज म्हणजे तेथील लोक. हे लोक अनेक स्तरातील, विविध जाती, धर्माचे असतात. अनेक जातीजमातीचे आणि धर्माचे लोक एकत्र राहतात हेच भारताचे वैशिष्ट्य मानले जाते. आपल्या भाषा, परंपरा, प्रथा आणि संस्कृती जोपासत हे लोक एकत्र नांदतात. परस्परांच्या सणउत्सवांमध्ये सहभागी होतात. त्यामुळे नित्यसंपर्क आणि परस्परांच्या भाषांचा प्रभाव ही अनिवार्य गोष्ट बनून जाते. चंदगडी बोलीही त्याला अपवाद नाही. याबोलीवर असलेले अनेक भाषा, बोलींचे प्रभाव हेच सूचित करतात. प्रत्येक समाजाची एक संस्कृती विकसित झालेली असते. ही संस्कृती त्यांच्या भाषेतून व्यक्त होते. त्यामुळे भाषेचा अभ्यास त्यांच्या संस्कृती आणि समाजजीवनाच्या संदर्भाधारे करावा लागतो. ठिकठिकाणी वास्तव करून असणाऱ्या मराठी समाजगटांचा नीट परिचय करून घ्यायचा असेल तर त्यांच्या बोलींचा अभ्यास करायला हवा. चंदगडी बोलीच्या अनुषंगाने येथे आपण ही बोली बोलली जाणाऱ्या प्रदेशाचा सविस्तर विचार केला आहे. चंदगडी बोली, ती बोलणारा समाज आणि त्यांची संस्कृती याचा एकत्रित विचार केल्यानंतर चंदगडी बोलीच्या निर्मितीची प्रक्रिया कशी घडली असेल याचा अंदाज येतो. समाजभाषाविज्ञानामध्ये या सहसंबंधाचा अभ्यास केला जातो. समाज हाच भाषेचा निर्माता असतो. समाजाच्या शेकडो वर्षांच्या संचिताचा ती भाग असते. त्यामुळे बोलीचा अभ्यास ती बोली बोलणाऱ्या समाजाच्या संदर्भात करणेच अधिक सयुक्तिक ठरणारे आहे. विशिष्ट क्षेत्रातील बोली एक व्यवहारभाषा असते. ती त्या प्रदेशात झऱ्यासारखी निखळपणे वाहत असते. तिच्यातील नित्यनूतन शब्द म्हणजे तिचा पाझर असतो. हा पाझर प्रमाणभाषेत झिरपणे म्हणजेच भाषावृद्धी होय. ती होण्यासाठी बोलीचा समाजाच्या संदर्भात अभ्यास आवश्यक आहे. अशा अभ्यासातूनच तिची परंपरा, तिच्यातील सौंदर्यस्थळे, संवादासाठी अधिक प्रभावी ठरू शकणाऱ्या अर्थछटा कळू शकणार आहेत.

❑❑❑

॥ तीन ॥

# चंदगडी बोली : भाषिक भांडार आणि लघुक्षेत्रे

समाज प्रवाही आहे. तो सतत बदलत असतो. त्याचे हे प्रवाहित्व आणि बदलणे भाषेवर परिणाम करणारे ठरते. अशा परिवर्तनशील समाजात ज्ञानाची निर्मिती, संवर्धन आणि वहन भाषेमुळे शक्य झालेले आहे. हजारो वर्षांपूर्वीपासून या ज्ञानाच्या आधारानेच समाजाची वाटचाल सुरू असल्याचे दिसते. भाषेला लिखित रूप प्राप्त होण्याआधीपासून; मिळविलेले ज्ञान जतन करून ठेवणे आणि पुढच्या पिढीकडे संक्रमित करणे या बाबी भाषेमुळेच शक्य झालेल्या आहेत. त्यासाठी त्या त्या समाजाचे 'भाषिक भांडार'(Verbal Repertoire) फार महत्त्वाचे असते. जॉन गम्पर्झ (Gumperz, John J.) यांनी मांडलेली ही संकल्पना बरीच व्यापक आहे. एखाद्या समाजातील लोक परस्पर संपर्क आणि व्यवहारासाठी ज्या भाषा, बोलींचा वापर करतात, त्या सर्वांचा मिळून एक भाषिक कोश तयार झालेला असतो. त्यामध्ये त्या समाजात, प्रदेशात वापरल्या जाणाऱ्या विविध भाषा, बोलींचा समावेश होतो. मुंबई, पुणे सारख्या महानगरांचा भाषिक कोश व्यापक आणि गुंतागुंतीचे असतो. कारण या भाषिक कोशावर विविध प्रदेशातील भाषा, बोलींसह अनेक व्यवसाय, आर्थिक सामाजिक स्तरातील लोकांच्या भाषांचा प्रभाव असतो.

कोणताही लहानमोठा समाज आपला दैनंदिन व्यवहार ज्या भाषेतून करतो, अशा व्यवहारासाठी जी भाषा वापरतो ती भाषा अभ्यासल्यानंतर त्या समाजाचे 'भाषिक भांडार' लक्षात येते. या भाषिक भांडारामध्ये संदर्भानुसार अनेक कप्पे तयार झालेले असतात. विविध कप्प्यांनुसार वेगळी पडणारी भाषा सामाजिक, सांस्कृतिक संदर्भांनी युक्त असते. या प्रत्येक कप्प्यांचे स्वतंत्र विश्लेषण करता येते. व्यक्तीचा भाषाव्यवहार जेवढा समृद्ध तेवढाच तो वैविध्यपूर्ण आणि संदर्भबहुल असतो. मर्यादित भावविश्व असणारा एकेकाळचा माणूस स्वत:च्या प्रदेशाच्या सीमा ओलांडून आज विविध कारणांसाठी मुक्त भ्रमंती करताना दिसतो. शहरांबरोबरच खेड्यापाड्यातील लोक आज नोकरी-व्यवसायाच्यानिमित्ताने परदेशात वास्तव्य करून आहेत. त्यामुळे बोलीभाषांच्या शब्दकोशात नव्या शब्दांची भर पडते आहे. शब्दांचे उच्चार बदलताहेत. अनेक बोलीभाषक आपली बोली टाकून नवी भाषा आत्मसात करू लागले आहेत. या सर्व प्रक्रियेत बोलीतील शब्दकोशाची चिकित्सा फार महत्त्वाची ठरणार आहे.

समाजाच्या भाषिक व्यवहारामध्ये संदर्भबहुलता आलेली आहे. जीवनातील नानाविध गरजांसाठी, विविध उद्देशांच्या पूर्ततेसाठी, दैनंदिन कामकाजासाठी व्यक्तीला विविध क्षेत्रातील लोकांशी संपर्क ठेवावा लागतो. या बहुविध संपर्कातूनच व्यक्तीचा 'भाषाव्यवहार' विविधांगी होतो. या व्यवहाराचे सूक्ष्म निरीक्षण केल्यानंतर संदर्भानुसार, विषयक्षेत्रानुसार भाषाव्यवहाराचे लहान-मोठे कप्पे तयार होताना दिसतात. समाजातील कोणत्याही व्यक्तीचा भाषाव्यवहार तपासला तरी आपल्याला त्याच्या 'भाषिक भांडार'मध्ये अनेक लहान मोठे कप्पे दिसतील. हे लहान लहान कप्पे क्षेत्रविशिष्ट असतात. या क्षेत्रविशिष्ट कप्प्यांना 'लघुक्षेत्रे' (domain) म्हणतात.

कोणत्याही बोलीचे सूक्ष्म निरीक्षण केल्यानंतर अनेक गोष्टी लक्षात येतात. त्यामध्ये बोली बोलणाऱ्या लोकांचे परंपरागत लहान मोठे व्यवसाय, त्यांच्या संपर्कातील लोक, व्यापारी, शेती, शेतकरी, अलीकडे निर्माण झालेल्या सहकारी संस्था, शाळा, राजकारण अशा अनेक गोष्टींचा संदर्भ त्यांच्या बोलीत दिसतो. पारंपरिक सण, उत्सव, रीतिरिवाज, विधी यासह

खाद्यपदार्थ, दागदागिने या गोष्टींशी संबंधित शब्दांचा मोठा भरणा बोलीत असतो. बोलीच्या परिक्षेत्रात शेती आणि शेतीशी संबंधित व्यवसाय करणारे, गावातच छोटेमोठे व्यवसाय करणारे काही लोक असतात. गवंडी, न्हावी, सुतारकाम, लोहारकाम, चांभार, डॉक्टर, जनावरांचा डॉक्टर, तलाठी, ग्रामसेवक, पोलीस पाटील, सरपंच, दूध डेअरींचे कर्मचारी, सोसायटींचे कर्मचारी, पतसंस्थांचे कर्मचारी, शाळेतील शिक्षक हे लोक आपल्या कामाशी निगडित भाषा वापरत असतात. त्यातून बोलीत समृद्ध शब्दभांडार तयार झालेले दिसते. यासंदर्भात शेतकऱ्याचे उदाहरण घेतल्यास त्याच्या भाषिक कोशामध्ये श्यात (शेत), गडी (पुरुष मजूर), आळ (मजूरी न घेता केली जाणारी मजूरी. म्हणजे एकमेकांच्या शेतात मजूरी न घेता काम करायचे. यामध्ये हिशोब दिवसांचा होतो. म्हणजे चार दिवस एखाद्याच्या शेतात कामाला गेल्यानंतर चार दिवस त्यांनी येणे अपेक्षित.) 'आळाला येणे' हा शब्दप्रयोग स्त्रियांच्या संदर्भानेच होतो. पुरुष आळाने जात-येत नाहीत. ते मजूरीनेच येतात. स्त्रिया मात्र आळाने येतात. भाव (विहीर), मोटार (पंप), बियाण (बी), वषेद (कीटकनाशक), राण (तण), जॉत (औत), बैलं (बैल), म्हसरं (जनावरे), पेंढी, गवात (गवत किंवा वैरण), दूध, गोठा, नांगर, कुळव, सुगी, खळं (खळे), खतं (खत), पेरा (पेरणी), लावण (ऊस, बटाटा, रताळीसारख्या पिकांची लागण), मळणी, कापणी, भांगलण, (सोसाटी) सोसायटी, रिण (कर्ज) असे शेकडो शब्द येतात. त्याशिवाय या ही बोली बोलली जाणाऱ्या परिसरात बाहेरून आलेले आणि स्थिर झालेले इतर भाषिक, इंग्रजी, हिंदी, गुजराती बोलणारे व्यापरी, नोकरदार, शेजार भाषा, बोली बोलणारे बहुसंख्य लोक असतात. यासंदर्भात चंदगडी बोलीचा प्रदेश उदाहरण म्हणून पाहिल्यास, चंदगडी बोली बोलली जाते त्या प्रदेशात अनेक भाषा, बोलींचा प्रत्यक्ष वापर पाहायला मिळतो. यामध्ये ख्रिश्चन समाजाचे लोक गोमंतकीय कोकणी बोलतात. जिला' बारदेस्करी बोली' म्हटले जाते. कन्नड भाषा बोलणारे लोक अनेक आहेत. त्यामध्ये लिंगायत आणि बेरड समाजाचे लोक बहुसंख्य आहेत. कुडाळी-मालवणी बोली बोलणारे लोक पश्चिमेकडच्या गावांमधून आहे. शिवाय गोवा, सिंधुदुर्ग, कर्नाटक अशा सीमा या प्रदेशाला असल्याने सीमावरती प्रदेशात दोन्ही भाषा, बोलींचा वापर असतो. अशा सर्व भाषा, बोली आणि सामाजिक, आर्थिक स्तरांनुसार बदलणारी भाषा हे येथील वास्तव आहे. या सर्व भाषावापरातून येथील 'भाषिक भांडारा'चे स्वरूप कल्पिता येते.

कोणत्याही बोलीची निर्मिती अभ्यासताना तिच्यावरील प्रभाव तपासावे लागतात. हे प्रभाव अनेकविध प्रकारचे असतात. त्यामध्ये बोलीप्रदेशातील सांस्कृतिक पर्यावरण, तेथील इतिहास, संस्कृती, परंपरा, श्रद्धा, धर्म, जात, शेजारी प्रदेशातील नित्य संपर्काच्या भाषा, भूगोल, शेती आणि स्थानिक व्यवसाय इत्यादी गोष्टींचा प्रभाव बोलीअभ्यासात तपासावा लागतो. कारण तेथील बोली या सर्व प्रभावामुळेच तयार होत असते. चंदगडी बोलीच्या संदर्भाने या प्रभावाची सविस्तर चर्चा या पुस्तकात आपण करीत आहोतच. शब्दस्तरावर भाषाघडणीच्या संदर्भाने हा प्रभाव विस्तृतपणे भाषासंपर्काची चर्चा करताना पुढे केलेली आहे.

चंदगडी बोली बोलल्या जाणाऱ्या प्रदेशातला कोकणी, गोमंतकी, बारदेस्करी, कन्नड, कुडाळी-मालवणी या भाषा-बोलींचा नित्य संपर्क आहे. त्यातून या भाषा-बोलींचा पडणारा प्रभाव फार गुंतागुंतीचा आणि सूक्ष्म आहे. तो शब्दसंग्रह, उच्चारविशेष, वाक्यरचना या सर्वच स्तरावर अभ्यासता येईल. चंदगडची ऐतिहासिक पार्श्वभूमी, तेथील भौगोलिक स्थिती, शेती, पाऊसपाणी, पिके, लहानमोठे व्यवसाय, जंगल, तेथील वनस्पती, प्राणी या सर्वांचा परिणाम बोलीच्या निर्मितीसाठी महत्त्वाचा आहे. या सर्व घटकांमुळेच तिचा स्वतंत्र आणि समृद्ध शब्दसंग्रह तयार होऊ शकला आहे.

एका भाषिक क्षेत्रात संकल्पना क्षेत्रानुसार कोणती शब्दरूप वापरायची हे तेथील भाषिक ठवरत असतात. म्हणजे त्या त्या क्षेत्राचा स्वतंत्र असा शब्दनिधी असतो. या संकल्पाक्षेत्रानुसार तयार झालेल्या शब्दनिधीला 'लघुक्षेत्र' म्हणतात. समाजभाषाविज्ञानातील ही देखील एक महत्त्वाची संकल्पना आहे. कारण लघुक्षेत्रांच्या विभागणीमुळे कोणत्याही समाजाच्या जगण्याच्या अनेक लहानसहान गोष्टींची ओळख होते. उदाहरणार्थ, स्वयंपाकघर हे लघुक्षेत्र प्रत्येक समाजाच्या जगण्यातील एका महत्त्वाच्या अंगाचा परिचय करून देते. कारण प्रत्येक समाजात खाद्यसंस्कृती आणि त्यासंबंधित गोष्टी शेकडो वर्षांची परंपरा स्पष्ट करतात. त्यामुळे समाजाची ओळख करून घेताना अशी लघूक्षेत्रे फार महत्त्वाची ठरत असतात. भाषिक भांडारामध्ये समाजातील प्रत्येक व्यक्तीचा भाषाव्यवहार सामावलेला असतो. एखाद्या बोलीतील लोकांचे भाषिक भांडार


मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

तपासताना त्या बोलीत संदर्भानुसार अनेक कप्पे दिसतील. बोलीभाषक शेतकरी असतील तर शेती, पिके, शेतीच्या पद्धती, औजारे, पिकांच्या पद्धती, मजूर, त्यासंबंधातील शब्द, शेतीवर अवलंबून असणारे घटक, व्यापारी, कर्ज पुरवठादार, औषधे, बी-बियाणांचे व्यापारी, जनावरे, गोठा, अशा अनेक ठिकाणी वेगळी भाषा दिसेल. बारकाईने पाहिले म्हणजे हे प्रत्येक ठिकाण म्हणजे एक क्षेत्रच असते. या क्षेत्रांनुसार वापरली जाणारी भाषा ही त्या-त्या लघुक्षेत्राची भाषा असते. सर्वसाधारणपणे समाजात काही लघुक्षेत्रे सार्वत्रिक दिसतात. या लघुक्षेत्रांची भाषा समाज आणि बोलींप्रमाणे बदलताना दिसते.

समाजामध्ये भाषा वापरण्याच्या बाबतीत काही संकेत ठरलेले असतात. वस्तू, पदार्थ तेच असले तरी; संकल्पनाक्षेत्रानुसार त्यांच्या नावामध्ये फरक पडतो. यासंदर्भात डॉ. रमेश वरखेडे यांचे विवेचन ध्यानात घेण्यासारखे आहे. ते लिहितात, 'त्या त्या भाषिक कोशावर त्या त्या क्षेत्रातील समाजविशेष, व्यावसायिक-आर्थिक-सामाजिक स्तर यांचा प्रभाव असतो आणि संकल्पनाक्षेत्रानुसार भाषिक कोशातून योग्य शब्दांची निवड केली जाते. या मर्यादित क्षेत्रातील भाषेचा वापर अधिक अचूक व परिणामकारक असतो. समग्र शब्दकोशाच्या संदिग्धतेतून शब्द बाजूला काढून विशिष्ट क्षेत्रात त्याचे वैशिष्ट्यपूर्ण उपयोजन होते. त्यामुळे संकल्पनाक्षेत्र बदलले की भाषा बदलते. कारण स्थळ, काळ, प्रसंगानुसार शब्दभांडारातील कोणत्या शब्दाचा वापर करावा. याचे संकेत त्या त्या भाषिक समाजाने ठरविलेले असतात.'(रमेश वरखेडे, २००१ : पृष्ठ २४) स्थळ, काळ, परिस्थितीनुसार एकत्र येणाऱ्या समाजातील प्रत्येक व्यक्तीची सामाजिक नाती वेगवेगळी असतात. संकल्पनाक्षेत्राप्रमाणेच परिस्थिती, प्रसंग, नातेसंबंध, स्तर, वर्ग यांनुसार भाषा वापरामध्ये बदल होतो. हा 'भाषाव्यवहार' अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण भाषेचे स्वरूप लघुक्षेत्रानुसार बदलत असते. समाजामध्ये होणारा भाषाव्यवहार कोणत्या घटकावर अवलंबून असतो, हे तपासणे उद्बोधक ठरते. कोण कोणाशी बोलत आहे. बोलणाऱ्यांमध्ये नाते कोणते आहे. संभाषण कोणत्या ठिकाणी चाललेले आहे. संभाषणाचा विषय काय आहे. संभाषणाची भाषा कोणती आणि संभाषणाचा संदर्भ काय आहे. या घटकांनुसार व्यक्तीचा भाषाव्यवहार आकार घेतो. या अनुषंगाने समाजाचा भाषाव्यवहार तपासला असता तेथील भाषिक भांडाराची कल्पना येते. या भाषिक भांडारातूनच वरील घटकांच्या संदर्भांनी छोटे-छोटे कप्पे कल्पून लघुक्षेत्रांचे विश्लेषण करता यते. ज्या समाजाच्या भाषिक भांडाराची आपण चर्चा करतो, त्या समाजाच्या संदर्भात अनेक गोष्टींची उकल भाषिक भांडाराच्या निरीक्षणातून मिळते. त्यादृष्टीने येथे काही लघुक्षेत्रांची चर्चा करू.

**घर**

घर ही गोष्ट संबंध मानवी जीवनातील एक महत्त्वाच वास्तू आहे. त्याच्या सामाजिकपणाचे 'घर' हे प्रतीकच असते. प्रत्येक मनुष्य घरासाठी झटत असतो. त्यातून घरविषय भाषा तयार झालेली असते. 'घर उभे करणं', 'घर सांभाळणं', 'घर मोठे करणं', 'घरादाराची काळजी घेणं', 'घर मोडणं', घरासाठी खस्ता खाणं' असे अनेक वाक्प्रयोग यासंदर्भाने पाहाता येतील. 'घर' ही व्यापक संकल्पनाच आहे. त्यातून आकाराला आलेली 'कुटुंब' ही भारतीय समाजजीवनातील सर्वात महत्त्वाची सामाजिक संस्था आहे. व्यक्तीचे सामाजिक नातेसंबंध भिन्न-भिन्न प्रकारचे असतात. त्याला समाजाचा घटक म्हणून समाजामध्ये वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. त्याप्रमाणेच कुटुंबाचा घटक किंवा सदस्य म्हणून व्यक्तीला निरनिराळ्या भूमिका पार पाडाव्या लागतात. कुटुंबातील प्रत्येक व्यक्ती वेगवेगळ्या नातेसंबंधांनी परस्परांना बांधलेली असते. संस्कृतीचे संवर्धन, संक्रमण, समाजाचे सातत्य यासाठी 'कुटुंब' ही संस्था महत्त्वाची भूमिका पार पाडते. बदलत्या समाजाबरोबर कुटुंबाचे स्वरूप बदलत राहिले आहे. कुटुंबाचे सदस्यत्व जन्मावर आधारलेले असून ते मृत्यूपर्यंत कायम राहते. कुटुंबांमध्ये नातेसंबध, कुटुंबाच्या विधीपद्धती, रूढी आणि रीतीरिवाज यावरून भाषा बदलत असलेली दिसते.

बदलत्या समाजजीवनासाठी साहाय्यभूत ठरलेल्या विविध कारणांमुळे कुटुंबसंस्थेचे स्वरूप बदलते राहिले आहे. भारतीय कुटुंबाच्या बाबतीत एकेकाळचे एकत्र कुटुंब सध्या नवे रूप घेते आहे. त्यामुळे अलीकडे सर्वत्र विभक्त कुटुंबव्यवस्था आकारत असल्याची दिसते. आजही काही ठिकाणी संयुक्त कुटुंबे दिसतात. परंतु, आज संयुक्त कुटुंबापेक्षा विभक्त कुटुंबांचीच संख्या अधिक दिसते. त्यामुळे कुटुंबाचा भाषाव्यवहार बदलतो आहे. भाषिक भांडाराचे स्वरूप बदलते आहे. कौटुंबिक


मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

भाषिक भांडारावरून आजच्या कुटुंब संस्थेची स्थिती आपण अभ्यासू शकतो. कुटुंबसंस्थेतील सदस्यांमध्ये भाषाव्यवहार घडताना जे भाषिक भांडार पाहायला मिळते; त्या भाषिक भांडाराचे संदर्भानुसार विविध कप्पे तयार असतात. एका कुटुंबामध्ये देवघर, स्वयंपाकघर, दिवाणखाना, नातेसंबंध अशी विविध लघुक्षेत्रे पाहता येतात. येथे देवघर, स्वयंपाकघर, दिवाणखाना, नाती ही संकल्पना क्षेत्रे आहेत. या संकल्पना क्षेत्रांचा व्यापक शब्दनिधी पाहता येईल. ही संकल्पना क्षेत्र बदलली की भाषा बदलताना दिसते. प्रत्येक बोलीत यासंदर्भात वेगळा शब्दनिधी पाहायला मिळतो. त्यामुळे बोलीतील शब्दनिधीचा सूक्ष्म विचार करण्यासाठी अशा पद्धतीने लघुक्षेत्रे एकत्र करणे फार फलदायी ठरते. एकाच प्रदेशात राहणारी आणि जाती, धर्म, स्तरांनुसार वेगळेपण जोपासणाऱ्या घरांमधील भाषिक भिन्नत्व अशा लघुक्षेत्रांमुळे अधोरेखित करता येते.

चंदगडी बोलीत 'घर' ही संकल्पना समोर ठेवल्यानंतर समोर येणारी लघुक्षेत्रे उदाहरणासाठी पाहता येतील. चंदगडी बोलीत घरासाठी 'घर' हाच शब्द प्रचलित आहे. अगदी आरसीसी बंगलोलाही घर म्हटले जाते. या बोलीत 'बंगला' शब्द जवळजवळ वापरला जात नाही. काही वर्षांपर्यंत अनेकांची घरे म्हणजे 'खोपी' होत्या. 'खोप' विशिष्ट गवताने किंवा ऊसाच्या पानांनी साकारलेली असे. खोप दरवर्षी पावसाळ्यापूर्वी 'शाकारली' जात असे. या कामाला चंदगडी बोलीत 'खाप शिवणे' म्हणात. जुने कुजलेले गवत काढून नवे ताजे गवत किंवा 'सरब' (ऊसाचा पाला) टाकून छत नव्याने साकारावे लागते. अलीकडील काही वर्षांमध्ये घरांचे बदलते स्वरूप लक्षात घेता, या खोपीशी संबंधित भाषा आता लुप्त झाली. ती भाषा एका विशिष्ट वर्गाची विशिष्ट काळातील स्थिती दर्शवत होती. खोपीला 'झाप' देखील म्हटले जात असे. या झापेला 'दार' (दरवाजा) नसे. तर 'तरटी' (काट्यांनी केलेला आडोसा) असायची. ती केवळ ओढून घेतली आणि कापडी चिंधीने नाहीतर दोरीने ती 'वाश्या'ला (वासा म्हणजे लाकडी मेढ किंवा खांब) बांधली की काम झाले. खोपींमध्ये वीज नव्हती 'घासलेट' यावरून 'घांड्रंत्याल' (रॉकेल) लागत असे. या तेलाला चंदगडी बोलीत 'घांड्र त्याल' म्हणूनच ओळखले जात होते. या तेलावर जळणारी 'चिमणी' हाच खोपीतील दिवा. खोपीच्या एका कोपऱ्यात 'चुल' आणि दुसऱ्या कोपऱ्यात 'न्हाणी.' त्यामुळे पुढे 'घरा'त आकाराला आलेल्या अनेक 'जाप्त्यांचा' किंवा 'पडव्या', 'पडद्या' (खोल्यांचा) खोपीत प्रश्न नव्हता. खोप म्हणजे एक मोठां 'जाप्ताच'. खोपीच्या न्हाणीतील सांडपाणी 'साण्या'तून बाहेर जाई. हे सांडपाणी जाऊन जाऊन कुलजलेल्या मातीला आणि त्यापासून तयार झालेल्या काळ्या चिखलाला 'बांबार' हा शब्द आहे. या 'बांबरा'चा वास 'व्हलंस' (खूप दुर्गंधी) असतो. 'व्हलंस' हा शब्द दुर्गंधी, वाईट या अर्थाने वापरात आहे. अशापद्धतीने खोपीशी संबंधित शब्दकोश आता लुप्त झाला असून घराशी संबंधित शब्दकोश चंदगडी बोलीत तयार झाला आहे. चंदगडीच्या भाषिक प्रदेशातील घरांचे स्वरूपही काळानुसार बदलत आहे.

चंदगडीच्या भाषिक प्रदेशात अतिवृष्टी आणि वातावरण बऱ्यापैकी थंड असते. त्यामुळे बहुतांश घरे उतरत्या छपराची, लाल मातीच्या भिंती असलेली आणि लाल कौलांची आहेत. घरांसाठी स्थानिक पातळीवर उपलब्ध होणाऱ्या लाल 'खापऱ्या' किंवा 'नळे' वापरले जातात. खापऱ्या आणि नळे म्हणजेच कौले. ही दोन प्रकारची कौले बऱ्याच घरांवरून दिसतात. ज्या घरची परिस्थिती चांगली आहे त्यांच्या घरावर 'तांबड्या खापऱ्या' दिसणार आणि ज्यांची परिस्थिती बेताची आहे किंवा होती त्यांच्या घरावर 'काळे नळे' (विशिष्ट प्रकारची मातीची कौले) दिसणार. हे आर्थिक परिस्थितीचे एक सूचनच आहे. तथापि, काही श्रीमंत विशेषत: ब्राह्मण, लिंगायत लोकांनी पर्यावरणाचा विचार करून मुद्दामही 'काळे नळे' घरावर ठेवलेले दिसतात. बहुतांश घरे दोन बाजूने उतरती कौले असलेली असतात. तर काही लोकांची घरे चार कोनाची दिसतात. दोन्ही बाजूंच्या मध्ये 'आडं' (दोन्ही बाजूच्या उतरत्या छपराची सुरुवात होणारी मधली जागा) असते. या आड्यांवरच्या कौलांना 'पास्टं' (दोन बाजूच्या उताराची त्रिकोणी कौले) म्हणतात. कौलांना 'खापऱ्या' असाही शब्द चंदगडी बोलीत आहे. हा परिसतर अतिपावसाळी असल्याने प्रत्येक घराला 'पासगाळी' किंवा 'पन्हाळी' लावावीच लागते. बहुतांश घरे 'चिरा' (लाल जांभा दगड) आणि लाल चिकट माती वापरूप बांधली जातात. त्याचबरोबर 'खानापुरी' (येथून जवळच आज कर्नाटकात असलेल्या खानापूर तालुक्यातील मातीपासून बनलेली वीट) भाजलेल्या विटाही मोठ्या प्रमाणात वापरल्या जातात. मात्र अलीकडे सिमेंटचा वापर केलेली 'आरसीसी' घरे मोठ्या प्रमाणात वाढू लागली आहेत. आरसीसी घर बांधणे

प्रतिष्ठेचे आणि श्रीमंतीचे प्रदर्शन करण्याचाही भाग बनले आहे. परंतु, ही घरे येथील वातावणात टिकत नसल्याचे वास्तव समोर आले आहे. या भागात अतिवृष्टीत मातीचे घरे 'दरावण्या'चा (दरावणे-पाझरणे) प्रकार होई. दळ, दरावणे हे शब्द जमिनीत पाणी झिरपून ओल येण्याशी संबधित आहेत. आता आरसीसी घरेही मोठ्या प्रमाणात चंदगडी बोलीत 'दरावताहेत.' शिवाय 'ठिबकतही' आहेत.

या घरांपैकी प्रथम आपण उतरत्या छपराच्या मातीच्या घरातील शब्दकोश पाहू. लाल मातीची घरे वर्षातून एकदा आतून बाहेरून मातीने 'लिपून' (लिंपून) घ्यावी लागतात. वर्षभरात बरेच ठिकाणी 'डिवळं' (मातीचे निसटून खाली पडणे) पडलेली असतात. 'डिवळं'साठी प्रमाण मराठीत शब्द सापडत नाही. फार तर 'मातीची खपले' म्हणता येईल. परंतु, त्यातून अपेक्षित अर्थ लक्षात येईलच असे नाही. ही 'डिवळं' म्हणजे भिंतीची निसटलेली खपले चिखलाने प्रथम भरून (लिंपून) घ्यावी लागतात. काही वेळा मातीच्या घरांना मोठ्या 'भेगा' पडलेल्या असतात. त्या लिपून (भरून) घेणंही आवश्य असते. या लिंपून घेण्यातील काव्यार्थ शोधून त्याचा वापर दैनंदिन 'व्यवहारात संसाराला पडलेली डिवळं' असाही शब्दप्रयोग केला जातो. त्यानंतर संपूर्ण भिंत लाल मातीचा 'काला' करून 'चोथ्याने' (गवताचा) 'सारवून' घ्यावी लागते. याशिवाय घराच्या 'भित्ती' 'आबादानी' (सुरक्षित, मजबूत) होत नाहीत. या घरांमध्ये मोठ मोठे उंबरे, चौकटी, चौकटींवर देवदेवतांच्या प्रतिमां, वेली यांचे कोरीव कामही पाहायला मिळते. घरात 'खन' किंवा 'पडव्या' (खोल्या), 'दिवळया' (वस्तू ठेवण्यासाठी भिंतीमध्येच तयार केलेली लहान कपाटेच),'खुंट्या', 'जाफ्ते'(विभाग), तुळया, माळे, वट्टी (आजच्या भाषेत हॉल. समोरची खोली) गोठा, न्हानी, न्हानीचे सांडपाणी वाहणारा 'साणा'(ड्रेनेज), दरवाजे, आडणी (आगळ), जाते, वहीन, मुसळ, भरूणे (जमीन बडवण्याचे लाकड औजार), नळी (फुकणी), शिकं, भाचर (मातीची मध्यम आकाराची घागर), डेरा (मातीचा हंडा), बिंदगा (लहान घागर, शिवाय प्लास्टीकच्या घागरीलाही 'बिंदगा' असाच शब्द वापरला जातो.), दोर, कप्पी (विहिरींवर पाणी ओळण्यासाठी किंवा चिखलगाळ काढण्यासांठीचा घडघडाच), शिबडं (बांबूच्या पट्ट्यांपासून बनवलेली लहान बुट्टी. बांबूच्या पट्ट्यांना 'बेळं' असा शब्द आहे.), या बेळांपासून बनवलेला 'तट्टा' आणि 'कणंग' धान्य साठवणूकीसाठी वापरला जातो. लोटा (मोठी वाटी), गुळांब (खोलगट प्लेट), ताटली (लहान ताट), चंबू (निमुळत्या अकाराचा पेला), काटवट (लाकडी परात), डाव (लाकडी पळी), तट्टे (भात भरून ठेवण्यासाठी बांबूच्या बेळांपासून बनवलेली वस्तू), कणगी (नाचणी, सावे अशी कमी प्रमाणात पिकणारी आणि अकाराने लहान धान्ये भरून ठेवण्यासाठी खालूनही बंदिस्त असलेली बांबूच्या बेळांपासून बनवलेली वस्तू.) वेगवेगळया आकाराच्या रव्या, माट (सांडपाणी टाकायचे मातीचे भांडे), चूल, चुलीची भानोशी, चिमणी असे कितीतरी शब्द घराचे स्वरूप उलघडून दाखवतात. घर कोणाचे आहे यावरही हे शब्दकोश बदलत असतो. उदाहरणार्थ, शेतकऱ्याचे घर आणि सुताराचे घर यामध्ये अनेक वस्तूंचे स्वरूप बदलून जाते. अर्थात गावोगावी अनेक बलुतेदारांची शेतीही आहेच. त्यामुळे शेतीशी संबंधित शब्दकोश बऱ्याच घरांमधील भाषाव्यवहारात असतो.

घरात अनेक 'खण'(खोल्या) असतात. किती खणाचे घर? किंवा किती 'पडव्या' बांधल्यात हा नित्य प्रश्न घरासंबंधाने विचारला जातो. एका 'पडवी'चे दोन 'जाप्ते' करण्यासाठी मधोमध 'पडदी' (भिंत) बांधली जाते. ही पडदी भिंतीची किंवा फळयांचीही असू शकते. घरात 'वट्टी' ही जागा सर्व सामुदायिक आणि घरची काम करण्याची महत्त्वाची असते. पैपाहुणे आले, घरातील लहानमोठा कार्यक्रम, गणेश चतुर्थीला गणपतीचे पूजन आणि 'म्हाताऱ्याकोतार्‍यांचे' 'गजाली' मारीत बसण्याचे हे हक्काचे ठिकाण. घराला 'माळा', 'देवघर', 'स्वयंपाकघर', 'गोठा' असतोच. घराशी निगडित शब्दकोशात 'वट्टी', 'माळा', 'आडी', 'मुगळ', 'गोटा' (गोठा), निसण (शिडी), तुळी (तुळई), दिवळी (भिंतीत तयार केलेले लहान कपाटच), न्हानी, उजदार, परडं, हातराण, पांघराण असा बराच 'सवसार' (संसार) सामावलेला असतो. यामधील अनेक शब्द घराशी संबंधित 'लघुक्षेत्रे' आहेत. पूर्वी 'गोठा' घरात सर्वात पहिल्या खोलीत असे. आता तो घराबाहेर स्वतंत्र किंवा खोपीत गेला आहे. तर काही लोकांनी तो गावातून शेतावर नेला आहे.

**देवघर**

'देवघर' असा उल्लेख चंदगडी बोलीत केला जात नाही. देवघराला 'देवाची पडवी' आणि अलीकडे 'देवाची खोली' असे शब्द प्रयोग होतात. एखादी वस्तू 'देवाडे' ठेव म्हणजे देवाच्या खोलीत ठेव. 'चुलीडे ठेव' म्हणजे स्वयंपाकघरात ठेव. तर बहुतेक घरांमध्ये देव ठेवायची स्वतंत्र खोली असते. इतकेच नाही देवाची पूजा करण्याचा मान सर्वांना नसतो. घरातील एकच व्यक्ती हे काम करीत असते. स्त्री असेल तर तिला 'देववाली' पुरुष असेल तर 'देववाला' अशी नावेही आहेत. पूजा करण्याचा मान शक्यतो घरातल्या 'थोरल्याचा' असतो. त्यामुळे तो आपसूक (नैसर्गिक, न ठरवता) 'देवाचा बाबा' होतो. या परिसरात अनेक घरांमध्ये रेणूका देवीचे मोठे प्रस्थ आहे. त्याबद्दल पुढे विवेचन येणारच आहे. तर रेणूका देवीच्या घरातील मुख्य भक्तीणीलाही 'देववाली' हे बिरुद लावले जाते. देवासाठी स्वतंत्र खोली नसलेल्या घरी एखाद्या खोलीत कोपऱ्यात लाकडी देव्हाऱ्यावर देव पूजलेले असतात. देव्हाऱ्यात शक्यतो 'टाक' आणि जोतिबा, रेणूका यांच्या पितळेच्या मूर्ती असतात. ज्यांच्या घरी रेणूका ही देवी आहे. तेथे 'देवघर' हे लघुक्षेत्र वैशिष्ट्यपूर्ण दिसते. हे लघुक्षेत्र उदाहणासाठी थोडे विस्ताराने पाहता येईल. रेणूका किंवा यल्लमा ही देवी सौंदत्तीच्या डोंगरावर आहे. कर्नाटकातील हे ठिकाण अनेकांचे श्रद्धास्थान आणि कुलदैवत आहे. या स्थानाला 'डोंगर' असेच म्हटले जाते. ज्यांच्या घरी ही देवी कुलदैवत आहे, त्या घरातील शब्दभांडार मुद्दाम अभ्यासण्यासारखे आहे. ते थोडे विस्ताराने पाहू.

रेणूका देवीसंदर्भातील शब्दसंग्रह पाहता ते लघुक्षेत्र नसून स्वतंत्र शब्द भांडारच असल्याची जाणीव होते. देवदासीला चंदगडीत 'देववाली' हा शब्द प्रचलित आहे. या देवीशी संबंधित पडल्या, सौंदत्ती, यल्लमा, यल्लुबाई, यल्लम्मादेवी, देववाल्या, जोगवा, अंगात भरणे, अंगात येणे, उद घालणे, जोगवा मागणे, भंडारा, जोगता, झाड, यल्लमाचा मोती, जट, निवद, यल्लूबाईची गादी, तेल वाढणे, पडल्या भरणे, झाड सोडणे, झाड भरणे, डोंगर, कोट, जग, जत, टाक, वार, दुरडी, घरं मागणे, व्हट्टी भरणे, मुटले (देवीचे हे मुटले पीठ तेलात तळून बनवले जातात.), गनीन, फुलं, बोळजोगते, मंगळवार, शुक्रवार (हे दोन्ही या देवीचे वार. यादिवशी जोगवा मागत फिरावे लागते.), करणी, बांधावळ, (हा शब्द अनेक अर्थाने वापरात येतो. बांधावळ म्हणजे स्वत:ला सुरक्षित करून घेणे. अनेक विधीवेळी, मोठ्या कार्यक्रमांवेळी, मोठ्या कामाच्यावेळी लोक करून घेतात. हा पूर्णत: अंधश्रद्धेचा भाग असला तरी, ही प्रथा समाजात मोठ्या प्रमाणावर रुजलेली आहे.) मांत्रिक, पडल्या भरून घेणे, खणानारळाची वटी (ओटी), कौल, बाळका, दर्शन, देवाच्यान (ही शपथ. यातील 'च्यान' हा शब्द शपथ या अर्थान वापरला जातो. उदारणार्थ, आईच्यान, पोराच्यान इत्यादी.), चवरी, घुंगरू, भंडऱ्याची पिशवी, माळ, कौड्याची माळ, मोती सोपवणे, जटा, कुंड, कुडातलं पाणी, तीरत (तीर्थ), आंगोळ (अंघोळ), नवस, भाविक, जोगणभाव (सौंदत्ती डोंगरावरील एक विहीर), सांडपुनव, लिंब, लिंब नेसणे, भाविक, आई जोगाई, आई यल्लूबाईच्या नावानं उदेऽऽ उदेऽऽ, महात्म्यं, निवद, माते, डोंगर चढणे (हा प्रतीकात्मक शब्द. डोंगर चढणे म्हणजे आई यल्लूबाईला शरण येणे.) दर्शन बांधणे, यमिनकुंड, राहुट्या, भिक्षा, पुजारी, कापूर, उदबत्ती, देवकार्य, वल्ला निवेद, वल्ल्या अंगाने दर्शन, जोगत्यांचे आहेर, झुलवा, पडली, सकना (भविष्य सांगणे), काकान फुटणं, आकुंदे जोगवा इत्यादी शब्द रेणूका देवीसंदर्भात वापरात दिसतात. अलीकडच्या काही वर्षांमध्ये सुशिक्षितांची संख्या लक्षणीय वाढल्यामुळे यल्लम्मा देवीचे प्रस्थ कमी झाले आहे. त्यामुळे हे शब्द बऱ्यापैकी व्यवहारातून बाजूला पडू लागले आहेत. अलीकडच्या काही वर्षांमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन करणाऱ्या कार्यकर्त्यांनी रेणूका देवीशी संबंधित अनेक प्रथा हद्दपार करण्यासाठी मोठे काम केले. त्याचा परिणाम आणि शिक्षणाचा सर्वदूर झालेला प्रसार यामुळे या देवीचे प्रस्थ खूप कमी झाले आहे. या देवीकडे गावच्या गाव लोटत असे. एका गावातून शेकडो बैलगाड्या डोंगराव जात. हा महिनाभर चालणारा उपक्रम होता. आता हे चित्र पूर्ण बदलले आहे. पर्यायाने या संबंधित शब्दसंग्रह भाषेतूनही हद्दपार होत आहे. या उदाहरणावरून सामाजिक, सांस्कृतिक हस्तक्षेप भाषिक बदलला कारणीभूत ठरतो हे दिसून येते. या परिसरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी यल्लम्मादेवीच्या प्रथेबाबतीत केलेले कार्य या क्षेत्रातील भाषिक कोश बदलाला कारणीभूत ठरले आहे. यासंदर्भात पुढील प्रकरणात आपण गोव्याच्या पोर्तुगीज वसाहतीमुळे येथील भाषेवर पडलेला प्रभाव हा देखील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक हस्तक्षेपाचे एक महत्त्वाचे उदाहरण पाहणार आहोत.

**स्वयंपाकघर**

स्वयंपाकघर हे एक महत्त्वाचे लघुक्षेत्र आहे. चंदगडी बोलीत स्वयंपाकघराचा उल्लेख 'चुलीडे' असा केला जातो. अलीकडे तो 'जेवणाची खोली' असाही होतो. या खोलीत 'शल्पावरची भांडी' फार महत्त्वाची. कारण ही भांडी 'संसार' या शब्दात सामावून घेतली जातात. या प्रदेशात 'संसारसट' असा एक शब्द आहे. तो या भांड्याकुड्यांशी संबंधितच वापरला जातो. लोटके, तांबये, चंबू, गुळांब, ताटल्या, पळया, हात, चमचे, परातणं, झारया अशी अनेक भांडी या 'शल्पा'वर असतात. अनेक स्वयंपाक घरांमध्ये अद्याप चूल, चुलीवरची भानोशी, माट (सांडपाणी साठवायचे मातीचे गोलाकार भांडे), गाडगी, मोगा, लोटकी, शिकं, शिबड (बांबूच्या बेळांपासून (पातळ पट्या) बनवलेली भाकरी ठेवण्याची छाटी टोपली), इस्वानाचं पाणी, दह्यांच लोटकं, सांबाऱ्याच लोटकं असते. आज अनेक घरांमध्ये या भांड्यांच्या जागी ॲल्युमिनिअमची भांडी आलेली आहेत. परंतु, तांब्याच्या-स्टिलच्या घागरी, पिप (पिंप), हांडे (हा शब्द केवळ तांब्याच्या हंड्यासाठीच) पाट, वाटा, वरूटा, खलबत्ता, नळी (फुकणी), पीठ, तांदूळ, हाळद (हळद), तीक (तिखट, चटणी), डाळी, मसाले, मसाल्याचे डब्बे, लोंची हे सारे स्वयंपाक घरात सामावलेले असते. 'मीठ' हा शब्द तोंडातून न उच्चारण्याचा एक संकेत या परिसरात आहे. हा संकेत पाळण्यासाठी मिठाला 'साखर' म्हणून संबोधले जात असे. परंतु, नवीन पिढी हा संकेत पाळत नाही. यावरून स्वयंपाक घराचे एक चित्र समजून येते. शिवाय ज्या त्या प्रदेशात तयार होणाऱ्या खाद्य पदार्थांमुळे तेथील स्थानिक संस्कृती कळून येते. तथापि, चटणीला 'तीक', फुकणीला 'नळी' चटईला 'डाळी', आमटीला 'डाळ' किंवा 'सांबारं' अशा शब्दांच्या यादीमुळे बोली बरोबर परिसराचाही परिचय होतो. आमटीशी संबंधित 'कडाण' आणि 'धुवाण' असे दोन शब्द चंदगडी बोलीत आहेत. कडधान्ये शिजवलेल्या पाण्याची आमटी 'कडाण' या नावाने ओळखली जाते. तर भात शिजवताना प्रथम तांदुळ धुवून घेण्याची पद्धत आहे. हे तांदुळ धुतलेले पाणी टाकून न देता त्याची आमटी करण्याची पद्धत होती. त्या आपटीला 'धुवाण' हा शब्द आहे. या शब्दावरून आजही आमटी जर खूप पातळ झाली. म्हणजे तिच्यात डाळ कमी पडली तर तिला उपहासाने आमटी म्हणजे, 'धुवाण' झालेय असे म्हटले जाते.

**शेती आणि शेतकरी**

चंदगड परिसरात 'शेती' हाच मुख्य व्यवसाय आहे. त्यामुळे शेती आणि शेतीकामांशी संबधित विपुल शब्दभांडार येथील बोलीत आहे. भारतात शेती हे उपजिवेकाचे मुख्य साधन असल्याने देशातील प्रत्येक भाषेत असा विपुल शब्दसंग्रह असणे स्वाभाविक आहे. चंदगड परिसरात अतिवृष्टी आणि हवामान थंड असते. येथे भात, नाचणी, रताळी, बटाटे, मिरच्या, काजू ही मुख्य पिके घेतली जातात. यातील अनेक पिके या परिसरात पोर्तुगीज वसाहतीमुळे रुजली. मिरचीला या परिसरात 'मिरसेंगा' म्हणतात. हे नाव काळया मिरीच्या शेंगेसारखी दिसणारी 'मिरसेंग'वरूनच पडले आहे. कारण मिरचीच्या वापराआधी देशात तिखट चवीसाठी मिरीचाच वापर केला जात होता. उष्णकटिबंधीय अमेरिकेतून ही मिरची जगभर गेली. पोर्तुगीजांनी ब्राझीलमधून लिस्बनमार्गे ती गोव्यात आणली. येथील हवामानाच्या पोषकतेने ती मुख्य पिकापैकी एक बनली. चंदगड गोव्याच्या अगदी जवळ असल्याने मिरची हे येथील मुख्य पिक बनली. डोंगराळ प्रदेश असूनही इतर डोंगराळ पिकांना मागे टाकून ऊस पीक अलीकडील काही वर्षांमध्ये मुख्य पिकाची जागा घेऊन बसले आहे. डोंगर उताराच्या जागेवर रताळी, भुईमूग, पावसाळी मिरची, या मिरचीतच आंबाडी, मका, तागाची काही रोपे लावली जात. आंबाडी, तागापासून दोऱ्या वनवण्याचे काम चाले. घरगुती वापराच्या दोऱ्या घरीच बनवल्या जात. आता हे चित्र दुर्मीळ झाले आहे. वास्तविक हवामानानुसार या प्रदेशातील भात हे मुख्य पीक आहे. भात पीक दोन पद्धतीने घेतले जाते. 'धूळवाफ' आणि 'चिखलरोप' या त्या दोन पद्धती होय. त्यामुळे भात पिकाशी संबंधित शब्दसंग्रहात बरीच विविधता आणि विपुलताही दिसते. वरील पिकांव्यतिरिक्त भुईमूग, जोंधळा, मका, गहू, विविध प्रकारच्या भाज्या, चवळी, सोले सारख्या वेलभाज्या, हरभरा, वाटाणा, मसूर ही कडधान्य ही पिके तुरळक प्रमाणात घेतली जातात. त्यामुळे शेतीशी संबंधित मोठा शब्दकोश चंदगडी बोलीत आहे.

उदाहरणार्थ, पेरणी, कुरी, मोगणे, कोळपा, कोळपणे, खुरपणे, खुरपे, ईळा, भांगलणे, नांगरणे, कुळवणे, दिंड मारणे, व्हलपाटा मारणे, फेसाटी फिरवणे, तिकाटणे ओढणे, तिकाटणे, व्हलपाटा मारणे, बांडगं, इसकी इत्यादी शेकडो शब्द शेतकऱ्याच्या भाषिक भांडाराचा भाग आहेत. शेतकऱ्याच्या भाषिक भांडारात हजारो शब्द येतात. हुलवर (जमीन भुसभुशीत करण्याचे अवजार), कुळव (कोळपे/मशागतीचे आवजार, दींड), घुट्टा (शेतातील मातीचे दगड ('ह्यंडे' हा चंदगडी बोलीतील शब्द. त्याचा अर्थ मातीचा दगड) फोडून ते पसरवण्याचे लाकडी अवजार), हेंडोर (शेतातील 'ह्यंडे' फोडण्याचे लाकडी अवजार), कोळपा (जमीन (पिकातील तण काढण्यासाठी) कोरण्याचे अवजार), तिकटं (तिफन), हाडगं (एकावेळी चार सऱ्या तयार करणारे भात पेरणीचे अवजार), फाळ, पान (फाळाबरोबर जमिनीत घुसणारा लाकडी भाग), दावं (बैलाचे कासरे एकत्र धरणे, दावं धरणे), वालं (शेतीकामात वापराची दोरी), इसाड (लांब लाकडी वासा नांगराला जोडलेला), इरस (बैलगाडीसाठी जाड लोखंडी बार), डोणा (लोखंडी इरसवर असलेले आधारासाठीचे लाकूड), बिरया (लाकडी हौद बैलगाडीवरील), खरडी (बैलगाडीचा वेग कमी करण्यासाठी लाकडी ब्रेक), घोडकं, जू (अवजारे ओढण्यासाठी बैलांच्या खांद्यावरचे साधन), कडीणी (बैलगाडीच्या चाकांना आधारासाठी अडकवलेली लोखंडी पट्टी), सुवारी (बैलगाडीला बांबूची तट्टी बांधणे), दांडी (कोळप्याला लावलेले बांबू), मुसकी (बैलांच्या तोंडाला बांधलेली जाळी), कासरा (बैलांच्या वेसणीला बांधलेला दोर), यसण (वेसण, बैलांच्या नाकातील दोरी), इरस, दींड (कुळवाचा आडवा लाकडी ठोकळा), कांड (बैलाच्या गळयातील दोर), पेसाटी (कोळया घाटल्यावर मातीत पुरलेले भात उठवण्यासाठी), कप्पय (बैलांना धुण्यासाठीचा काथ्या), घोळणा (नाचण्याची कणसे चाळण्यासाठी), ओपा (मोठा प्लॉट), गादा (मध्यम अकाराचे एक शेत), कुणगी (छोट्या आकाराचे शेत), बना (वाफा), खागं (वाफ्यातील एक भाग), ख्वाळ (पावसाळ्यात पोते दुमडून डोकीवर घेणे), भाव (विहीर), व्हंडवा, हळळा, व्हळ (ओढा), कोंडूकं (ओढ्यातील, नदीतील लहान खड्डा), घळ (नदीतील खोल जागा), व्हळी (गवताची गंजी), मूळ (वताचा एक प्रकार ज्याचे झाडू बनवतात आरि बेंदूर सणाला चौकटीला याची दोरी बांधतात), शिस ओपा (शिसण्याच्या झाडाजवळील शेत), तिरवाड (चिखलात बसण्याचे साधन), गोराब (पावसाळ्यात बांबूच्या बेळापासून बनवलेले साहित्य (इरलं), यरवानं (बांबूची टोपली), गाळाणं (बांबूची टोपली), शिबं (भात येळण्यासाठी बांबूची प्लेट), डालगं (कोंबडी झाकण्यासाठी), पांजरा (कोंबडी झाकण्यासाठी), म्हणी (पाट बसण्यासाठी), म्हणकूटा (लाकडाचा ठोकळा), टरंग (पत्र्यापासून बनवलेली पेटी), व्हगाली (खड्डा), घळाण (मोठा खड्डा), सारण (पाणी जाण्यासाठी मारलेली सरी) कामगत (मशागत), दांडया, खांदाडी, यलगार, वंगवान (वंगण, बैलगाडीच्या चाकात घालावयाचे तेल) इत्यादी शब्द उदहरणासाठी घेतले तरी, कृषिकर्माशी संबंधित असलेले विपुल शब्दभांडार लक्षात येते. या भाषिक भांडारात कृषिकर्मातील अनेक 'लघुक्षेत्रे' सामावली आहेत. उदाहरणार्थ, बैलगाडी. बैलगाडी या लघुक्षेत्रात इरस, गड्डा, घुंपट, वुलवर, डोके, व्हट्टा, डोना, तोळ, बिरी, खुट्टे, कत्री, यलकार, जू, घोडा, यटान, पट्टे, सोगा, पौंडी, खर्डी, आळकट, घुंपट, चाक, आऱ्या, साप्ती, मुसकी, आडोंबा, दावन, आरी, कडाणी हे जवळपास तीस शब्द समाविष्ट होतात. या भाषिक भांडारातील जू, फास, ठेचकं, सापती, मुसकी, म्हारेकी, दावं, लोढणं, वंगाण असे बरेच शब्द भाषिक व्यवहारात व्यापक अर्थाने वापरले जातात. ते कधी थेट तर कधी प्रतिकात्मक रूपानेही वापरले जातात. उदहरणार्थ, एकादी मुलगी किंवा मुलगा घरच्या मंडळींना न जुमानता वागू लागली की त्यांची मुसकी आवळा, दावं ओढा असे शब्द प्रयोग होतात. लहान मुलगं सतत सोबतच येत असल्यास हे 'लोढणं मागणंच असताय' असे सहजोद्गार काढले जातात.

शेती व्यवसायात बैलगाडी, नांगर यांना फार महत्त्व आहे. यासंदर्भाने येणारी भाषा म्हणजे शेतीव्यवसायातील लघुक्षेत्रेच होत. उदाहणार्थ, बैलगाडी. या लघुक्षेत्रात येटाक, जू, वालं, फाळ, फास, दांडी, ठेचकं, सापणी, मुसकी, वेसण, म्होरकी, दावं, बिरडं, कंठा, कडाणी, पावकुडा, वंगाण, चाक, आरं, वट्टं, कगा, तोबरी, वड, झटका, गानगाडी, घोडा, सोगा असे शब्द येतात.

शेतकऱ्याचे पशूधन म्हणजे त्याचा खरा गोतावळाच असतो. यामध्ये जनावरांना वयानुसार, लिंगानुसार वेगवेगळी नावं असलेली दिसतात. 'पाडा' म्हणजे गायीचं पुल्लिंगी वासरू तर 'पाडी' हे वासराचे स्त्रीलिंगी रूप चंदगडी बोलीत आहे.



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

'रेडा' म्हैशीचे पुल्लिंगी रूप. तर रेडकू आणि रेडी ही अनुक्रमे पुल्लिंगी आणि स्त्रीलिंगी रूपे आहेत. 'दावण' म्हणजे सर्व जनावरे एका ओळीत बांधण्याची जागा. 'गव्हाणी' जनावरांना वैरण टाकण्याची जागा. 'चगळ' म्हणजे जनावरांनी वैरण खाऊन राहिलेला टाकाऊ भाग. 'रवत' (रवंथ), 'पेंढी' (वैरण), 'इळती' म्हणजे वैरण तोडण्याचे विळ्यासारखे असणारे धारधार अवजार. 'कडबाकुटी' शेतकऱ्यांना मिळालेले आधुनिक औजार आहे. ते इलेक्ट्रीक मोटरवरही चालते. ते 'कडब्या'सारख्या टणक वैरणी बारीक करून घेण्याचे औजार आहे. चंदगड परिसरात जोंधळा, मका तुरळक प्रमाणात घेतला जातो. त्याची 'धाटे' वैरणीसाठी वापरली जातात. ती बारीक करण्याचे काम हे मशिन करते. तर नाचणी पिकाच्या धाटांना 'काड' म्हणतात. हे काडही बरेच टणक असतात. अलीकडे अनेक शेतकरी हा 'काड' कुटायलाही या औजाराच वापर करतात. कडबाकुटी चांगली म्हशींनी व्यवस्थित खावी म्हणून काड, धाटांच्या पेंड्यांमध्ये मीठ घालून ठेवले जाते. मिठामुळे कडब्याला 'कीड' लागत नाही. आणि कुटल्यानंतर जनावरे ते चवीनेही खातात.

'लोढणा' हा जनावरांना आवर घालण्यासाठीचा एक मार्ग. याप्रमाणेच काही वेळेला 'पायकुटी' चाही अवलंब करावा लागतो. 'पायकुटी' म्हणजे जनावरांनी पळू नयेत म्हणून पुढच्या एका पायाला मागचा पाय बांधणे. 'कुप' (कुंपण), व्हळी (गवताची गंजी) 'व्हळी' हे चंदगड परिसरातील कृषिसंस्कृतीतील एक प्रतीकच. मेहनतीने घेतलेले भाताचे पीक कापून झाल्यानंतर शेती सुकून खळयायोग्य होईपर्यंत त्या पिकाची 'व्हळी' घातील जाते. ही 'व्हळी' वादळी वाऱ्यात, अवकाळी पावसातही सुरक्षित राहते. आत पाणी जाणार नाही अशी तिची रचना असते. पावसाळ्यात जनावरांसाठी 'वाळंक गवात आणि पिंजार' (सुके गवत) परड्यांमधून 'व्हळया' घालून ठेवले जाते. 'पिंजार' म्हणजे भात पिकाची मळणी झाल्यानंतर वाळवून ठेवलेले भात पिकांचे खोडं. 'पेंडी' म्हणजे एकत्र बांधलेली वैरण. 'कट' म्हणजे गवताचा एकमेकांना जोडून भारा बांधण्यासाठी दोरीऐवजी केलेला वापर. 'खोपरी' म्हणजे दोरीची हातापासून खोपराच्या आकराची केलेली गुंडाळी. 'मेंडा' म्हणजे गवताच्या कटाची भारा बांधताना मारलेली गाठ. 'खराटा' गोठा लोटण्यासाठी वापरले जाणारे साधन. 'पत्री' म्हणजे बैलाच्या नख्या झिजू नयेत म्हणून नख्यांना मारले जाणारे लोखंड. 'वशिंड' म्हणजे बैलाचा खांदा. 'आयाळ' म्हणजे बैलाच्या मानेच्या खालचा भाग. 'खुराड' म्हणजे कोंबड्या ठेवण्याचे ठिकाण. 'शीट' म्हणजे कोंबड्यांची विष्ठा. 'कुकडशा' म्हणजे कोंबड्यांच्या राहण्याच्या ठिकाणी तयार झालेले बारीक जंतू. 'तलंग' म्हणजे कोंबडीचे स्त्रीलिंगी पिल्लू. 'खुडूक' म्हणजे अंडी न देणारी कोंबडी. इत्यादी शब्द हे शेतकऱ्यांच्या पाळीव प्राण्यांशी संबंधित आहेत. 'खुडूक बसलीसाय काय?' असा एक वाक्प्रयोग अंडी न देणाऱ्या कोंबडीवरून चंदगडी बोलीत वापरला जातो.

कृषिसंस्कृतीने मराठी भाषेत मौलिक भर घातली आहे. 'आडं', 'मेढ', 'कुड', 'पांझराण', 'शेकारणी' इत्यादी झोपडीशी संबंधित शब्द आहेत. 'उजरणी', 'लावण', 'आंबवान', 'खोडवं', 'निडवं', 'जोडवं' इत्यादी शब्द हे ऊसशेतीमधून आलेले आहेत. 'लावणी' म्हणजे ऊसाची लागण. तर तिसऱ्या पाण्याला 'चिमुन' म्हटले जाते. लागण तुटून गेल्यानंतर दुसऱ्या वर्षी जे पिक घेतले जाते त्याला 'खोडवा' म्हटले जाते. तिसऱ्या वर्षीच्या पिकाला 'निडव'ं तर चौथ्या वर्षीच्या पिकाला 'जोडवं' म्हणतात. पेरणीच्या योग्य हंगामाला 'घात'; तर पीक काढायला आलेला हंगाम म्हणजे 'सुगी'. लावणीनंतर पिकाला दिल्या जाणाऱ्या दुसऱ्या पाण्याला 'आंबवान' म्हटले जाते. सुगीच्या दिवसात शेतकऱ्यांचा बराच काळ खळयावर जातो. काढून आणलेलं पीक मळण्याचे ठिकाण म्हणजे 'खळं'. खळयाच्या मध्यभागी पूर्वी जनावरांच्या साहाय्याने 'मळणी' केली जायची तेव्हा मध्ये एक खांब रोवला जायचा त्याला 'तिवडा' म्हणतात. या तिवड्याला बैलांची मोठ्ठी 'दावण' बांधली जात असे. त्या बैलांना एका दावणीत बांधून फिरवले जाई. हीच पद्धत मोटेवर बैल फिरवण्याची होती.

चंदगडी बोलीतील शेती आणि शेतीविषयक शब्दांचा विचार करताना बऱ्याच शब्दातून भौगोलिक, हवामानविषयक तसेच कृषिकर्मविषयक नव्या शब्दांची ओळख होते. भाव, नद, हेंडोरे, गादा, कुणगी, बना, पटकी, वरा, पट्टी, मोकरकी, हाडग, कुरी, तिरवाड, घट्टा, कोळती, इळा, खुरपं, गोकलं, खोरं, पिकास, नांगर, नांगरट, वाली, च्याक, खांदार्डी, आलगार, वल्ला, पात, लंबर, खागी, मुगड, तट्टा इत्यादी शब्द हे चंदगडी बोलीतील शेतीविषयक कामाची, अवजारांची, शेतांच्या नावांची ओळख करून देतात. यातील एखादा शब्द प्रमाण मराठीची ओळख असणाऱ्या शहरी माणसाने ऐकला तर

त्याला त्या शब्दाचा अर्थ लावणे कठीण काम ठरेल. 'भाव' हा शब्द ऐकला तर तो भाऊ असा अर्थ घेईल. परंतु, चंदगडी बोलीत 'भाव' म्हणजे विहीर असा अर्थ होतो. म्हणून बोलीत ध्वनीवरून शब्दांचा अन्वयार्थ लावताना चुका होऊ शकतात. चंदगडी बोलीत पायांसाठी 'डोके' हा शब्द असल्याचे अनेकांना पटत नाही. 'लुच्च्या खऱ्यान वाग न्हयतर डोके मोडीन.' असे वाक्य ऐकल्यानंतर डोके कसे मोडणार? ते तर फोडता येईल असा प्र्रश्न नव्या व्यक्तीला पडू शकतो. परंतु, त्याचा प्रश्न चंदगडी बोलीत पायांना 'डोके' म्हणतात हे कळल्यावरच सुटतो. असे बरेच शब्द चंदगडी बोलीत आहेत. चंदगडी बोलीत शेतीशी निगडित वैशिष्ट्यपूर्ण शब्द आहेत. कुनगी, वरा, पट्टी, गादा, काकरी, व्हंडवा इत्यादी शब्द उदाहरण म्हणून घेता येतील. 'कुनगी' म्हणजे शेतीचा लहान तुकडा. 'वरा' म्हणजे एका लहान कुनगीतील अजून थोडा लहान भाग. 'पट्टी' म्हणजे सलग आणि लांबट आकाराचे, म्हणजे अगदी पट्टीसारखे लांब आकराचे शेत. 'गादा' म्हणजे मोठा शेतीचा वाफा. 'काकरी' म्हणजे एक लहान तुकडाच. अनेक ठिकाणी त्याला 'बना' असेही म्हणतात. भाताची किंवा नाचणीची कापणी करताना कापणीसाठी हात पोहोचेल तेवढ्या सरींना एक 'पाथ' म्हणतात. 'व्हंडवा' हा शब्दही शेतासाठीच वापरला जातो. काही गावांमध्ये 'व्हंडवा' हे विशिष्ट ठिकाण असते. 'आमी व्हंडव्याकडे जाऊलावात', व्हंडव्यात आवंदू भात बरं न्हाय' ही वाक्य त्यातून तयार होतात. 'वाली' म्हणजे कोणी आश्रयदाता नव्हे तर बारीक दोरी. 'वल्ला' म्हणजे केवळ ओला नव्हे तर भाताची मळणी करताना खोड ओले असणारे भाताचे पिंजर. त्यामुळे अशा शब्दांचे अर्थ समजून घेण्यासाठी चंदगडी बोलीतील या शब्दांना असणारे कृषिविषयक व कृषिकर्मविषयक असणारे संदर्भ ध्यानात घ्यावे लागतात.

'ह्यंडे' म्हणजे मातीचे मोठे मोठे दगड. जे जमीन नांगरल्यानंतर तयार होतात. ते फोडणारे अवाजर म्हणजे 'ह्येंडोरे'. 'ह्येंडोरे' हे महत्त्वाचे अवजार आहे. पण ते कोणत्या कामाचे साधन आहे, हे समजून घेतल्याशिवाय त्या शब्दाचा अर्थ उलगडणार नाही. शेतकरी पेरणीपूर्व मशागत करत असतो. पेरणीपूर्व मशागत चांगली झाली तर पीक चांगले येणार म्हणून तो पेरणीच्या अगोदर शेत पेरणीयोग्य करण्यासाठी तो प्रचंड कष्ट उपसत असतो. वळीव पाऊस लागलेला नसला तर मातीचे 'हेंडे' (दगड) केवळ औताने फुटत नाहीत. अशा वेळी हे हेंडे फोडण्यासाठी शेतकरी एका काठीला पुढे लाकडी ठोकळा जोडलेले अवजार वापरतो. त्याला चंदगडी बोलीत 'ह्येंडोरे' असे म्हणतात. हे ह्येंडोरे चंदगडी भाषिकांच्या भाषिक व्यवहारात अनेक अर्थांने वापरले जाते. एखाद्याला 'हेंडोऱ्या' म्हणण्यापासून हा व्यवहार पाहता येतो. कोल्हापूर जिल्ह्यातील काही भागात यालाच 'मोगली' असेही म्हणतात. तर ह्येंडोरे बैलांच्या साहाय्याने चालवावे लागते. ते फिरवल्यानंतर 'गादा' पिकासाठी व्यवस्थित करण्यासाठी अजून काही कामे यावेळी करावी लागतात. त्यामध्ये गद्याचे 'गळे काढणे' हे एक. नंतर बांध बांधणे हे दुसरे. गाद्यातील कोपरे जे बैलांनी नांगरता आलेले नसतात ते 'पिकासी'ने किंवा 'फावड्या'ने 'खंदून'(खोदून) घ्यावे लागतात. तर चारीबाजूचे बांध हेंड्यानी बांधून घ्यावे लागतात. ऱ्या

चंदगड परिसरात लोकांची शेती फार नसते. जी असते तीही सलग एका ठिकाणी नसते. त्यामुळे ती लहान लहान 'कुनगे', 'वरे' आणि 'गादे' अशी असल्याने शेतातील बरीचशी कामे बैलांच्या साहाय्याने शेतकरी करीत असतो. क्वचित काही लोकांच्या 'पट्ट्या' असतात. त्यामुळे अशा शेतीला बैल सर्वात सोयीचे असतात. परंतु, अलीकडे लहान ट्रक्टरही दिसू लागले आहेत. तरीही बैल हा शेतकऱ्याचा खरा सखा सोबती असतो. डोंगर उताराच्या शेतांमधून गवत, लाकूडफाटा आणण्यापासून डोंगरांवरच्या गाद्यांमध्ये 'गोवर' शेणखत टाकण्यापर्यंत बैलच त्याला मदत करीत असतो. चिखल रोपेत 'डोगला ऐवढ्या चिखलात' तो शेतकऱ्याबरोबर चिखल तयार करणऱ्यासाठी राबराब राबतो. शेतकरी बैलांना 'पेंड', 'सरकी', 'कुळथी', 'कणिक', 'कोंडा' असे चांगलेचुंगले खायला घालून त्यांची निगा राखत असतो. परंतु, कोणत्याही पिकाच्या आंतरमशागतीचे औत करत असताना बैलांचे तोंड उघडे ठेवले तर ते औत ओढता ओढता पिकाचे 'घास' घेतात. अशावेळी 'औत' ओढताना घास घेतल्यामुळे बैलाला घास लागू शकतो. औतात दिरंगाई होते. म्हणून बैलांच्या तोंडाला 'मुसकी' बांधतात. या मुसकीला चंदगडीत 'मुस्कं' असा शब्द आहे. या मुस्क्यावरूनच 'मुसकी आवळणे' यासारखे वाक्प्रचारही मराठीत रूढ झाले आहेत. चंदगडी बोलीत काही भागात मुस्क्याबरोबर 'मोकरकी' असेही म्हणतात.

चंदगडी बोलीतील शब्द आणि प्रमाण मराठीतील शब्द यांच्यामध्ये अर्थदृष्ट्या खूपच भिन्नता दिसते. 'पटकी' हा शब्द असाच आहे. प्रमाण मराठीत पटकी हा एक रोग आहे, यावरूनच स्त्रिया शिव्या देताना, 'तुला पटकी आली तुला' अशी शिवी देतात. पण चंदगडी बोलीत 'पटकी' शब्द दोन अर्थाने वापरला जातो. एक 'पटकी' हा साथीचा अजार आणि दुसरा अर्थ 'गावालगतचे शेत' असा होतो. वास्तविक शेताला 'श्यात' असे चंदगडीत म्हटले जाते. गावाजवळच्या शेताला कोल्हापूर जिल्ह्यातील बहुतेक प्रदेशात 'गावंदरी' असे म्हटले जाते. येथे गावाच्या उदरी असणारी गावंदरी असा अर्थ होऊ शकतो. पण गावाशेजारच्या शेताला सर्वत्र, सर्व घरातील लोक 'पटकी' का म्हणतात, हे नेमकेपणाने कोणी सांगत नाही. कदाचित पटकीच्या साथीत लोक गावाशेजारच्या या शेतातून राहिले असल्याने या शेतांना 'पटकी' ही नावे पडली असावी असा एक अंदाज बांधता येतो. परंतु, ही केवळ शक्यता वाटते.

शेताच्या आकरावरून आणि ठिकाणावरूनही काही शेतीविषयक शब्द भाषेत रूढ होत असतात. यातून शेरी, लंबर, गावठाण, राई, व्हंडवा, कोल्हेमाळ, नदीकाट, चिमटा, माळ, ओपा, तसरी, डाग, पठार, गोठण, देवकी, म्हारकी यासारखे शब्द शेताची नावे म्हणून येतात. हलकर्णी या एका गावातील शेतींना दिलेली नावे उदाहरणासाठी आपाण पाहू शकतो. या गावात कासारंगी, भोकरीचा गोंड, सुक्कतळं, खाचराट, गाडीगोंड, व्हंडवा, पइल्याड, मलगारी, समदा, शिंगेश्यात, सीमदेवाडे, राई, पाणयाची व्हळ, मरगाई, पटकी, मारगाकडे, लाश्याचा लबंर, कटीणाकडे, पावणादीत, भंडीमाळ, बेरडकी, म्हारकी, शेतवडीत, तळयाडे, डागी, गुरवाळ, रोडगादा, नरसुचंश्यात, लव्हेटेक, चांभाराप्पा, कोल्हेमाळ, रांगी, गाडीतळ, हुंबराचा लंबर, खंडाचावता, जांगेचा लंबर, कामताचं माळ, कामतात, परवेचं माळ, नागझरी, भाकरशेत, डोंगरीटेक, आडीचा मोळा, मोडाण, खडकश्यात, बाबणाचा मोळा, बरम्याचा हळ्ळा, घणवटी, मोडका आंबा, घणघणीत, गुरुलींगाचं श्यात, केळश्यात, मळकाट, भटाचा लंबर, गुरुजा लंबर, दिवेरंगी, गळटेक, लक्ष्मीची बाग, मडेमोळ, दत्ताचा मोळा, कोलेमाळ, शिपण्याची कोंड, लव्हाराचा टेक, गोळाचं माळ, फरांकुचा लंबर, हिरडीचा लंबर अशी सुमारे सत्तरहून अधिक नावे हलकर्णीतील शेतांची आहेत. या सर्व नावांना स्थानिक संदर्भ आहेत. मारग म्हणजे मार्ग. इंग्रजांनी पहिले रस्ते तयार केलेल्या ठिकाणच्या शेतांना हे मारग नाव पडले आहे. कोरडे पडलेल्या तलावाला सुक्कतळं. तर गुरवांचे शेत ते गुरवाळ. अशी सर्व स्थानिक, गावपातळीवरचे संदर्भ शोधल्यास या शेतांच्या नावाचा उलगडा होतो.

चंदगडी बोलीत 'पट्टी' म्हणजे सलग आकाराचे शेत, 'लंबर' म्हणजे मोठ्या आकराचे डोंगरी शेत इत्यादीसारखे शब्द रूढ आहेत. त्याचप्रमाणे आरा, वरा, सरी, आडास, कड, बांध, आळं, करपाडी, बोद, वाफा, बना, खागं इत्यादी शब्द एकाच शेतातील आतल्या भागासाठी उपयोजिले जातात. यातून काही वेळा शेतकऱ्याची मोजमापेही निर्माण होतात. त्या रानाच्या आकाराएवढे असा त्याचा अर्थ असतो. उदाहरणार्थ, चंदगडी बोलीत असणारा 'वराभर' हा शब्द. 'वरा' म्हणजे पेरणी करताना एका पिकाची पेरणी होताना पाच किंवा सात सऱ्या सलग पेरणी झाल्यानंतर मध्येच एक सरी दुसऱ्या पिकाची पेरायची. त्याला 'आरा' असे म्हणतात. एका आऱ्यापासून दुसऱ्या आऱ्यापर्यंतची मधली पहिल्या मुख्य पिकाची जागा म्हणजे 'वरा'. मग लोक बोलताना, 'आवंदू झाडाबुडली वराभर जागा उगवोसच न्हाय', असे म्हणतात. तेव्हा वराभर म्हणजे दोन आर्यांच्या मध्ये असते तेवढी जागा. येथे हा 'वराभर' शब्द मोजमाप म्हणून येतो. असेच 'खोपरीभर', 'वावभर', 'बुट्टीभर', 'कासराभर', 'पांगभर', 'खंडीभर' असे शब्द चंदगडी बोलीत रूढ झाले आहेत. यामधील 'खोपरी' म्हणजे हाताच्या पंज्यापासून खोपरापर्यंतचे अंतर. तर 'वावभर' म्हणजे दोन्ही हात 'फाकवून' (लांब करून) या हातापासून त्या हातापर्यंतचे अंतर. 'बुट्टीभर' म्हणजे बुट्टी भरून. बुट्टी म्हणजे 'चिवा' किंवा 'मानगा' (वेळूच्या) कामट्या किंवा कांब्या काढून 'बुरडाने' बनवलेले साधन. येथे भांड्यामधली 'बुट्टी' अपेक्षित नाही. ज्याच्यातून जेवणाची भांडी ठेवून शेताकडे डोक्यावरून नेता येतील, किंवा जनावरांचे शेण काढून त्या बुट्टीमध्ये भरून ते 'गायरेत' (उकिरड्यात) टाकता येईल. अशी शेतकऱ्याच्या कामासाठी ही बहुपयोगी 'बुट्टी' असते. तिच्या आकारावरूनही वेगवेगळे शब्द भाषेत रूढ आहेत. कुरकू, बुट्टी, हारा, इत्यादी शब्द आकारावरून पडल्याचे दिसते. बुट्टीसारखी 'रोळी' ही एक अजून महत्त्वाची वस्तू शेतकऱ्याकडे असते.

'कासराभर' म्हणजे कासऱ्याएवढे. बैलाला बांधण्यासाठी, त्याला ने-आण करण्यासाठी, त्याच्यावर अंकुश ठेवण्यासाठी त्याच्या 'यसनी'स (वेसणीला) किंवा गळ्यातील 'कंठ्या'ला कासरा बांधलेला असतो. हा कासरा (दोरी) मागे बैल 'हांबडणाऱ्याच्या' (हाकणाऱ्याच्या) हातात असते. तो कासरा जिकडे ओढला जाईल तिकडे बैल वळतो. म्हणजे बैलाचा मार्ग हा कासरा ओढण्यावर ठरतो. थांबायचे असेल तर कासरा ओढून ठेवला जातो. त्यावेळी बैलाच्या नाकातील 'यसनी'ला (वेसणीला) ओढ लागते आणि बैल थांबतात. म्हणचे कासरा हा बैलांवर अंकुश ठेवण्याचे साधनच. त्यावरून 'त्याचा कासरा माझ्या हातात आहे' असा प्रयोग मराठीत रूढ झालेला आहे. कासरा ओढणे, कासरा हातात ठेवणे हे शब्दप्रयोगातून योग्य अर्थसूचन होत असते. 'यांगभर' (कोल्हापूरच्या इतर ठिकाणी 'पांगभर' असा शब्द) म्हणजे माणसाच्या दोन्ही हातांच्या 'कवळ्या'त 'मावेल' (बसेल) इतके. 'खंडीभर' म्हणजे खंडीएवढे. एक खंडी म्हणजे धान्याची वीस पोती. भातमळणी झाल्यानंतर भाताला 'वारं देणे' ते मळलेले भात घरात आणणे ही प्रक्रिया असते. भात भरण्यासाठी पोतं वापरतात. तोंड शिवलेल्या पोत्याला चंदगडीत 'मुगडं' म्हणतात. खळयावर माती मिसळलेल्या धान्याला 'मातेरं' तर धान्य न भरलेल्या भातालाला (धानाला) 'चिंब' किंवा 'चिंबार' म्हणतात.

'कुरी' हा शब्द सर्रास सगळीकडे असलेला दिसतो. पण 'हाडगं' हा शब्द चंदगडी बोलीतच आढळतो. कुरी म्हणजे पेरणीचे अवजार. या कुरीला खाली बियाणे मातीत जावे यासाठी असणाऱ्या फणांच्या मागे भोके असतात आणि प्रत्येक फणासाठी वरती एक पोकळ नळी असते. ज्याच्यातून धान्य खाली येते. असे एका कुरीला पाच फण आणि त्यांचे पाच 'नळे' असतात. हे नळे वर एका लाकडी गड्ड्यात बसवलेले असतात. ज्या लाकडी गड्ड्याला प्रत्येक नळ बसविण्यासाठी एक भोक असते. या लाकडी गोल गड्ड्याला सगळ्या भोकांमधून समान बियाणे सोडली जातात. ती त्या नळांच्यामधून फणांच्या मागे पडत जातात आणि मातीत रुजतात. या गोल लाकडी गड्ड्याला 'चाडगं' असे म्हटले जाते. चंदगडी बोलीत यालाच 'हाडगं' असे म्हणतात. यासारखे शब्द चंदगडी बोलीत शेती आणि शेतीविषयक कामातून आलेले आहेत. प्रत्येक शब्दाला शेतीविषयक कामाची पार्श्वभूमी असलेली दिसते. ती पार्श्वभूमी किंवा त्या साधनाचा अथवा कामाचा नेमका कुठे व कसा वापर केला जातो, हे समूजन घेतल्याशिवाय त्या शब्दांचा अन्वयार्थ आपणास लावता येत नाही. पेरणीपासून मळणीपर्यंत असंख्य कामे शेतकरी शेतात करीत असतो. त्याच्या 'राबणुकी'तून त्याच्या कामाची, शेतशिवाराची एक नवीच भाषा तयार होते.

शेतकरी कधी काळी बारा बलुतेदार, आलुतेदारांसह फिरस्ते, भटके या सर्वांना सांभाळणारा गावगाड्यातील सर्वात महत्त्वाचा होता. आज गावगाडा बदलला आहे. बलुतेदारांमधील अनेकांनी आपला पारंपरिक व्यवसाय टाकून दिला आहे. बलुत्यावर काम करण्याची पद्धत कालबाह्य झाली आहे. तथापि, बलुते-आलुतेदारीतून निर्माण झालेले फार मोठे भाषिक भांडार चंदगडी बोलीत आजही आहे. ते वापरले जाते. त्या भांडाराची चर्चा आपण पुढे करणारच आहोत.

शेती व्यवसायात 'नांगर' महत्त्वाचा आहे. नांगर हे शेतकऱ्याचे प्रतीकच. तो आपली जमीन नांगरीशिवाय पेरण्यायोग्य करू शकत नाही. त्यामुळे त्याच्या 'नांगरटी'चा संदर्भ भाषिक व्यवहारात अनेक अंगाने होेतो. जमीन नांगरून तयार ठेवणे, हे वाक्य केवळ शेतीशी संबंधित राहिले नाही. तर जमीन नांगरून ठेवणे, म्हणजे कोणत्याही कामाची व्यवस्थित पूर्व तयारी करणे होय. हे भाषिक रूप शेतीतून प्रमाण मराठीच्या व्यवहारात आले. या नांगरीमध्ये 'पास', 'पेटणं', 'दांडा', 'जोता', 'जू' असे काही शब्द आहेत. पास टाकणे, अंगावरचे जू उतरवणे, भूमी नांगरणे असे शब्दप्रयोग त्यातूनच तयार झाले आहेत. 'पेटणं' म्हणजे नांगरीचा वरचा भाग. ज्याला 'मूठ' बसवलेली असते. हे 'पेटणं' ही शेतकऱ्याच्या भाषिक व्यवहारात अनेक संदर्भाने वेळोवेळी येताना दिसते. 'जू' हेही रूपक बनले आहे. तर बैलांना शेतीची मशागत करताना बांधलेले 'मुसके' हेही शेती व्यवसायातून प्रमाण मराठीत आलेला महत्त्वाचा शब्द. मुसक्या आवळल्या, मुसक्या बांधल्या ही भाषिक रूप त्यातून आलेली आहेत. बैल 'हाती आलेले पीक' खाऊ नयेत यासाठी शेतकऱ्यांने 'मुसकी बांधण्याची' केलेली योजना जीवनव्यवहारात अर्थपूर्ण बनली आहे. 'मुस्काट' हा शब्द चंदगडीत तोंडासाठी वापरला जातो. त्याला बांधांयचे ते 'मुस्के'.

शेतीतील प्रत्येक पिकासंदर्भात शब्दभांडार आकाराला आलेले असते. 'भात' पिकापासून ही चर्चा सुरू केल्यास चंदगडी बोलीत धानासाठी 'भात', भात सडून त्याचे तांदुळ आणि तांदुळ शिजला की परत तो 'भात' होतो. त्यामुळे 'भात'


मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

हा शब्द दोन वेळा वापरला जातो. भाताशी संबंधित ‘रॉप’, ‘तरवा’, ‘भांगलण’, ‘कोळपा’, ‘खाद घालणे’, ‘कापणी’, ‘मळणी’, ‘व्हळी’, ‘लोंबं’, ‘गवात’, ‘पिंजार’, ‘चिंब’ असे काही बोलीत दिसतात. रताळ्याशी संबंधित ‘चिन्नी’, ‘म्हेरा’, म्हेरेवर, म्हेरेत, ‘याल’, नाचण्याशी संबंधित ‘नाचण्याची कनसं’, ‘धाट’, ‘लव्हा’ इत्यादी, मिरचीच्या पिकाशी संबंधित तरू लावणे, आंबवान, भरती मारणे, मिरशेंगा, फुल पडणे, मिरशेंगा तोडणे असे काही शब्द दिसतात. काजूच्या बागेतही अनेक शब्द आहेत. उदाहरणार्थ, काजवा, डांब, तोरं, म्होर, म्हार जळणं, काजवा पेलणं, मुरटे इत्यादी. किणीकर्याद भागात हरभरा, वाटाणा आणि मसूर ही पिकं घेतली जातात. या पिकांशी संबंधित शब्दसंग्रहही या परिसरात तयार झालेला दिसतो.

शेतकऱ्याच्या वर्षभराच्या कामावरून, येथील भौगालिक परिस्थितीनुसार घेतल्या जाणाऱ्या विविध पिकांनुसार, ती पिके करण्याच्या पद्धतीनुसार अनेक शब्द प्रयोग येथील भाषेत प्रविष्ठ झाले आहेत. सुग्गी संपली, ‘घात’ सुरू झाले, ‘रान’ (तण) लई वाढलेय हे भाषाप्रयोग केवळ शेतीतील कामे राहिलेली नाहीत. तर हे महत्त्वाचे भाषिक प्रयोग आहेत. कामे संपली की ‘सुग्गी संपली’ किंवा एखाद्या व्यावसायिकाचा सिजन सुरू झाला की तो अगदी आनंदाने सुग्गी सुरू झाली म्हणतो. उदाहरणार्थ, गणपतीच्या सिजनला कुंभार व इलेक्ट्रिक दुकानवाल्यांची बरीच चलती असते. त्यांच्या दुकानांमध्ये आता सुग्गी सुरू झाली आहे, असे सहज बोलले जाते. अशा पद्धतीने अनेक भाषिक प्रयोग शेती व्यवसायातून प्रमाण भाषेकडे येताना दिसतात. एकादी व्यक्ती वारंवार तिच गोष्ट सांगत असली तर तुझे ‘चऱ्हाट बंद कर’ म्हणण्याबरोबर ‘मळणी संपली काय?’ असे विचारले जाते. कामे संपली की ‘घात सपली’ म्हटले जाते. ‘पाणी पाजून येतो’ हा शब्दप्रयोगही असाच आहे. शेतकऱ्यांनी मराठी किती समृद्ध केली आहे, याचा प्रत्यय बोलीभाषेचा अभ्यास करताना येतो.

## बलुतेदारांचा भाषिक कोश

पूर्वीश्रमीचे आलुतेबलुतेदार हे स्वयंपूर्ण गावचे खांब होते. त्यांच्या आणि शेतकऱ्यांच्या श्रमावरच गावरहाटी चाललेली होती. या परस्परांचे संबंध येवढे घनिष्ठ होते की, नित्यसंपर्कामुळे परस्परांचे शब्दभांडार प्रत्येकाला ज्ञात होते. त्याचा ते भाषिक व्यवहारात कौशल्याने वापर करीत असत. त्यामुळे परस्परांच्या भाषेत त्या शब्दांचा वापर नैसर्गिकपणे होत असे. बोली समृद्ध करण्याचे काम हे सर्व मिळून करत होते. आज आलुतेबलुते संपलेले असले तरी ते वेगळ्यापद्धतीने आपले आपले व्यवसाय गावोगावी करताहेत. त्यामुळे त्यांची भाषा बोलीत जिवंत आहे. त्यामुळे ते आता बलुतेदार नसले तरी व्यावसायिक म्हणून आपल्या परंपरागत ज्ञानाच्या बळावर जगताहेत.

## सुतार

सुतार हा गावगाड्यात शेतकऱ्यांना सर्वाधिक जवळचा बलुतेदार. सुतारांना वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळी नावे असलेली दिसतात. त्यामध्ये सुतार, सुत्तार, बाडिग, बडगी, थवी, बढई असे शब्दप्रयोग दिसतात. चंदगडीत यापैकी ‘सुतार’ आणि ‘बडगी’ हे दोन शब्द वापरले जातात. चंदगडीचा भाषिक प्रदेश कन्नड भाषेच्या लगत असल्याने संपर्कामुळे ‘बडगी’ सारखे अनेक शब्द चंदगडी बोलीत प्रविष्ठ झालेले आहेत. अशा संपर्कातून चंदगडी बोलीत रुजलेल्या शब्दांची चर्चा आपण पुढील प्रकरणात विस्ताराने करणार आहोत. सुतारांचा व्यवसाय आणि हत्यारे यावरून काही शब्द प्रमाण भाषेत प्रविष्ठ झालेले आहेत. त्यामध्ये ‘पाचर मारणे’, ‘खुट्टा मारणे’, ‘तासणे’ असे काही शब्द सांगता येतील. या व्यवसायचेही समृद्ध भाषिक भांडार आहे. खरगस (करवत), उळी (एक धारदार उभट लाकूड तोडायचे, तासायचे पाते/हत्यार), तासणी (वाकून लाकूड तासण्याचे हत्यार), चिरणं (लाकडाला छिद्र पाडण्याचे साधन), मटवालकी (माप काटकोणात घेण्यासाठीचे साधन), खत फावडी (मापात रेषा आखण्यासाठीची पट्टी), बुलोर (भाता : हत्यारे तापवण्यासाठीची वस्तू), ऐरण (अवजारे (हत्यारे) तापवून करून यावर आकार देतात), हातोडी (खिळे ठोकण्यासाठी याचा वापर), छेन्नी (लोखंडी बार तोडण्यासाठी), शानशी (गरम लोखंड पकडण्यासाठी), कानस (हत्यारांना धार काढण्यासाठी वापर), तीनधारी कानस (हत्याऱ्याची धार समान करण्यासाठी), ढाणी (गरम निखोर हलवताना उपयोग करतात), घण (लोखंड बडविण्यासाठी), किटी (लोखंड पकडण्यासाठी), गिरमीट

(लाकडात छिद्र पाडण्यासाठी वापरतात), रंदा (लाकूड सपाट करणारे अवजार) असे अनेक शब्द सुतारांच्या भाषिक भांडारात समाविष्ठ होतात.

सुतारांच्या धंद्यात अनेक लहानमोठ्या हत्यारांना महत्त्व असते. त्यापैकी अनेक हत्याराशी संबंधित आणि त्याच्या कामाशी संबंधित भाषिक प्रयोग प्रमाण भाषेत रुजले आहेत. 'अंबोर' हे हत्यार लाकडात खिळा ठोकताना किंवा पूर्वीचाच जुना खिळा बाहेर काढण्यासाठी वापरले जाते. 'आरगडा' (बैलगाडीच्या चाकांना गोल अकार यावा यासाठी या हत्याराचा वापर), 'खतावणी' किंवा 'गिट्या' या हत्याराने लाकडावर खुणा केल्या जातात, 'खरगस' या हत्याराने लाकडे कापली जातात. 'खरगसा'चे अनेक लहान मोठे प्रकार आहेत. 'कानस' ही अनेक पद्धतीच्या असतात. 'कानस' हे हत्यार खरगसांना धार काढण्यासाठी वापरले जाते. काही ठिकाणी याला 'कानसी' असेही म्हणतात. कुऱ्हाड (कुऱ्हाड शेतकऱ्याकडे आणि सुताराकडे असणारे सामाईक हत्यार आहे. ते लाकुड तोडण्यासाठी आणि तासण्यासाठी वापरले जाते. सुताराकडे कुऱ्हाडीबरोबर 'तासणी' हे एक हत्यार असते. परंतु, सुताराकडील कुऱ्हाड आणि शेतकऱ्यांकडील कुऱ्हाडींमध्ये बराच फरक असतो. सुताराला लहान मोठ्या आकाराच्या अनेक कुऱ्हाडी वापराव्या लागतात.), 'कैवार' (लाकडांना गोलाकार आकार देण्यासाठी विशेषत: गोलाकार आकाराची औजारे बनवण्यासाठी वापरले जाणारे हत्यार), 'कोरकापी' (कोरकापी हे हत्यार अलीकडे कालबाह्यच झालेले दिसते. कारण लाकडावर नक्षीकाम पूर्वी हातानेच केली जात होती. त्यावेळच्या सुतारकर्मात हे महत्त्वाचे हत्यार मानले जायचे. नव्या सुतारांकडे हे फारसे आढळत नाही. काही सुतारांना माहितीही नाही), 'चिरणं' (चिरण्याने लहान लहान छिद्रं पाडली जातात), 'ठिय्या' (बाभळीचे टणक कापीव गोलाकार ठोकळ्यांचे लाकूड जमिनीत पुरले जाते. या बाभळीच्या टणक लाकडावर सुतार आपले काम करतात. सुताराची धारधार हत्यारे काम करताना या लाकडावर आदळली, घासली, किंवा पडली तरी त्यांची धार जात नाही आणि खालचे टणक लाकूड लवकर झिजतही नाही. अशा या जागेला ठिय्या असे म्हणतात. चंदगड परिसरात सुतार ज्या जागेत काम करतो त्या जागेला 'सुताराची शाळा' म्हणतात. या सुतार शाळेतही 'ठिय्या' शब्द आहे. याबरोबर बीट, ड्रील, तरगी, दराद, दातवाकी, पानसळ, रंधा, वाकस, तासणी, सामता, नारज, पकड, पटाशी, पाणसळ, माथकडी, मूठ, रंधा, शेडगा (पक्कड), शिल्ली, शेमी, हातोडा अशी काही औजारे सुताराच्या भाषिक भांडाराचा भाग आहेत.

**लोहार**

लोहाराच उल्लेख चंदगडीत 'लव्हार' असाच केला जातो. या समाजाच्या कामाचे स्वरूप सांगणारी एक म्हण हिंदी भाषेत फार प्रसिद्ध आहे. 'सौ सोनार की, और एक लोहार की' ही ती म्हण आहे. या म्हणीवरून लोहार समाजातील स्त्रियांच्या कष्टांची कल्पना येते. लोहार हा लोखंडी हत्यारे बनवणारा समाज आहे. या जातीतील काही पोटजातीही आहेत. या समाजाने अनेक उद्योगव्यवसायांना मदत केली आहे. हत्यारे बनवून देणारा हा समाज असल्याने ऐतिहासिक कालखंडापासून या समाजाने समाजासाठी मोठे योगदान दिले आहे. शिकारी, शेती, लढाया, शत्रास्त्र, उद्योग अशा सर्वच क्षेत्राला या समाजाने मदत केलेली आहे. या समाजाच्या भाषिक भांडारात अनेक शब्द येतात. उदाहरणार्थ, ऐरण, एकलई, कानस, कुत्रे, घण, चोपणी, छन्नी, जंतर, डहाण, डागपान्हा, ताव, पोगर, भट्टी, भाता, सांडसी, शेक, हातोडा, अडकित्ता, आख, इड्या, इळत, उकरी, उलाथणे, कडी, कत्ता, कढई, कन्पी, कानखिळ, खुणी, कुदळ, पहार, कुऱ्हाड, कुसा, कोयते, कुरपे, खोरे, धुमटक, चिमटा, जाळी, टिकाव, दातऱ्या, लोखंडी कोळपा, दाभण, धावपट्ट्या, नाल, पहार, पळी, पास, पावशी, फाळ, फारुळा, फरशी, फुंकणी, भोरकडी, खलबत्ता, वाकस, विळा, शेवटणे, सतूर, साखळी, हूकपट्टी, आगळपट्टी असे अनेक अनेक शब्द लोहार व्यवसायाशी संबंधित आहेत.

लोहार समाजाच्या या शब्दांमधून या व्यवसायाचे संपूर्ण स्वरूप लक्षात येते. अलीकडे या व्यवसायाचे स्वरूप अमूलाग्र बदलले आहे. लोहार बनवत असलेली बहुतांश हत्यारे आता कारखान्यांमधून बनतात. लोहार कधीकाळी मोठ्या प्रमाणात 'नांगरीचे फाळ' बनवत असे. या फाळांमुळे जमीन नांगरणे सोयीस्कर होत होती. लाकडी नांगरीला लोखंडी फाळ

आवश्यकच होता. या फाळावरून चंदगडी बोलीत पुढे आलेल्या दातांना 'फाळ' आणि अशा व्यक्तीला 'फारोळा' म्हटले जाते. 'फारोळ्या दाताचा' सारखे शब्दप्रयोग त्यातून घडले आहेत. अर्थात आता हे फाळ, लोखंडी नांगर कालबाह्य झाले आहे. घण, छन्नीचा वापरही कमी झाला आहे.

## कुंभार

कुंभार गावगाड्यात ओल्या मातीपासून सुरई, माठ, खुजे, रांजण, कुंड्या, घट, गाडगी, मडकी, झाकण्या, पणत्या, कौले, विटा, कुंड्या इत्यादी घडवून, त्या वस्तू भाजून विकणारा कारागीर. चंदगडी बोलीच्या भाषिक प्रदेशात हा समाज प्रत्येक गावात दिसत नाही. त्यामुळे कुंभाराचे बरेच काम सुतार-लोहार करतात. उदाहरणार्थ, कुंभार समाज असलेल्या गावांमध्ये मातीचे गणपती आणि नाग बनवण्याचे काम कुंभार करतात. चंदगडच्या बहुतांश गावांमध्ये कुंभार नाहीत त्यामुळे हे काम सुतार किंवा लोहार करतात. कुंभार समाजाचा भाषिक कोशही बराच समृद्ध असतो. कुंभाराच्या भाषिक कोशात 'आवा' (कुंभाराची भट्टी) पेटवून त्यामध्ये गाडगी, मडकी भाजली जातात. आवा (म्हणजे कुंभाराची वस्तू भाजायची भट्टी) ही भट्टी पाचसहा विटांचे थर आणि त्यावर कोळसा, परत विटांचे थर आणि कोळसा, अशी आव्याची रचना असते. भाजलेल्या वस्तूंना तांबडा रंग हवा असेल तर आव्यातील धुराला बाहेर जाण्यासाठी वाट करून देतात. वस्तू काळ्या रंगाच्या हव्या असतील तर आवा पेटल्यावर काही वेळाने धूर बाहेर जाणे बंद करतात, म्हणजे धूर आतल्या आत कोंडून वस्तूंना काळा रंग येतो. गंडा किंवा गुंडा (हा एक बहिर्वक्र आकाराचा दगड असतो. वस्तूच्या आतून, वस्तूवर हा एका हाताने फिरवला की वस्तू गुळगुळीत आणि पक्की होते) 'चोपणे' (ही एक प्रकारची लाकडी थोपटणी असते. जी वस्तू तयार करायची असेल तिला बाहेरून चोपण्याने ठोकले जाते. त्यामुळे वस्तू पक्की होते), बांबूचा दांडा (हा चाक फिरवायला लागतो. चाकाच्या दोन आऱ्यांमध्ये बांबू घुसवून कुंभार चाकाला गती देतो.), मण्यांची माळ (ही वस्तूला चकाकी आणण्यासाठी वस्तूवरून फिरवली जाते.), साचे (विटा, मूर्ती वगैरेंसाठी लाकडी साचे असतात.) या समाजात 'चक्कार' (चाक), आवा, कोळसे, इंगळ, खापर, खापऱ्या, गार, भाजणी, धिसू, चिखल, माती, शाडू, थापी, दोरी, रिंग, रक्का असे शब्द वारंवार येताना दिसतात. शिवाय खापऱ्या (कौले), गाडगी, लोटके, करे, बिंदगी, डेरा, मडकी, भाचर, मोगा, पणत्या असे अनेक शब्द येतात.

चंदगड परिसरात बाहेर गावांहून येणारे कुंभार घरोघरी जाऊन किंवा बैलगाडीतून मातीची गाडगी, मडकी विकताना दिसत. हे बहुधा खानापूर (कर्नाटक) परिसरातून येत. ते मोठ्या गावांमध्ये ठराविक ठिकाणी आपला सर्व 'माल' उतरून ठेवत. गल्लोगल्ली जाऊन काडगी मडकी खरेदीचे अवाहन करीत. काही दिवसांपूर्वीपर्यंत ही भांडी धान्य घेऊन विकली जात. चंदगड परिसरात अनेक घरांवर दिसणारी काळी कौले ज्याला चंदगडी बोलीत 'नळे' म्हणतात ते कुंभाराकडून बनवून घेतली जात.

## सोनार

चंदगड परिसरात सोनार समाजही प्रत्येक गावात नाही. हा समाजही ठराविक गावांमध्ये आहे. त्या समाजात पारंपरिक पद्धतीने सोन्याचांदीचे दागिने बनवन्याचा व्यवसाय चालतो. या व्यवसायाला आजही महत्त्व असून लग्नादि समारंभात सोन्याच्या दागिन्यांची खरेदी मोठ्या प्रमाणात चालते. या व्यवसायातून अनेक शब्द मराठी भाषेने स्वीकारले आहेत. 'सोनारे कान फुंकले इकडून तिकडे गेले वारे' वाक्प्रयोग योग्य आशय व्यक्त करण्यासाठी नेहमी वापरला जातो. चंदगडी बोलीत कंजूस व्यक्तीला 'जिकटा', 'चिक्कूमारवाडी' या शब्दांबरोबर 'सोनार' असेही म्हटले जाते. 'सोनार हाईस' म्हणजे काटकसरी आहेस असेच म्हणायचे असते. या व्यवसायात वापरल्या जाणाऱ्या शब्दांचे भांडार नोंदवता येईल. उदाहरणार्थ, ऐरण, अंबोर, कणा, करवत, कलम, काटा, तागडी, कातर, कानस, गाभा, सेट, चिमणी, ठोकळा, तोळा, गुंज, कॅरेट, शुद्ध, मिक्स, तांबेमिश्रित, चांदी इत्यादी.

### न्हावी

न्हावी हा बलुतेदारांमध्ये महत्त्वाचा व्यावसायिक आहे. न्हावी धंदा गावोगावी कालपरवापर्यंत बलुत्यावरच चालला होता. दरडोई किती धान्य घ्यावे, याचे संकेत ठरलेले होते. वास्तविक न्हाव्याला अनेक गावात इनामी जमिनीही देण्यात आलेल्या आहेत. तिला चंदगडी बोलीत 'न्हावकी' असेही नाव आहे. तर काही गावांमध्ये 'हाजामाची पट्टी' म्हणून ओळखले जाते. ज्यापद्धतीने ग्रामदेवतेला वाहण्यासाठी गुरवाकडे तेल देण्याची जबाबदारी एका विशिष्ट कुटुंबाकडे असते. त्या कामासाठी त्यांनाही एक जमीन इनामी दिलेली असते. त्या जमिनीला 'तेलपट्टी' असे नाव असते. बैत्याच्या न्हाव्याला घरातील लग्नादि कार्यातही फार महत्त्व असते. त्याच्याशिवाय हळदीचा विधी सुरू होत नाही. शेतकऱ्याच्या घरी मुलाचे लग्न असल्यास नवऱ्या मुलाची हळदीदिवशी न्हाव्याने मंडपात हजामत करण्याची प्रथा अनेक ठिकाणी आहे. त्या मोबदल्यात न्हाव्याला पूर्ण आहेर आणि विशिष्ट रक्कम बक्षीस म्हणून दिले जाते. न्हावी हजामत करून गेला की हळद लावली जाते. अलीकडे हा केवळ एक औपचारिक विधी असला तरी तो आजही पाळला जातो.

न्हावी आता गावोगावी दुकाने थाटून व्यवसाय करतात. त्यांची दुकाने गावात 'कुचाळक्या' करणाऱ्यांची हक्काची ठिकाणे असतात. न्हाव्याच्या पारंपरिक व्यवसायाचे स्वरूप पूर्ण पालटले आहे. त्यातून त्यांचा भाषिक कोशही विस्तारला आहे. 'बटव्यात' आरसा, दोन कतऱ्या, धार लावायचा वस्तारा आणि कंगवा या चार वस्तू सोबत घेऊन व्यवसाय करणाऱ्या पारंपरिक न्हाव्यामध्ये आणि आजच्या न्हाव्यामध्ये बराच फरक पडला आहे. तो त्यांच्याकडील वस्तूवरूनही दाखवता येतो. आरसा, कपडा, कटिंग, (कटिंग हे छोटे भाषिक लघुक्षेत्र गृहीत धरले तर, बॉबकट, बॉयकट, गांधी कट, साईडकट, चंपी, टकलू, सोल्जरकट, मिल्ट्रीकट, राऊंडकट इत्यादी. असे काही शब्द दाखवता येतात.) कंगवा (येथेही अनेक प्रकार सांगता येतात. विशेषत: नंबरावरून कंगवा ओळखला जातो.), कात्री (कात्र्यांचेही अनेक प्रकार, नंबर), ब्लेड, वस्तारा, वाटी, मशिन, तुरटी, साबन, हजामत, दाढी, मिशी, बगल, नखंकोरी, धोपटी असे अनेक शब्द या व्यवसायाशी संबंधित आहे. ये हजामा, ये न्हाव्या या शिव्या म्हणून वापरल्या जातात. जातीवरू उल्लेख करून हिणवणे ही शिवी बनली आहे. इकडची बातमी तिकडे करणाऱ्या माणसाला 'न्हावीपणा करू नको' असे किंवा तुझी 'न्हावकी' बंद कर असे म्हणतात.

### गुरव

बलुतेदारी पद्धतीत गावच्या देवाची सेवा, जबाबदारी गुरवाकडे होती. आजही आहे. शेतकरी किंवा कुणबीकी करणाऱ्या लोकांना गावच्या देवाची पूजा करण्यासाठी वेळच नसतो. त्यामुळे गावच्या देवाची नियमित पूजा करण्यासाठी गुरव नेमला जात होता. या गुरवाला उपजिविकेसाठी गावकरी जमीन देत. त्या जमिनीला चंदगडी बोलीत 'गुरवाळ' म्हणातात. हे गुरवाळ 'कसून' खाण्यासाठी 'वर्षील' पाळले जाते. गावात गुरवांची चारपाच घरे असतात. त्यांच्यामध्ये हे 'वर्षील' फिरत असते. ज्या गावात गुरव समाज संख्येने जास्त आहे. त्या गावांमध्ये गुरवांचे 'वर्षील' ठरवले जाते. बऱ्याच गावांमध्ये गुरव बाहेरील गावातून आणून त्याला 'गुरवकी' दिलेली दिसते. गुरवाचे काम देवपूजा, देवळाची झाडलोट, दिवाबत्ती, सणाच्या दिवशी पत्रावळी पुरवणे आणि लग्नकार्यात, साखरपुड्यात गुरवाकडून देवपूजा करून घेऊनच शुभकार्याला सुरुवात केली जाते. गावच्या देवळाचे पूर्ण वर्षाचे संपूर्ण व्यवस्थापन गुरवांकडे असते.

गुरवाचा एक खास भाषिक व्यवहाराचा शब्दकोश दिसतो. गुरवाळ, गुरवकी, गावकी, वर्षील, इनाम, देव, देऊळ, आरती, आरत, पूजा, उपवास, एकवाद, निवेद (नैवैद्य), फले, हार, गाऱ्हाणे, गंध, अंगारा, हळदीकुंकू, गुलाल, भंडारा, माळा, दागिणे, कापडे, आभूषणे, हुगला, हलगी, निवेद, नैवेद्य, प्रसाद, मुठल्या, नारळ, भकली, उदबत्ती, कळस, घाट, घंटा, तुळस, तेल, वहिवाट, दिवटी, पलोता, पालखी, पालखीचा गोंडा, झेडा, पताका, पतवा, दिवा, दिवाबत्ती, समई, वात, निरांजन, पंचामृत, पायऱ्या, पादुका, वस्त्र, धुपारती, काकडआरती, भजन, प्रार्थना, मागणं, नवस, नवसाचे फळ, कोपणे, पावणे, बेल, बेलपत्र, वात असे असंख्य शब्द गुरवांशी संबंधित आहेत.

**महार (नवबौद्ध)**

बारा बलुतेदारांपैकी महार हा फार महत्त्वाचा बलुतेदार होता. गावच्या कारभारात त्याला महत्त्वाची जबाबदारी असे. गावची 'म्हाई' यात्रा, लक्ष्मी, विविध सणांना गावात फिरवली जाणारी पालखी, देवाजवळ घातला जाणारा गाऱ्हाना इत्यादी कामात महार लागतो. त्यासाठी गावाच्यावतीने त्याला 'म्हारकी' कसून खाण्यासाठी दिलेली असते. महार गावकुसाबाहेर वस्ती करून असल्याने गावच्या आणि त्यांच्या भाषेत काही भेद दिसून येतात. विशेषत: उच्चाराच्या पातळीवर अधिक फरक जाणवतो. जनवावरांना ढोरं, ढॉर ओढणे, त्याला सोलणे, त्याचे वाटे घालणे आणि मांस सुकवणे याबाबतीत काही शब्द एकेकाळी या जातीत बरेच होते. ही काम या समाजाने टाकून दिल्यामुळे नवीन पिढीला हे शब्द माहिती नाहीत. चाण्या, करगोळ्या, चुनचुन्या, सोले हे शब्द या मांसाशी संबंधित आहेत. जनावर फार मोठे असल्याने ते एका वेळी खाऊन संपायचे नाही. त्यामुळे ते सुकवून ठेवण्याची प्रथा होती. वाळवलेले मांसाचे तुकडे म्हणजे 'चाण्या' किंवा 'करगोळ्या' होय. त्या नंतर तळून किंवा शिजवून खाल्ल्या जात होत्या. 'सोले' म्हणजे अशा मांसाचे लांब लांब धागे करून दांडीवर वाळवून बनवलेले मांस होय. महार जातीकडे 'ढोरे' ओढण्याची जबाबदारी होती. त्यामुळे गावात गोठ्यातील एखादे जनावर 'ओढाळ' असेल तर त्याची 'दमणूक' सहन न होऊन 'तुला घातलं म्हाराच्या गाडग्यात' अशा शिव्या जनावराला दिल्या जात असत. हा समाज हिंदू धर्मामध्येच येत असला तरी, प्रेत जाळण्याची प्रथा या जातीत नाही. प्रेत पुरले जाते. त्यातून काही वेगळे शब्द आलेले आहेत. 'माती देणे' हा त्यापैकी एक शब्द. म्हारकी, म्हारताळ, तराळकी, वर्षील, जोहार, येसकर, बैतं, बलुतं, सागोती (मटण), कांजी (आमटी), बाय (आई) हे काही या जातीशी संबंधित शब्द आहेत. तर लेडा, डांटपित्तला अशा काही खास शिव्याही आहेत. तर 'म्हार सोडू नव्हे म्हारुड्यात आणि रेडा सोडू नव्हे पाण्यात' अशा वाक्प्रचाराबरोबरच म्हारडा अशा जातसदृष्ट शिव्या या जातीवरून समाजात रूढ असलेल्या दिसतात. महरांची देव 'म्हारताळ' हा आहे. एक उभी शिळा म्हणजे हा देव. या देवावर या समाजाची श्रद्धा असते.

म्हारकी, तरवाळकी, तराळकी हे शब्द महारांकडे असलेल्या शेतीलाही पडलेले आहेत. महारांच्या कुटुंबामध्ये 'वर्षील' फिरून येत असते. त्याला 'गावकी' असेही म्हणतात. गावकी असलेल्या कुटुंबातील लोक त्या वर्षाचे गावचे काम करतात. त्यामध्ये गावात 'सादवणे' हे एक मुख्य काम असते. बेंदूर सणाला पिंपळाचे टाळ घरोघरी देतो. यासाठी या दिवशी त्याला घरोघरी 'उंडऱ्या' (हा एक तांदळाचा पदार्थ) मिळतात. गावच्या पुजाऱ्याला महारच मदतगार असतो. तो देवळातील स्वच्छता आणि इतर कामे करतो. हे करणाऱ्या व्यक्तीला 'देव महार' म्हणतात. याला देवासमोर 'गाऱ्हाणा' घालण्याचा अधिकार असतो. गुरव गाऱ्हाणा घालत असताना हा मागून 'व्हय महाराजा' किंवा 'व्हय गा श्यामी म्हाराजा' असे म्हणत असतो. या म्हणण्याशिवाय गाऱ्हाणं पूर्ण होत नाही आणि पालखी उचलण्याल परवानगी मिळत नाही. महारांच्या प्रत्येक कुटुंबाने गावातील काही कुटुंबे बलुत्यासाठी वाटून घेतलेली असतात. त्या घरची झाडलोट करून रोज भाकरी मागितली जाते. भाकरी मागण्यासाठी 'भाकरी वाढाई...' म्हणत दिलेली भाकरी 'रोळी'त घेतली जाते. ही कुटुंबे त्यात्या शेतकऱ्याकडे 'खळ्यास येतात'. भात मळणीच्या वेळी खळ्याची झाडलोट करून विशिष्ट 'सुप्प' भात महार खळं म्हणून दिले जाते. त्याला 'खळ्यास येणे' किंवा 'बलुत्यास येणे' असे म्हणतात. काही वर्षांपर्यंत अनेक शेतकऱ्यांकडे म्हाराचे गडी 'वर्षीला'ने ठेवले जात. तर काही स्त्रियांनाही घर व शेती कामांसाठी वर्षभर 'ठराव' करून घेतले जात असे. या स्त्रिया त्या घरातील झाडलोट, सारवणे, शेण काढणे ते गायरेत नेऊन टाकणे, अशी सर्व काम करायच्या. महार समाजात व्यक्ती वारल्यानंतर प्रेत जाळले जात नाही. ते पुरण्याची प्रथा आहे. या समाजातही अंत्यविधीला जाणे पुण्य समजले जाते. असे जाण्याला 'मातीस जाणे', 'मरतुकीस' असे म्हटले जाते.

**चांभार**

चंदगडच्या बहुतांश गावांमध्ये चांभार आहे. चांभार हा चामड्याशी संबंधित व्यवसाय असल्याने चामड्याचे अनेक प्रकार या समाजातील लोकांना माहिती असतात. काही वर्षांपर्यंत 'व्हना'(चप्पल) बनवण्याबरोबर हा समाज पाण्याच्या

पिशव्या, मोटेच्या पिशव्या, पंपाच्या 'जिबल्या' देखील बनवत असे. या वस्तू आणि चप्पल बनवण्याची औजारे यांच्या जगण्याचा भाग असतात. त्यातून यांचा भाषिक व्यवहार विकसित झालेला दिसतो. या जातीतील औजारांचा आढावा घेऊ. रापी (चामडे कापण्यासाठीचे हत्यार), आरी (चामड्याला किंवा चप्पलेला छिद्र पाहण्यासाठी वापरले जाणारे हत्यार), अस्ती (चामडे कमविण्यासाठी वापरले जाणारे हत्यार), फळी (चामडे कापताना आधारासाठी वापरतात), दगड (हत्याराला ताजे तवाने करण्यासाठी), लास (चप्पलला मोळे मारताना आधारासाठी वापरले जाणारे साधन), पकड (खिळे/मोळे काढण्यासाठी), खुरपे (चमडे स्वच्छ करण्यासाठी), काटा आरी (चप्पल शिवण्यासाठी वापरले जाणारे हत्यार), अंगठाआरी (अंगठा लावण्यासाठी उपयोग), पंची (छिद्र पाडण्यासाठी), आंचपंच (पट्ट्यावर नक्षी काढण्यासाठी वापरतात) ही केवळ यांची औजारे नाहीत, तर यांच्या दैनंदिन वापरातील महत्त्वाचे शब्द आहेत. या शब्दांशिवाय यांचा भाषाव्यवहार पूर्ण होत नाही.

चांभार शेतकऱ्यासाठी मोटेच्या पिशव्या, गोफण, आसूड, घुंगरमाळा इत्यादी वस्तू बनवून देत होते. मोट, गोफण या वस्तू काळानुसार कालबाह्य झाल्या आहेत. परंतु, आसूड ओढला, आसूडी भाषा अशा प्रकारचे शब्दप्रयोग मात्र अजून आहेत. 'गोफणगुंडा' हा शब्दही वापरात आहे. हा व्यवसाय जनावरांच्या कातड्याशी संबंधित आहे. त्यामुळे चामडे, मुंडाले, सळपट्टी, शेपटी, शेपी, प्रेसचे चामडे असे काही शब्द या व्यवहारात येतात. 'बेत पाडणे' हाही शब्द खास चांभार व्यवसायात आहे. कच्च्या माड्यापासून चपला बनविताना माणसांच्या पायाच्या आकारानुसार चामड्याचा बेत पाडला जातो. पाडलेला बेत लोखंडी 'हस्ती'ने 'तकटला जातो.' तकटणे हा शब्दप्रयोगही यातूनच आलेला आहे. चामड्याची 'कापणी' रापीने होते. शेतकरी व्यवसायातील कापणी आणि चांभाराची कापणी यामध्ये खूप फरक आहे. कापलेले चामडे योग्य आकारानुसार शिवण्याच्या हत्याराला 'आरी' म्हणतात हे आपण पाहिले आहेच. चांभार समाजाकडून मराठीला मिळालेला अजून एक वाक्य प्रयोग म्हणजे, 'टाका घालणे' हा होय. 'टाका ढिला होणे' हा शब्दही त्यातूनच आलेला आहे. या व्यवसायातून आलेला 'जोडणी' हा शब्द चंदगड परिसारत शेतीच्या कामाची तयारी या अर्थाने वापरतात. तसाच तो अलीकडे राजकारणात खूप वापरला जाऊ लागला आहे. 'जोडणी करणे' याला त्यामुळे बरेच महत्त्व आले आहे. हा शब्द चामड्याचे दोन तुकडे एकत्र करण्यातून आपल्या भाषेत आलेला आहे. चांभार जातीत हा शब्द महत्त्वाचा व्यावसायिक शब्द आहे.

तयार चपलांसांठी चांभार लोक 'माल' असा शब्द वापरतात. माल संपला, माल आणला, माल तयार आहे. शिवाय या समाजाकडून 'गांडीखाली आरी आणि चांभार पोरं मारी', चपला झिजल्या, टाका ढिला झाला, आसूडाचा मार, मोट बांधणे, रिबीट मारणे, तळ ठोकणे (संदर्भ ऐतिहासिकही) असे वाक्प्रचार मराठी भाषेला मिळाले आहेत. नाल मारणे, पंजा, पान, पखाल, तळ, नाळ, टाच, पायतान, व्हान, अंगठा, शिलाई, शिळ, आसूड, सुलोचना, सळ, वादी, ब्रश, बारदाण, बांबू, बटाण (बटण), डबी, फरांडी, लेदर, पाल, दोरा, तेलडबी, छत्री, ताडपत्री, जोडणं, पिशवी, कानस, पॉलिश असे अनेक शब्द चांभाराच्या भाषिक कोशात येतात.

**व्यक्तिविषयक भाषिक कोश**

समाजात व्यक्ती हा महत्त्वाचा घटक. व्यक्तींच्या एकत्र येण्यातूनच समाज आकरतो. त्यामुळे समाजाच्या भाषिक कोषात व्यक्तीविषयक पुष्कळ शब्द दिसून येतात. चंदगडी बोलीत स्त्री, पुरुषांच्या लिंगाबद्दल वैशिष्ट्यपूर्ण शब्द आहेत. घो माणूस (पुरुष), बाईमाणूस (स्त्री), बापय, बायील, पॉर, पोरगा (मुलगा), पोर किंवा पोरगी (मुलगी) असे शब्द उपयोजिले जातात. चेडूमाणूस (अजून अविवाहित स्त्री-पुरुष) लिंबा (लग्न न झालेला) बाटका (धर्मांतरीत, लैंगिक गैरवर्तन केलेला), उंडगी (गावभर फिरणारी, अनैतिक व्यवहार केलली) असे काही शब्द आहेत. खज्जाळा (म्हातारा), खज्जाळी (म्हातारी), नेनता (समज नसलेला लहान मुलगा), घुळी (आडदांड वाढलेला), तर 'वळू' गावात असाच फिरणाऱ्याला म्हणतात. अशा व्यक्तीला चंदगडीत 'सुनकुत्रं' असाही एक शब्द आहे. चंदगडी बोलीत माणसाला बोलविताना वेगवेगळे संदर्भ ध्यानात घेतले जातात. लग्न झालेल्या स्त्रीस 'बायको माणूस','बाई माणूस' असे संबोधले जाते तर, लग्न झालेल्या पुरुषास 'बापय माणूस', 'बापय', 'झिलगो' असे संबोधले जाते. या शब्दप्रयोगात पुरुष किंवा स्त्रीला लग्न या सामाजिक संस्थेमुळे प्राप्त झालेला संदर्भ

ध्यानात घेतला आहे. जोपर्यंत स्त्री किंवा पुरुषाचे लग्न होत नाही तोपर्यंत त्याला 'बाई माणूस' किंवा 'बापय माणूस' म्हणून संबोधले जात नाही.

माणसाच्या समाजजीवनात लग्नसंस्थेला अनन्य साधारण असे महत्त्व आहे. स्त्रीसाठी तर ही संस्था बऱ्याचदा परीक्षा घेणारीच असते. माणूस म्हणून स्त्रीचे असणारे सामाजिक अस्तित्व लग्नसंस्थेशी घट्ट जोडलेले आहे. स्त्रीला जन्मल्यापासून तिचा सांभाळ करतानाच तिच्यावर लग्नसंस्था मनात ठेवूनच संस्कार केले जातात. 'परक्याचे धन' म्हणूनच तिला सांभाळले जाते. म्हणून तिला 'काचेच भांडे' अशी प्रतिमा दिलेली दिसते. या सगळ्यात तिच्यावर रीतीरिवाज, सामाजिक नियमने, लोकरीती, लोकनीती यांची बंधने येत असतात. या सगळ्यातून स्त्रीविषयक शब्दभांडाराची भर भाषेत पडत असते. तिच्या वागण्याबोलण्यातूनही तिला काही विशेषणे लावली जातात यातूनही विशिष्ट शिव्यांचीदेखील भर पडते. 'सिंदळकी', 'उंडगी', 'रांड', 'रंडकी', 'गावभवानी' अशा शब्दांची भर बोलीत पडलेली दिसते. या सगळ्या शब्दांच्या मुळाशी स्त्री आणि तिचे सामाजिक जीवनातील स्थान हेच केंद्रवर्ती असते. पुरुषाच्या बाबतीतही हेच लागू पडते. पुरुषाबाबतही 'उंडगा', 'फकीर', 'बायलभाड्या', 'घरगडी'; याबरोबरच 'बारतं', 'बुरसं'(घाणेरडा), 'खादबोडं'(खादाड), 'ढोरी' (गबाळा), 'ढोरीकल्ला'(गवाळा), 'लोळसा' (आळसी),'व्हळगा'(अज्ञानात बाता मारणारे), 'बुळगा' (भित्रा), 'हांडगा' (बायकी), 'हांडगोळा' (बायकी), 'टिळका'(हागवण लागलेला), आपसवराती (स्वार्थी) असे कितीतरी शब्द चंदगडी बोलीत व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडवणारे आहेत.

चंदगडी बोलीतील 'छिनाल', 'उडंगी', 'गावझवी' हे शब्द स्त्रीच्या सामाजिक वर्तनातून आलेले आहेत. 'उंडगी' म्हणजे बिनकामाची रिकामटेकडी (रिकामचोट) असणारी स्त्री 'गावझवी' किंवा 'हुसभुरकी' या शब्दांच्या मुळाशी स्त्रीचे सामाजिक गैरवर्तन असल्याचे ध्यानात येते. ज्या स्त्रीचे वर्तन सामाजिक नियमांना धरून नसते अशा स्त्रीला समाजाच्या दृष्टीने बदचलनी ठरविले जाते. त्यामुळे अशा वर्तनाशी संबंधित शिव्या व शब्द चंदगडी बोलीत आढळतात. 'रांडे', 'बोडकी' यासारख्या शिव्या याचे उदाहरण म्हणून घेता येतील. तर पुरुषाच्या सामाजिक वर्तनाशीही 'घरकोंबडा', 'उंडगा', 'सुनकुत्र', 'केडगं', 'बेरकं', 'कळखोचरा', 'कळकोटा', 'भाड्या', 'बंद्य', 'रांडोळा', 'हांडगोळा', 'जोकता' (जोगता), 'बायकोळा' असे शब्द चंदगडी बोलीत आढळतात. 'घरकोंबडा' म्हणजे कायम घरात बसून असणारा पुरुष. 'उंडगा', 'सुनकुत्र' म्हणजे कायम रिकामटेकडा असणारा माणूस. कुठल्याही गोष्टीचा विचार आपल्या मनाप्रमाणे करून समोरच्याला कळू न देणारा, कुणाला न जुमानणारा माणूस म्हणजे बेरकं. सतत दुसऱ्यांची भांडणं लावणारा तो 'कळखोचरा' किंवा ''कळलाव्या आणि जाता येता दुसऱ्याची कळ काढणारा तो 'कळकोटा'. समाजातील माणसाच्या वृत्तीतून हे शब्द आले असल्याचे आपल्या लक्षात येते. माणूस आणि त्याची वृत्ती व सामाजिक वर्तनातून निर्माण झालेले असे शब्द चंदगडी बोलीत आलेले आपण पाहिले. या सर्व शब्दांच्या केंद्रस्थानी मानव व त्याचे सामाजिक वर्तन असल्याचे पाहावयास मिळते. त्याचबरोबर समाजातील स्थानानुसार 'पंच', 'जानता', 'व्यवहारी', 'देवमाणूस', 'वारकरी', 'संत' असे शब्दही चंदगडी बोलीत मोठ्या प्रमाणात वापरले जातात.

या शब्दांमध्ये गुणधर्मविषय शब्दभांडाराचाही विचार करता येईल. व्यक्ती तितक्या प्रवृत्ती असे म्हटले जाते त्याप्रमाणे प्रत्येक माणूस हा वेगळा असतो. त्याचे संपूर्ण जगणे, वागणे, बोलणे हे सगळेच एकमेकांपासून भिन्न असलेले पाहावयास मिळते. त्यामुळे प्रत्येक माणसाचे गुणधर्म वेगवेगळे असतात. पण काही मानवी गुणधर्म हे वैश्विक स्वरूपाचे असतात. ते सर्वत्र आढळतात. उदाहरणार्थ, आळस, खोटे बोलणे, स्वार्थ यासारखे गुणधर्म हे मानवी जीवनात सर्वत्र आढळतात. चंदगडी बोलीत आळसा, बुळगा, घाबरं, काचबारलेला, बुरसा, व्हगा, लोळसा, घोळबा, उतावळा, इदरकल्याणी, इरोधक, धुसफुसणे, गंडवूस, देखशिकवी, घरमोडी, चिक्कुमारवाडी, तोतडं, उडंगी, उधळो, भगली, आगाव, कळखोचरी, खज्जाळी, कुरडा, चापटर, चालू, डिसकोळी, बंडल, बेरकी, हागरा इत्यादी शब्द हे मानवी गुणधर्मविषयक असलेले दिसतात.

**शरीर आणि शारीरव्यवहार**

चंदगडी बोलीत काही गमतीशीर शब्द असलेले पाहायला मिळतात. चंदगडी माणूस जेव्हा दुसऱ्या एखाद्या माणसाला रागाने 'डोके मोडीन' असे म्हणतो तेव्हा 'डोके या शब्दाचा अर्थ पाय असा असतो. माणसाच्या शरीर अवयवाचा विचार करताना चंदगडी बोलीतील अनेक शब्दांमध्ये वेगळेपण जाणवते. करंगळीसाठी 'करांगळी', त्वचेसाठी 'चमडं', 'क्यास' केस नसलेल्या डोक्याला 'टकला', डोक्यासाठी 'डोचकं', कंबरेसाठी 'कंबार', तोंडासाठी 'थोबाड', 'मुसकाट', 'त्वांड', सुटलेल्या पोटासाठी 'कोथळा', 'ढेरी', डोक्यासाठी टकुरं, ढुंगणासाठी 'ढुंगाण', पायांच्या तळव्याला ''तळपाय', खोटेला 'खाट' यासारखे शब्द चंदगडी बोलीतील माणसाच्या शरीरअवयवांविषयी प्रचलित आहेत. केसांसाठी 'क्यास', कुरळया केसांना 'केंगरी केसं', तिरळया डोळयांना 'काने डोळे', ऐकू न येणाऱ्या कानांना 'फुटके कान' असा शब्दप्रयोग केला जातो. बाईच्या केसांसाठी बऱ्याचदा 'झिंज्या' असे संबोधले जाते. शरीराचे अवयव हे प्रत्येक माणसाला सारखेच असतात. परंतु, बोलीभाषांमध्ये यासाठी वापरली जाणारी भाषा मात्र वैशिष्ट्यपूर्ण दिसते.

चंदगडी बोलीमध्ये 'पासालणे' (झोपणे), 'कुरकुरणे' (तब्येतीची तक्रार), 'भोवाडणे' (चक्कर येणे), 'इव्हाळणे' (ओरडणे), 'कुतने' (कुंथणे), 'काचबारणे' (घाबरणे), 'यवदरणे' (ओरबडणे), 'खांजळणे' (खाजवणे), 'झिनझिण्या येणे', 'मुंगळ्या येणे' (शरीराच्या एखाद्या भागाला मुंग्या येणे), 'सरापणे' (शिव्याशाप देणे. हा शब्द 'शाप' वरून 'सराप' आणि त्यावरून 'सरापणे' असा तयार झाला आहे.), 'मुरकासणे' (नटणे, नखरे करणे), 'दिम्माख दाखवणे' (थोरवी सांगणे), 'हाऊळ घालणे'(दंगा करणे), 'गप्पगार बसणे'(शांत बसणे), 'देवासारखं बसणे' (शांत बसणे), 'कुडीस ठारा नसणे'(धडपड करणे), 'खाकारणे', 'इवळत बसणे'(कन्हणे किंवा एखाद्या गोष्टीबद्दल सतत नापसंतीपर बोलणे), 'गुळण्या करणे', 'वकणे'(ओकरी करणे), 'टिळाकणे', 'बुळाकणे'(हागवण लागणे), 'वसानणे' (स्वप्नात बडबडणे किंवा एखाद्या बद्दल सारखी सारखी तक्रार करणे), 'हासडणे' (खाणे), ठेचकाळणे (ठेच लागणे) यासारखे अनेक शब्द शारीरक्रियांशी संबंधित आहेत.

पासालणे म्हणजे झोपी जाणे. शक्यतो हा शब्द उपरोधिक अर्थाने येतो. कामधाम सोडून झोपलेल्या व्यक्तीला 'पासाल्लेस' असे म्हटले जाते. कुरकुरणे म्हणजे तक्रारीचा सूर आळवणे. भोवाडणे म्हणजे चक्कर येणे. ही भोवड अनेक अर्थाने येते. भोवणे (फिरणे), भोवड (शिकार) या अर्थाचे चंदगडी बोलीत काही शब्द आहेत. इव्हाळणे म्हणजे विनाकारण ओरडणे किंवा एकादी तक्रार वारंवार सांगणे. कुतने (कुंथणे) तर काचबारणे हा शब्द घाबरणे या अर्थाने वापरला जातो. यवदरणे म्हणजे ओरबाडणे. सरापणे म्हणजे शिव्या देणे. सराप हा शब्द 'शाप' वरून तयार झाला आहे. हाऊळ म्हणजे दंगा, कुडी म्हणजे शरीर, इव्हळणे म्हणजेही ओरडणे, वसानणे हा शब्द बराच काव्यमय अर्थान येतो. झोपेत बडबडणे म्हणजे वसानने. परंतु, हा शब्द चंदगडी बोलीत एकादी बातमी पसरवणे यासाठीही 'इनाकारणी वसनेत भोवा नको.' अशी वाक्य ऐकायला मिळतात.

याशिवाय नैमित्तिक शरीरव्यवहारातील प्रातर्विधी, लघवी, आंघोळ यासारख्या शब्दांना बोलीत वेगवेगळे शब्द असलेले पाहावयास मिळतात. परसाकडं जाणे, संडासला जाणे, हगायला जाणे, इरागतीस जाणे, इरडायला जाणे, पोटात इरड करून येणे असे प्रातर्विधीसाठी; तर मुतणे, धार मारणे असे लघवीसाठी शब्द प्र्रयोग असलेले पाहावयास मिळतात.

मानवी शरीराला वेगवेगळ्या आजारांची 'लागण' होते. सतत आजारी असणाऱ्या माणसास 'रोगट' म्हटले जाते. आजही गावातील एखादी म्हातारी शिवी देताना तुला 'गाठ उठली तुला' 'पटकीची गाठ यवो भाड्यास' असं म्हणते. आपण या शिवीकडे फारसे लक्ष देत नाही. या शिवीच्या पाठीमागं मोठी पार्श्वभूमी असलेली पाहायला मिळते. तर पूर्वी प्लेगची साथ यायची लोक गाठी उठून मरायचे. लोक त्याला मरिआईची गाठ म्हणायचे. या साथीत माणसाला शरीरावर गाठी उठायच्या आणि तो मरण पावायचा. ही एक गोष्ट या शिवी निर्माण होण्यामागे आहे. चंदगडी बोलीत खांडूक, किवंडा, वशीद, इंजिशेन, धनुरात, न्हंगडं (आजारी), सीक (आजारी) किरमं (सर्दी), फणफणने (ताप येणे), भोवळ येणे, बुळकण लागणे यासारखे

आरोग्याविषयक, आजाराशी संबंधित शब्द आढळतात. त्वचेला झालेली जखम या अर्थाने 'खांडूक' हा शब्द उपयोजला जातो.

**नातेसंबधवाचक भाषिक कोश**

भारतीय समाजव्यवस्थेत कुटुंबाला फार महत्त्व आहे. अलीकडील काही वर्षांपर्यंत एकत्र कुटुंबे मोठ्या प्रमाणात पाहायला मिळत होती. त्यामुळे नातेसंबंधांना आपल्या जीवनात विशेष स्थान होते. त्यातून परस्परांचे 'भावबंध' तयार होत होते. आई, वडील, भाऊ, बहीण, आजोबा, आजीबाई, पणजोबा, पणजी, नातू, नात, सासू, सून, लेक, आत्ती, मावशी, काका, चुलता, चुलती, मामा, मामी, मावसभाऊ, मावसबहीण, चुलतबहीण, चुलतभाऊ, मामेभाऊ, मामेबहीण, मेहुणा, मेहुणी, साडू, दीर, भावजय, नणंद इत्यादी अशी अजून खूप मोठी यादी मराठी माणसाच्या नातेसंबंधांची देता येईल. या शब्दांशिवाय मराठीत आण्णा, आप्पा, आवू, आबई असे कानडी भाषेच्या संपर्कातून आलेले शब्द आहेत.

चंदगडी बोलीत बाय, बायल, बापूस, भन, मेवणा, व्हन्नी, व्हंजी, मामा (सासरा), भावो, भाऊ, भन, वन्स, व्हंजी, मावसा, माससी, आत्ती, मावशाप्पा, जावाय, इवाई, ईन, चुलता, चुलती, ननंद, मामी (सासू), मामा-मामी, दीर, भावजय, जाऊ इत्यादी शब्द आप्तसंबंधविषयक शब्दांची भर घालताना दिसतात. आपली कुटुंबे वर्षानुवर्षे परस्परांना बांधून जगत असल्याने असे नातेवाचक शब्द मोठ्याप्रमाणात पाहायला मिळतात. बायकोसाठी 'बायल' यासारखे शब्द चंदगडी बोलीत वापरताना दिसतात. आईसाठी अनेक जातीत 'बाय' हा शब्द आहे. तर काही जातींमध्ये 'बाय' हा शब्द आजीसाठी आहे. सूनेची आई ती 'ईन' आणि वडिल ते 'इवाई'. वन्स (ननंद), 'मावश्याप्पा' किंवा 'मावसा' हे शब्द मावशीच्या नवऱ्यासाठी वापरले जातात. या नात्यासाठी मराठीत काका हा रूढ शब्द आहे. वहिनीसाठी 'व्हन्नी', तर 'व्हन्नू' आणि 'भावो' हे दोन शब्दही फार वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ते इतर बोलीत दिसत नाहीत. आत्याच्या मुलगीला 'व्हन्नू' आणि मुलग्याला 'भावो' असे शब्द चंदगडी बोलीत म्हटले जाते. सावत्र भावाल 'सवतीर भाऊ', तर आईच्या आईला 'मामाची आई' म्हटले जाते. आज्जीला आज्जी म्हणण्यापेक्षा या बोलीत आई किंवा 'म्हातारी आई' म्हणण्याची पद्धत जास्त आहे.

येथील समाजजीवनावर परंपरेचा फार मोठा पगडा आहे. त्यामुळे स्त्रिया आपल्या पतीचे नाव घेत नाहीत. पतीला बोलविताना हे, ते, ह्येनी, त्येनी अशी सर्वनामे वापरतात. स्त्री ही सतत घर आणि परंपरेत बंदिस्त राहिल्यामुळे आप्तसंबंधविषयक शब्दांमध्ये स्त्रियांच्या शब्दांचे जास्त करून वैविध्य असलेले दिसते. इन, मामी, आत्ती, व्हंजी, भण, व्हन्नी, वन्स, आत्त्यासाब यासारखे शब्द जास्त दिसतात.

**पाळीव प्राणी**

शेतकऱ्याचा बैल हा सर्वात महत्त्वाचा प्राणी. तो असेल तरच शेती होती. आता परिस्थिती बदलली आहे. ट्रॅक्टरने बैलांची जागा घेतली आहे. तथापि आजही अनेक कामांना बैल लागतातच. बैलांचे संगोपण हा शेतकऱ्याच्या संपूर्ण घरचा एक आस्था विषय. त्याच्यासाठी नाना तऱ्हेच्या गोष्टी घरात चालतात. हातात नारळाच्या 'शेंडी'पासून बनवलेली खरखरीत 'कप्पय' हातात घालून त्याला चोळणे. त्याच्या गळयात 'घाट' व 'घुंगूर' बांधणे, पट्टा घालणे, शिंगे 'कोंगळ्याने चकचकीत करणे, ती रंगवणे. सणासुदीला शिंगांना गोंडे बांधणे, उन्हात अंगावर झूल टाकणे, त्यांच्या आहाराकडे बारकाईने लक्ष देणे असे बरेच शेतकऱ्याच्या घरी चाललेले असते. त्यातून उजविणे, जुंपणे, सोगा टाकणे, वळवा टाकणे असे शब्द भाषेत येतात. चंदगडी बोलीत बईल, बैलं, मांजार, म्हस, म्हसरं, रेडकं, रेडा, तलंगी, तलंग, पालवा, पाट, कुत्रं, कोली इत्यादी पाळीव प्राणिविषयक शब्द असलेले दिसतात. या शब्दांमध्ये केवळ ध्वनी व उच्चारांमध्ये भेद असलेला पाहावयास मिळतो. प्रमाण मराठी भाषेतील बैल, मांजर, म्हैस, रेडा, रेडकू, तलंग, पालवा, कुत्रा हे शब्द चंदगडी बोलीमध्ये बईल, बैलं, मांजार, म्हस, म्हसरं, रेडा, रेडकं, तलंगी पालवो कुत्रं असे उच्चारले जातात.

चंदगड परिसर डोंगराळ आणि जंगलाने वेढलेला असल्याने जंगली प्राण्यांविषयी, झाडे आणि झुडपांविषयीचेही अनेक शब्द चंदगडी बोलीत आहेत. किटक, सरपटणारे प्राणी, जलचर, उभयचर, वनचर व पक्षी यांचे वास्तव्य या प्रदेशात अधिक आहे. या सर्व प्राण्यांची प्रमाणभाषेतील नावांची काही प्रमाणात उच्चारात मोडतोड करून चंदगडी बोलीत ते शब्द वापरले जातात. तर काही शब्द प्रमाणभाषेपेक्षा पूर्णपणे भिन्न असलेले पाहावयास मिळतात. गवा, गवा रेडा, कोला, वांदार, लांडगा, रानमांजार, रानकुत्रं, कोल्हं, आसवाल, साळींदर, घुबाड, माकाड, डुक्कार, हारण असे अनेक शब्द दैनंदिन व्यवहारात येतात.

किरवं म्हणजे खेकडा, बावगा म्हणजे वाघ, सावाज म्हणजे सांबार, वांदार किंवा मंग म्हणजे वानर, कुर्ली म्हणजे खेकडा हे शब्द मात्र पूर्णपणे चंदगडी बोलीचे नवीन शब्द आहेत. किरवं, मंग, बावगा, सावाज, कुर्ली हे शब्द प्रमाण मराठीतील शब्दांपेक्षा भिन्न असून चंदगडी बोलीची ती स्वतंत्र शब्दनिर्मिती आहे. या शब्दांमधील सावाज म्हणजे सांबार हा शब्द शिकारीमधून आला असावा. सावज म्हणजे शिकार पूर्वी सांबाराची केली जात असावी आणि त्यातून सांबरासाठी सावज व बोलीमध्ये सावाज म्हणून तो शब्द रूढ झाला असावा. मंगं किंवा वांदार हा शब्द वानर या शब्दासाठी उपयोजिला जातो.

**काळवेळविषयक शब्द**

चंदगडी बोलीत काळवेळाचे वैशिष्ट्यपूर्ण भाषिक भांडार दिसते. आवंस (अमावस्या), आवंदू (यावर्षी), गसाली (मागील वर्षी), यंदा (यावर्षी), यंदाई, आमुशा (अमावस्या), उद्याच्यान (उद्यापासून), कलच्यान (कालपासून), कव्वपासनं (कधीपासून), एकख्याप (एकवेळ), कव्वं (कधी), कव्वापास्न/कव्वच्यान (कधीपासून), इतकोर (इथपर्यंत), तितकोर (तिथपर्यंत), पुनाव (पोर्णिमा), पुनावेचे बरेच प्रकार आहेत. उदाहरणार्थ, रांडपुणव, चुडीपुणव, भिंबेची पुणव, नारळीपुणव, दवण्याची पुणव, इरडंपुणव, म्हाईची पुणव इत्यादी. तिनसांज (संध्याकाळ), मध्यान (मध्यरात्र), भगाटताणं (पहाटे), सांजेस, धुंदरुकीत (संध्याकाळी) धुंदरूक (संध्याकाळ), वरीस (वर्ष), गसाली (मागील वर्षी), निंबराचं/निंबरात (दुपारी), भगाटतानं किवा कोंबडा बोबोस (उजाडायच्या वेळी) इत्यादी शब्द आढळतात. याशिवाय यदवं (आत्ता), मागणं (नंतर), कव्वं (केव्हा), आज आठ रोज (एक आठवडा), पंधरादिस (पंधरवडा) इत्यादीसारखे काही शब्द काळवेळेचे सूचन करतात.

**वनस्पती**

चंदगड हा जंगलांचा प्रदेश आहे. कोकणच्या घाटमाथ्यावर हा परिसर असल्याने येथे मुबलक पाऊस त्यामुळे दाट झाडी दिसून येते. अलीकडील काही वर्षांमध्ये लागवडीचे क्षेत्र विस्तारत राहिल्यामुळे मोठ्या प्रमाणावर जंगल तोड झालेली आहे. अक्षरश: हजारो ट्रक्स लाकूड या परिसरातून दरवर्षी बाहेर जाते. त्यामुळे येथील जंगल झपाट्याने कमी होत आहे. याचा परिणाम चौतीस अंशापर्यंत सर्वोच्च तापमान असलेल्या या प्रदेशाचे तापमान अलीकडे अडतीस अंशापर्यंत पोहोचत आहे. उन्हाच्या झळा या प्रदेशातही वाहू लागल्या आहेत. जंगली झाडाझुडपांची तोड मोठ्या प्रमाणात होऊन काजू, आंबे यासारखी रोपे लावण्याकडे लोकांचा कल वाढला आहे. फणस, आंबा, काजू, सिसम, साग, रक्तचंदन, चंदन, हिरडा, धामीन, जांभूळ, पिंपळ, वड, करंजी, बेहडा, मत्ती, जितवण, कुकवीन, आंबाडी, आवळा, गुलमोहोर, बाभूळ, काटे सावरी, फनसवडा, बिबटी, बेल, भोकरी, नारळ, माड, रतांबी, हिवर, वाळुंज, शिवण, वावळ, मोह, सुरुंगी, भुत्या, ऑस्टरलीयन बाभूळ, केवडा अशी असंख्या झाडे या परिसरात आहेत. जंगली झुडमे त्यामध्ये करवंदी, चुरणांची झुडप फार जंगलातील लोकांसाठी फार मौल्यवान ठरली आहेत.

येथील झाडेझुडपे, फळे, फुले, भाजीपाला, वनस्पती यांनी या प्रदेशाला नवी ओळख दिली आहे. काजू, फणस, लाल मातीतील रताळी, बटाटे यासारख्या फळांनी चंदगडला स्वतंत्र ओळख दिली आहे. याबरोबरच येथील लोकांच्या आहरातदेखील इथल्या भाजीपाल्यामुळे नावीन्य असलेले दिसून येते. रानात पिकवल्या जाणाऱ्या भाज्यांबरोबर येथे

रानभाज्याही खूप मोठ्या प्रमाणात आढळतात. हे चंदगडी लोकजीवनाचे एक वैशिष्ट्य म्हणावे लागते. यामुळे चंदगडी बोलीत भाजीपाला, वनस्पतीविषयक शब्दांचीही भर पडलेली दिसते. फातरी, कामून्या, कांगनी, तपूव्या, गुणगुण्या, कुरडु, नाली, तोंड्या, चिन्या, मुरी, मुळा, भोपळा, बावची, वांगी, बटाटा, राजगिरीची, भाबा, पालक, सळपळीची, चिचुची, कागुव्याची, टाळीगळा, बांबू कामचे, आळंबी, चवाळी, आकुर, फणसाची, तेठाली, काटेली, वाळकाची, बेलवांगी, आंबाडी, आळू, मुरसोग्या, कावळीचं, पपईची, चचराची, वाळूक, तवसा, प्यार, पेरवं, चिबुड, बोर, वाल, फपय, बटाटो, चिन्नी, वायंगी, कामाटू, कारली, तेलच्या, सोले, दोडकं, चवळी, मसूर, हरबरा इत्यादी भाजीपाला व फळांविषयीचे शब्द आढळतात.

**कपडे आणि दागदागिने**

'देश तसा वेष' अशी एक म्हण प्रसिद्ध आहे. चंदगड हा लाल माती आणि अतिपावसाळी प्रदेश. त्यामुळे येथे कपडे त्यापद्धतीने वापरले जात होत. ढगळी अर्धी चड्डी आणि तेवढाच ढगळा शर्ट हा येथील पुरुषांचा मुख्य गणवेश. महिला सुती पातळ गुढग्यापर्यंत कासोटा बांधून राहतात. याला येथील निसर्ग जबाबदार आहे. अलीकडे मात्र या कपड्यामध्ये फरक पडत चाललेला दिसतो. लोक अशा पद्धतीने कपडे घालायला लाजताहेत. ते नव्या पद्धतीचे कपडे वापरू लागले आहेत. चंदगडी बोलीत विजार, चड्डी, पाटलोन हे शब्द पॅन्टसाठी वापरले जातात. 'आंगी' हा शब्द शर्टसाठी. मनिला, आंडरपॅन्ट, बनयाल, धोतार, पटका (फेटा), टावेल, घुंची, परकर, पाताळ, सावलं, चोळी, झंपर, बावडी असे शब्द व उच्चार कपड्याविषयीच्या शब्दांचे आहेत. जुनी पिढी शर्टला शरट, विजारला इजार, पॅन्टला पाटलोन, असे उच्चार करताना दिसते.

दागिन्याबाबतचा शब्दसंग्रहही वैशिष्ट्यपूर्ण दिसतो. पाटल्या, मणीमंगळसूत्र, नथ, कमरपट्टा, झुब्बे, गोंडा, काकणं, बांगड्या, पाटल्या, जोडवी, पैंजन, आंगठ्या, तोडे, नथ, नथनी, लक्ष्मीहार, चप्पलहार, दंडपट्टे, कडी, पेटी, वाळ्या, भीकबाळ्या असे अनेक शब्द दागिन्यांसाठी आहेत.

**सण-उत्सव**

भारतीय समाज सण आणि उत्सवप्रिय आहे. हजारो वर्षांची परंपरा असलेल्या या देशात शेकडो वर्षांपासून चालत आलेल्या चालीरिती, श्रद्धा, समजुती निष्ठेने जोपासल्या जातात. अशाच अनेक सणउत्सवांनी मराठी माणसाचेही भरणपोषण केले आहे. म्हणूनच असेल मराठी माणूस 'रीण काढून सण' साजरा करतो. शहरांपेक्षा खेडोपाडी सणाचे एक भारावलेले वातावरण असते. शहरी जीवनातील समृद्धीत सणांचे अप्रुप हरवून गेले आहे. खेड्यातील शारीरिक कष्टाच्या कामातून अगदी उंसतीसाठीच सण येतात. रोजच्या धबडग्यात गोडधोड करता न येणाऱ्या येथील कष्टकऱ्यांना सण पर्वणीच वाटते. देव, विधी आणि नैवैद्यासाठी केले जाणारे गोडधोड पदार्थ यामुळे एक सणाचे वातावरण तयार होऊन जाते. त्यातून परंपरागत चालत आलेली विधीगीते, लोकगीते सणांना मोठ्याप्रमाण म्हटली जात असल्याने वातारवणातच एक गेयता येते.

अशा सणउत्सव विषयक शब्दांनी चंदगडी बोली समृद्ध असलेली दिसते. गुढीपाडव्याला वर्षाची सुरुवात होत. गुढीपाढव्याला 'पाडवा' असेच म्हटले जाते. निंब, डाळ, हिरवी करवंदे, कैरी, गुळ यांचा एकत्रित काला म्हणजे या सणाचा नैवैद्य असतो. आबंट, तुरट, गोड, कडू अशा सर्व चवींची मिसळण खाणं म्हणजे नव्या वर्षाचे स्वागतच असते. या दिवशी शेतकरी शेतात जाऊन कामाची सुरुवात करतो. किमान तास, अर्धातास काम करून तो या दिवसाची सुरुवात करतो. 'नाग' म्हणजे नागपंचमी. नागपंचमी फार मोठ्या उत्सवाने साजरी केली जाते. स्त्रियांसाठी या सणाचे विशेष महत्त्व असते. नवरात्री, दिवाळी, दिवाळीचा पाडवा, गणपती, बेंदर, नारळी पुनव, चुडी पुनाव, आकाडी, दसरा, शिमगा असे अनेक सण चंदगड परिसरात मोठ्या उत्सवाने साजरे केले जातात.

या सणांना निवऱ्या, घुगऱ्या, ल्हाया, पिठांचे लाडू, निवऱ्या, उंडे, उंडऱ्या, भुजाने, गुळाचे लाडू, चिवडा, खीर, पोळ्या, मटण, वडे, गोड उंडे, घवणं, रासाळ्या, तेलच्या असे अनेक प्रकारचे खाद्यपदार्थ केले जातात. चंदगड परिसरात भात हे मुख्य पीक असल्याने तांदळाच्या पिठापासून बनवलेले खाद्यपदार्थ मोठ्या प्रमाणात केले जातात.

**लग्नविविधीविषयक शब्द**

लग्न ही भारतीयांच्या सामाजिक जीवनातील महत्त्वाची घटना समजली जाते. विवाह हा संस्कार मानला जातो. लग्नविधीचा कालावधी पाचसहा दिवसावरून आता एका दिवसावर आलेला आहे. तथापि, बहुतांश भागात दोन दिवस हा विधी धुमधडाक्यात साजरा केला जातो. हा विधी साखरपुड्यापासून सुरू होतो. साखरपुड्यापूर्वी 'लग्न ठरवणे' हा भाग मुख्य आहे. यालाच 'वाङ्निश्चय' असे म्हणतात. याला चंदगडी बोलीत 'ठराव' असा शब्दप्रयोग केला जातो. लग्नाच्या निमित्ताने नवे पाहुणे तयार होणे, जुन्या नात्यांना उजाळा मिळणे, अनेक दिवसांनंतर नातेसंबंध एकत्र येणे, परस्परांची भेट होणे, संवाद वाढणे अशा अनेक गोष्टी घडतात. विवाह हा नातेसंबधांना समाजमान्यता घेण्याचाच भाग असल्याने समाजाचा सहभाग या विधीत वाढतो. आप्तस्वकीयांना निमंत्रणे देणे, येण्याचा आग्रह करणे, जेवणावळी उठवणे हा त्याचाच भाग आहे.

या विधीचे महत्त्व समाजात मोठे असल्याने लग्नविधीशी संबंधित शब्दभांडार ही मोठे असते. चंदगडी बोलीत या विधीशी संबंधित काही खास शब्द आहेत. ठराव, देणंघेणं, साखरपुडा, मानपान, हळद, हुंडा, आयार (आहेर), नवरा, नवरी, धेडा (मुख्य करवला), धेडी (मुख्य करवली), होळ्या (लग्नविधीत या फार महत्त्वाच्या. सर्व विधी पार पाडण्याची जबाबदारी, लग्नगीते म्हणण्याचे काम यांच्यावर), शेस (आहेर), फेराव/फेरावा (आहेर), मदळास (लग्नानंतरच्या दुसऱ्या दिवशीचे जेवण), वाजाप (बँड), मांडव (मंडप), मंडपी, मेढी, रांगोळी, दिवा, निंब, करे, पाट, तळी, मुहूर्त मेढ, मद्दी (मेहंदी), हाळकुंड, काकान बांधणे (कंकन) मंडोळ्या, बाशिंग, हार, हारतुरे, मंगलाष्टके, दिस्ट (दृष्ट काढणे), आरतवान परतवान, दुरडी, कट्यार, गोंधळ, घुगूळ, नाव घेणे, घर भरणी, काकणं (बांगड्या) भरणं, गृहप्रवेश, रुखवत, व्हट्टी भरणे (ओठी भरणे), होम, अक्षता, कन्यादान, कानपीळी, सप्तपदी, पाठवणी, पंगत, वरात, पाचपर्तावन, धडवत, स्वरगत, स्वयरत, भासगा असे अनेक शब्द याविधीशी संबंधित आहे. हे भाषिक भांडार बारकाईने वाचल्यानंतर पारंपरिक हिंदू धर्म पद्धतीने केल्या जाणाऱ्या विवाह विधीचे स्वरूप, या विधीशी संबंधित प्रथा लक्षात येतात. या विधीबाबत लग्नाविधीसंबंधित गीतांची चर्चा करताना पुढे सविस्तर केलेली आहे.

एखाद्या प्रदेशातील भाषिक भांडार समजून घेणे म्हणजे तो समाज समजून घेणे असते. कारण समाजाच्या सर्व गोष्टी शब्दांमध्ये गोठलेल्या असतात. यादृष्टीने चंदगडी बोलीचा भाषिक कोश वरील काही घटकांच्या आधारे आपण समजून घेतले. चंदगड हा पूर्णत: ग्रामीण, डोंगराळ आणि मुख्य प्रवाहापासून दूर असलेला प्रदेश आहे. येथील मुख्य व्यवसाय शेती असल्याने सर्वात मोठे भाषिक भांडार शेती आणि शेतकऱ्यांसंदर्भाने तयार झालेले दिसते. एखाद्या प्रदेशातील जीवनव्यवहार अभ्यासन्यासाठी त्या प्रदेशातील लोकांच्या भाषिक भांडाराचे स्वरूप तपासून पाहता येते. लोकांचे सामाजिक जीवन सुखकर होण्यासाठी अनेक घटक समाजातच कार्यरत असतात. समाजात अनेक लहान मोठे व्यवसाय करणारे एकत्र येऊन परस्परांच्या गरजा पूर्ण करत असतात. गावगाडा अस्तित्वात होता तेव्हा गावे स्वयंपूर्ण होण्यावर भर देत होती. गावात नसलेल्या आवश्यक व्यक्तीला गावात आणून ठेवले जात असे. यामध्ये धार्मिक गोष्टींबाबत विशेष सजगता दिसते. हिंदू लोक बकऱ्याचा वगैरे बळी देतात पण त्यासाठी मुसलमानाने 'सल्ला' घालावा लागतो. त्यामुळे या कामासाठी गावात मुसलमान नसेल तर आणून ठेवला जातो. चंदगडमध्ये नवीन बसलेल्या काही गावांमध्ये गुरव गावात नसेल तर गुरव आणून ठेवलेले आहेत. इब्राहिमपूर या गावात प्राचीन जैन मंदिरे आहेत. परंतु, गावात जैन नाहीत. त्यामुळे पूजेसाठी बाहेरगावातून जैन पुजारी गावात आणलेला आहे. त्या कुटुंबाला उदरनिर्वाहासांठी चार एकर जागाही गावकऱ्यांनी उपलब्ध करून दिली आहे. गावं स्वयंपूर्ण होण्यावर भर द्यायची. समूहजीवन आणि परस्परांबद्दलचा सहानुभाव जोपासला जात असे. आज गावगाडा मोडकळीस आला आहे. नवे आणि आधुनिक पद्धतीने केले जाणारे उद्योगव्यवसाय वाढल्यामुळे पारंपरिक उद्योगांना उतरती कळा लागली. बलुतेदारी आणि आलुतेदारी संपली. परंतु, या सर्वाचे प्रतिबिंब असलेली बोली अजून वापरली जाते. बोली ही शेकडो वर्षाच्या सहजीवनातून घडत आलेले गोष्ट असल्याने ती सहजासहजी नष्टही होत नसते. एखाद्या प्रदेशातील समाजजीवनाचे अनेक संदर्भ त्या समाजाच्या बोलीत सापडत असतात. म्हणून समाजभाषाविज्ञानाचा एक दृष्टिकोन भाषेकडून समाजाचा अभ्यास करण्याचा आहे.

चंदगडी बोलीच्या अनुषंगाने वरती कल्पन्यात आलेली लघुक्षेत्रे म्हणजे समाजाचे संपूर्ण दर्शन नाही. वरील लघुक्षेत्रे केवळ काही उदाहरणे आहेत. समाजातील विविध क्षेत्राशी, जाती, जमातीशी संबंधित भाषिक कोशाची सुव्यवस्थित वर्गवारी करून शब्दांची नोंद घेतल्यास समाजाचे वास्तव चित्र समोर येते. त्या प्रदेशातील लोकांचे जीवन समजून घेता येते. त्यांच्या जगण्यातील बारकावे लक्षात येतात आणि एका मानवी समूहाची संस्कृती अभ्यासता येते.

❑❑❑

॥ चार ॥

# चंदगडी बोली : भाषाव्यवहार

कोणत्याही समाजाचे सर्वसामान्य स्वरूप समजून घेण्यासाठी त्या समाजातील भाषाव्यवहार (functional language) सूक्ष्मपणे समजून घेणे आवश्यक आहे. समाजाचा दैनंदिन व्यवहार भाषेतून समजून घेता येतो. व्यक्तीला सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत सतत बोलावे लागते. अनेकांशी संपर्क करावा लागतो. त्यातून त्याचे जीवन गतिमान होत असते. त्यासाठी भाषाव्यवहार आणि भाषासंपर्क या दोन्ही गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत. त्यामुळेच समाजभाषाविज्ञानात या दोन संकल्पना विशेष महत्त्वाच्या मानल्या जातात. प्रस्तुत प्रकरणात चंदगडी बोलीभाषकांचा भाषाव्यवहार आणि पुढील प्रकरणात भाषासंपर्क तपासणार आहोत. भाषा विकसित होत असते. तिच्यामध्ये नेहमी परिवर्तन सुरू असते. कारण भाषा समाजात नदीसारखी वाहती असते. भाषा वाहती असणे, म्हणजेच व्यवहारक्षम असणे होय. लोक बोलत असतात. परस्परांच्या संपर्कात असतात. गरजेप्रमाणे आपला संपर्क वाढवत आणि कमी करत असतात. त्यातूनच भाषा घडत राहते. तिच्यातील परिवर्तन सुप्तपणे सुरू राहते. हे परिवर्तन तात्काळ लक्षात येत नसले तरी, काळाच्या विशिष्ट टप्प्यांवर ते अभ्यासता येते. बोलीचा अभ्यास करत असताना बोलीतील परिवर्तन अभ्यासण्यासाठी लिखित पुराव्यांची वानवा जाणवते. चंदगडी बोलीसारख्या अलक्षित आणि लिपीबद्ध न झालेली बोली काळानुसार कशी घडत आली, हे सांगणे त्यामुळे फारच आव्हानात्मक बनते.

सुमारे दिडशे वर्षांपूर्वीचा चंदगडी बोलीचा १८८४ ला प्रकाशित झालेला उपलब्ध लिखित पुरावा 'चंदगड : समाज, संस्कृती आणि भाषा' या प्रकरणात आपण नोंदवला आहे. हा पुरावा अलक्षित करण्यासारखा नाही. कारण ब्रिटिश अभ्यासकांनी ही बोली प्रमाण मराठीपेक्षा वेगळी असून तिचे दोन भिन्न उच्चारविशेष आहेत, हे नोंदवून ठेवले आहे. ब्रिटिश अभ्यासक त्याकाळात अनेक दृष्टिकोन समोर ठेवून भटकत होते. त्यांचा अनेक प्रदेशांशी, व्यक्तींशी एकाच वेळी संपर्क होता. त्यामुळे त्यांच्या निरीक्षणांना फार महत्त्व आहे. चंदगड परिसरातील बोलीचे निरीक्षण करताना आपल्या विवेचनात ते या बोलीला नाव देऊ शकले नसले तरी, ब्राह्मणांच्या भाषेपेक्षा ही भाषा वेगळी आहे. या भाषेला त्यांनी स्पष्टपणे मराठीची बोली म्हटले आहे. इतकेच नाही या बोलीतील लहानसहान बारकावे त्यांनी टिपले आहेत. क्षेत्रविशिष्ट काही शब्द, त्यांचे उच्चार, क्रियापदांच्या रचना, बोलीतील भिन्न रूपे त्यांनी स्पष्टपणे नोंदवली आहेत. चंदगडी बोली अभ्यासाच्या वाटचालीत ही नोंद फार महत्त्वाची आहे. ब्रिटिश अभ्यासकांनी समाज, संस्कृती, खाद्यसंस्कृती, परंपरा, तेथील शेती, भूगोल, जंगले, पाण्याचे स्रोत, राहणीमान, सण, विधी, जंगले, जंगलातील जैववैविध्यता, पशूपक्षी या सर्वांची नोंद  घेतली आहे. या सूक्ष्म नोंदींमुळे भाषेची विस्ताराने नोंद होऊ शकली आहे. परंतु, ब्रिटिश सरकारनेच भाषेची नोंद घेण्यासाठी स्वतंत्र नेमलेल्या सर जॉर्ज ग्रिअर्सनच्या 'द लिंग्विस्टिक सर्वे ऑफ इंडिया'ने मात्र या बोलीची नोंद घेतलेली दिसत नाही. या प्रदेशातील बोलींबद्दल ग्रिअर्सनची निरीक्षणे वस्तुस्थितीदर्शक नाहीत. तर ब्रिटिशांच्या नोंदीच्या सुमारे दिडशे वर्षानंतर या बोलीत नक्कीच अनेक बदल झालेले असणार. परंतु, ते नोंदवता येतील असे संदर्भ आपल्या जवळ नाहीत. तेव्हा ही बोली अधिक स्पष्टपणे ऐकू येत असणार. आज शिक्षणाचा सर्वदूर पोहोचलेला प्रसार, शिक्षण घेण्याबद्दलची जागृती, वाढता संपर्क, दोन भिन्न भाषिक प्रदेशांबरोबरच सर्वदूर होत असलेला संचार यामुळे चंदगडी बोलीत खूप परिवर्तन झालेले आहे. हिंदी, इंग्रजीतून आणि प्रमाण मराठीतून आलेले अनेक शब्द आज या बोलीत अधिकाधिक वाढताहेत. अनेक शब्दांचे मूळ उच्चार कमी होऊन ते प्रमाण मराठीच्या उच्चारांकडे सरकू लागले आहेत. याबाबतची दोन गंमतीदार उदाहरण सांगता येतील. आमच्या गावच्या जिल्हा

परिषदेच्या केंद्र शाळेत शिक्षक विद्यार्थ्यांना शब्दांचा वापर आणि उच्चार प्रमाण मराठीप्रमाणे करण्याचा आग्रह करीत. त्यावेळी शिक्षणासाठी पोरांना झोडपून काढण्याचे पालकांचे आदेशच असत. त्यामुळे शिक्षकांचा प्रसाद घेतला नाही, असा एकही दिवस मुलांचा जात नसे. त्यातून मुलांमध्ये शिक्षणापेक्षा शिक्षकांबद्दल भयंकर दहशत. शिक्षकांनाही गावातील मुलांना प्रमाण भाषेत बोलायला शिकवण्यासाठीच आपली नेमणूक असल्यासारखे वाटे. तेच त्यांचे मुख्य शिक्षण. त्यामुळे मुलांना पुस्तकातील ज्ञानापेक्षा प्रमाण भाषेत बोलण्याचेच भयंकर दडपण येई. आमच्या या गावच्या शाळेतील एक किस्सा मला माहिती आहे. एक विद्यार्थी वर्गात गैरहजर होता. काही अडचणीमुळे घराच्या मंडळींनी बदली माणूस म्हणून त्याला जनावरे चारायला पाठवले. त्यामुळे इच्छा असूनही त्याला शाळेत येता आले नव्हते. दुसऱ्या दिवशी संबंधित शिक्षकाने हातावर जोरात छडी देत त्याला गैरहजेरीचे कारण विचारले. तेव्हा त्याने घाबरून 'आहोऽऽ, गुर्जी मी ढोराकनं गेलेलो' असे उत्तर दिले. हे उत्तर ऐकून मुलं आणि मास्तर खोखो हसायला लागले. हा किस्सा आजही त्याचे वर्गमित्र हसून सांगतात. प्रमाण भाषेत बोलण्याच्या नादान 'ढोराकनं' हा शब्द बोलीतील घुसल्याने त्याचे हसे झाले होते. दुसरा एक किस्सा माझाच आहे. हायस्कुलमध्ये विज्ञानाच्या तासाला शिक्षकांनी शरीराच्या कार्यपद्धतीबद्दल कोणतातरी प्रश्न विचारला. मला उत्तर देण्यासाठी उभे केले. मी त्या प्रश्नाचे उत्तर देताना 'माणसाच्या शरीरात' असे म्हणण्याऐवजी 'माणसाच्या अंगात' असे म्हटले. शरीराऐवजी 'अंगात' हा शब्द वापरल्यानंतर त्या शिक्षकांनी केलेला माझा अपमान मला आजही स्मरणात आहे. तर बोलीतील मूळ शब्द आणि उच्चार मागास ठरवण्याचे यथोचित शिक्षण शाळांमधून दिले गेल्यामुळे नवशिक्षित पिढी बोलीपासून दूर जाऊ लागली.

अशा पद्धतीने बोलीबद्दलचे दृष्टिकोन रुजवले गेल्यामुळे चंदगडी बोलीचे निजभाषकच ही बोली टाकून देण्यासाठी सरसावले. त्यामध्ये या बोलीचा प्रदेश प्रचंड मागास. दुर्गमही. पारंपरिक पद्धतीने जगणारा. बेळगाव आणि तालुक्यातील सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांनी लोकजागृती करून येथे शिक्षण आणले. हा प्रदेश हळूहळू प्रवाही बनला. शिक्षणाने नव्या जगाची ओळख करून घेऊ लागला. नव्या नोकरी धंद्याला लागला. येथील नवशिक्षित जेव्हा आपला प्रदेश सोडून बाहेर हिंडूफिरू लागला तेव्हा आपलीच बोली बोलायला लाजू लागला. सर्वत्रच बोलीबद्दलचे गैरसमज पसरले असल्याने बोली ऐकणारा आणि बोलणाऱ्या दोघांनाही आपण जणू अपराध करीत आहोत असे वाटे. प्रमाण भाषेत बोलणे म्हणजे सुधारलेला आणि बोलीत बोलणारा मागास असा नवा दंडकच झाला. त्यातून बोलीचे कधीही न भरून येणारे नुकसान झाले. त्यामुळेच चंदगड प्रदेशातील माणसाचे शेकडो वर्षांचे संचित लयाला जाण्याची वेळ आली. बोलीत बोलणाऱ्या लोकांची संख्या गतीने घटली. त्यामुळे बाहेरून पर्यटनासाठी येणारे अनेक लोक कुठे आहे येथे बोली? असा प्रश्न करतात. त्यांना येथे एक संपन्न आणि स्वत:ची वैशिष्ट्ये असलेली बोली आहे, हे सांगूनही पटत नाही. कारण त्यांच्या आजूबाजूचे लोक प्रमाण भाषेत बोलण्याला अधिक प्राध्यान्य देतात. अशा पद्धतीने आपल्याच बोलीला दुय्यमत्व दिल्याने अनेक पिढ्यांचे संचित, चंदगडची संस्कृती विस्मृतीत ढकलली जाण्याची प्रक्रिया गतिमान झाली. तथापि, आजही अनेक लोक चंदगडी बोलीत बोलतात. अनेक शब्द, म्हणी, वाक्प्रचारांचा वापर बोलताना करतात. स्त्रिया या बोलीत चालत आलेली लोकगीते गातात. ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. त्या आधारेच आपण आत्ता या बोलीचे स्वरूप उलघडून पाहू शकतो आहोत. त्यातून येथील समाजाचा आणि सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करू शकत आहोत.

येथे आपण चंदगडी बोली भाषकांचा भाषिक व्यवहार अभ्यासणार आहोत. चंदगडी बोली ही बऱ्याच मोठ्या प्रदेशातील लोकांची मातृभाषा आहे. या प्रदेशाबद्दल मागील प्रकरणात चर्चा येऊन गेलेली आहे. कोणत्याही बोलीच्या निजभाषकांना भाषेचे आणि संस्कृतीचे संस्कार त्यांच्या त्यांच्या बोलीतूनच होत असतात. हे निजभाषकांपैकी बहुतांश पुढे शिक्षित, उच्चशिक्षित झालेले असले तरी, त्यांना आपल्या भाषा-बोलीची सूक्ष्म जाण असते. विशिष्ट वयात त्यांचे भरणपोषण निजबोलीतून झालेले असल्याने त्यांना ती उत्तम प्रकारे ज्ञात असते. चंदगडी बोलीच्या संकलनाचे काम करताना हा अनुभव येत राहिला. अनेक उच्च शिक्षित बोलीच्या संकलनात सहकार्य करू लागले. त्यांना आपली मूळ भाषा आठवून पाहताना आनंद मिळू लागला. त्यांना आपल्या संस्कृतीचा पुनर्प्रत्यय येऊ लागला. आपला पूर्वीचा भाषिक व्यवहार आठवू लागला.

गावोगावी आजही जुनी माणसं हीच बोली वापरत असली तरी, घरातील सुशिक्षितांच्या सहवासात त्यांनीही अनेक जुने शब्द टाकून दिलेले आहेत. उदाहरणार्थ, 'न्हंगड' हा आजारपण सूचित करणारा शब्द न वापरता 'आजारपण आलय' असे लोक म्हणू लागले आहेत. जुने लोक आजारी पडलाय हे सांगण्यासाठी 'सीक पडलाय' असे म्हणत. 'सीक' हा शब्द इंग्रजीतून थेट चंदगडी बोलीत प्रवीष्ठ झालेला शब्द आहे. त्याचाही वापर जवळजवळ संपत चालला आहे. या शब्दाप्रमाणे सर्दीसाठीचा 'किरमं', 'आत' या अर्थासाठी वापरला जाणारा 'भुत्तूर' हा शब्दही कमी प्रमाणात वापरला जातो. या दोनतीन उदाहरणांतील 'सीक' शब्द इंग्रजीतून, 'किरमं' मालवणी-कुडाळी बोलीतून आणि 'भुत्तूर' हा शब्द 'भितर' या हिंदी, उर्दुभाषेतून चंदगडी बोलीत रुजला आहे. चंदगड प्रदेशालगत असणारी बंदरे, त्यातून चालणारा व्यापार, चंदगड मधून जाणारा प्रवासी मार्ग, या मार्गावरून ब्रिटिश-पोर्तुगीज लोकांचा नित्य वावर आणि गोव्यातून घाटावर येऊन धर्मप्रसार करणारे पोर्तुगीज यांच्या संपर्कातून 'सीक', बेस (चांगले) मूळ शब्द 'बेस्ट', असे शब्द चंदगडी बोलीत येऊन रुजले. वाटेसाठी आलेला 'मार्ग' हा देखील नवा शब्द होता. ब्रिटिशांनी आपल्या व्यापारासाठी नवे मार्ग निर्माण केले. या मार्गालगतचे शेत आपोआप 'मारग' झाले. लोक 'मारगाडे जाऊलोय' असे म्हणू लागले. आणि 'मारग' चंदगडी बोलीतील एक शब्द झाला. मालवण-कुडाळी बोली ही तर चंदगडला सर्वात जवळीची संपर्क भाषा आहे. चंदगडला शेजारच सिंधुदुर्गचा असल्याने कुडाळी-मालवणीतून चंदगडीत आलेल्या शब्दांची संख्या फार मोठी आहे. चंदगडीतून कुडाळी-मालवणीत गेलेल्या शब्दांचीही संख्या मोठी असणार आहे. मात्र हे शब्द कोठून कोठे गेले याबद्दल खात्रीपूर्वक काही सांगता येणार नाही. तर 'भुत्तूर' (भितरवरून) सारखे शब्द येथील मुसलमानी राजवटींच्या काळात चंदगडीत रुजले असले पाहिजेत. अशा हिंदी, उर्दू शब्दांचाही भरणा खूप मोठा आहे. अशा शब्दांची चर्चा आपण पुढे करणार आहोत. तथापि, या उदाहरणावरून येथील लोकांचा संपर्क आणि त्यातून झालेला भाषिक व्यवहार लक्षात येतो.

भाषेमुळेच समाजाचे अस्तित्व अबाधित आणि विकसित होत राहिले आहे. एकंदरीत 'भाषाव्यवहार' ही बाब मानवी जीवनामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. हा 'भाषाव्यवहार' बदलत्या समाजजीवनाबरोबर अनेक अंगांनी विकसित होत राहिला आहे. 'व्यक्त होणे' ही गोष्ट या व्यवहारामागे असल्याने; बदलत्या समाजजीवनाबरोबर मानवाने व्यक्त होण्यासाठी अनेक कल्पना शोधून काढल्या आहेत. एका भाषिक समाजातील सर्व सदस्यांकडून एका भाषेचे एकच एक रूप वापरले जात नाही. संपर्कव्यवस्थेमध्ये व्यक्ती बदलली, संदर्भ बदलला की भाषा बदलते. त्यामुळे एक व्यक्ती दैनंदिन व्यवहारात एकसारखी भाषा वापरताना दिसत नाही. एखाद्या व्यक्तीचे समाजातील स्थान, काळ, वेळ, परिस्थिती, वय, लिंग, प्रसंग इत्यादीनुसार भाषा वापरात वैविध्य दिसते. मानवी संप्रेषण ही एक व्यामिश्र प्रक्रिया असते. मानवी संप्रेषणासंदर्भात डॉ. रमेश वरखेडे यांचे मत लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात, 'मानवाचा संप्रेषणव्यवहार ही सरधोपट प्रक्रिया नसून अतिशय गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. माणसाचा एकूण वर्तनव्यवहार त्यात गुंतलेला असतो. साध्या दैनंदिन संभाषणातही काही लोकांच्या बोलण्याची शैली दुसऱ्यांना बोलते करण्याची असते, इतरांमध्ये रस घेणारी असते. तर काही लोकांची बोलण्याची ढब समोरच्या माणसाची इतराजी ओढवून घेणारी असते. झोंबणारा विनोद, उपरोध, उपहास, फटकळपणा, संभाषणातला खरखरीतपणा ह्यातून बोलणाऱ्याचे व्यक्तित्व, त्याचा जीवनविषयक दृष्टिकोन, त्याच्या श्रद्धा-समजुती सारे काही व्यक्त होत असते.' (संपा. रमेश वरखेडे, २००३ : पृष्ठ तीन) भाषेचा जन्म हाच मूळी व्यवहारपूर्ततेसाठी झालेला आहे. भाषिक व्यवहार पूर्ण करणे हे भाषेचे सर्वात महत्त्वाचे आणि मुख्य काम आहे.

व्यक्तीचा भाषिक व्यवहार विविध कारणांसाठी बदलत असतो. त्यामुळेच तो आकलनाबाबत गुंतागुंतीचा होतो. समाजाच्या भाषिक व्यवहार निरीक्षण केल्यानंतर भाषेतर्गत होणाऱ्या अनेक बदलांचे, भाषिक परिवर्तनच्या प्रक्रियेचे आकलन होते. भाषिक परिवर्तनामागील विविध कारणांपैकी 'भाषासंपर्क' हे सर्वात महत्त्वाचे कारण आहे. बदलत्या समाजजीवनामध्ये भाषासंपर्क ही अटळ अशी प्रक्रिया आहे. त्यामुळे भाषिक परिवर्तनाचे ते सर्वात प्रभावी कारण ठरते आहे. भाषासंपर्कासह इतर अनेक कारणांमुळे भाषिक परिवर्तन सुरू असते. परंतु, या प्रत्येक कारणामागे देखील संपर्काची प्रक्रिया कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्ष दिसतेच.

भाषिक परिवर्तनामागील राजकीय परिस्थिती या कारणाची मीमांसा करताना डॉ. गं. ना. जोगळेकर लिहितात की, 'भारताचा राजकीय इतिहास हा तर आक्रमणांचा आणि सत्तांतरांचा इतिहास आहे. बहुधा जेत्यांची भाषा जितांवर लादली जाते किंवा निदान जेते आणि जित यांच्या भाषांचा एकमेकींवर परिणाम होतो. हे साहचर्य दीर्घकाळाचे असेल तर हा परिणाम विशेष दृढ होतो आणि यातून शेवटी भाषेचे एक नवीन रूपच आकाराला येते.' (गं. ना. जोगळेकर, २००५ : पृष्ठ १४) येथे संपर्कामुळे भाषेवर होणाऱ्या परिणामाचे स्वरूप सूचित करावयाचे आहे. चंदगडी बोलीचा या अनुषंगाने वेध घेतलेला आहे. भारतीय इतिहास पाहता, राजकीय वर्चस्वाखाली असलेला प्रदेश हा बराच विस्तीर्ण आणि बदलता असे. त्या अनुषंगाने चंदगडी बोलीचा प्रदेश फार लहान त्यामुळे राजकीय वर्चस्वाच्या दृष्टीने विचारात घेण्याला अनेक अडचणी येतात. तरीही या प्रदेशातील अनेक राजकीय वर्चस्वांची चर्चा मागील प्रकरणात आपण केलेली आहे. बोलीच्या निर्मितीचा अभ्यास करताना ही गोष्ट अभ्यासने खूप महत्त्वाचे असते. ब्रिटिश भारतातून जाईपर्यंत या प्रदेशात अनेक राजवटींची सत्ता होती. परंतु, स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा प्रसार आणि नोकरी धंद्याच्या नव्या संधी यामुळे बोलीतील परिवर्तन गतीने झाले.

आज नानाविध कारणांसाठी माणसाचे स्थलांतर सुरू आहे. नोकरीनिमित्त होणाऱ्या बदल्या, नव्या नोकरीच्या शोधात नवीन गावातील वास्तव्य, परदेशातील नोकरीचे आकर्षण, औद्योगिकीरणाचा विस्तार, या विस्तारातून अनेक लोकांशी होणारा संपर्क यामुळे भाषिक परिवर्तन झपाट्याने सुरू आहे. अलीकडच्या काही वर्षांमध्ये भारतात शहरांचे स्वरूप झपाट्याने विस्तारते आहे. औद्योगिकतेमुळे विविध शहरे अस्तित्वात आली आहेत. या शहरांमध्ये विविध बोली भाषक नव्याने स्थिर होत असल्याने अशा महानगरांची एक भाषिक संस्कृतीही आकाराला आलेली आहे. प्रसारमाध्यमांमध्ये झालेली वाढ आणि त्यातील आधुनिकता याचाही भाषिक परिणाम होऊ लागला आहे. विशिष्ट दैनिक वृत्तपत्र राज्यात सर्वत्र वाचले जाऊ लागले. नभोवाणी, दूरदर्शन या माध्यमांमुळे सर्वांच्या कानावर एकाच स्वरूपाची भाषा पडू लागली. या सर्व घडामोडींचा खोलवर परिणाम बोलींवर झाला. चंदगडी बोलींचा विचार करताना या सर्व घडामोडींचा विचार करणे आवश्यक आहे.

**भाषाव्यवहार**

भाषा समाजाची असली तरी तिच्या वापराला अलिखित अशी सामाजिक बंधने असतात. समाजात कोणीही, काहीही बोलू शकत नाही. शिवाय भाषाव्यवहार आकलनाच्या कक्षेत करावा लागतो. कारण समाजातील प्रत्येकाची भाषा आकलन क्षमतेची काही मर्यादेत असते. नासातले संशोधन अशिक्षित शेतकऱ्याशी चर्चा करून चालणार नाही. किंवा शरीरशास्त्राचे किचकट ज्ञान त्याच क्षेत्रातील लोकांना अधिक चांगल्या पद्धतीने आकलन होऊ शकेल. भाषा-बोली समाजाच्या मालकीची असली तरी; तिचा वापर व्यक्तीकडून होत असतो. प्रत्येक व्यक्ती भाषा स्वत:च्या पद्धतीने वापरीत असते. भाषाव्यवहाराचे वस्तुनिष्ठ वर्णन करणे फारच कठीण असते. कारण एका प्रदेशातील समाजाकडून एकाच वेळी वेगवेगळ्या भाषा-बोलींचा वापर सुरू असतो. चंदगड परिसरातील भाषाव्यवहाराचे निरीक्षण केल्यानंतर चंदगडी बोलीच्या दोन रूपांबरोबर कन्नड, कोकणी, कुडाळी-मालवणी, दखणी या भाषांचा वापर करणाराही समाज या प्रदेशात मोठा दिसतो. त्याचबरोबर या प्रदेशातील लिंगायत, ख्रिश्चन धर्मीय, बेरड, नवबौद्ध समाजातील लोकांच्या बोलीरूपात लक्षात येण्यासारखे फरक आहे. हा फरक शब्दसंग्रह ते उच्चारविशेष या पातळीवर नोंदवता येईल. त्यामुळे चंदगडसारख्या खूप लहान भाषिक प्रदेशात एकाच वेळी इतक्या भाषा-बोलींचा वापर व्यवहारात दिसतो. काही वेळा या प्रदेशातील समाजाकडून वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये एकापेक्षा अधिक भाषांचा प्रयोग होतो किंवा एकाच परिस्थितीमध्ये एकाहून अधिक भाषांचा प्रयोग होतो. तर काही विशिष्ट प्रसंगी एकापेक्षा अधिक भाषांच्या मिश्रणाचाही वापर होतो. तरीही या संपूर्ण समाजाला एक भाषिक समाज म्हणता येईल. कारण या समाजाच्या भाषावापरात 'आंतरिक सुसंवाद' दिसतो. 'भाषिक समाज' अस्तित्वात येण्यासाठी सततचा संपर्क, नित्य भाषाव्यवहार म्हणजे 'सुसंवादित्वाची घनता' महत्त्वाची असते आणि ती येथील समाजात दिसते.

चंदगडी बोलीचा अभ्यास करताना, व्यक्तीचा भाषाव्यवहार आणि समाजाचा भाषाव्यवहार ही भाषाव्यवहाराची विभागणी करणे महत्त्वाचे वाटते. कारण काही निवडक व्यक्तींचा भाषाव्यवहार म्हणजे संपूर्ण समाजाचा भाषाव्यवहार ठरविणे शास्त्रीय ठरणार नाही. एका व्यक्तीच्या भाषाव्यवहाराचा विचार केला तरी; हा भाषाव्यवहार अनेक कारणांमुळे वेगवेगळी रूपे घेताना दिसतो. समोरील व्यक्तीनुसार तो बदलतो. या संदर्भात डॉ. रमेश धोंगडे लिहितात, 'व्यक्तीचा भाषाव्यवहाराचा गट असतो व छोट्या गटांची भाषाव्यवहार जाळी तयार होतात. व्यक्तीचा प्रत्यक्ष भाषासंपर्क येतो तो लोकसमूह फार लहान असतो. मात्र लोकांच्या व्यवहाराची भाषाव्यवहार जाळी अमर्याद असतात. भाषिक समाज ही मर्यादा घालणारी संकल्पना आहे, तर भाषकांचे छोटे गट आणि एकमेकांना जोडली जाणारी भाषाव्यवहारजाळी हे अमर्याद असे वास्तव आहे.' (रमेश धोंगडे, २००६ : पृष्ठ १६) एकंदरीत भाषाव्यवहार ही संकल्पनाच गुंतागुंतीची असून भाषाव्यवहाराचे विश्लेषण करणे त्याहून अधिक गुंतागुंतीची बाब आहे.

भाषाव्यवहाराचे स्वरूप तपासण्यासठी उदाहरणादाखल कौटुंबिक भाषाव्यवहार पाहता येईल. हा भाषाव्यवहार वर्ग, स्तर, राहणीमान, संपत्ती, प्रतिष्ठा, जात, धर्म अशा अनेक घटकांनुसार बदलताना दिसतो. एखाद्या मराठी कुटुंबामध्ये आजी-आजोबा, काका-काकी, आई-वडील, भाऊ-बहीण, आत्या अशी नाती दिसतील. या प्रत्येकाची प्रत्येकाबरोबर बोलण्याची भाषा एकसारखी असणार नाही. कोणी, कोणाला नावाने बोलवायचे, कोणाला अहो-जाहो म्हणायचे याचे नियम या भाषाव्यवहारामध्ये ठरलेले असतात. कुटुंबातील सर्वात लहान व्यक्ती सर्वांना आदरार्थी भाषा वापरताना आढळते. परंतु, स्त्रियांच्या बाबतीत वेगळी भाषा आणि पुरुषांच्या बाबतीत पुन्हा वेगळी भाषा दिसून येते. म्हणजे स्त्रीवर्गाला 'अगं आजी, अगं आई, अगं काकू' अशी जिव्हाळ्याची परंतु, एकेरी भाषा कुटुंबातील लहान मुले देखील वापरतात. पण हीच मुले आजोबांना 'अहो आजोबा', 'अहो बाबा', 'अहो काका' असे आदरार्थी बोलावतात. नातेसंबंधातील हा जिव्हाळा भाषेमध्ये देखील दिसून येतो.

पति-पत्नी, भाऊ-बहीण, आई-वडील-मुले या नातेसंबंधानुसार वेगवेगळी भाषा दिसते. शिवाय वय, काळ यानुसार देखील कौटुंबिक नातेसंबंधातील भाषा व्यवहारात फरक पडतो. कौटुंबिक नातेसंबंधातील स्त्रीची भाषा हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय होईल; एवढी वैशिष्ट्यपूर्ण आहे. रमेश वरखेडे यांनी स्त्रियांची भाषा आणि पुरुषांची भाषा यांचे वेगळेपण सांगताना म्हटले आहे की, 'मराठी भाषक समाजातही पुरुषसत्ताक समाजरचनेचा प्रभाव आढळतो. स्त्री-पुरुष संबंधात समानतेचे नाते नसल्यामुळे पारंपरिक हिंदू स्त्रिया नवऱ्याला कधीही नावाने हाक मारीत नाहीत. 'धनी', 'मालक', 'स्वारी', 'यजमान' अशा शब्दांनी नवऱ्याचा उल्लेख होतो. 'इकडचे येणे झाले', 'स्वत: गावाला गेले' अशा शब्दांनी ती नवऱ्याचा उल्लेख करते. तसेच भावोजी, मामंजी, वन्स इत्यादी नातेदर्शक शब्द फक्त स्त्रियाच वापरतात."(रमेश वरखेडे, २००१ : पृष्ठ ३९) याप्रमाणे चंदगडी बोली भाषा वापरणाऱ्या समाजातील विविधांगी भाषाव्यवहार अभ्यासता येईल.

**चंदगडी बोलीतील भाषाव्यवहार**

बोलीत होणारा भाषाव्यवहार प्रमाण भाषेपेक्षा नैसर्गिक, जिवंत असतो. तो अभ्यासण्यासाठी प्रत्यक्ष बोलीचे नमुने पाहणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने येथे आपण चंदगडी बोलीतील काही नमुने पाहू. चंदगडी बोलीचे दोन भेद स्पष्ट दिसतात, असे मागे नोंदवले आहेच. तथापि, अजून सूक्ष्म निरीक्षण केल्यानंतर अजून काही भेद स्पष्टपणे नोंदवता येतात. हे भेद काही शब्द, उच्चार आणि वाक्य बनवण्याच्या पद्धतीनुसार दिसून येतात. चंदगड परिसरातील बेळगावच्या मार्कंडेय नदीच्या आजूबाजूच्या परिसरात बोलीचा एक वैशिष्ट्यपूर्ण नमून आहे. ही बोली बेळगावी बोली म्हणून ओळखली जाते. बेळगावचा परिसर, खानापूर, हुक्केरी, चंदगड परिसरातील अनेक गावांमध्ये ही बोली थोड्याफार फरकाने सर्वत्र बोलली जाते. या बोलीचे दुसरे रूप किणीकर्याद परिसरातील गावांमध्ये बोलले जाते. या दोन्ही रूपांवर कानडीच्या उच्चार विशेषांचा प्रभाव आहे. तर हलकर्णी परिसरातील मध्यवर्ती गावे वेगळ्या पद्धतीची चंदगडी बोलतात. या परिसरात बोलल्या जाणाऱ्या बोलीवर कोकणी आणि कानडी दोन्हीचा संमिश्र प्रभाव दाखवता येतो. तर चंदगडच्या पुढील आंबोलीकडे जाणाऱ्या रस्त्यावरील



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

आणि तिलारीकडील गावे जी बोली बोलतात त्या बोलीवर कोकणी, मालवणी आणि कुडाळी या बोलींचा स्पष्ट प्रभाव आहे. ज्या त्या परिसरातील लोकांच्या संपर्कानुसार हे प्रभाव दिसून येतात. या सर्व प्रभावांची सविस्तर चर्चा प्रस्तुत प्रकरणात आपल्याला करायची आहे. यासाठी चंदगडीच्या भाषिक प्रदेशातील विविध ठिकाणी बोलल्या जाणाऱ्या बोलीतील संवादांचे नमुने प्रत्यक्ष चर्चेला घेणे अधिक सयुक्तिक ठरणार आहे. त्यानुसार काही नमुने दिलेले आहेत.

**नमुना १ : दरशन दे गं आई, धोंड्या गाणं गाई**

पुनाव झाल्यावर सुक्रवारी गावातली लोकं गेल्ली यल्लुबाईस. धोंड्याच्या घरातलीबी गेल्ली. चक्कोट तीनचार दिस वस्तीसच डोंगरार जात्यात. आज आईतवारी गावातली लई लोकं जाऊलली. बारक्यामोठ्या धा गाड्या व्हत्त्या. धोंड्याबी जाऊस नटलं. खर उठोस येळ झाल्ला. गडबडीत आंघोळबिंघोळ केल्यान नि ट्रॅक्सात बसोस गेलं. म्होरच्या शिटवर जागा पायजे म्हनून भांडोललं. कव्वंबी येऊन पायजे तिथे जागा गावताय व्हय. गप्प गुमान मागे जाऊन बसलं. सक्कासक्काळी लई घानल्या गाळ्या देऊलं. मिय्या म्हटलो, 'ऱ्हाऊ दे घे धोंड्या, दांडगी हाईत ती त्यास्नं कश्या उग्गीच गाळ्या देऊलेसाय!'

तर म्हनुलं, 'बाईस न्ह्युन तिनशे रुपय मेजून घेतल्यानीत नि.'

मिय्या म्हटलो, 'व्हय खरं, सगळीच काय म्होरे मावनं न्हाईत! ऱ्हाऊदे. शांत घे. तुझ्यातच देवी शिरल्यागत करू नकोस.'

शांत झालं खरं. तरीबी बडीबडीतच व्हत्तं. आधी कधी जाऊस न्हव्हुतं. त्येची ही पयलीच पाऊट यल्लुबाईस जातली. बेळगावच्या म्होरे गेल्यावर मधी च्या पियोस गाडी जरा थांबीवल्यानी. खरं म्होरे बसली खलीबी उतरोस न्हाईत. त्यास्नं म्हाईत व्हत्तं धोंड्या टपोनच बसलंय. उठलाव की जागा जाताय. तरीबी धोंड्या म्होरे गेलं नि त्या तात्यास म्हनुलं, आगा तिय्याच बस खरं, जा वायचा हूनहूनीत च्या पिजा थंडाचं. तव्वं म्होरची च्या पियोस गेली. धोंड्या भडाकलं की खल्यास आईकन्नाय. खरं बगीतलेस त त्येच्यागत शांत खलंबी खलं न्हाय...

सोगल सोमनाथास जरा थांबल्यानी. तिथे नि दांडगे दांडगे गुंडे व्हत्ते. तिथे पायाबिया पडलाव आनि गेलाव जोगंभावीस. तिथे लोकं लिंबबिंब नेसोन देवळाभोवत्यान भोवेत. तिथल्या तिर्थकुंडात न्हाईत. हिथल्या पाण्यात न्हाल्यावर अंगावरची दुःखं वाळत्यात म्हनी. धोंड्याबी त्या पाण्यात बुचकाळलं. मानं यल्लुबाईस गेल्यानी. गावातनं यल्लुबाईस पोचोस चक्कोट तीन तास लाले. पोचल्यावर घरातल्यास्नं आनि गावातल्यास्नंबी भेटलं. उधं गं आई उधं.... उधं... ह्यो आवाज सगळीडे घुमोलाच. सगळयांच्या पाया पडलं. सगळी भंडारा लावीत. कपाळ भांडाऱ्यान मुजोन गेलं. मानं सगळी मिळोन दरशनास गेली. आगं बाईऽऽ बाईऽऽ बाईऽऽ कव्हढी बाबा गर्दी ती. भंडारा आनि माणसांनी सगळं मुजोन गेल्लं. दरशनाची रांकबी दांडगी व्हत्ती. दरशन घ्युसाठनं गेल्यानी तर तिथे नि म्हनीत शंभर रुपय देवा नि लौकर दरशन घ्येवा. धोंड्या म्हनुलं, त्तिचीभन्या यक दिस खाडा करून वर आनि तिनशे रुपय देऊन हिथपतर आलावात आनि म्हनी हिथे शंभर रुपय देवा. लौकर दरशन घ्येवा म्हनी. नशेना त्ये... कव्हढा येळ उभा ऱ्हाऊचा लागताय तव्हढा लागोदे. खरं रांकेतनंच दरशन घेयाचं! आसं म्हनून उभे ऱ्हाली सगळी लंबरात. उधं गं आई उधं... उधं... म्हनीत भंडारा उधळीत रांकेत म्होरे सरदोली. आत्तं दरशन व्हईल, मानं दरशन व्हईल, म्हनून वाट बगुली तर चक्कोट चार तासान दरशन झालं. तिथे दरशन घ्युस गेलावात तर सरीऽऽ... सरीऽऽ... म्हनून म्होरे ढकलूस नि दोन मानसं पाठीवर. धोंड्या म्हनुलं, 'आगा ढकलू नकोस की गा... चार तास उभारोन लंबर लागलाय. दरशन तरी सपय घेऊसदे...' त्ये कानडी व्हत्तं त्येलाबी काय कळोस न्हाय, त्येनं आपला पट्टा चालूच केल्यानाय सरीऽऽ... सरीऽऽ... धोंड्या त्येच्येडे रागान बघीत म्होरे गेलं.

म्हातारी कोतारी, तरनी, बारकी पोरं, नवीन लग्नं झाल्ली जोडपी आशी लईबी लोकं आल्ली. सगळयांच्या आंगा-तोंडावर भंडारा व्हत्ता. परसाद, खेळणी, आईसकिरीम, थंड्याची दुकानंबी व्हत्ती. हिकडी रांदून ठेवल्यानी. सगळी लोकं यका जागेस आली. गावातली जत्रा भरल्यागत लोकं व्हत्ती. तिथे मोकळ्या जागेस पडल्या मांडल्यानी, गाराना घातल्यानी, पडल्या भरल्यानी. उधं... उधं... आसा आवाज घुमे. कुणा कुणाच्या अंगात देवी यई. काय काय सांगे. पाया बिया पडलाव. तिंचं

सगळं आटापल्यावर रांदल्यानी तो परसाद सगळ्यास्नं वाढल्यानी. आम्ही भोवोभोवोन दमलाव. पाटभर जेवलाव. यकदा जेवल्यावर तिथे काय काम! आम्ही गावाडे परत जातली तयारी करुलाव. धोंड्यास म्हटलो, 'हु, चल आत्तं लौकर. म्होरे जागा गावताय काय बघूया.'

धोंड्यान मला गोटास नेल्यान आनि हाळूच म्हनुलं, 'तिय्या जा. मिय्या आत्तं काय येन्नाय. हिंचेबरोबर यतो परवादिशी म्हारक मळत्यात तव्वं.'

मिय्या म्हटलो, 'बायले यतो म्हनुलेस नि हे आनि कव्वं बदललेस?'

धोंड्या हाळूच म्हनुलं, 'आरे तुला म्हाइतच हाय की मला पोरया ठरेनात. ते जरा मागणं मागतलं व्हत्तं देवीडे. तो म्हसोबा मागणी मागोसच देईना की. सरीऽऽ सरीऽऽ म्हनून पाठीवरच व्हत्ता नि. उद्ये आनि यकदा जातो नि मागणं जरा मागून बघतो. काय झालं तर झालं!'

मिय्या कपाळास हात लावीत म्हटलो, 'बायले तसलं काय नसताय रे.'

तर म्हनुलं, 'आत्तं आयनाशी आलावातच तर बगूया की यक ख्याप परयत्न करून, काय झालं तर झालं.' बायले हेचं काय खरं न्हाय म्हटलो नि मिय्या गाडीत जाऊन बसलो. धोंड्याच्या नशिबात कुठली देवी यते काय की... ह्ये आत्तं मंगळवारीच येताय म्हारक मळतल्यादिशी... तुम्हीबी यवा जेवान आसतंय. खलेटे म्हनून काय इचारुल्याशित? हिथेच की मळवीत... यत्याशी नय्... यल्याशी तर धोंड्याची वळख करून देतो तुमास्नं...!

*(हणमंत जयवंत पाटील, कालकुंद्री)*

वरील उताऱ्यात चंदगडी बोली बोलणाऱ्या लोकांचा जिवंत व्यवहार शब्दबद्ध झालेला आहे. या व्यवहारात यल्लम्मा देवीला जाण्यासंदर्भातील, जातानाच्या प्रवासातील, सौंदत्तीच्या डोंगरावर गेल्यानंतरचे संवाद आले आहेत. हे संवाद गावातील एकाच स्तरातील, समवयस्क लोकांशी केलेले आहेत. या संवादांतून देवदासी प्रथेबद्दलचा मागे पाहिलेला भाषिक कोशही ऐकायला मिळतो. हा भाषिक व्यवहार चंदगड परिसरात आजही सुरू असलेल्या रेणूका देवीच्या भक्तीबद्दल फार बोलका आहे. येथील लोक या देवीच्या नादी लागून अनेक अघोरी कृत्ये करीत होती. त्यातून मुलं देवाला सोडणे, देवदासी होणे, अंगात देवी येणे असे अंधश्रद्धेचे बरेच प्रकार चालत होते. हे प्रकार येथील भाषिक कोशात खूप अर्थपूर्ण आहेत. एखादी व्यक्ती घरचा कामधंदा न करता नुसतेच फिरून दिवस काढत असले तर 'तुला काय देवास सोडल्यानीत काय?' असे त्याला सरळ म्हटले जाते. ते या प्रथेवरूनच रुजलेले भाषिकरूप आहे. देवाला मुलंमुली सोडण्याचे प्रस्थ अलीकडे कमी झाले असले तरी, 'देवीचे महात्म्य' ओसरलेले नाही. हा भाषिक व्यवहार त्याबद्दलचा प्रातिनिधिक चित्र रेखाटतो. आजही लोकांची श्रद्धा सौंदत्तीच्या डोंगरावरील यल्लम्मा देवीची आहेच. कधी काळी अनेक दिवसांचा बैलगाडीचा प्रवास करत जाणारे भक्त आता भाड्याच्या चारचाकी गाड्या घेऊन जातात. त्याचे हे चित्रण आहे.

या उताऱ्यात पुनाव, सुक्रवार, धा, कव्वबी, दरशन, परयत्न हे येथील बोलीच्या उच्चारणाबाबत विचारात घेता येतील. 'पुनाव' हा शब्द पोर्णिमासाठी वापरला जातो. शुक्रवार, दहा, केव्हाही, दर्शन, प्रयत्न या शब्दांची उच्चारणे सुलभीकरणातून बदलली आहेत. जवळजवळ प्रत्येक बोलीत अशी सुलभीकरणशची प्रक्रिया सुरू असते. त्याला चंदगडी बोली भाषक अपवाद नाहीत. हे सुलभीकरण बोलीच्या उच्चारणवैशिष्ट्यांनुसार होताना दिसते. तर म्होरच्या (पुढच्या), कव्वंबी (केव्हांही), घानल्या (वाईट, घाणेरड्या), गाळया (शिव्या), दांडगी (बरीच, खूप, मोठी), मेजून (हिशोब करून), मावनं (बसत नाही), टपोनच (टपून बसणे), हूनहूनीत (गरम, गरम), खलंबी (कोणीही), गुंडे (दगड), मुजोन (भरून, सर्वत्र पसरलेला), लंबरात (लाईनमध्ये), चक्कोट (चांगले), सपय (सरळ), भोवोभोवोन (फिरून फिरून), पोरया ठरेनात (लग्न न ठरणे), आयनाशी (आयते, अनायसे), आइतवार (रविवार), म्होरे (पुढे), पाऊट (खेप, एकदा), वायचा (थोडा), भडाकलं (रागावला), रांदून (स्वयंपाक करून) सारखे चंदगडी बोलीतील शब्द आणि गेल्ली, जाऊलल्ली, झाल्ला, नयलं, बसलं, जाऊस, जऊस, न्हऊतं, जाताय, यताय अशी क्रियापदाची रूपे येथे पाहता येतात. लल्ली, ल्ला, लं, स, तं, य असे प्रत्यय या बोलीत मोठ्या

प्रमाणात वापरले जातात. हा व्यवहार ज्या किणीकर्याद परिसरातील आहे, त्या परिसरात तिच्चीभन्या, बायले, चक्कोट, पाटभर, व्हय गा असे खास शब्द वापरात आहेत. हे शब्द येथील भाषिक व्यवहारात मोठ्या प्रमाणात वापरात असलेले दिसतात. 'पोटभर' या अर्थासाठी येणारा 'पाटभर' हा शब्द केवळ जेवणाशी निगडित नाही. 'पाटभर मार खाल्यानाय' (त्याला खूप मार बसला आहे.), 'पाटभर गाळया दिलोय' (त्याला बऱ्याच शिव्या दिल्या आहेत.), 'पाट भरलं घे त्यचं' (तो समाधानी आहे) अशा वेगवेगळया वाक्यातून तो वेगवेगळया अर्थाने येतो.

या व्यवहारात समकालीन मित्रांबरोबरचे संवाद जास्त आहेत. शिवाय आपल्यापेक्षा वयाने जास्त असलेल्या लोकांवरचा राग थोड्याच वेळात शांत होऊन धोंड्या त्यांच्याशी सुसंवादी होतो. त्यांच्यावरचा राग दूर करतो. 'गा' हे आपल्यापेक्षा वयाने जेष्ठ असलेल्यांसाठी वापरायचे आदरार्थी उच्चारण आहे. व्हय गा (काय हो?), का गा (का हो?), कुठे गा (कोठे हो) असे प्रश्नार्थक संवाद हे जेष्ठत्वाचा आदर राखणारी भाषा आहे. या बोलीत 'सारखे' (त्याच्यासारखे) साठी 'गत' (त्यच्येगत) असा प्रत्यय येतो. स्वत:चे लग्न ठरवण्याबद्दल धडपडणाऱ्या धोंड्याचे एक इरसाल व्यक्तिमत्व या उताऱ्यात चित्रित झाले आहे.

**नमुना २ : गोडी म्हाही करूवा... गोडी मायेन न्हाऊवा..**

शिजन चालू झालाय म्हनतानं धोंड्या काय म्हाह्या सोडनं न्हाय. लांबडी लिस्टच काढून ठेवल्यानाय. निट्टूरच्या भावकाईसबी गेल्लं. वांगडं जोडीदारबी व्हत्ते. सातबी वाजोस नव्हुते आनि इज्याच्या घरास गेली. त्यो म्हनुला, यरवाळी यल्याशी... आजून शिजोस लई येळ हाय तवर हिंडोन येवा जावा. जोडीदारबी लई श्यानी... त्येनी त्येला बाजूस बलिवल्यानी आनि हाळूच कायतर सांगितल्यानी. सगळीच थेंब्याची व्हत्ती. ती आनि दुसरं काय सांगत्यात!

इज्यान सगळी सोय केल्यान खरं धोंड्या तसलं काय घेनं बी न्हाय. धोंड्यान आवडाव बघितल्यान. हिंचं काय लौकर आटापन्नाय म्हटल्यान. 'तुमी बस्सा, तवर मिय्या जत्रेत भोवोन यतो' म्हनून सांगितल्यान आनि जत्रा बघुस एकटंच गेलं... जत्रेत पोरया सोडून दुसरं नि काय बघताय. पोरयांचे घोळकेच्या घोळके, टकामका बघुलं. बघशिला तिकडी पोरया दिशेतच. हिकडी बगू काय तिकडी बगू असं झाल्लं त्येला. बाजूस खेळनीवाल्याजवळ पोरया लईच दिसोल्या. जरासक्कं म्होरे सराकलं. खेळण्याकडनं बघितल्यागत केल्यान खरं त्येचं सगळं ध्यान हिकडीच व्हत्तं. त्यास्नंबी संशोय येऊस नको म्हनून कायतर घेऊवा म्हटल्यान. तवर त्येला बाजूच्या घरातली बारकी पोर आठावली. तिचेसाठनं यक बावली घेतल्यान. पोरयाबी तिथनं हालल्या. हेबी तिथनं जाऊलं तवर त्येला म्होरे कोणतर वळखीचं दिसलं. धोंड्या म्हनुलं, पांडुतात्या वळीखलेस.

पांडुतात्या निट्टूरचाच. पांडुतात्याचं म्हंजे गण्याचा बा. गण्या आनि धोंडबाची जुनी वळख व्हत्ती. त्यातनंच गण्याच्या घरातल्यांची धोंड्यास वळख झाल्ली. पांडुतात्याचं ध्यान दुसरेडेच व्हत्तं. जरा येळान म्हनुला, 'धोंडबा तिया हाईस व्हय... दांडगाबी झालेस नि!'

'व्हय गा, खरं तुझं ध्यान खलेटे हाय?'

'काय न्हाय, ह्या दाटणीत कायबी दिशेना बग'

'हं... गण्या यलंय काय?'

'न्हाय येऊस.'

'का गा?'

'सुट्टी न्हाय म्हनुलंय... जेवले बिवलेस क् न्हाय?'

'न्हाय आजून... आनि पोरं येतली हाईत. तवर जत्रा बगूवा म्हटलो...'

'चल मनं घराडे... वाईचं जेऊन येईस म्हनीस...'

'कश्या घे उगीच... मानं जेवतावात की पोरं यल्यावर...'

'आत्तं तिया कश्या यतेसाय आमच्याते...'

‘पांडुतात्यान आसं म्हटल्यावर धोंड्या म्हनुलं, यवढंच म्हनुलेसाय तर चल मनं…’

दोघंबी घराडे जाऊलली. पांडुतात्या कसला इचार करीत जाऊला काय की. हिकडी धोंड्यासबी बरं झालं. भूकबी लागली आनि हिकडी खाऊन तिकडीबी खाऊस मिळतंय… दोघंबी घराजवळ यली. दारात काळोखघुप्प व्हत्ता. घरातबी मानसं खली दिशेनात. दारात गेल्यावर धोंड्यास कायतरी येगळंच वाटलं. बाहीर चपला काढल्यान आनि घरात गेलं. म्होरच्या पडवीची आरदी भित्त पडली व्हत्ती. भिंती आनि खायली जमीनबी वल्लीकीच व्हत्ती. घरात गेल्यावर काकू पाण्याचा तांब्या घ्युन यली. धोंड्यास म्हटलीन, ‘कव्वं यलेस?’

पाण्याचा तांब्या घेईत धोंड्या म्हनुलं, ‘आत्तंच यलो..’

जरा हिकूतिकुलं बोलल्यानी. तात्या आनि काकू भुतूर घरात गेली. भुतूर दोघं कायतरी बोलोली खरं बाहीर काय आयकोस येईना झाल्लं… धोंड्या हिकडी तिकडी बघीत बसलं. घरात कायतर येगळंच वाटोलं. सगळं सामान हिकडी तिकडी पडलं व्हत्तं. घराच्या मागच्याबी भित्ती पडल्या दिसोल्या. पांडुतात्या बाहीर यला कायतरी बोलोला तव्हढ्यात धोंड्या म्हनुलं, ‘तात्या, घर पडोस यलंय नि. पूर हिथेबी यल्ला काय’

‘व्हय रं… पुराचं पानी हिथपतर यल्लं. चक्कोट चार पाच दिस घरात पाणी व्हत्तं. सामान बिमान भिजोन गेलं. दांडगीबी लुकसानी झाली घे ती. रातीचं पानि घरात आलं आनि तव्वं घरातनं बाहीर गेलाव. गणपाबी तिकडी म्हंबईस. आम्ही दोघं म्हातारीच हिथे. शेतांचीबी तीच गत. त्या निसर्गाम्होरे बोलोनबी काय उपेग न्हाय.’ सांगतानं पांडुतात्याचे डोळे वल्ले झाल्ले.

धोंड्या म्हनुलं, ‘मनं गण्या येऊस न्हाय?’

पांडुतात्या म्हनुला, ‘यल्लं नि… त्येनं नि ताप आंगावर काढल्यान. त्येला टायफाईड क् काय झाला. चक्कोट दीड महिना आंथरुणात व्हत्तं त्ये. कायबी ऱ्हाऊस न्हाय पोरात. लईबी खचलं. आत्तं गेलंय खरं काम गावेना… मंदी काय बिंदी आलेय म्हनी कसली.’

‘व्हय… आसं सगळं झालंय. मला कायबी म्हाईत न्हाय की गा… गण्यासबी भेटोन लई दिस झाल्यात.’ धोंड्या आपनी आपराधी आसल्यागत बोलोला.

पांडुतात्या म्हनुला, ‘सगळं आसं झालंय म्हनून आमी काय म्हाहीबी लई मोठ्यान करुस न्हाय. खल्या पावन्यासबी सांगोस न्हाय… सक्काळी ल्येक आनि जावय यल्ली म्हनून कवाड्यास जाऊन उल्लंसक्खं चिक्कन घ्युन यल्लो. लेक आनि जावई दिसादिशी खाऊन गेली. नात तव्हढी ऱ्हातो म्हनुली म्हनून तिला तव्हढं ठयुन गेल्यात.’

काकूजवळ बारकी पोर बसली तिच्याडे हात करीत धोंडया म्हनुलं, ‘हीच व्हय ती नात…’

धोंड्याडे बावली व्हत्ती, त्येचेडे त्या नातीचं ध्यान व्हत्तं त्ये धोंड्यान वलळीखल्यान.

सक्काळी चिक्कन आनलो. म्हनून तुला जेऊस बलिवलो. खरं चिक्कन संपलंय त्ये मला ठाऊक न्हाय. आत्तं ही म्हनुले म्हनून मला ठाऊक झालं. पांडुतात्या आपराध्यागत सांगोलला.

मघाशी ही दोघं भुतूर हेच बोलोली हे धोंड्यान वळीखल्यान आनि म्हनुलं, ‘ऱ्हाऊ दे घे, निमत्तान घरास तरी येऊस गावलं.’

तवर काकू म्हनुली, ‘पोळ्याचं जेवान हाय. वाढू काय?’

धोंड्या म्हनुलं, ‘वाढ की काकू…’

काकून पोळ्यांचं जेवान दिलीन. धोंड्यानबी चाटू पुसून खाल्यान. काकू म्हनुली, ‘पुढल्या खेपेस ये मटण करूवा.’

धोंड्या हात पुशित म्हनुलं, ‘पुढल्या खेपेस बलवूस नसल्याशी तरीबी यणार आनि मटण न्हाय पोळ्याच खाणार…’

धोंड्यान हातातली बावली नातीस दिल्यान आनि बाहीर पडला. तव्वं बाहीरची दोघं कायतरी बोलोलली.

यकजन, ‘काय न्हाय म्हनुलेस नि म्हाही दांडग्यानबी केलेस नि…’

दुसरा, ‘काय न्हाई, फंडातनं वाईचे पैसे काढलो.’

धोंड्या मनातल्या मनात म्हनीत गेलं, 'रीन काढून कश्या करुस पायजे ह्या माह्या! वरीसभर लागोन कमवायचं आनि म्हाहीत यका रातीत सोंपवायचं. गोडं जेवान करतलं आनि लोकास्नं वाढतलं. लोकास्नं गोड वाटेल क् न्हाय ह्यो इचार तुमी करू नकाशी... मिया आत्तंपास्नंच खल्याबी म्हाहीस गेलो तर गोडंच जेवान खाणार, मटण आजेबात खान्नाय...'

'म्हाहीवाले आईकन्नाईत. त्येनी बकरीच कापनार खरं आपनी गोडंच खाऊस जायाचं. यका दिसाच्या जेवनान तिंचं घर डबऱ्यात जाणार आशेल तर तुमीबी गोडं जेवान जेवीत ऱ्हावा. धोंड्यान आपनापास्नं चालू केल्यानाय. तुमीबी आसं करून बगा... गोडं जेवान जेऊवा आनि गोडी मायेन ऱ्हाऊवा...'

*(हनमंत जयवंत पाटील, कालकुंद्री)*

या उताऱ्यात चंदगड परिसरातील म्हायांचे (जत्रा) प्रस्थ आणि त्यासंबंधातील भाषिक व्यवहार लक्षात घेता येतो. या उताऱ्यात येथील जत्रांबद्दलचे तरुणांच्या मनातील स्थान, तेथील व्यवहार, जत्रांचे आकर्षन कशासाठी, जत्रा साजरी करणाऱ्या लोकांची मानसिकता, तेथील आर्थिक आणि सामाजिक स्थिती अशा अनेक गोष्टींचे प्रत्ययकारी चित्र या उताऱ्यातून लक्षात येते.

या उताऱ्यात गरीबीत जत्रा साजरी करणाऱ्या एका कुटुंबाचा संदर्भ येतो. चंदगड परिसरातील बहुतांश जत्रा मांसाहारी जेवण करून साजऱ्या केल्या जातात. पैपाहुण्यांना बोलवून त्यांना जेवण वाढले जाते. त्यात बराच खर्च होतो. कधीकधी वर्षभर कमावलेले एका जत्रेत संपून जाते. त्यासंदर्भातील एक वास्तव हा संवाद समोर आणतो. वरील नमुना १ प्रमाणे अनेक चंदगडी शब्द आणि क्रियापदांचा वैशिष्ट्यपूर्ण वापर दिसतो. या उताऱ्यातील बोलण्याची लकब किणीकर्याद भागातील लोकांची खास शैली आहे. 'म्हाया सोडणं न्हाय' म्हणजे यात्रा चकवत नाही. 'वांगडं' म्हणजे सोबतीने. हा शब्द चंदगडी बोलीत वेगवेगळ्या अर्थाने येतो. 'वांगड' म्हणजे भाजी असाही एक अर्थ या शब्दाला आहे. 'वांगडास' म्हणजे सोबत अशाही अर्थाने तो येतो. येथे येणारी तरुण मुले दारुची व्यसनी आहेत. त्यांना 'थेंब्याची' असा एकच शब्द वापरण्यात आलेला आहे. या शब्दाचा तो प्रतिकात्मक अर्थ आहे. लांबडी (लांब), भावकाई (एक देवी), यरवाळी (लवकर, हा शब्द सकाळी लवकर या आणि केवळ लवकर अशा दोन्ही अर्थानी प्रचलित आहे.), भोवोन (फिरून), शिजन (मोसम), आवडाव (अंदाज) हा शब्द काव्यमय आहे. आवडाव बघणं म्हणजे समोरच्या व्यक्तीचे चलनवलन न्ह्याहाळणे, त्याच्या मनाचा अंदाज घेणे, तो काय करतो याचा माग काढणे किंवा तो काय ठरवतो हे बघणे इत्यादी अनेक अर्थाने तो वापरला जातो. व्यक्तीच्या स्वभावाशी निगडित हा शब्द असल्याने बोलीत तो वेगवेगळ्या अर्थाने येतो. जरासक्क (थोडं), वळक (ओळख), खलेटे (कोठे), काळोपघुप्प (दाट अंधार) काळोकघुप्प हा शब्दही काव्यमय आहे. तो पावसाळी वातावरणासाठी वापरला जातो, हिथपतर (येथे पर्यंत), रीन (कर्ज), आटापन्नाय (आवरत नाही), दांडगाबी (खूप मोठा), मनं (नंतर किंवा मग), हिकूतिकुलं (इकडच्या तिकडच्या), भुतूर (आत), लुकसानी (नुकसान), गत (स्थिती), उपेग (उपयोग), गावेना (सापडन नाही), उल्लसक्खं (थोडं), दिसादिसी (एका दिवसात), डबरा (खड्डा) अशा पद्धतीचे काही चंदगडी शब्द या उताऱ्यात आलेले आहेत. शिवाय 'गोडीमायेन' राहण्याबद्दलचे चंदगडी तत्त्वज्ञानही या भाषिक उताऱ्यातून पाझरलेले दिसते.

**नमुना ३ : गटारी आमोशा, गटारी पेशल...**

(गण्या - मुलगा, पांडबा - गण्याचा बाबा, गौराई - गण्याची आई)

पांडबा : पार खलेटे गेलंय गं...

गौराई : मसणात गेलं आसेल... सक्कळधरणं गेलंय पत्त्या न्हाय त्येचा!

पांडबा : बायले हे पार एक लईच भागवूलंय... जलमास येऊन वाया हाय ह्येचं...

गौराई : जावा... पेंडी घेऊन येवा जावा तिकडी लौकर.. वाट्यास्नंबी जाऊस पाहीजे...

पांडबा : वाट्यास्नं नि कदी जाऊ ते? उन्हातल्यागत वाट हाय व्हय ती... वाटेस उल्ला चिखोल झालाय काय... डोगलभर पाय रुत्तोल्यात आत... बायले लई येळ लागोलाय येऊस... हे पार वाट्यास्नं जाईल म्हटल्यावर खलेटे खपलंय काय की...

(तवर गण्या गाणं म्हणीत येतंय)

गौराई : खलेड्डे गेल्लेस?

गण्या : वाईचं उघाडल्लं म्हटलो नि भोवाडा मारून यलो गावातनं

पांडबा : लगनास आलेस खरं जरा सुदीक आक्कल येऊस न्हाय.. भोवोन काय पाट भरतंय व्हय तुझं...

गण्या : मनं काय घरात बस म्हणत्याशी...

गौराई : घरात बसोन आनि काय मोबाईलातच डोचकं घालून बसेतेसाय नि... कामाचा काय धामाचा...

पांडबा : त्या गोटास ईळा हाय तो घे नि वाट्यास्नं जा...

गण्या : ते नी खल्यान सांगितल्यान वाट्याचं... खाटक्याकडनं आनूस गावेतं नि

पांडबा : लई श्याना हाईस जा... पिश्श्या कुत्र्यान चावल्यागत करू नकोस... खाटकी कसली बकरी कापुल्यात बघुलेसाय...तुकाबाच्या पयड्यात बकरं कापूस लाग जा... मागल्या खेपेस पाटधारेचा ईळा नेल्लेस वाट लावून यलेस... जरा रित्तीन धंदा करीत ऱ्हा...

गण्या : हु घे (गण्या जाईत आसतंय तवर)

पांडबा : लई भोवो नकोस हिकडी तिकडी आमोशा हाय आज...

गौराई : रक्ती केल्यानी तर सगळीच खाईत बसो नकोस... वाईचीसरी घ्युन ये म्हातारीस... तिचीबी ध्यायी शांत हु देत.. (गण्या आपलं आपनीच ब्याड ब्याड करीत बाहीर पडतंय)

गण्या : (आपलं आपनीच म्हनतंय) बायले बकरच करून सोडल्यानीत मला... काय करत्याशी, जलमास घातल्यानीत बोलोन घुचं लागतंय... तुमीबी करा जावा गटारी आणि रक्ती केल्याशी तर बलवा मला... मियाबी रक्तीस लई वंडा हाय... बलवूस विसरो नकाशी... हु काय...

*(लेखन : हणमंत जयवंत पाटील, कालकुंद्री)*

या उताऱ्यातही खलेटे (कोठे), सक्कळधरणं (सकाळपासून), मसाण (स्मशान), वाटे (हिस्से), भोवाडा (लांबचा पल्ला), जरासुदीक (जरादेखील), पिस्स (वेडा), वंडा (हावरट) यासरखे शब्द येतात. वरील तिन्ही नमुन्यातील बोली 'किणीकर्यात' भागातील भाषिक व्यवहार दर्शवते. चंदगडी बोलीतील शब्दसंग्रहाच्या संदर्भाने पुढे चर्चा करणार आहोतच. तथापि, वरील भाषिक व्यवहाराचे नमुनादर्शन या शब्दांचा, क्रियापदांचा वापर आणि वाक्य तयार करण्याची या बोलीची पद्धत लक्षात येण्यासाठी महत्त्वाचे आहे. पुनाव, सुक्रवार, आईतवार हे येथील लोकांची वैशिष्ट्यपूर्ण उच्चारणांचे नमुने आहेत. तथापि, घानल्या (घाणेरड्या), गाळया (शिव्या), म्होरे (पुढे), पाऊट (खेपा/वेळा), खलीबी (कोणीही), वायचा (थोडा), तव्व (तेव्हा), भोवेत (फिरत), भोवत्यान (सभोवती), दुक (जखम), मुजोन (भरून), रांक (रांग), लंबर (नंबर), सरादणे (सरकणे), सपय (सरळ), रांदणे (स्वयंपाक करणे), भोवोभोवोन (फिरून), आयनाशी (अनायशे), ख्याप (एक वेळ), बुचकाळणे (अंघोळ करणे), दाटणी (अडचण), वल्लीकीच (ओली), भुतूर (आत), लुकसानी (नुकसान), दिसादिशी (आलेल्या दिवशीच परत), खलेटे/ खलेड्डे (कोठे), हे शब्द वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने या भाषिक व्यवहारात वापरलेले दिसतात. हे चंदगडी शब्द चंदगडच्या बहुतांश भागात वापरात असलेले दिसतात. परंतु, तिच्चीभन्या (आश्चर्य व्यक्त करून बोलताना वाक्यारंभी येणारा शब्द), केल्यानाय (केलेले आहे), गावाडे (गावाकडे), बायले (हा शब्दही 'तिचीभन्या' या शब्दासारखा वाक्यांच्या प्रारंभी वापरण्याची पद्धत आहे. 'तिच्या आयला' अशा अर्थाने तो येतो.), जरासक्कं (थोडं), मनं (नंतर), हिकूतिकूलं (इकडचे

तिकडचे), न्हाय की गा (नाही),  सक्कळधरणं (सकाळपासून), पाट भरतंय (पोट भरणे), ईळा (विळा), वाईचसरी (थोडं) यासरखे शब्द खास किणीकर्यात भागात वापरले जातात.

'तिचीभन्या', 'बायले' हे दोन शब्द वाक्यांच्या प्रारंभी वापरण्याची लोकांना जणू सवयच आहे. 'तिचीभन्या कव्व यलेस गा', 'बायले खा दोन घास' अशा अगदी सामान्य व्यवहारातही हे शब्द तालुक्याच्या पूर्व विभागात म्हणजे किणीकर्यात भागात वापरले जाताना दिसतात. वरील शब्दांच्या किणी तालुक्याच्या पश्चिम विभागा 'च्या आयला/मायला' असे म्हटले जाते. परंतु, हा शब्द वापरण्याची वारंवरता पूर्व विभागाच्या तुलनेत खूप कमी आहे. शिवाय जरासक्कं, मनं, हिकूतिकूल, सक्कळधरणं, ईळा, वाईच या शब्दांच्या ठिकाणी अनुक्रमे मानं, हिकूलं तिकूलं, सक्काळपासनं, कोंगळा, जरासकं असे शब्द वापरण्याची पद्धत पश्चिम विभागत दिसते. त्याचबरोबर 'काय न्हाय म्हनुलेस नि म्हाही दांडग्यानबी केलेस नि...', 'पार खलेटे गेलंय गं...', 'मागग्या खेपेस पाटधारेचा ईळा नेल्लेस नि वाट लावून यलेस...जरा रित्तीन धंदा करीत जा.' यापद्धतीने वाक्य तयार करून भाषिक व्यवहार करण्याची पद्धत पूर्व विभागात दिसते. पश्चिम विभागातील भाषिक व्यवहाराची चर्चा आपण पुढे करणारच आहे.

**नमुना ४ : सुग्गी**

पुरा जून म्हयना मळभाकडे डोळे लावून बसोच लालं. पाऊस यताय काय, काय करताय, यंदा काय खरं नाय! म्हणूनच धुळवापा पीपा सगळं गेलं आतं, आतं नुसतं सगळी रोपाच करूल्यात! पावुसच न्हाय तर काय कर्त्यात, यंदाबी असंच वाटोल्ल.. पावूस यताय काय न्हाय...? मानं कसाबसा एक्दसरा पाऊस सुरू झाल्यावर कसतरी कुणाचं पेरून, नि कुणाचं रोपं झाली एक्दसर! मानं जो काय पाऊस चालू झाला... तो वशाड पडेना असं झालं!

जिकडी तिकडी नुसतं पानिच पानि, खळगीच खळगी... सगळी मळक यवून बसली उगल्या भातावर

आत कस भात यणार वर, हेचि काळजी लागोन बसली.

एवढं कमी म्हणून त्यात त्यो महापूर. तेन तर गावच्या गाव, भाताची शेत पार दिक्कोध्याड करून टाकल्यान. कर्यादी भागाची तर वाटच लागोन गेली. आमानं तरी असला पूर माहीतच नव्हता! नुसतं शाळेत गुरुजीनी शिकीवल्यानी काय काय की, तेवढंच. लई नुक्सान करून गेला त्यो पूर.

आमच्या गावास तेवढं नद न्हाय म्हणून पूरपीर काय नव्हता खरते. व्हळ, हाळ्ळे हायीत. व्हळ काय गावाकडे येऊस न्हाय खरते. शेतातन घुसलीच की.. ती तरी केव्हढ पाणी मावून घेणारं ते. जास्तीच पाणी शिडावणारच की!

मानं या पावसात भांगलन करतानं, कोळपे वाढतानं, पेसाटी वढतानं सगळयासन फुरेफुरे झालं अशेल. हे सगळं झाल्यावर, भात पोटरीस येलं तरी पावूस चालूच... पोसावल तरीबी पावूस सुरूच. पांडव पूजवून झाले, दिपवाळी यली, लोम्ब हाणून चौकटीस अडकीवल्यानी तरी पाऊस सुरूच. अरे देवा आतं सुगी करुस देताय काय न्हाय ही काळजी.

त्यातच जरा उघडीप पडली की.. कुणी कुणी घाई केल्यानी भात कापतली नि झालं भात भीजोन परत दुप्पट उसाबर. जेंचं भिजोस न्हाय खरते कापलं की डोळ्यास डोळा लागोस न्हाय.. भात घरास ययीस्तोर! असं व्हता व्हता, एक्दासर गेला पावूस... आणि सगळयाची एकदमच घाई सुरू. तरी बरं मेळे मेळे करून कामं करूल्यात आतं, नाहीतर कुठली माणसं, पैशावर न्हाय, बदलास यत्याशी तर यतो ह्यो नियम.

पाणी असलं तर बायल्यान पाणी काढून, कापून टाकून, पाणयातल्या कवळया काढून, दोनचार दिवस वाळवून मग बांतली तयारी. मानं ते सगळं बांधोन भारेच्या भारे लांब असलं तर ट्रॅक्टरात घालून नायतर डोचक्यावर घून जिथे वारं लागेल तिथे खळयावर न्हेतली गडबड. आतं मळणीचं एक बरं झालंय, पयल्यासारखं जागा खोऱ्यान तासून सप्पय करून, पाणी मारून, सारवून खळं करतलं सगळं गेलं. आत्त येल्यात मोठ्ठी बारदानं..हथरल्यानी की झालं. आणि ते रात्रीच्या मळण्या, मग बैलं बघतली, बैलानं मुसक्या, कंदील, चार्जिंगच्या तवच्या आरगाड्या बॅटऱ्या, चहाचं सामान, मटणाची तयारी, घोमाणसं, धग, ईस्तो, बैलाच्या पाती, पाती हाम्बडुस एक माणूस, बैलांच शान धरतलं एक माणूस, वळळयांनी करला गोल हे सगळं

आतं कुठे दिसणं न्हाय. आत्त सगळं दिसादिसीच. जरा सप्पय जागेवर मोठ्ठी बारदान टाकून तेचेवर कवळयांचे भारे टाकून ट्रॅक्टर मागेम्होर फिरीवल्यानी की सगळा बुकनाच.

मानं काय घोमांणसासाबरोबर बायामान्स बी जोडीस वळ्ळे काढुस. वळ्ळे काढुन व्हळी घालून हिकडी वारं दून पिशव्या भरून मोकळी! व्हाट आणि चिंब आत्त भरून घेत्यात काय नाय माहीत नाय.. आतं शेण्याच नाहीत तर व्हाट काय करणार? हे सगळं एका दिसात. तर असं सगळं हे. नांगरून, कुळवून, पेरिपासून ते हे पिवळं सोनं मळून वारं देऊन घरात पिशव्या आणून टाकीपर्यंत लै कष्टाच कामं बाबा.

*(डॉ. अरविंद शेनोळकर, करेकुंडी)*

**नमुना ५ : खालच्या माणितलं झऱ्याच्या कोंडीवरचं शात**

'काय, रे! काय केलेस?'

'काय बी न्हाय, गा! काय करताय आत्त. खातलं पाटभर आणि फिरतल गावभर. दुसरं काय काम? ते राहूनदे. पाट भर खाईस म्हणी खरते. उदे तवढं ते झऱ्याच्या कोंडीवरचं पेरून घालूवा तिकडी. म्हणजे मोकळं पावसाच्या आद्दी..!!'

'इतक्यातचं काय गा, अजून मिरगं कुठे? नि तुझी एक घाईचं असते गावाच्या आद्दी!'

'व्हय! खुळा का काय? मिरगापरत थाम्बोन व्हताय व्हय रे. ते काय शिवार हाय व्हय. ते पाणी मुरताय म्हणतलं हाय, निव्वळ फडा, बाबा! आडूळ्यानं पडलं तरी पाणी पाणी व्हइल! माणं काय करतेस त्यात डोंबाल?'

'व्हय व्हय, तुमची ती एक पीडा हाय नं. जवा केलेसाय क न्हाय सगळा?'

'जवा आणि कसला आत्त, हाडगं, टोना, घुट्टा, बैलं, बायका माणसं घरातली चं किरे. दोन हाडग्यास गावली की झालंचं नि. खाद बी आणून ठेवलोय आधीचं. धुळवाफ करून टाकतली आपली एक्दसरं!'

'उदे, जाऊआ घे. झाल्या..!'

'बघ हु काय, मागेंदि सारखं फसीवशील नि. यतो तर यतो म्हणून सांग.'

'न्हाय घे गा, फसीवन्न! आत्त काय कामं हाइत? जाऊआ घे! मिलीटरी वाल्यास तवढं सांग एका घोटाचं!'

'लेका, य तरी पयला. तेचि काळजिचं करू नको तू!'

तर असं हे आमच्या आज्या बाबाचं बोलणं. मे महिना सुरू झाला की बाबाचं चालुचं. कधी एकदा ते झऱ्याच्या कोंडीवरचं पेरून मोकळं व्हतोय असं व्हही तेला. घरात बी काय ठार लागो देणं नसे. गावतबी तेचीच चर्चा. शेनोळकराच्यानी पेरल्यानीबी असेल, त्यासन काय करामताय व्हयं.

तेचं असं हाय, तर आमचं मानिकडे शात हाय. तेच्यातलं खालच्या मानीतं आणि वरच्या मानीतं असं दोन भाग. त्यातल्या त्यात खालच्या माणीतलं ते झऱ्याच्या कोंडीवरचं म्हणून फेमस. त्यात बी अजून एका गाद्यास मोठ्ठा कूप हाय म्हणून तो कुप्पाचा गादा. नि कधीतरी तेच्यात कांदे बी करल्यानी म्हणून तोच कांद्याचा गादा. तिथेच आमचं जरासं काऊल बी हाय. म्हणून कावलाजवल असं बी म्हणत्यात. आत्त काऊल म्हणजे काय? तर काऊल म्हणजे म्हशयासन चरोस आणि गवात वाढोस राकली जागा.

एवढी नावं त्या शेतास हाइत. तिथे क नाय एक काळाकुट्ट फडा व्हत्ता. तेचेवर म्हणी आमच्या बाबानं तेन माती टाकून ते गादे बसिवल्यानीत. वरनं माती आणि खाली फडा असं हाय, म्हणून तिथे पाणी मुरणं न्हाय. एकदा पाऊस पडला की पाणीच पाणी. म्हणून तिथे मे महिन्यात पाऊस चालू हुच्या आदीचं धुळवाफ करुची लागते. धुळवाफ म्हणजे नांगरून, कुळवून, ह्यन्डोर मारून माती बारीक व्हते. माणं त्यातचं हाडग्यास माणसं जुप्पोण भात पेरतलं. हे जरा त्यातल्या त्यात सोप्प असताय. माती असते तेन वडूस सोप्प जाताय. माणं तेचेवर घुट्टा मारतलं आणि निर्गुडीचे, रामेठ्याचे, जांभळीचे टाळ रोवतले मदी मदी, पेरलं हाय म्हणून कळोस. न्हायतर, शेतास लागोनचं टेक हाय. गावची सगळी ढोरं चरोस टेकावरचं की! ती ढोरराखी काय, ढोरं सोडून खेळोस जात्यात नि हिकडी ढोरं पेरलं माणं दिक्कोधाड करतील की. इथले गादे भात पेरतानं तवढं



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

बिनपाण्याचे असत्यात. एकदा पाऊस चालू झाला की, माणं भांगलतलं, कोळपे, कापणी हे सगळं पाणयातचं. कापून गोळा करतानं नि लई गोते. एकतर पाणी असताय, तेन वाकोन कापुचं लागताय. कापल्यावर गाद्यातनं बाहीर काढून ठुचं लागताय वाळोस. न्हायतर गाद्यात वाळतलं दूरचं, परत उगवेल ते भात. माणं खळ करून ते भात वाळल्यावर गोळा करून मळूस खळ्यावर न्हुचं लागे. माणं तो मळणीचा जवा आणि यगळा. तर असे तीत्ये चार गादे आणि दोन कुनग्या हाइत नि वीसेक पोत्याचं भात व्हताय म्हणींनाशी. नि जवळच तेच्या पेंडीसाठी अजून एक बारकं काऊल हाय.

आत्त, पाऊस काय पुरनं न्हाय तेन भातचं व्हताय तेवढचं. आदी, तो कांद्याचा गादा म्हटलोय कनाय, तेच्यात तेवढं भात कापून झालं की कवतरी कांदे लावी नि कव कव गहू करी. तेलाबी दुसऱ्या वरच्या गाद्यात जरासं नांगरून चिखलान बांध घालून पाणी आडीवतलं नि माणं सारनं काढून पानी आणूचं लागे.

त्या दोन कुनग्यातनं कधीतरी पाणी मुरलं लवकर तर हरबोरा पेरीत. तो काय यला तर यला न्हायतर गेला. ढोरांनी आणि ढोरराख्यानी ठेवल्यानी तर ते बी. ते बी आत्त सगळं बंदच झालं. पाऊसच पूरेना तर काय व्हइल? तव बांधावर बी सोले असेत, तुरी व्हईत जराशा. खरते आत्त सगळं गेलं, काय काय न्हाय. बोडके बांध ऱ्हात्यात आत. निलगिरीची झाडं बी व्हत्ती बांधावर, ती बी सगळी भात यणं न्हाय म्हणून तोडून टाकल्यानि. आत्त, बोडके बांध आणि नुसतं भात व्हताय ह्या शेतात. ते बी आत्त काय करुस व्हइना. बाबा गेला सोडून, आई पप्पानि बी साठी वलांडल्यानीत. बाळया कोलापुरास. करणार कोण श्यात?

*(डॉ. अरविंद शेनोळकर, करेकुंडी)*

नमुना क्रमांक ४ व ५ मधील बोली तालुक्याच्या मध्यवर्ती परिसरातील गावांमध्ये बोलली जाणारी आहे. म्हणजे हा परिसर गावांवरून सांगायचा झाल्यास चंदगड तालुक्याच्या मध्यवर्ती असलेला ढोलगरवाडी, कार्वे, तुर्केवाडी परिसर म्हणता येईल. पश्चिमेकडील कोकणी, मालवणीच्या प्रभावातील आणि पूर्वेकडील कानडीच्या प्रभावातील बोली असल्याचे मागे नोंदवले आहेच. या दोन भिन्न प्रभावांचा मध्य म्हणजे हा परिसर. या परिसराचे भौगोलिक चिन्ह म्हणजे या गावांपासून पश्चिमेकडे लाल माती सुरू होते. या मातीत धुळवाफेपेक्षा चिखलरोप करून भात लागण केली जाते. या परिसरातील भाषेवर काही पूर्वकडेच्या बोलीतील तर काही पश्चिमेकडच्या बोलीतील वैशिष्ट्यांचे मिश्रण झालेले दिसते.

एकदसरा (एकदाचे), खळगी (खड्डे), दिक्कोध्याड (नुकसान), व्हळ (ओढा), हाळ्ळा (लहान ओहोळ), ययीस्तोर (येईपर्यंत), जाईस्तोर (जाईपर्यंत), आरगाड्या (मध्यम आकाराच्या किंवा प्रमाणापेक्षा थोड्या मोठ्या आकाराच्या), घोमाण्सं (पुरुष), वळ्ळे (धानाची मळणी किंवा कापणी करतानादोन्ही हातांमध्ये बसेल इतके धानाचे पीक उचलून घेणे, हलवणे याला एक वळ्ळा म्हणण्याचा प्रघात), पाट (पोट), कोंड (नदी, ओढ्यातील खोल जागा), फडा (दगड), टाळ (फांदी) असे या बोलीतील शब्द या उताऱ्यांतून येतात. पूर्वकडे वापला जाणारा 'लुक्सान' (नुकसान) हा शब्द येथे 'नुक्सान' असा होतो. कर्त्याल (करतील) हा शब्द पूर्वेकडील भाषिक प्रदेशाप्रमाणे कायम आहे. पश्चिमेकडे हा शब्द 'कर्तील' 'व्हयेतर' (पाहिजे तर) असा होतो. 'ययीस्तोर' हा येथे वापरला जाणारा शब्द अजून थोडे पुढे हलकर्णी परिसरात 'ययीसकोळ' असा होतो. 'पाट' (पोट), 'पाटभर' (पोटभर) हे शब्दही 'पॉट', 'पॉटभर' असे होतात. ही वरील भाषिक नमुन्यातील काही निवडक उदाहणांवरून भाषाव्यवहाराचे स्वरूप पाहतो आहोत. वास्तविक असे अनेक शब्द यासंबधाने उहारणासाठी घेता येतील. खरं, खरते हा शब्द या बोलीत सर्वत्र वापरले जातात. या प्रदेशात 'खरते' जास्त वापला जातो. येथे शेतीशी निगडित हाडगं, ह्यंडोरं, नांगर ही औजारे येतात. 'धूळवाफ' ही भात लागण करण्याची पद्धत आहे. लोम्ब (शेतात बहलेले धान), कवळ्या (दोन्ही हातांमध्ये बसणारे), वळ्ळे (मळणीत मळलेले धान वरखाली हलवणे), व्हळी (गवताची गंजी), हाम्बडणे (हाकणे), फडा (दगड), दिक्कोधाड (विस्कटणे) हे शब्द चंदगडी बोलीत सर्वत्र दिसतात. येथे 'आडुळा' हा चंदगडी बोलीतील एक चांगला शब्द येतो. आडवळणाने किंवा मार्गाने येणारा, अचानक आलेला पाऊस वर्णन करण्यासाठी हा शब्द वापरात आहे. शिवाय या उताऱ्यात निर्गुडी, रामेठी ही स्थानिक झुडपांची नावे आली आहेत. या जातीच्या वनस्पती अलीकडे दुर्मीळ झाल्या

आहेत. कुंपनातून त्या सर्रास बघायला मिळत होत्या. पैकी निर्गुडी कीडनाशक वनस्पती होती. जी अलीकडे पाहायला मिळत नाही. तर रामेठीच्या काट्यांनी झोपड्या बांधण्याचे, कुड करण्याचे काम केले जात असे. तेही अलीकडे कोणी करताना दिसत नाही. स्थानिक वनस्पतींचा मानवी जगण्यातील सहभाग महत्त्वाच असतो.

**नमुना ६ : मळाब**

रामुदा कसल्यातरी इचारातच शेतास पळोला. आईच्यान बगीन तव पायास भिंग्री बांधल्यागत असताय. रंगान जरा अदमास जाल्यागत सावळा, सावळा कसला खरं जरा कमी काळाच, पैशापाण्यान बी रडेखडेत दिवस काढी. वरीसभर रीन काढ काढी आणि परत फिडी. गेल्या सालास भिक्कीच्या म्हदूची दुकानातली उदारी दांडगी करून ठेवल्यान. त्यातच तेचं नि तेच्या आईचं दांडगं भांडान लागे. देवास फुल चुकेल खर ह्येंच भांडण चुकोच न्हाय. रामुदाचा सौसार बी अतचाच. लई वरस पोर सुदि कोण दिना कि मग आईनच भांडोन भांडोन भावाची पोर अन्लीन करून. आपलगतातली केलीन खरं आत तेंच्या भांडणात भाव बी मोडला नि बघीन तव बायकोचच ऐकताय हे पॉर असं म्हणून पोटच्या पोरात नि हिच्यात बी नासलं सगळ. रामुदाच्या पायातल्या भिंग्रीन याद यली. रामुदा टावेल झटकित पळोला मिया त्यास हाळ्ळी मारलो. 'ये रामुदा कुटे पाळोलेसाय ये हिक्डी....बगीन तव कुठल्या तरी मसणात गेल्यागत कर्तेसाय' रामुदाचे भिंग्री बांदलेपाय जाग्यास अडोम्बा घातल्या बैलगाडीगत थांबले. रामुदा रडव्या तोंडान म्हणूला 'काय करशील तियाच सांग. शाण्या बगीन तव ह्या बायकांचं भांडान. जीव यटीस यलाय माझा. बायले चुकताय दोघींचंबी खरं तरास मला. वशाड पडोंदे म्हणून गप बसतोय तर ह्येंच लैइच. बायले जीवच नकोसा झालाय.' रामुदा सगळा खाच्ल्यागत झाला कशान. तो या घरच्या धांदलीत यापला हे तेच्या तोंडावरच्या हिरमुसल्यापणान दिसोलल. रामुदा काय तरी सांगोला तर बायले बघता बघता ढगात काळोघुप्प झालं. कशान मळाब धरल्यागत झालं. मला तसच मळाब रामुदाच्या तोंडावर दिसल. घरातलं भांडान रामुदाच्या नशिबात वट इस्कोट करूस यल्ल. रामुदा जाऊस लागला. मिया म्हटलो, 'रामुदा थांब वाइचं. दांडगी सळाक येतली. बायले थपराक मारल्यागत गालावर बसतली' रामुदा तरी उठला नि म्हनुला 'कसली थपराक नि कसल काय' घरातल्या थपराकीपरास हाबही सळाक बरी बाबा.' तशानच उठला नि मोकळीच्या हाताच्या शेताची वाट धरल्यान. त्यो जाऊस लाला तसं मळाब वाढोलं, जसकाय मळाब तेच्या पाठीसच लागल जलमबर....

*(परसू गावडे, करंजगाव)*

**नमुना ७ : म्हायारास जाऊसेत...**

म्हायारास जाऊसेत म्हणून भगाटल्याधरणं राबोललोय. माझ्या वाट्याची रोच्ची कामं सप्पोसच रात व्हते. आज म्हायारास जाऊसेत म्हणून यरवाळम्हेरेन कामास लालोय तरीबी कामं सप्पेणात. निंबार पडोच्याआत बुक्याळास पोचतलं यवजलोय खरं कव्व जाऊन लागतोय काय म्हाईत. पंदरादी झाले बाबा न्हंगड्यास पडलाय. आयीचं तीनदं सांगण यलं. खरं कामातणं उसरगच गावेणा. तिचं अवसानच गळालय. तीबी शिक पडली म्हणी. तिचं तरी किरमं कव्व खंडीचं नसताय. बाबावांगडं खपोन तिच्याबी जीवात काय ऱ्हालय आतं? चिप्पाड झालय निसतं. तिच्याबी जलमाचं वाळवाणच केल्यानाय बाबान. मिय्या काळजीतरी कित्ती करूची. आत्तं भियंच वाटोललय. बाबाचं जास्तीनी झालय का कायकी. लईच ठकलाय म्हनी. त्यास तरी कित्तीदं सांगोचं. जरा बरं वाटोल्ल की ह्यला दारू यवाजते. त्यंच्या वाटणीस ती वसेदुच झाले. डाकटर तरी कित्तीदा बेडशिवील. लईच आरमुट हाय. आत्त तरी किरडावलाय निसता. सऱ्यांच्या वाटणीस निसता वनवा झालाय. मिंत्या करून इट यलाय सऱ्यासनी. शिरं पडल तोंडार कुणाचं वट्टातूच आइकणं न्हाय तर. आप्पाबी खिदडून दमला. त्यच्या जीवास तरी खलेटे ठारा असताय. दिसध्याड त्यच्याबी जल्मास राबनूकच पूजली हाय. बाबान सगळ दिक्कोमाळ केल्यानाय. शिवारातली चक्कोटली वावरं दारवेत घातल्यान. आदमासी पंधराइस चिल्लं भात व्हयी तिते. वशाडपडल त्यच्या जल्माअर त्यनं आप्पाअर आळास जातली यळ आणल्यान. राग यताय खरं करणार काय? कसाबी असला तरी आयीचा कुकू हाय त्यो. जाऊन कव्ह यगद त्यचं त्वांड बगतो आसं झालय. भिगीन जाऊचं म्हनत्यानं ह्यनीनी अजुन जोताचे यवूचे हायीत.

उजवाडोच्या आदी गेल्यात, भुकेल्यातबी आसेल. कल आनुसेपोटी निंबार पडेपतोर ऱ्हाल्ले. आल्याअर उचबांळोललय म्हनूले. यवडा वकत ऱ्हाल्याअर भोवाडल्याम्हैरेन ऱ्हायील? कित्ती पावटी सांगोचं भिगीनं ययीत ऱ्हावा म्हणून. हेबी आरमुटच हायीत. काम उलं व्हयीना, यळेत ज्युचं. राबनूक काय जल्माची सपले? मिंत्या करतोय खरं आमचं खल्यास पडलय आयकोचं. आजबी यदवसकोळ यवूस न्हायीत. यवूदेत कव्व यवूचं तव्व. घितील वाडून. मिय्या अजुन पारोशा तोंडानुच हाय. पानीबी लासेसकं झालय अशेल. इस्वानास पानी आणुन चार तांबये भसासी वत्तो अंगावर. आई वाटेडे डोळे लावून बसले असेल. तिचेसाठणं सकाळधरणं गुद्याडोन धाबारा भाकरी थापलोय. ध्यायी काय गप्प बसो देते. बाबासाठणबीं इसेक कवटं ठेवलोय. ती घेतो बांदोन नी जातो भार्रणं. पल्ला काय जवळचा हाय.

*(भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण, पृष्ठ ११८-११९)*

वरील दोन नमुने हलकर्णी परिसरातील म्हणजे चंदगडी भाषिक प्रदेशातील मध्यवर्ती परिसरातील आहे. या परिसरानंतर पश्चिमेकडील गावांमधून मालवणी-कुडाळी बोलीचा उचारवैशिष्ट्यांसह गडद प्रभाव आहे. तत्पूर्वीच्या काही गावांमध्ये चंदगड या तालुक्याच्या ठिकाणापूर्वीच्या गावांमध्ये ही बोली बोलली जाते. चंदगडी बोलीचे येथील रूप कुडाळी-मालवणी आणि कन्नड या दोन्हीच्या प्रभावात दिसते. हा परिसर बेळगाव-वेंगुर्ला रस्त्यावर आणि कारखानदारीमुळे बाहेरून आलेल्या लोकांच्या संपर्कात आल्याने येथील उच्चार झपाट्याने प्रमाणभाषेकडे सरकले आहेत. वरील बोली नमुन्यातील भगाटल्याधरणं (उजाडल्यापासून), यवजलोय (ठवलेय), अवसान (विश्वास), शिक (आजारी), किरमं (सर्दी), वांगड (सोबत), किरडावणे (कुजणे/वैतागणे), खिदडणे (घाबरवणे), चक्कोट (चांगले), राबणूक (कष्ट), दिक्कोमाळ (विस्कणे), आदमासी (अंदाजे), निंबार (दुपारची वेळ), अनुसेपाटी (उपाशी), उचबांळोलय (गरगरणे), उचबांळोण येणे (भावनावश होणे), गुद्याडोन (धडपडून), मिंत्या (विनंती), पारोसे तोंड (उठल्यानंतर तोंड नं धुता), इस्वान (खूप गरम पाणी थोडे थंड करण्यासाठी गार पाणी ओतणे), कवाट (अंड) हे शब्द अस्सल चंदगडी शब्द आहेत. परंतु, अलीकडच्या काळात अशा अस्सल चंदगडी शब्दांचा, तशा उच्चारणांचा वापर कमी झाला आहे. अशिक्षित आणि वयस्कर लोकच ही उच्चारणे वापरतात. राबोललोय, जाऊस, यऊस, खाऊस या क्रियापदांमधील लोय, स हे प्रत्यय हे खास चंदगडी बोलीचे वैशिष्ट्य आहे. प्रमाण मराठीतील 'ला' या प्रत्ययाऐवजी 'स' हा प्रत्यय सर्वत्र येतो. उदाहरणार्थ, सप्पोसच, म्हायारास इत्यादी. अशा पद्धतीने ही बोली या परिसरात वापरली जाते. बोलींच्या नमुना प्रारूपानंतर चंदगडी बोलीच्या व्यवहाराचा अंदाज यावा यासाठी तिच्या उच्चार विशेषांची संक्षेपाने चर्चा करू.

**नमुना ८ : पऊस काय अवदेसा...**

पऊस काय अवदेसा... त्यास जरातरबी इच्चार पाजे... उगेबी वतला म्हटल्या काय त्यास खुला चक्कोट म्हणणार हाय... सर्व शिवार व्हहोन जऊलाय... गादेच्या गादे गईप हुल्याताव... बावकालं यवढी पडल्याताय... वरीसभर काम करून दोन आळास्न बायकालं भरोची न्हाताय... महागामालाचं रिन काढून पेरलं बी सुकान ह्या पवसानं व्हव्होन गेलाय... शेतकाऱ्यानं जगतलं कसं... शॅत रितीवर हाणूस पाच वर्स लागत्यात का धा वर्स लागत्यात ठऊक न्हाय... दुसऱ्यांची माठी आमच्या गाद्यात आमची माठी दुसर्यांच्या गाद्यात.... सर्व इस्काटोन गेलाय... मॅर तर जाग्यावरूच न्हाय... शॅतं हुडीकतली कशी त्याची पंच्यात पडलेय.

गावातली गवूडकी करणारी मोठी माणसं असल्या पावसाचा फायदा घेत्यात आणि आपल्या जमिनीया चारी बाजूनं चाचार हातानी रुंद करून घेत्यात.... त्यात जीव जाताय गरिबाचा. अस्से मोठे पऊस पडले म्हटल्या बारक्यांचे गादे बारीक होत्यात... मोठ्यांचे गादे मोठे व्हत्यात... पऊस सर्व्यास्न पाजे हाय... खरं त्यानंन बी उल्ला इच्चार करतला... दोनूच दिसात सर्व्या नद्यास्न पूर काढतल्या वाटा आठ दिस कोसळोन पूर काढल्यानं तर त्याच्या बाबाचं काय गठलं कमी व्हणार हाय? पैनं पऊस रहितूच की... पुऱ्या पवसाळयात आतच्या किंता डबल पऊस पडे... यवढा पऊस पडे म्हटल्या सर्व्या गोरांच्या पाठी पवसानं कुजेत... माणसांची बोटं सुकान कसोन जईत... पायाच्या बोटात्न बीबा घालीस्कळ फुरे व्हई... खरं तण्णा आतंगात पूर



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

नव्हते. रस्ते बंद व्हईनसेत... पाणी आपल्या मागान जईत रही... व्हळा-नद्या वर्सानवर्स व्हव्हेत रहीत... गावातली वल खंडू व्हईनसे...

सिमग्यापत्तून हाळ्यात्न पाणी रही... इस हाताची भाव खांडल्याशीकी त्यातलं पाणी कंदी आटेनसे... आतं बघाजावा... साठ-साट हाताच्या बावडीया खांडून त्यास इस-इस हाताचे बोगदे खांडून सुकान लिंबराच्या दिसात पियोस पाणी नसताय... बॅळगावची लोकं तर नुस्त राकसकोपाच्या धरणातल्या पाण्याकडं बघीत ऱ्हात्यात...आतं दोन-चार वर्सात पऊस पडोलाय...खरं त्यास आदमास न्हाय... पडतल्या म्हटल्या पडतला. त्यानन काय हूलाय... शेतकारी कसा संपोलाय... त्यास खुला सांगणार? एकेका दिसास पऊस वत्तोलाय म्हटल्या लई अजाब... आवंदू असं झालं... सक्कळ बघीटलो तर मार्कंडे नदीच्या तळात वाळू दिसली. दोपारी बघीटलो तर नदीन पाणी पुढे सरकोललं..... सांच्याळ बघीटलो तर नदी काठोकाठ व्हती... आणि दुसरेंदी सक्कळ बघीटलो तर नदीचा समुद्रच झाला... असला पऊस वत्तोलाय...नदीच्या दोन्ही बाजूचा शेतकारी आवंदू सरला. कितींदा पेरतलं...बीयास खुलेटनं पैसा हाणतला... दुसऱ्यानं पेरलं तरी उगावणार हाय म्हणून खुल्यात सांगिटल्यानाय?

पवसान बाकी इक चक्कोट केल्यानाय... सरकारास पैसा खऊचा लई चक्कोटला चानस देल्यान्हाय... नवे करले रस्ते आणि पुलं व्हवोन जात्यात... रस्त्याच्या दोन्ही बाजूस टाकली बाजूच्या गाद्यातली माठी पहिल्या पऊसातूच व्हवोन जाते... अतिपावसानं रस्ते व्हवोन गेल्ले म्हणून पेपरात्न छापोन येताय... नि पुढच्या वर्षी त्याच कामासाठनं आणि पैसा सरकार खरंच करताय... कंचराटदार अर्धे कामावर नि अर्धे खिशात घालताय... त्यास खुल्ला इच्चारन्हाय... परत पुढच्या वर्षी म्हणतलं गसली गातूच आवंदूबी पऊस पडला... रस्त्यावर माठी कशी तग्याल? आणि पेसा उकळतला? असं हे खातल्यांचंबी चक्कार सुरू हाय... सरकार काय बी करन्हाय... सरकार नुस्त आपणास खऊस गाव्याल तवडंच करताय... खरं आतं माणसानूच शाणं हूस पाजे... पैनं लई वईटला पऊस पडोन सुकान आतच्या गात लुकसान व्हईनसे... आणि आतं पहिल्यातला अर्धा पऊस पडोन सुकान एक गादा जाग्यावर राहन्हाय...हे असं का? ह्यचा इच्चार करतली टईम यल्ले.. पहिला आमचे हळ्ळे चक्कोट व्हवेत... आतं हळयावरूच बाजूचे शेतकारी हाक्क गाजबूल्याताय... दरवर्षी उल्ली उल्ली माठी हळयात ढकलून शेतकरी आपला गादा मोठा करूस बघूलाय... शेतात भांगलले कळे सुकान तो व्हळेतून टाकताय... शेतकऱ्यानं व्हळेस्न गाईर करून सोडल्यानं... पाण्यान पुढे जातलं कसं...? नयांचंबी हेच झालाय....

चारी बाजूनं नदी आवळोन यल्ली... नदीत पाणीच मावेनाय... एक यळ पाणीबी माव्याल खरं जऊस वाट पाजे का नको... लिंबराळात भाच्या खांडत्याशी नदीत नि माठी बाजूस तशीच... नदीनं व्हवतलं कसं? शेतात्न बांध असे घालत्यास्ताय की आपल्या गाद्यातलं पाणी दुसऱ्याच्या गाद्यात गेलं तर ते आपल्याक्षी लई भात मळील, यांचीच तुम्हाशी काळजी पडते... तुमच्या शेतातलं खतमुत बदीच्याच्या शेतात जईल म्हणून छाती बडवून चल्याल...? उल्ल पाणी सोडलं बरं काय सर्वा गादाच व्हयोन गेल्ला बरा...? ह्याचा खुला इच्चार करणार हाय काय न्हाय... व्हळा आणि नद्या यवस्थीत व्हवल्या तर पुराचा तडाखा बसन्हाय... तुम्हीच दुसऱ्यांच्या मार्गात आडवे यल्याशी म्हटल्या तरास ह्यो व्हनारूच हाय... पाऊस कंदी उल्ला पड्याल कंदी लइ पड्याल... खरं आपली शेतं-शिवारं आबादान करूस खुलं सरकार येऊच न्हाय... आपलं शिवार आपनीच राखोस पाजे... लुकसान भरपाई देतली सरकाराची बुद्धी न्हाय... सरकार चालीवतली आमच्यातलीच हाताय... खरं त्या बावास्न खातलं यवढंच ठऊक हाय... म्हणूकोस कुणावर इास टून चलन्हाय... आपलं आपनी आबादान करतले दिस यल्याताय... नुकसान झालं म्हणून ध्याई फोडून घूकाशी... नव्या दमानं कामास लागा... पऊस संपोकोस आजूबाजूच्या तालुक्यात्न नट्टी लावूस रोपं इक्कात हाणा... आणि आवंदूच वरिस उल्लं मागस व्हईनाय काय... खरं शेतं करा... पाड टाकूंकाशी....जे गव्याल त्यातूच समाधान मानतली शेतकयाची जात हाय... संकटं शेतकऱ्यावर यऊची न्हाताय तर ती काय त्या टाटा, बिर्ला, अंबानीवर येणार हाताय... गरिबानूच सोसतलं असताय, हे काय तुम्हाशी ठऊक न्हाय?

*(विजयकुमार दळवी, अंतरीचा बोल, पृष्ठ क्रमांक १५२ ते १५४)*

चंदगडच्या पूर्व भागात वरती सांगितल्याप्रमाणे मार्कंडेय नदीच्या परिसरात आजच्या बेळगाव जिल्ह्यातील बहुतांश भागात आणि चंदगडच्या शिनोळी, तुडये, हाजगोळी परिसरात या पद्धतीने बोली बोलली जाते. ही बोली सध्या 'बेळगावी' म्हणून ओळखली जाते. तिच्यावरचा कानडी भाषेचे प्रभाव, कानडी उच्चारांचे प्राबल्य पाहता ते नाव योग्यच आहे. तथापि, चंदगड हा कधीकाळी बेळगावचाच अविभाज्य भाग असल्याने आजच्या चंदगडमधील अनेक गावांमध्ये ही भाषा असणे नैसर्गिक आहे. तशी ती अनेक गावात आजही मोठ्या प्रमाणात बोलली जाते. बेळगावी बोलीची क्रियापदे, प्रत्यय प्रक्रिया आणि काही वैशिष्ट्यपूर्ण शब्द सोडल्यास अनेक बाबतील चंदगडी बोलीशी साम्य आहे. या बोलीरूपाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य तिचे उच्चारण आहे. कन्नड भाषेतील शब्दांसह उच्चारणाचा मोठा प्रभाव या बोलीवर आहे.

त्यामुळे या प्रभावात पूर्व भागात तूज (तू), मिण्ण (मला), माज (मला), त्यासणी (त्यांना), तिण्ण (तिने), त्यणाणी (त्यांनी), ह्यणाणी (यांनी) अशी काही वैशिष्ट्यपूर्ण सर्वनामाची रूपे दिसतात. वरील भाषिक व्यवहाराच्या नमुना प्रारूपात जरातरबी (जरा तरी, थोडी लाज, थोडी शरम अशा अर्थाने), उगेबी (उगाच, काही कारण नसताना), त्याननबी (त्यांनीही), ह्याननबी (यांनीही), घालीस्कळ (घालीपर्यंत), हाळयात्न (आढ्यातून), बाबडीया (विहिरी) व्हहोन (वाहून जाणे), गईप (गायब होणे), गवूडकी करणारी माणसं (दलाली करणारी, मध्यस्थी करून स्वत:चा लाभ उठवणारी प्रवृत्ती), लिंबार (उन्हं), आदमास (अंजाद), माठी (माती), वईटला (भयानक, फार या अर्थाने. वाईट या अर्थाने नाही) अशी शब्द बनवण्याची खास पद्धती आहे. वरील उतारा एक प्रकारचे स्वगत आहे. स्वत:शीच बोललेला उतारा. या उताऱ्यातील भाषा त्या क्षेत्रातील उच्चारणांशिवाय ऐकीव होत नाही. तिचे वैशिष्ट्य कळत नाही. या उताऱ्यातील शब्द चंदगडी बोलीत जरातरबी - जरातरीबी, उगेबी - उगीचबी, त्यानानबी - त्यनबी, ह्याननबी - ह्यनबी, घालीस्कळ - घालीसकोळ, हाळयात्न - हाळळयातनं, बावडी - भावी असे आहेत. त्यामुळे यामध्ये उच्चारणाच्या अंगानेच भेद दिसतो. या बोलीत दिसणारे सुकान (आनंदने), रहीत (राहात), खयीत (खात), टईम (वेळ/वेळा), बावास्न (एक शिवी), गव्याल  (मिळेल) हे शब्दही इकडच्या भाषिक व्यवहाराचे खात वैशिष्ट्य आहे.

**नमुना ९ : खरे मैतर**

आमी कोलापुरात नयीनच. आमका सवय खयची बाहेर जावची? पण काय करतलस सुट्टी घराकडे रहोन. काय करतलस हुनून कामक ईल्लव. रहोचा ठिकाण राजाराम पुरी. रोजचा आमचा ठरलला न्हता. बेघीना उठोचा आणि महालक्ष्मी देवळात दर्शन घेवन येवचा. तदवा इतक्या कळा नाय शहरात कसा रहोचा. मगे हळूहळू सवयचा झाला. जेमतेम महीनो झालो असात, मी आणि माझे मैतर... मैतर खैचे घरचेच. नारू, झेंडो नारू, आणि आमचो भाई. सगळे हाटेलात कामाक व्हते. काम करून कॉलेजाक जाईत थिसर. मिया मात्र तेच्याबरोबर कामाक गेललय. पण कसला काय माझा पहिला कॉलेज पुणे इद्यापीठाच्या नारायणगावला तेरावी झाली. आता चौदावीक नइन इविद्यापीठ बदलुक गावचा नाय असा कळाला. मीया नारूक हुतलय, नारु आता मिया हीसर रहो शकन ना. माका कायव करोन जावचा लागतला. ह्या ऐकोन सगळे गप्प झाले काय समजना ते ईचारू लागले. अरे तीया हूनस नी हीसर रहोन कॉलेज करतलस आता अचानक काय झाला. सगळे थोडे नाराज झाले असतले ह्या माझ्या मनात इला पण काय इलाज नव्हतो.

सगळ्यांनी ठिक हाय हुतलयांनी. आणि वार सोम्मार व्हतो. येळ राच्ची बारा कोल्हापूर ते नाशिक गाडी व्हती. सगळे कामावयना ईले. मिया माझे कपडे बिपडे भरून ठेयललय. माका स्टॅन्डवर सोडुक नारु, भाई, आणि झेंडे नारू येणार व्हते. आमी रुममधना स्टँडकडे जावक निघलव. राजारामपूरी ते स्टँडकडे जाताना मधी याक रेलये नाका लागता. येळ राच्चीची व्हती. आमी त्या रेलयेच्या प्लॅटफॉर्मार पोहचलव. तितक्यात कुणीतरी आमका हाक दिली. आमी थांबलव बघतव तर काय एक फोलीस. तो आमका ईचारू लागलो, इतके राच्चे खय निघालाय. आमी एकमेकांच्या तोंडाकडे बघत व्हतव. तितक्यात नारू पुढे झालो आणि त्या फोलिसाक सगळा सांगल्याण. साहेब आमच्या मैतराचा नारायणगावला जावचा हा. तेका स्टॅन्डवर सोडुक चालव. तो फोलीस चवताळून बोललो इतक्या राच्चे तुमका काय बगीचा वाटला काय फिरोक. बाबाचे

राज्य हा काय? ह्या ऐकोन आमी जास्तीच भियालव. तितक्यात नारु काय पुटपुटलो ता ऐकोन त्या फोलीसान नारुच्या एक कानपाटीत मारल्यान. तितक्यात मिया पुढे ईलय आणि त्या फोलिसाक सांगलय साहेब माझो उद्या पेपर हा काय करा पण आमका सोडा. पण तो कसलो ऐकता, आता जास्त बोलला आतमधे खोलीत कोंडून ठेवीन. मीया खुप विनवणी केली आणि हुतलय, साहेब इथुन पुढे असा होणार नाय. इतक्या येळेक सोडा आमका. तो बोलला ठिक आहे पण या पुढे ईकडे फिरताना दिसलात तर डोके मोडीन. आमी बापडे होहुन हा हुतलव आणि खाली मान घालुन निघलव. बरोबर अरधो तास तेच्याबरोबर हुज्जत घातलव आणि स्टॅण्डवर पोहचलव. तेवढ्यात गाडी ईली माका त्यांनी निरोप दिल्यानंतर ते पण नीघुन गेले. पण नारूक माझ्यामुळे झालेली शिक्षा आजही कायम ध्यानात आहे. पण खरे मैतर काय असतत ते आता कळाला.

*(परसू गावडे, करंजगाव)*

हा बोलीचा उतारा चंदगडी लोकांच्या म्हणण्यानुसार 'कोकण्या मुलकातला' आहे. हा 'मुलूक' (परिसर) चंदगड या तालुक्याच्या गावापासून पश्चिमेला आंबोली या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील लोकप्रिय पर्यटन स्थळापर्यंत पसरला आहे. जेमतेम तीस किलोमीटरचा परिसर. या परिसरातील बोलीवर मालवणी-कुडाळी बोलीचा खूप खोलवरचा प्रभाव आहे.

करलस, जातलस, यतलस अशा पद्धतीची 'लस' प्रत्यय लागलेले क्रियादर्शक शब्द या बोलीत मोठ्या प्रमाणात वापरले जातात. तुमका (तुम्हाला), आमका (आम्हाला), माका (मला), तुका (तुला) ही सर्वनामे मालवणीप्रमाणेच या बोलीरूपात आहेत. शब्दसंग्रहावरही मालवणीची प्रभाव आहेच. मह्यनो, मैतर, कानपाटीत सारखे या उताऱ्यातील शब्द याचा पुरावा आहेत. कानपाटीत (कानाखाली), खैचे (कोणते). व्हते (होते), ईलय (आले आहे), येळेक (वेळेवर) अशा पद्धतीचे अनेक शब्द मालवणी-कुडाळीतील आहेत.

वरील उताऱ्यावरून चंदगडी बोली बोलली जाणाऱ्या बहुतांश प्रदेशातील बोलीचे नमुने पाहता आले. या उताऱ्यांवरून बोलीतील विविधता लक्षात येते. प्रत्येक प्रदेशातील लोकांचा संपर्क, तेथील आजचे वातावरण, औद्योगिकीकरण, शहरांशी आणि भाषां-बोलींशी भिन्न भिन्न स्वरूपाचा संपर्क इत्यादीमुळे व्यवहारात विविधता आली आहे. सण, विधी, कुटुंब, विवाहासारख्या सामाजिक संस्था, शेतीसारखा मुख्य व्यवसाय, बाजाराच्या निमित्ताने बाजार गावातील लोकांशी होणारा संपर्क अशा अनेक ठिकाणातून या बोलीभाषकांचा व्यवहार तपासता आला. वरील भाषिक नमुने या बोलीत प्रत्यक्ष व्यवहार कसा होतो हे समजून घेण्यासाठी फार महत्त्वाचे आहेत. हे बोलीचे नमुने प्रत्यक्ष व्यवहाराचे निरीक्षण करून लिहिलेले असल्याने ते व्यवहाराचे प्रतिबिंब आहेत. बोलीतील संभाषणामधून, निवेदकाच्या निवेदनामधूनही चंदगडी बोलीचे साक्षात दर्शन घडते. ही बोली कशी बोलली जाते, याचा काहीएक अंदाज बांधता येतो.

या बरोबरच बोलीचा व्यवहार सूक्ष्मपणे लक्षात येण्यासाठी त्या बोलीचे व्याकरण अभ्यासने आवश्यक आहे. त्यासाठी व्याकरणातील महत्त्वाच्या मुद्यांच्या आधारे चंदगडी बोलीचे प्रत्यक्ष उपयोजन कसे होते हे समजून घेता येते. वरील व्याकरणावरूनही या बोलीला लाभलेले भिन्न संपर्क, इतर भाषिकांच्या संस्कृतीचा प्रभाव, भौगोलिक वेगळेपण, ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात येते. चंदगडी बोलीचा स्वत:चा स्वतंत्र शब्दसंग्रह आहे. या शब्दसंगहाची चर्चा पुढे करणार आहोतच. या बोलीवर कोकणी, कन्नड या भाषांचा आणि मालवणी-कुडाळी बोलीचा प्रभाव कसा व्यापक आहे याचा अनुभव या बोलीची संपर्कव्यवस्था अभ्यासताना येईल. त्याचबरोबर येथील ऐतिहासिक कालखंडातील विविध राजवटींमुळे अनेक भाषांमधील शब्द या बोलीत रुजले आहे. या सर्व विवेचनावरून एखाद्या प्रदेशात शब्द कसे विकसित होतात. शब्द घडण्याची प्रक्रिया भाषेत कशी चालते. संपर्कामुळे भाषेची देवाणघेवाण कशी घडते. भाषेला नवे रूप प्राप्त होतात कोणती प्रक्रिया घडते. अशा अनेक गोष्टींचा अभ्यास या विचारातून होताना दिसतो.

❑❑❑

॥ पाच ॥

# चंदगडी बोली : भाषासंपर्क

जीवनव्यवहारात भाषासंपर्क ही नैसर्गिक आणि अटळ अशी गोष्ट बनली आहे. त्यामुळेच समाजभाषाविज्ञानातील एक महत्त्वाची संकल्पना ठरली आहे. या प्रक्रियेत भाषिक आदानप्रदान अटळ असते. भाषासंपर्काच्या (language contact) संकल्पनेधारे भाषाव्यवहाराचे स्वरूप अभ्यासता येते. आज समाजाचा भाषाव्यवहार चौफेर विकसित झालेला आहे. पारंपरिक जीवनपद्धतीचा त्याग हे या मागील मुख्य कारण आहे. चंदगडी बोलीच्या अनुषंगाने संपर्काचा विचार केल्यास येथील भिन्न बोली आणि भाषासंपर्क शेकडो वर्षांपासूनचा आहे. राजकीय सत्तेतून होणारी भाषिक आदानप्रदान प्रक्रिया येथेही झालेली आहेच. ती गोव्याच्या संपर्कामुळे थेट परकीय भाषेशी संपर्कात आलेली आहे. आज ग्रामीण समाजजीवन झपाट्याने बदलले आहे. पारंपरिक खेड्यांचे स्वरूप अमूलाग्र बदलले आहे. अलुतेदारी, बलुतेदारी पद्धती, पूर्वीचा गावगाडा आणि खेड्यातल्या माणसाचा गोतावळा आता शिल्लक राहिलेला नाही. नागरिकीकरणामुळे खेडी शहराकडे वाटचाल करू लागली. नव्या यंत्रयुगाची ओळख ग्रामीण माणसाला झाली. त्यातून त्यांचे पारंपरिक जीवन बदलत गेले आणि पर्यायाने त्यांची बोली बदलली.

चंदगडी बोलीचा प्रदेश आज कोल्हापूर जिल्ह्यात येत असला तरी, तो खूपच अलीकडच्या काळात कोल्हापूरशी जोडला गेला आहे. तत्पूर्वी तो आज कर्नाटकात असलेल्या बेळगावचा भाग होता. आज कर्नाटकात असलेल्या मराठी भाषिक समाजाचा विचार करता बेळगाव, खानापूर हे तालुके मराठी भाषिकांची मोठी लोकसंख्या असलेले तालुके आहेत. या प्रदेशातील मराठी भाषिक लोकांची संख्या कमी करण्याच्या उद्देशानेच चंदगड वेगळा केला गेला. त्यामुळे हा प्रदेश प्रारंभापासून कोल्हापूरपेक्षा बेळगावशी अधिक जवळचा आणि सर्व दृष्टीने जोडलेला प्रदेश आहे. आजही चंदगडच्या सर्व गावांचा प्रत्येक कामासाठी संपर्क बेळगावशी आहे. शेतीत पिकणारा माल बेळगावला मार्केट यार्डात नेणे आणि घरासाठीचा सर्व बाजार बेळगावातूनच करणे, हे येथील लोकांच्या अंगवळणी पडले आहे. त्या दृष्टीने चंदगड हा प्रदेश कोल्हापूरपासून साधारण दीडशे किलोमीटर अंतरावर असल्यामुळे तुलनेने खूपच जवळ असलेल्या कर्नाटकातील बेळगाव, गोवा आणि कोकणप्रदेश म्हणून ओळखला जाणारा सिंधुदुर्ग जिल्ह्याशीच या तालुक्याची जास्त जवळीक असते.

तळकोकण, गोवा, कर्नाटक यांच्या जीवनसंपर्कामुळे एक नवी जीवनपद्धती उदयास आली आहे. हिरवागार निसर्ग, डोंगर, दऱ्या, तलाव, लाल मातीतील काजू, ऊस, बटाटा, रताळी, मिरची इत्यादी पिके; पर्यटनासाठी येणारे आणि इथून गोवा, कोकण, कर्नाटकात जाणारे पर्यटक, यामुळे आर्थिक आणि सामाजिक जीवनावर पडणारा प्रभाव या साऱ्यामुळे दुर्गम असूनही चंदगड हा तालुका सतत जिल्ह्याच्या सत्ताकारणात, समाजकारणात अग्रेसर राहिलेला आहे. मूळच्या रांगड्या प्रदेशातील मराठी भाषेला कोकणी आणि कन्नड यांचा शेजार लाभल्यामुळे या लोकांच्या जीवनसंक्रमणातून निर्माण झालेली चंदगडी बोली येथे तयार झाली आहे. भाषा, संस्कृती विषयक गैरसमजातून येथील समाजजीवन अन्य समाजाच्या तुलनेत मागास आहे, असे लोक म्हणत होते. वास्तविक कोणतीही भाषा, बोली आणि संस्कृती मागास नसते. ती श्रेष्ठ-कनिष्ठही नसते. परंतु, ही गोष्ट लक्षात येण्याअगोदर मागासपणाचा शिक्का येथील लोकांनीही स्वीकारलेलाच होता. त्यामुळेच रमेश वरखेडे म्हणतात तसे, 'सांस्कृतिक व राजकीय दृष्ट्या श्रेष्ठ मानल्या जाणाऱ्या गटाच्या भाषांतून निम्नस्तरीय गटातील भाषंकांकडून ऋणग्रहण होत राहाते.' (रमेश वरखेडे, २००१ : पृष्ठ ५८) चंदगडच्या पूर्व भागात कर्नाटक राज्य, पश्चिम भागाला गोवा-



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

कोकण सीमांचा शेजार त्यामुळे वरखेडे म्हणतात तशा प्रभावातून हिंदी, कन्नड, कोकणी, मालवणी-कुडाळी, इंग्रजी, पोर्तुगीज भाषा-बोलींचा प्रभाव चंदगडी बोलीवर दिसतो. कदाचित काही प्रभाव येथील बोलीतून या भाषांमध्येही गेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. संपर्काचा परिणाम दोन्ही भाषांवर कमीअधिक प्रमाणात होतच असतो.

भाषासंपर्काच्या प्रक्रियेतून (pidginisation) बोलीअंतर्गत अनेक घडामोडींचा अभ्यास करता येतो. त्या प्रदेशातील लोकांचा द्वैभाषिक आणि बहुभाषिक संपर्क तपासता येतो. चंदगडला अशा पद्धतीचा संपर्क असल्याने ही गोष्ट तपासायला हा प्रदेश चांगले उदाहरण ठरणार आहे. त्याचबरोबर भाषाद्वित्व (diaglossia) या संकल्पनेनुसार लोक भाषा आलटून पालटून कशी बदलत असतात हेही पाहता येईल. संपर्क अटळ झाल्यानंतर भाषामिश्रणाची (code mixing) प्रक्रिया घडतेच. याबाबतचा मोठा इतिहास आपल्याकडे उपलब्ध आहे. शेकडो वर्षांच्या मुसलमानी राजवटीत राज्यव्यवहाराच्या भाषेवर पडलेला फारसी भाषेचा प्रभाव दूर करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यव्यवहार कोश निर्माण करून घेतला. पुढे भाषाशुद्धीच्या चळवळीतही भाषामिश्रणाचा मुद्दा ऐरणीवर आलेला होता. भाषामिश्रणातून घडणारे 'भाषाबदल' (code switching) टिपणे हे समाजभाषाविज्ञानाचे काम आहे. त्यातूनच 'भाषाप्रदूषण'सारख्या वादग्रस्त संकल्पनेबद्दल वस्तूस्थितीदर्शक माहिती उपलब्ध होऊ शकते. भाषा घडणीची प्रक्रिया समजून घेता येऊ शकते. पिजीन आणि क्रिरऑल प्रक्रियेतून भाषा कशी घडते, हेही याच प्रक्रियेतून अभ्यासता येते. त्या दृष्टीने चंदगडी बोलीची संपर्कप्रक्रिया येथे अभ्यासता येईल.

**भाषासंपर्क**

भाषासंपर्क संकल्पना अभ्यासासाठी चंदगडी बोली एक लक्षणीय उदाहरण ठरावे. याचे कारण मागे चर्चा केल्याप्रमाणे या बोलीला अनेक भिन्न भाषा आणि बोलींचा शेजार लाभला आहे. वास्तविक या शेजारामुळेच या बोलीची निर्मिती झालेली आहे. भौगोलिकदृष्ट्या मुख्य प्रवाहापासून दुरस्त, दोन घाटमाथ्यांमुळे कोकणी आणि मालवणीचा प्रभाव, शेजारचे कन्नड बहुभाषिक राज्य अशा अनेक कारणांनी या बोलीतील शब्दसंग्रहात वैशिष्ट्यपूर्ण भर पडत राहिली आहे. याचे कारण येथील लोकांचा संपर्क या सर्व भिन्न भाषिक लोकांशी आहे. व्यापाराचे मुख्यगाव म्हणून बेळगावशी नित्य संपर्क, अनेक कन्नड भाषिक लोकांचा शेजार, कन्नड मातृभाषा असलेल्या लिंगायत आणि बेरड समाजातील लोकांचा गावोगावी सहवास, त्यांच्यासोबतचे सहजीवन, विविध कारणांसाठी गोवा आणि तळकोकणात संपर्क; यामध्ये गोव्यातील नोकऱ्या, शेतीची कामे करण्यासाठी चंदगडकरांचा गोव्यातील राबता, अशा विविध कारणांनी घडणारा येथील लोकांचा संपर्क अभ्यासता येतो. वास्तविक भाषासंपर्क म्हणजेच मानवी जीवन व्यवहारात माणसाचा येणारा विविध लोकांशी संपर्कच असतो. भाषासंपर्काच्या अभ्यासातून त्या प्रदेशातील लोकांचा कोणत्या कारणांनी आणि का विविध लोकांशी संपर्क येत असतो याचाही अभ्यास यातून होत असतो. या संपर्काची चर्चा व्यक्तिबोली संपर्क, शेजार भाषा-बोली संपर्क आणि परकीय भाषासंपर्क या तीन संकल्पनांच्या आधारे करता येतो.

बोलीच्या अभ्यासात व्यक्तिबोली संपर्क सर्वात महत्त्वाचा आहे. बोली निर्माण झालेला प्रदेश एका विशिष्ट काळापर्यंत मुख्य प्रवाहापासून, राजसत्तेपासून दूर असणे, तेथील जगण्यात आलेली स्वयंपूर्णता यामुळे संपर्क मर्यादित राहतो. काही वर्षार्ंपर्यत चंदगडी बोलीच्या प्रदेशातील लोकांचे जीवन असेच असल्याने या बोलीच्या निर्मितीला ते कारणीभूत ठरले असावे. एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तींच्या संपर्कात येण्यासाठी विविध कारणे असतात. अगदी गावातील सामान्य शेतकरी, शेतमजूरही आपल्या जगण्यासाठी अनेकांच्या संपर्कात येतो. गावातील शेतकरी सुतार, लोहार, कुंभार, शेतमजूर अशा लोकांच्या संपर्कात येणे अपरिहार्य असते. त्यातून होणारा व्यवसायविशिष्ट (Register) भाषासंपर्क हा व्यक्तिबोली संपर्क म्हणून अभ्यासता येईल. व्यक्तींनुसार बदलणारी भाषा भाषाविज्ञानात व्यक्तिबोली (idiolect) म्हणून परिचित आहे. व्यक्तीनुसार भाषा भिन्न असली तरी; संप्रेषण व्यवहारामध्ये व्यत्यय येत नाही. बऱ्याचदा संपर्कात येणारी व्यक्ती, तिची भाषा समोरच्या व्यक्तीला प्रभावित करते. शब्दांची निवड, बोलण्याची पद्धत यांची छाप समोरील व्यक्तीला आकर्षित करते.

समाजात अनेक व्यक्तींच्या बोलींचा प्रभाव इतरांवर पडत असतो. त्यातून शब्दांची उच्चारणांची, म्हणी, वाक्प्रचारांची देवाणघेवाण भाषेत घडते. समाजातील काही व्यक्ती कल्पक असतात. ते त्यांच्या नकळत अनेक नवे शब्द घडवतात. त्यांच्या कल्पनांना ते आपल्या व्यवहारात मूर्त रूप देत राहतात आणि त्यांच्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तीकडे ते आपली कल्पना संक्रमित करतात. समाजात ही प्रक्रिया सतत चाललेली असते. त्यातूनच अनेक शब्द घडतात. खेडोपाडी सुतार, लोहार, कुंभार समाजाकडून असे व्यवसायविशिष्ट अनेक शब्द कल्पकतेने प्रथम बोलीत आणि नंतर प्रमाण भाषेत प्रविष्ट झाले आहेत. गोंधळ घालणे, पाचर मारणे, वळंब्यात घेणे, गाऱ्हाणे सांगणे, असे पुष्कळ शब्द यासंदर्भाने विचारात घेता येतील.

चंदगड हा डोंगराळ आणि अतिपावसाळी प्रदेश असल्याने कधी काळी शेतीत येथे फार उत्पन्न मिळत नव्हते. त्यामुळे काळाच्या एका विशिष्ट टप्प्यावर मुंबईत गिरणी व्यवसाय गतीने वाढायला सुरू होताच चंदगड परिसरातील लोकांचे लोंढे मुंबईकडे निघाले. आजही वाढत्या लोकसंख्येमुळे वडिलोपार्जित शेती पोट भरायला अपुरी ठरते आहे. त्यामुळे मुंबईसारख्या महानगरांमध्ये या परिसरातून खूप लोक नोकरीसाठी जात असतात. बाहेर नोकरीधंद्याला जाणाऱ्या लोकांमध्ये मुंबईत नोकरीसाठी जाणाऱ्यांची आणि सैन्यात भरती होणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. येथील बहुतांश लोकांनी हेच पर्याय स्वीकारलेले दिसतात. असे येथील लोक पोटासाठी बाहेर पडल्यानंतर येथील लोकांच्या म्हणजेच चंदगडी बोलीच्या संपर्कात अनेक भाषिक लोक येऊ लागले. मुंबईकडे गेलेले लोक आपली बोली टाकून होना, आलो ना, जाऊ ना असे बोलणारे ‘मुंबयकर’ झाले. प्रत्येक घरातील एखादी व्यक्ती अशी मुंबईकडे जात असल्याने व्यक्तीबोली संपर्काला वेगळे परिमाण लाभले. मुंबईहून सुट्टीत महिनाभर गावी येणाऱ्यांच्या संपर्कातून घरातील, गावातील शब्दसंग्रहात नवी भर पडू लागली. चंदगडच्या पश्चिमेकडील गावांमधून मोठ्या संख्येने लोक मुंबयकर झाले. गावंच्या गावं मुंबई, पुण्यात गेली. त्यांनी आपल्य घरची आणि गावची भाषाच बदलून टाकली आहे.

## चंदगडी आणि शेजार भाषासंपर्क

बोलीवर दुसरा प्रभाव शेजार भाषासंपर्काचा असतो. भारत हा बहुभाषिक देश आहे. म्हणूनच बहुभाषिकत्व हे भारताचे महत्त्वाचे वैशिष्ट्य मानले जाते. आपल्या देशात सुमारे बावीस भाषांना राज्यभाषा म्हणून मान्यता आहे. या देशात व्यवहारासाठी इंग्रजीलाही मान्यता देण्यात आली आहे. या भाषांव्यतिरिक्त शेकडो बोलीभाषा आहेत. ज्या अद्यापही मोठ्या प्रमाणात बोलल्या जातात. उदाहरणार्थ, देशातील बहुतांश प्रदेशामध्ये विशेषत: उत्तर भारतामध्ये हिंदी भाषा बोलली जात असली तरी; ती सर्व हिंदीभाषिक राज्यामध्ये एकसारखी दिसत नाही. म्हणूनच तिच्यामध्ये पंजाबी, काश्मिरी, बिहारी, राज्यस्थानी असे ठळक भाषिक भेद आढळतात. गुजराती, बंगाली, कन्नड, तेलगू, तमिळ, उडिया अशा राज्यांनुसार आढळणाऱ्या भाषा पूर्णत: परस्परभिन्न आहेत. भारतातील या विविध भाषांचा विचार करताना येथील समाजाची भाषाज्ञानाची क्षमता समजून घेतली पाहिजेत. केवळ मातृभाषा बोलता लिहिता येणारा समाज या देशामध्ये मोठा आहे. तरीही या सर्व भाषा आपल्या देशामध्ये परस्परांच्या शेजारभाषा म्हणून नांदतात.

चंदगडी बोली बोलली जाणाऱ्या प्रदेशातील लोकांचा शेजार कन्नड, कोकणी, मालवणी-कुडाळी या भाषाबोलींशी आहे. त्यामुळे चंदगडी बोलीत शेजार भाषांचे मोठे ऋण आहे. शेजार भाषांमुळे केवळ शब्दपातळीवरचेच नाही, तर उच्चारणाच्या पातळीवरचे संस्कार चंदगडी बोलीवर झालेले आहेत. कन्नड, कोकणी भाषांचे आणि मालवणी बोलीच्या उच्चारणांचे बेमालून मिश्रण चंदगडी बोलीवर आहे. शिवाय दोन्ही या शेजार प्रांतातून खाद्य संस्कृती, कृषिसंस्कृती, सण, उत्सव, लोककला या सर्वच बाबतीत ऋण घेतलेले दिसते. याबाबत सविस्तर चर्चा करू.

## कन्नड भाषेचा प्रभाव

चंदगडी बोली प्रदेशाला कर्नाटकची विस्तृत सीमा लाभली आहे. वास्तविक या प्रदेशासंबंधीचे १९५४ पूर्वीचे नकाशे पाहता, चंदगडी बोली बोलली जाणारा सर्व प्रदेश कर्नाटक प्रांताचाच भाग होता असे दिसते. १९५४ पूर्वी आज जो

चंदगड तालुका म्हणून ओळखला जातो तो बेळगावचा भाग होता. चंदगड हा पूर्ण मराठी भाषिक प्रदेश असल्याने बेळगावातील मराठी भाषिकांची संख्या कमी करण्यासाठीच हा भाग सर्वप्रथम बेळगावपासून तोडण्यात आला. एका राजकारणाचा भाग म्हणूनच चंदगड तालुक्याची निर्मिती झाली हे सर्वज्ञान आहे. या राजकारणामुळेच बेळगावला कर्नाटकात ठेवणे सोयीस्कर झाले. चंदगडी बोलीचा सर्व प्रदेश स्वातंत्र्यपूर्व कालखंडात सांगली, कुरुंदवाड आणि हेरे संस्थानांकडे होता. या प्रदेशातील शेतकऱ्यांचे शेतीमाल विकण्याचे आणि बाजाराचे मुख्य ठिकाण बेळगाव होते. आजही आहे. शिक्षणाचे, दवाखान्यांचे केंद्रही बेळगावच असल्याने चंदगडच्या लोकांचा राबता सतत बेळगावात असतो. आजही प्रशासकीय व्यवहार सोडल्यास बाकी सर्व व्यवहार बेळगावशीच आहेत. बेळगावच्या सततच्या संपर्कामुळे चंदगडी बोलीत अनेक कानडी शब्द रुजण्यासाठी कारणीभूत ठरला आहे.

कानडीत असलेले आणि चंदगडी बोलीत रुजलेले अनेक शब्द आहेत. त्याचबरोबर मूळ चंदगडी बोलीतील परंतु, सीमावर्ती कानडी भाषेत रुजलेले काही शब्दही दाखवता येतील. बाजार आणि शेतकऱ्यांनी पिकवलेला माल स्वीकारणे, विकणे या व्यवहारात शब्दांची देवाणघेवाण मोठ्या प्रमाणात झालेली आहे. चंदगड भागात मोठ्या प्रमाणात पिकणारी 'चिन्नी' (रताळी), 'गड्डे' (बटाटे), 'मिरसेंगा' (मिरची) मिरसेंगा हा शब्द पोर्तुगीजांनी येथील मसाल्याच्या पदार्थातील मिरी बाहेर पाठवून येथे मिरची रुजवली. तत्पूर्वी भारतात मिरची कोणी खात नव्हते. येथील आहारत तिखटपणा मिरीने आणला जात असे. मिरीची शेंग आणि तिला दिलेला पर्याय मिरची यावरू 'मिरी शेंग'वरून 'मिरसेंगा' हा नवाच शब्द मिरचीबद्दल तयार झाल्याचे सांगितले जाते., 'काजवा' (काजू), 'नाचना' (नाचणी) त्याचबरोबर 'बावची' (गवार), 'बिनिस', 'कोबी', 'फ्लावर' अशा काही भाज्या, जंगलातील बिबटी, बिब्बे, मध, डिंक, हिरडा, करंजी, रिटा यासारख्या अनेक औषधी आणि दैनंदिन गरजेच्या वस्तू, इतर अनेक औषधी उत्पादने आणि 'लाकूडफाटा' (जळावू लाकडे) विकण्याचे ठिकाण बेळगाव हेच आहे. या परिसरातील बहुतांश दुकानदार, लहानमोठे व्यापारी मालाची खरेदी बेळगावमधून करतात. शिवाय चंदगड हा अतिपावसाळी प्रदेश असल्याने येथील लोकांना पावसाळ्याचा संपूर्ण बाजार (बाजारहाट) उन्हाळ्याच्या शेवटी करून ठेवण्याची पद्धत आहे. या तालुक्यातील अनेक गावांचे रस्ते पावसाळ्यात बंद होतात. त्यामुळे वर्षानुवर्षे हे लोक पावसाळ्याचा बाजार करून ठेवताना दिसतात. त्यातून दरवर्षी उन्हाळा संपत आला की, बहुतांश लोक पावसाळ्याची 'बेजमी' (तजवीज, पूर्वतयारी) करतात. या 'बेजमी'त डाळी, तेल, मीठ, मसाले, चहापावडर, साखर, कडधान्ये इत्यादी गोष्टी प्रामुख्याने असतात. त्यातून ठराविक व्यापाऱ्यांशी त्यांचे कायमस्वरूपी संबंध तयार झालेले असतात. या नित्यसंपर्काच्या व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात शब्दांची देवाणघेवाण होत असते.

अशा देवाणघेवाणीतून झालेला भाषिक संपर्क फार घनिष्ठ आहे. ही देवघेव केवळ शब्दांची नाही तर उच्चारणांचीही आहे. या संपर्कामुळे कानडीतून चंदगडी बोलीत आलेल्या शब्दांची चर्चा करू. 'आगळीक' (मूळ अर्थ प्रभावीत) हा मूळ कानडी शब्द चंदगडी बोलीत काही तरी वेळगे, अपूर्व या अर्थाने किंवा 'वेगळेपण' या अर्थाने वापरला जातो. 'अंगी' हा कानडी शब्द 'सदरा' या अर्थाने वापरला जातो. तो तसाच परंतु, 'आंगी' असा उच्चार करून वापरला जातो. 'अच्चूतं' म्हणजे कानडीत 'आयते' किंवा 'अनायसे' तर हा शब्द 'आयते' याच अर्थासाठी चंदगडी बोलीत वापरला जातो. 'कल त्यास जॉत आच्चूतच मिळालं' (काल त्याला बैलजोडी आयतीच मिळाली) किंवा 'आच्चूतच काम झालं ब त्यचं' (आयतेच काम होऊन गेले त्यांचे.) असे म्हणताना, हा आयते, अनायसे असाच अर्थ अभिप्रेत असतो.

कानडी भाषेत 'अड्डवार' म्हणजे सुट्टीचा दिवस असा अर्थ आहे. चंदगडी बोलीतही हा शब्द 'आडवार' आणि 'अड्डदिशी' असा येतो. 'अड्डदिस' म्हणजे चुकीचा दिवस. 'आडवारी यऊ नकोस' असे म्हणताना हाच अर्थ अभिप्रेत असतो. ज्या दिवशी जे करायचे नाही तो दिवस. अर्थात् हा शब्द वेगवेगळ्या एक दोन अर्थासाठी वापरात आहे. ज्या दिवशी काम नाही त्या दिवसासाठीही हा शब्द वापरात आहे. कानडी भाषेत असलेल्या काही शब्दांना असलेला अर्थ चंदगडी भाषेत राहत नाही. तो थोडा बदलताना दिसतो. उदाहरणार्थ, 'अत्तं' हा शब्द चंदगडीत दोन अर्थ 'आत्तं' म्हणचे आत्ता? आणि 'आत्तं' म्हणजे नुकताच अशा दोन अर्थांसाठी वापरला जातो. 'तिय्या आत्तं जाणार?' आणि 'आत्तं गेलं ते' या दोन



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

वाक्यांमध्ये दोन भिन्न अर्थ या शब्दातून प्रतीत होतात. पहिल्या वाक्यामध्ये 'आत्ता, यावेळी' असे म्हणायचे आहे. तर दुसऱ्या वाक्यामध्ये 'नुकताच' असे म्हणायचे आहे.

कानडी भाषेतील नातेवाचक शब्दांमधील 'अत्ते' हा 'सासू' या अर्थाने वापरलेला शब्द चंदगडी बोलीत 'आत्त्या', 'आत्ती' असा वापरला जातो. या बोलीत 'आत्याबाय' असाही शब्द सासूसाठी वापरात आहे. तर अनेक शब्द थोडे बदलून किंवा काही वेळा थोड्या वेगळ्या अर्थासाठी रुजलेले दिसतात. उदाहरणार्थ, 'अंभ' हा पाणी या अर्थाचा शब्द 'अंबवान' असा वापरला जातो. चंदगडी बोलीत 'अंबवान' म्हणजे रोप, तरू किंवा ऊसाची लागण केल्यानंतरचे पिकाला पाजवले जाणारे पहिले पाणी म्हणजे 'अंबवान.' शेतीकामात मजुरीला येणे म्हणजे चंदगडी बोलीत 'आळास येणे.' कानडीत 'आळ' म्हणजे गडी किंवा मजूर. हा शब्द चंदगडीत 'आळास' म्हणजे 'मजुरीला' या अर्थाने तर 'आळ' हा 'मजुरी' या अर्थाने येतो. शेजारी कोकणीत 'आळ' म्हणजे आरोप. कोकणीतील हा शब्द आणि त्याचा तळकोकणातील अर्थही चंदगडीत आहे. त्यामुळे चंदगडी बोलीत 'आळ' हा शब्द मजुरी आणि आरोप अशा परस्परभिन्न दोन्ही अर्थाने वापरला जातो. 'त्यनं माझेवर आळ घेतल्यानाय' सारख्या वाक्यामध्ये हा कोकणीतील अर्थ अभिप्रेत आहे. 'उगीच कुनारबी आळ घीत राहू न्हीवे.' या वाक्यामध्ये हा कोकणीतील 'आरोप' हा अर्थ अभिप्रेत आहे.

चंदगडी बोली आणि प्रमाण मराठीमध्येही 'आळी' हा शब्द गल्ली या अर्थाने वापरला जातो. विशेषत: बेळगाव परिसरात हा शब्द अधिक वापरला जातो. जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांमध्ये हा शब्द वारंवार आवृत्त होताना दिसतो. बेळगाव शहरात गल्ल्यांपेक्षा 'आळया' प्रसिद्ध होत्या असेच त्यांच्या कथांवरून दिसते. चंदगडी परिसरातही वरची आळी, खालची आळी, पाटलांच्या आळीत, सुतार आळी असे शब्दप्रयोग वापरात आहेत. कानडी भाषेत 'आळी' चा मूळ अर्थ घराणे. विशिष्ट समाज, जातीचे आणि एका भावकीचे लोक एकत्र राहात असल्याने गावांमधून 'आळया' तयार झाल्या. त्यातूच चंदगडी बोलीत 'आळी' म्हणजे 'गल्ली' असा शब्द रूढ झाला. तरीही ज्या जातीचे लोक जास्त आहेत अशा जातीचा उल्लेख आळीचे संबोधन करताना होतो. 'चांभार आळी', 'सुतार आळी' असे. आळीबरोबर चंदगडीत 'आळ' आणि 'आळं' असे अजून दोन शब्द आहेत. 'आळ'ची चर्चा केली. 'आळं' म्हणजे रोपाला, वेलीला केलेला बांध. हे 'आळं' त्या रोपाला किंवा वेलीला खतपाणी घालण्यासाठी कामी येते. त्यावरून 'आळं करणं' म्हणजे सुरक्षित करणे असाही एक अर्थ या शब्दावरून तयार केला जातो.

'इल्ल' हा कानडी शब्द. या शब्दाचा मूळ अर्थ 'निषेधात्मक' किंवा 'नाही' असा आहे. हा शब्द या प्रदेशातील बहुतांश लोकांना माहिती आहे. तो चंदगडी बोलीत वापरात नसला तरी कधीकधी जाणीवपूर्वक वापरला जातो. या शब्दाशी उच्चारणसाम्य असलेला चंदगडी बोलीत 'इल' असा एक शब्द आहे. 'इल' आणि 'यबाव' हे दोन शब्द जवळजवळ एकाच अर्थाने वापरले जातात. 'तीस कशाला इलच न्हाय घे', (तिला कशाचा अनुभव नाही. किंवा तिला व्यवस्थित राहता येत नाही. अशा दोन अर्थाने हे वाक्य वापरले जाते.) 'त्यास इल न्हाय' या वाक्यांमध्ये 'इल' हा शब्द वागण्याबोलण्याचे संस्कार या अर्थाने येतो. 'यबाव' (संस्कार) हा शब्दही याच अर्थाने. 'यबाव' नसणे म्हणजे संस्कार नसणे. 'यबाव' हा शब्द मराठीतील 'स्वभाव' या शब्दाशी मिळताजुळता. परंतु, अर्थाच्या बाबतीत बराच वेगळा. कानडी भाषेत 'उत' हा शब्द 'वर' किंवा 'पुढे' या अर्थाने वापरला जातो. मराठीतही 'उतू नको मातू नको, दिला वसा टाकू नको' सारखे वाक्प्रयोग आहेच. चंदगडीतही 'उत येणे' म्हणजे 'माजणे' असाच अर्थ अभिप्रेत आहे. 'उत यलाय त्यास' म्हणजे 'माजला आहे तो', 'त्याचे उतू चालले आहे.' असे अर्थ त्यातून अभिप्रेत आहेत.

याप्रमाणेच 'आराम' (विश्रांती), 'काष्ट' (रोडपण/खास्ट), 'कुंची' (घुंची), 'गोणि' (पोते), 'कालमान' (काळानुसार) असे अनेक शब्द कानडी भाषेतून चंदगडीत आलेले आहेत. यातील 'काष्ट' हा शब्द विशेष महत्त्वाचा आहे. 'तीची सासू दांडगी कास्ट हाय घे' असे म्हणताना त्यातून एका विशिष्ट स्वभावाची वैशिष्ट्ये अभिप्रेत आहेत. 'गोंडे' (गुच्छ) हा शब्दही कानडी आहे. हे 'गोंडे' बेंदुर सणाला बैलांच्या शिंगांना बांधण्यासाठी अथवा लहान मुलांच्या पाळण्याला बांधण्यासाठी कापडी, रेशमी अथवा लोकरचे बनवलेले असतात. 'गोष्टी' हा कानडी शब्द चर्चा किंवा संभाषण या अर्थाचा आहे. 'गोष्टी'चा



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

अर्थ चंदगडीत जवळजवळ याच अर्थाने येतो. या शब्दाला पयार्र्यी शब्द ‘गजाली’ हा चंदगडी बोलीत कोकणीतून आला आहे. हे दोन्ही शब्द चंदगडीत प्रचलित आहेत. ‘रिण’ (कर्ज, ओझे, उपकार), ‘रवाजु’ (रुढी) हे शब्द मराठीतही वापरले जातात. ‘रवाजु’ हा शब्द ‘रिवाज’ बनून मराठीत वावरतो. चंदगडीतही ‘रिवाज’ (पद्धत) असाच वापरला जातो.

‘इंगळ’ (रक्ताळलेले) म्हणजे विस्तवासारखे या अर्थाचा कानडी शब्द चंदगडीत लाकूड अथवा कोळशापासून बनलेला विस्तव या अर्थाने वापरात आहे. ह्या इंगळांवरच लोहार औजारे बनवतात. ‘इंगळ’ ‘रक्केत’ (राखेत) पुरून ठेवण्याची पद्धत होती. काड्यापेटी अथवा लायटर या गोष्टी खूप अलीकडच्या आहेत. तर चुलीत चांगले ‘इंगळ’ राखेत पुरून ठेवून त्यांच्यावर फुंकर मारून पुन्हा ते पेटवले जात होते. कानडीत ‘कटकी’ म्हणजे ‘बेट.’ चंदगडीत ‘कटकीचे बेट’ असा शब्द वापरला जातो. मोठ्या आकराच्या बांबूचे गच्च झुडूप असेल तर त्याला ‘बेट’ म्हणतात. ‘बेट’ या शब्दाचा उच्चार बहुतांश ठिकाणी ‘बॅट’ असाही होतो. उदाहरणार्थ, ‘बॅट बेंदून आलो’ (झुडूप स्वच्छ किंवा निटनेटके करून आलो.) या वाक्यातील ‘बेंदून’ या शब्दाचा अर्थ साफसफाई करून असा आहे. ‘कडवर’ हा कानडी शब्द ‘शेवटपर्यंत’ या अर्थाचा आहे. तो तसाच चंदगडीत त्याच अर्थासाठी प्रचलित आहे. ‘ही पात कळवर पुरी कर’ म्हणजे ‘तू हाती घेतलेली सरी शेवटपर्यंत पोहोचव किंवा पूर्ण कर.’ ‘पात’ हा शब्द जबाबदारी या अर्थानेही येतो. आपली पात पूर्ण करायची म्हणजे जबाबदारी पूर्ण करायची. भाताच्या पिकातील स्वत:च्या दोन्ही हाताच्या रुंदीची एक सरी कापणीसाठी घेतली जाते. तिला पात म्हणतात. हा येथील शेतीतून तयार झालेला शब्द आहे. ‘केडगा’ (काडिग) म्हणजे त्रास देणारा, मुद्दामहून कळ काढणारा या अर्थाचा आहे. तोही चंदगडी बोलीत त्याच अर्थाने वापरला जातो. ‘कायली’ हा शब्दही कानडीप्रमाणेच ‘तगमग’ या अर्थाने वापरला जातो. कानडीत ‘कार’ म्हणजे अंधार. चंदगडी बोलीत हा शब्द आहे. परंतु, तो वेगवेगळया अर्थाने वापरला जातो. ‘कार पडो’ आणि ‘अंधारी पडो’ हे दोन्ही प्रयोग शापवाणीसारखे वापरले जातात. शेजारच्या भाषेतील शब्दांची प्रभावातून आवक आणि त्याला प्राप्त होणाऱ्या नावीन्यपूर्ण अर्थछटा अभ्यासण्यासाठी ‘चंदगडी बोली’ एक उत्कृष्ट उदाहरण ठरावे.

कानडीत ‘किडुक’ म्हणजे ‘किडक्या मनाचा मनुष्य.’ चंदगडीत ‘किडूक’ हा शब्द किरकोळ या अर्थाने आणि ‘किडुकमिडूक’ हा शब्द साधे, गरीबाचे, किरकोळ अशा वेगवेगळया अर्थछटा निर्माण करण्यासाठी वापरला जातो. ‘किर’ हा मौन किंवा तळाचा या अर्थाचा कानडी शब्द चंदगडीत प्रत्ययासारखा वापरला जातो. उदाहरणार्थ, कानेरकिर, काटाकिर या पद्धतीने वापरात आहे. शिवाय ‘किर’ हा शब्द चंदगडीत ‘अंधार’ अशा अर्थाने वापरला जातो. या अर्थाला जवळ जाणारा अजून एक शब्द ‘खेव’ हा चंदगडी बोलीत आहे. ‘खेव पडो’ ही जवळजवळ शापवाणीच आहे. ‘त्यच्या संसारावर खेव पडो’ (म्हणजे त्याच्या संसाराची राखरांगोळी होवो.) असे म्हणताना, समोरच्याला शाप देण्याचा भाव असतो. कन्नड ‘केडकी’ हा शब्द ‘वाईट करणारी’ या अर्थाचा आहे. चंदगडी बोलीत हा शब्द थोडे ध्वनी बदलून ‘केडगी’ होतो आणि अर्थ मात्र तोच राहतो. शिवाय ‘केडगी’ या शब्दाचा अजून एक अर्थ ‘त्रास देणारी’ असाही घेतला जातो. ‘केडगी’प्रमाणेच ‘केडगा’ असाही शब्द चंदगडीत ‘त्रास देणारा’ या अर्थाने वापरात आहे. कानडी शब्द ‘गजकर्ण’ हा ‘खरूज’ या अर्थाचा आहे. तो चंदगडीतही आहे. चंदगडीत अतिशय संवेदनशीलपणे वापरला जाणारा ‘गळगळया’ हा शब्दही कन्नड आहे. या शब्दाचा कानडी अर्थ ‘तीव्रतेने’ असा आहे. चंदगडीत मात्र ‘गळगळया’ म्हणजे आर्जव किंवा विनंती होय. हा शब्द व्यक्तीच्या बोलण्यातील भावनिकता लक्षात आणून देतो. ‘मिय्या केवड्या गळगळया केलो’ असे वाक्य विनंती किती तीव्रतेने केली हे लक्षात आणून देते.

कानडी भाषेतील ‘गिड्ड’वरून त्याच अर्थाचा ‘गिड्डा’ हा शब्द चंदगडीत आहे. या शब्दांचा अर्थ ‘बुटका/ठेंगणा’ असा आहे. चंदगडी बोलीत या शब्दाची ‘गिड्डा’ आणि ‘गिड्डी’ अशी दोन रूपे आहेत. उंचीने कमी असलेल्या व्यक्ती, वस्तूला हा शब्द वापरला जातो. ‘गुबरू’ हा शब्द कानडी भाषेत ‘पोटाची फुग’ या अर्थाचा आहे. तर चंदगडीत ‘गबरू’ हा शब्द ‘ढेरी सुटलेला’, ‘खूप श्रीमंत’, ‘बक्कळ मिळवलेला’ अशा अर्थाने वापरात आहे. ‘गड्डे’ हा कानडी शब्द ‘मूळ’ किंवा रताळयासाठी वापरला जातो. बेळगाव परिसरात हा शब्द बटाट्यांसाठी वापरात आहे. तर चंदगड परिसरात बटाट्यांबरोबर ‘नवलकोल’ या भाजीसाठीही वापरला जातो. ‘गोंके’ या कानडी शब्दाचा अर्थ ‘मान’, ‘गळा’, ‘मुंडी’ असा आहे. चंदगडी

गोंकं, गोक्की, गोकलं असे काही शब्द आहेत. 'गोकलं' हे शेतीत खुरपणीसाठी वापरले जाणारे हत्यार आहे. तर 'गोक्क' म्हणजे झाडावरची फळे काढण्यासाठी तयार केलेली काठी. जिच्या समोरील बाजूस 'खाप' पाडून एक तिरपी लहान काठी घुसवलेली असते. किंवा तिरकी काठी बांधून फळे तोडण्याची सोट केलेली असते.

कानडीतील अनेक शब्द चंदगडी बोलीत त्याच अर्थासाठी वापरात असलेले दिसतील. उदाहरणार्थ, 'गोड्डी' म्हणजे 'वाझं', 'रोड्ड' म्हणजे 'डावखुरा' (चंदगडीत रोड्डा), 'चट' या शब्दाचा एक अर्थ 'व्यसन' आणि दुसरा अर्थ 'इच्छा होणे' असा आहे. एखादा पदार्थ खाण्याची इच्छा होणे याला 'चट' शब्द वापरला जातो. चंदगडीत 'डोण' म्हणजे 'होडी' डोन चा उच्चार 'डॉन' असाही केला जातो. काही वर्षांपूर्वी अनेक ठिकाणी 'व्हळ' (ओढा), 'हाळळ' (नाला) आणि नदीतून प्रवास करण्यासाठी 'डॉन' हाच आधार होतो. आजही काही ठिकाणी ते वापरात आहे. 'पूरा' म्हणजे 'सर्व', 'पेज' म्हणजे 'तांदळाची गंजी', 'लोटा' म्हणजे 'वाटी', 'मोंड' म्हणजे 'हट्टी' (चंदगडीत माँड), 'लकलक' म्हणजे 'चकचकीत' (चंदगडीत 'लक'चा उच्चार 'लक्क' असा आहे. 'लकलकीत' हा शब्दही चंदगडीत वापरात. 'लक्क' म्हणजे स्वच्छ, लकलकीत म्हणजेही स्वच्छच, खूप चांगल्या पद्धतीने) कानडीत 'घट' म्हणजे 'मातीचे भांडे', (चंदगडी बोलीत 'घट' म्हणजे पूजेवेळी पुजले जाणारे तांब्याचे भांडे), 'घात' हा कानडी शब्द 'पेरें' या अर्थाचा आहे. तर हा शब्द चंदगडीत 'हंगाम' या अर्थाने येतो. 'डोणे' म्हणजे 'कुंड' चंदगडी बोलीत 'डोणा'शब्द पाणी साठवण्याचे दगडी भांडे म्हणजे, छोटा घरकामाचा कुंड, या अर्थाने वापरला जातो. 'पिंजर' शब्द कानडीत 'अस्थिपंजर' तर चंदगडीत भाताच्या पिकाचे मळणीनंतरचे गवत 'पिंजार' म्हणून ओळखले जाते. 'मडद' हा शब्द कानडीत 'मठ्ठ/मूर्ख' या अर्थाने तर चंदगडीत 'मदडगी' हा शब्द त्याच अर्थाने येतो. 'रट्टे' म्हणजे 'बाहू/हात' हाही शब्द चंदगडीत त्याच अर्थासाठी येतो. 'वटार' हा शब्द 'प्रशस्त जागा/ घराभोवतीचे आवार' या अर्थाने कानडी भाषेत वापरला जातो. 'वटार' या शब्दावरून चंदगडी बोलीत 'वट्टी' हा शब्द आलेला आहे. 'वट्टी' म्हणजे घरातील समोरची खोली. ओवरी, ओटी या अर्थाने हा शब्द वापरला जातो. अशा पद्धतीने चंदगडी बोलीत शेजारच्या कानडी भाषेतील शब्द प्रविष्ट झालेले आहेत.

**कोकणी बोलीचा प्रभाव**

कोकणीचा प्रभाव दोन प्रकरचा आहे. गोव्यातील गोमंतकीय कोकणी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील म्हणजे तळकोकणातील कोकणी असा दुहेरी प्रभाव चंदगडी बोलीवर आहे. आपल्या सोयीसाठी 'कोकणी' म्हणजे गोमंतकीय कोकणी असा अर्थ घेऊ. तळकोकणातील बोलीला आपण मालवणी-कुडाळी बोली असे संबोधले आहे. चंदगडी बोली बोलली जाणाऱ्या प्रदेशाची सीमा जशी कन्नड भाषिक प्रदेशाशी आहे, तशी ती सर्वात कोकणी भाषिक प्रदेशाशीही आहे. सिंधुदूर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग आणि सावंतवाडी तालुक्याच्या सीमा चंदगड तालुक्याला लागून आहेत. शिवाय बेळगावहून चंदगडमार्गे कोकणात जाणारा एक मार्ग आंबोली आणि दुसरा मार्ग तिलारी अशा दोन घाटांमधून जातो. आंबोलीतून आपण तळकोकणात उतरतो. या वाटेवरील घाटमाथ्यावरच्या आंबोली आणि आजूबाजूच्या वाड्यावस्तींवर संपूर्ण मालवणी-कुडाळी बोली बोलली जाते. तर तिलारी घाटातून उतरल्यानंतरही प्रथम सिंधुदूर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग या तालुक्याच्या गावातून थेट गोवा राज्यात जातो. या दोन घाटांतून शेकडो वर्षांपासून व्यापारी मार्ग होते. तिलारी धरण बांधण्यापूर्वी हा घाट दाट रहदारीचा नव्हता. तथापि, ब्रिटिश काळात आणि तत्पूर्वी रामघाट मार्गे गोव्याला व्यापारी आणि लोक जात असत. अनेक कारणासाठी घडणारा या दोन प्रदेशातील नित्य संपर्क येथील भाषेतून दिसून येतो.

या प्रक्रियेतून चंदगडी बोलीत रुजलेल्या शब्दांची स्वतंत्र चर्चा करता येईल. कोकणीतील 'हून' (गरम) त्यावरून 'हूनहूनीत' (गरम) असाही एक शब्द तयार झाला आहे. 'मांडवळ' (व्यवहार घडवून आणणे) किंवा मध्यस्थी करणे होय, 'म्हळ' (अंगावरती घाण), 'बुरसा' (घाणेरडा), 'सुद' (शुद्ध), 'वशाड पडो' वरून चंदगडीत अनेक वाक्यप्रयोग तयार झाले आहेत. 'वशाड पडो त्यच्या तोंडार' (तोंड काळे होवो या अर्थाने) यावरून पुन्हा 'शिरं पडो' (वाईट होवो) हाही शब्द तयार झाला आहे. 'दुकणं पडो' (वाईट होवो), 'बोवाळ' (तेच काम पुन्हा किंवा चुकीने पुन्हा करायला लागणे होय. यासाठी

'उसाबर' असाही एक शब्द आहे., भोवळ (चक्कर येणे), घात (योग्य वेळ किंवा सिजन या अर्थाचा शब्द), 'खिन' (टाईम या अर्थाने) हा शब्द वापरण्याची चंदगडी बोलीत एक पद्धत विकसित झाली आहे. 'खिनहाळ', 'खिनबर', 'खिन पडो' असे या शब्दावरून काही शब्दप्रयोग तयार झाले आहेत. 'खिनहाळ' म्हणजे नीरव शांतता, 'खिनबर' म्हणजे काही वेळ, तर 'खिन पडो' म्हणजे त्याच्यावर वाईट वेळ येवो असा शाप. वेळ या अर्थाचा 'ध्याड' हाही एक शब्द आहे. त्या शब्दाचेही 'ध्याड पडो' (वाईट होवो, वाईट वेळ येवो), 'ध्याडबर' (बराच वेळ असा अर्थ म्हणजे 'खिनबर'च्या नेमका उलटा अर्थ या शब्दातून प्रतीत होतो. या बोलीत 'खिनबर बसोस दिनात', 'खिनबर वसनूक न्हाय जिवास', 'ध्याडभर बसलोय' अशी वाक्य आहेत. 'कोडगं' (कळ काढणारा) या कोकणी शब्दावरून 'केडगं' असा शब्द चंदगडीत आहे. जिन्नस (वस्तू), उस्तवारी (उपद्व्याप), अपुरबाय (लाहकं) हा शब्द मराठीतील 'अपुरवाई' वरून तयार झालेला वाटतो. 'चुरका' हा शब्द चान्स, संधी या अर्थाचा आहे. तर 'चानस' हा शब्दही प्रचलीत आहे. 'निबर' (ऱ्हाट), 'लजोवप' या शब्दावरून चंदगडीत 'लजवट' (लाजाळू) हा शब्द तयार झाला आहे.

बलुतेदारी पद्धतीमध्ये महार जातीत गावची तराळकी करावी लागत होती. जी व्यक्ती गावात सूचना देत असे त्या सूचनेला 'सादवणे' म्हटले जात होते. हा प्रकार अलीकडे कमी झाला आहे. परंतु, 'सादवणे' हा शब्द बोलीत आहे. 'बिलंडर' वरून चंदगडीत 'बिलंदर' म्हणजे चतुर असा शब्द तयार झाला आहे. 'कलकलाट' (खूप आवाज), 'उचांबळाय' वरून उचंबाळणे आणि डचमाळणे असे दोन शब्द (ढवळून निघणे) या अर्थाचे आहेत. 'तिरायत' (मध्यस्थी), 'वाररधंद्यांत' (शेतीत), 'किंचाट' (आरोप), 'वांटो' (वाट्यान देणे-घेणे किंवा वाटा-वाटणी), 'रितीभायर' (अनैतिक, नियमाच्या बाहेर), 'तिडा' (कोडं), 'म्होव' (मधाचे पोळे), 'खातीर' (साठी) असे अनेक शब्द या प्रभावातून सांगता येतील.

'कांचवेल्लो' या शब्दावरून काचबारलो, 'पालसो' म्हणजे कोकणीत (लवंडणे) या शब्दावरून पासाल्लो (झोपलो), 'कांबळ' हा शब्द 'रग' (ब्लँकेट) या अर्थाने नाही, तर 'पाव्हणेर' या अर्थाने चंदगडी बोलीत वापरला जातो. श्रमपरिहारासाठी दिले जाणारे जेवण म्हणजे 'कांबळ' होय. 'शिराप' वरून 'सराप' (शाप) आणि 'सरापणे' (शिव्या देणे) यावरून 'त्या कमळी रांडेन सरपोन धुळ्ळा केलीन' सारखी वाक्य बोलली जातात. हा संपर्क अनेक शब्दांच्या माध्यमातून स्पष्ट करता येईल. कोकणीत असलेला 'लजोवप' हा शब्द चंदगडी बोलीत येऊन 'लजवट' असा हो ेतो. 'पोर दांडगी लजवट हाय' अशा वाक्यांमध्ये येणारा हा शब्द 'लाजाळू' या अर्थाने येतो. 'वचपा' शब्द आहे असा चंदगडीत आहे. प्रमाण मराठीतल 'सूड' या अर्थाने येतो. या अर्थाचा चंदगडी बोलीत 'फारीक' हा अजून एक शब्द आहे. 'व्हरप' हा शब्द 'व्हरपणे' असा होतो. 'व्हरपणे' म्हणजे खाण्यावर ताव मारणे. गडबडीने खावून मोकळे होणे. कोकणी आणि चंदगडी बोलीत असलेला 'तरक' हा शब्द हिंदीतील 'तरख'पासून बनला आहे. अशा पद्धतीचे अनेक शब्द चंदगडी बोलीत आहेत. 'त्यो नजरेस देखो सक्क नाय' सारख्या वाक्यांच्या रचनाच हिंदीच्या प्रभावातील आहेत. अशा पद्धतीचा प्रभाव हा सरळ सरळ मुस्लिम राजवटींच्या काळातील आहे. फारसी आणि नंतर हिंदुस्थानी किंवा हिंदी भाषेतून हा प्रभाव पडलेला दिसतो. 'तरक' हा शब्द चंदगडी बोलीत दोन अर्थान वापरला जातो. 'तरखेत ठेव' या वाक्यात तो 'स्मरणात' या अर्थाने येतो. तर 'तरक दून ब' या वाक्यात तो 'लक्षपूर्वक' या अर्थासाठी येतो.

असे कोकणीतून आलेले पुष्कळ शब्द विश्लेषण करून सांगता येतील. असे काही शब्द नोंदवत आणि शक्य त्या शब्दांबद्दल चर्चा करत आपण पुढे जाऊ. कोकणीतून चंदगडीत 'वचपा' (सूड), 'व्हरप' वरून 'व्हरपणे' म्हणजे खाण्यावर ताव मारणे. 'तनरी' (तंदरी लागणे), 'येवजवणे' (ठरवणे), 'गाळी' (शिवी) , 'रीग' (रास), 'गजाल' आणि 'गजाली' (गप्पा), 'बिरमत' आणि 'बिरामत' (आरोप, संकट या अर्थी), 'वळख' (ओळख), 'रीण' (कर्ज), 'उद्देग' (उद्योग), 'जिनस' (वस्तू), 'सादोवन' आणि 'सादिवणे' (हाक मारणे, सूचना देणे), 'बिलंडर' (बिलंदर, चतूर, चॅप्टर), 'कलकलाट' (खूप गोंधळ), 'उचांबळाय' (पोटात ढवळणे, उलटी येण्याची स्थिती निर्माण होणे), 'तिरायत' (मध्यस्थी), 'तिरायत' करणे ही माणसाच्या सामाजिक जीवनातील एक महत्त्वाची गोष्ट असते. लोंकची भांडणे सोडवताना, व्यवहार ठरवतात, लग्न जमवताना, विभक्त होताना ही 'तिरायत' करावी लागते.

'वावारधंद्यांत', 'आळ' (मजूरी), 'वावार' (शेत), 'वावर' (रहिवास), 'किंचाट' (झाडाझुडपांनी वेढलेले) हे कोकणीतील शब्द शेतीधंद्याशी संबंधित आहेत. 'आळ' (आरोप) हा शब्द आपण कानडीच्या प्रभावातून आल्याचे पाहिले आहेच. तर चंदगडी बोलीत 'आळ' कोकणी आणि कानडी भाषेत ज्या भिन्न अर्थासाठी वापरला जातो त्या दोन्ही अर्थासाठी हा शब्द वापरला जातो. 'वावरधंदा' हा शब्द 'कामधंदा' या मराठीतील शब्दाप्रमाणे आहे. 'वावारा' म्हणजे शेत आणि 'वावर' म्हणजे राबता. उच्चारणातील थोड्या भिन्नतेमुळे अर्थात बराच फरक पडतो. हे दोन्ही शब्द चंदगडी बोलीत आहेत. 'पांदीकडेच वावार भांगलतल हाय' आणि 'पटकीतला वावर कमी झालाय' अशा दोन वाक्यांमधून तो दाखवता येईल. 'ववांटो' हा कोकणी शब्द 'वाट्यान देणे/घेणे' याबाबतीत आहे. 'वाट्यान' हा शब्द चंदगडीत आहे. 'वाट्यात' म्हणजे मिळून. अर्धी वाटणी या अर्थाने. तर 'वाटा' हा दुसरा शब्द हिस्सा या अर्थासाठी मराठीप्रमाणेच आहे. चंदगडी बोलीत काही रंगांबाबत वैशिष्ट्यपूर्ण भाषा वापरली जाते. 'पिवळा' हा शब्द शक्यतो न वापरता 'हाळदुळा' हाच शब्द वापरला जातो. हा शब्द कोकणीत 'हळडुवसार' असा आहे. 'इश्टागती' हा शब्द चंदगडी बोलीत तक्रार या अर्थाने येतो. 'जा खरं कुणाची इश्टागती घराहे आणू नको.' हे आईचे आपल्या मुलाला नेहमी सांगणे असते. 'रितीभायर' आणि 'नीतीभायर' हे दोन्ही शब्द कोकणच्या जगण्याच्या तत्त्वज्ञानाचा भाग आहेत. हे शब्द अनुक्रमे 'रितीभाईर' आणि 'नीतीभाईर' अशा पद्धतीने चंदगडीत आहेत. 'रीत' सोडून वागणे हे खेडोपाडी फार गंभीर घेतले जाते. असे वागणाऱ्यांना बहिष्कृतही करण्याची पद्धत अनेक जातीजमातीत दिसते. त्यातून हे शब्द बोलीत सामाजिक दंडक म्हणूनच वावरतात.

'तिडा', 'वर्सान वर्स' (वर्षानुवर्षे) हे शब्दही कोकणीच्या प्रभावातीलच आहेत. कोकणीतील 'म्होव' चंदगडीत 'म्हाव' होते. 'म्हाव' म्हणजे 'मधाचे पोळे', मूळ हिंदी, उर्दू असेलेले अनेक शब्द चंदगडी बोलीप्रमाणे कोकणी बोलीतही आहेत. त्यापैकी 'बेजार', 'खातीर' हे दोन शब्द सांगता येतील. हे दोन्ही शब्द मूळ अर्थासाठीच चंदगडी बोलीत वापरले जातात. परंतु, ते वेगवेगळ्या शब्दांसोबत वापरल्यामुळे त्यांचा वापर वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. उदाहरणार्थ, 'जीव बेजार झालाय.', 'पोरांनी बेजार करून सोडल्यानीत.' इत्यादी. प्रमाणे 'बेजार'चा वापरत होतो. तर 'त्यचेखातीर', 'ह्यचेखातीर', 'सबदाखातीर' असा 'खातीर'(साठी) शब्दाचा वापर होतो., वरती उल्लेक आलेल्या 'लागशिल्लो' या शब्दाला असलेला 'ल्लो' हा प्रत्यय कोकणीकडूनच चंदगडीत आलेला दिसतो. चंदगडी बोलीत अनेक शब्दांना हा प्रत्यय लावला जातो. 'गेल्लो', 'यल्लो', 'खाल्लो', 'निजल्लो' असे अनेक शब्द चंदगडीत बनवले गेले आहेत. 'वांगडा' हा शब्द 'वांगडास' किंवा 'वांगड' अशा पद्धतीने वापरला जातो. 'वांगड' म्हणजे भाजी आणि 'वांगड' म्हणजे सोबतही. 'वांगडास काय हाय?' या प्रश्नात भाकरीसोबत भाजी काय आहे, हे विचारलेले आहे; तर 'वांगडास कुणासतर घ्युन जा' असे सांगताना 'कोणाला तरी सोबतीला घेऊन जा' असे म्हणायचे असते. येथे वांगडास म्हणजे सोबतीला, असा अर्थ होतो.

'आरास' हा शब्द आहे असा वापरला जातो. 'तडीक' हा 'तिडीक' होतो. 'त्यला बगून डोचक्याची तिडीक उठली' असे म्हणताना 'तिडीक' म्हणजे शीर अपेक्षित आहे. 'वांटेकार' हा शब्द 'वाटेकरी' किंवा 'मिळणदार' अशा दोन पद्धतीने वापरला जातो. 'तरेकवार'चा 'तारीखवार' होतो. 'लिपून' हा शब्द आहे असा किंवा काही वेळा 'लिंपून' असाही होतो. भाताचे तट्टे, नाचणीच्या कणगी, मातीलच्या भिंती 'लिंपून' घेतात. भाताचे तट्टे आणि नाचणीच्या कणगी शेणाने, तर भिंती मातीने लिंपल्या जातात. 'माथ्यार' म्हणजे माथ्यावर. चंदगडीत 'माथा' शब्द वापरला जातो. 'तुज्याम्होरे माथा टेकलो बाबा मिय्या' अशा वाक्यांमधून तो येत असतो.

कोकणीतून आलेलले 'आगळीक' (आश्चर्यकारक), उस्तवारी (प्रश्नाची सोडवणूक) चंदगडीत हा शब्द 'उसाबर' असाही झालेला दिसतो. दोन्ही शब्द वापरले जातात, 'भियं' (भिती), 'निलाजरो' हा शब्द 'निलाजरा' असा होतो. त्याचा वापर 'निलाजऱ्या भाड्या' असा शिवी देण्यासाठी होतो. 'दांढगाइ' हा शब्द मोठेपणा आणि दादागिरी अशा दोन्ही अर्थासाठी वापरता आहे. 'सोस' हा शब्द मराठीत 'हव्यास' या अर्थासाठी परंतु, चंदगडीत 'तहान' (पाण्याचीच) या अर्थाने येतो. 'सोस लाले' म्हणजे 'तहान लागली आहे.' कोकणीतील 'कांचवेल्लो' या शब्दावरून 'काचबारलो', 'पालसो' वरून पासाल्लो (लवंडणे), 'घटकेखातर' हा शब्द 'घटकाबर', 'वळवळे' हा 'वळवळा' असा होतो. 'कांबळ' हा शब्द चंदगडी बोलीत 'रग'

(ब्लँकेट) या अर्थाने नाही, तर पाव्हणेर या अर्थाने येतो. 'शिराप' हा शब्द 'सराप' (शाप) त्यावरून पुन्हा 'सरापणे'. उदाहरणार्थ, 'तिनं सरपोन धुळ्ळा केलीन' असा या शब्दाचा प्रत्यक्ष वापर होतो. कांकण (बांगड्या), बावटो (खांदा), 'शिटकावणे' हा अंगावर शिंतोडे पडणे किंवा टाकणे, घासणे किंवा घासून जाणे अशा दोन अर्थाने येतो. 'धपके' हा शब्द 'धप्पाटा', 'धप्पा' असे अनेक पद्धतीने वापले जातात. लहान मुलांच्या खेळात या शब्दाचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. हा शब्द कोकणीतील 'धपके घालप'चेच रूप आहे.

कोकणीतील कवळो हा शब्द 'कवळा' म्हणजे दोन हातांमध्ये बसेल इतके. त्याला चंदगडीत 'यांग' असेही म्हणतात. 'बोवाळ' हा शब्द नवी 'उसाबर' असा आहे. 'म्होंवा' शब्द 'म्हू' असा वापरला जातो. तर 'इश्टागत' हा शब्द कोकणीत आधार देणे किंवा मदत करणे यासाठी वापरला जातो. तर चंदगडीत इस्टागत म्हणजे आपत्ती होय. 'फावट' हा 'पावटी' म्हणजे, किती पावटी किंवा किती खेपा असा आहे. 'धरबंद' हा शब्द आहे असा अतिरेक करणे या अर्थासाठी वापरला जातो. 'आयदान' (भांडे), 'छाती' म्हणगे धाडस. उदाहरणार्थ, त्यास छाती हूस नको. असा छाती शब्द वापरला जातो.

'भेतळो' (जळणासाठी वापरल्या जाणाऱ्या लाकडाचा तुकडा), 'साकव' (लाकडांपासून बनवलेला पूल) हा शब्द चंदगडीत आहे. शिवाय या शब्दासाठी 'आडी' हा अजून एक शब्द या बोलीत आहे. 'आडसर' हा शब्द चंदगडीत कच्चा नारळ यासाठी वापरला जातो. 'आंगाची' म्हणजे तयार कपडे. चंदगडीत हा शब्द 'आंगी' असा होतो. बावले म्हणजेच मोवाळले प्रमाण मराठीतील 'सुकणे' या अर्थाचे हे दोन शब्द आहेत. 'दांतरो' हा शब्द 'दातरा' असा वापरला जातो. 'दातरा' हा शेतीच्या कामाला, काजूची बाग स्वच्छ करायला ज्याला चंदगडीत 'बाग बेंदायला' म्हणतात अशा कामात वापरला जातो. कोकणीत 'सुद्द वगडायल्ली अवस्था' होते म्हणजे 'बेशुद्ध पडणे'. तर चंदगडीत बोलीत 'सुद सांडणे' म्हणजे 'लाज सोडणे' होय. 'येवजप' हा शब्द 'यवजणे' असा होतो. यवजणे म्हणजे स्मरण करणे, आठवून पाहणे.

'खेटे मारणे' (चंदगडीत ख्याप), 'चकाटा' वरून चंदगडीत 'चकाट्या' पिटणे, असा शब्दप्रयोग तयार झाला आहे. 'मांडावळ' हा शब्द चंदगडीत एखाद्याचा कामाची बांधणी करण्यासंदर्भात वापरला जातो. अदमास (अंदाज घेणे), 'तीरपीट' वरून त्रेधातिरपीट (धांदल उडणे), निवणे (थंड होणे), 'बेगीन' या शब्दावरून चंदगडीत 'भिगिनं' (गडबडीने), वसवसो ('लोभी' या अर्थाने), लजप चंदगडीत 'लजवट' (लाजरा), गवण (गव्हाणी), 'नाचप' चा 'नाचाप' होतो, 'शिंदळकी' म्हणजे 'व्यभिचार करणे', 'निसरप' चा 'निसरड', 'धरबंद सोडील्लो'चा अर्थ कोकणीत निरंकुश सत्ता भोगणे. या शब्दाचा चंदगडीत उपयोग 'धरबंद सोडून वागणे' म्हणजे 'लाजलज्जा सोडून वागणे' असा आहे. आरिश्ट (संकट), मेळ्यान (सर्व जन मिळून), 'सपय'चा 'सप्पय' (सरळ), मोडटो घालप (मोडता घालणे म्हणजे एखादे काम होऊ नये याची काळजी घेणे.), बोवलो वरून 'बावला' किंवा 'मोवाळला' (सुकला), 'पिसो 'पिस्सा' किंवा 'पिस्सं' (वेडा), 'येवजिनासतना'वरून 'यवजणे' (ठरवणे), 'मस्कऱ्या' हा शब्द 'मस्करी' (चेष्टा) असा होतो. चंदगडीत 'मस्करीची कुस्करी व्हणे' अशी एक म्हणही आहे.

याबरोबरच 'व्हाळी'वरून 'व्हळी' (गंजी), 'अधाशी' (आळशी), 'दिक' (आश्चर्य), 'भायर' (बाहेर), 'निवळू दे' (थंड होऊ दे), 'साज' (सजावट) चंदगडीत 'साज (रूप) न्हाय सोबा नी दिम्माक (नखरा) दांडगा (फार)' अशी म्हण आहे. या म्हणीतील 'साज' हा शब्द काव्यमय अर्थ देतो. बाकी 'दिम्माक' आणि 'दांडगा' हे शब्दही चंदगडी बोलीतील स्वतंत्र शब्द आहेत. कारण त्यांच्या अर्थछटा वैशिष्ट्यपूर्ण आहेत. 'नेट' (जोर), 'धीट' (धाडसी), 'आणभाव' (अनुभव), 'यबाव' (अवतार), 'खिणभर' (क्षणभर) या शब्दाबरोबर या अर्थाच्या विरुद्ध चंदगडीत अजून एक 'ध्याडभर' (खूप वेळ) हा शब्द आहे. 'देख' हा शब्द कोकणीत तात्पर्य/सार या अर्थाने. परंतु, चंदगडीत 'अक्कल' किंवा 'ज्ञान' या अर्थी तो वापरात आहे. 'देख शिकवू नको' या वाक्यांमध्ये तो वापरात आहे. 'पांवड्या' (पायऱ्या), 'अपरुपाय' हा शब्द 'अपुरुबाईचं' म्हणजे 'लाडकं' या अर्थाने वापरला जातो. 'वचपा' (बदला), 'उजवाड' (उजेड), 'भायलो' (भाईरचा), 'बळयान' (मुद्दाम), 'अपेशी' (अपयशी), 'दाटी' (अडचण), 'भोवंक' (भोवणे म्हणजे फिरून येणे), 'फोपसो' (जाड व्यक्ती), 'पोटाक घालप' - 'भुलयणो' (भुलणे) या शब्दासाठी चंदगडी बोलीत 'हाराकला' असा अजून एक शब्द आहे. 'नाचरी' (चंचल), 'साव'

(सज्जन) हा शब्द खरा या अर्थाने परंतु, उपरोधिक अर्थाने खूप वेळा वापरला जातो. उदाहरणार्थ, 'दांडगा साव लागोन गेलेसाय', 'सांदीकोपरा' (सर्वत्र), 'खुबळ्ळेलो' या शब्दावरून 'खुदबळणे' (विसळणे) हा शब्द. 'बॉब' (बोंब) यासारखे शेकडो शब्द कोकणीच्या संपर्कातून चंदगडी बोलीत समाविष्ठ झाले आहेत. याशिवाय 'चित्त यकेडे नी चुत्ताड यकेडे', (देह एकीकडे मन दुसरीकडे) 'घुग्गी घालून बसणे' (रुसून बसणे) सारख्या म्हणी व वाक्प्रचार कोकणीच्या संपर्काने चंदगडी बोलीत प्रविष्ठ झालेले आहेत.

शिवाय कोकणीतून चदंगडी बोलीत आलेत असे वाटणारे 'बाइल', 'दादला', 'कानसूल', 'गची', 'थान', 'पाटकुळी', 'बचका', 'लोंब', 'धाकटा', 'निबर', 'खोप', 'करा', 'कोलित', 'आंबील', 'उंडा', 'उंबर', 'कालवण', 'पेज', 'फातर', 'वडे', 'सांबारं' (या शब्दाचा उल्लेख थेट लीळाचरित्रात ) 'सीत'वरून 'शित', 'रांधणे', 'दिस', 'रात', 'लिपणे', 'मेजणे' हे शब्द मूळ मराठीतूनच कोकणीत गेलेले आहेत. हे सर्व शब्द यादवकालीन मराठीतील लीळाचरित्र, ज्ञानेश्वरी या महत्त्वाच्या ग्रंथांमध्ये आढळतात. त्यामुळे या शब्दांचा प्रवास कोणत्या भाषेकडून कोणत्या भाषेकडे झाला, हे निश्चित सांगता येत नाही. कोकणी आणि चंदगडी या दोन्ही बोली मराठीच्या बोली असल्याने हे शब्द मूळ मराठीतून दोन्ही बोलींमध्ये गेले असल्याची शक्यताही दुर्लक्षित करून चालत नाही.

'कळवळप' वरून 'कळवाळणे' (खूप त्रास होणे), 'घोगरो' आवाज बसलेला. 'रागिश्ट', 'बाळगणे' (सांभाळणे), 'निकतं' (नुकते), 'अपरूप' (लाडके), 'कामिन' (काविळ), 'गचको' (त्रास देणे), 'फुडे' (पुढे), 'अदमास' (अंदाज), 'घासलेट' (रॉकल), 'किरपण' (बारीक), 'वातड' (चिवट), 'घोव' (नवरा), 'सभावगुण' (स्वभाव), 'नेट' (ताकद), 'धिटाय' (धाडस), 'नाचरो' (पुढे पुढे करणारा), 'घाणयारो' (घाण), 'वरकड' (वरून), 'परमळ' (स्वच्छ), 'उसरापत' (विश्रांती), 'कलकलाट' (खूप आवाज),'घातमोरा' (विश्वासघातकी), 'बुरसा' (घाणेरडा), 'बसकण' (जाग्यावरून न उठणे), 'थपकल' (एका ठिकाणी बसून राहणे), 'मेड' (आधाराची काठी), 'वशाड पडो' (वाईट होवो), 'वसणूक' (शांतता), 'चवथाय' (चौथा हिस्सा. शेतीसाठी पाणी दुसऱ्याचे असेल तर त्याला 'चवथाय' द्यावी लागते), 'किण्ण' यावरून 'किनहाळ' (शांत) आणि 'काणेरकिन' (गोंधळ, दंगा) असे दोन शब्द चंदगडी बोलीत वापरले जातात. सोयरो (नातलग), 'खंडाक लावण' (शेती विशिष्ट खंड ठरवून दुसऱ्याला कसायला देणे), 'आळ घालप' (दुसऱ्यावर आरोप),' वळ' (व्रण), 'दरावलेला' (पाझरलेला), 'तोंडास लागणे' (वाद सुरू करणे) 'कश्याच तिच्या तोंडास लालेसाय' या वाक्याचा अर्थ 'तिच्याशी कशाला वाद घालत आहेस?' असा आहे. 'यवजप' वरून 'यवजणे' (आठवणे/ठरवणे) हा शब्द तयार झाला आहे. या शब्दाचा दोन अर्थासाठी वापर. 'यवजून बघ' असे म्हणताना 'आठवून बघ' असे म्हणायचे असते. तर 'यवजून ठेवताव' असे म्हणताना 'ठरवून ठेवतो' असे म्हणायचे असते. 'सुशेगात' (सावकाश), 'कोडगा' (कळलाव्या) यावरून 'कळखोचरा' असाही एक शब्द चंदगडी आहे. 'चाबरो' (चाड्या करणारा), 'अजागळ' (गबाळा), 'किचांट' (अडगळ), 'परमळ' (वास), 'लुडबं' (तोतरा), 'तरतरी' (उत्साह), 'कुणगी' (शेताचा छोटा तुकडा), सुण्यान (विनाकारण फिरणे), नेटान (ताकदीने), बायलमनीस (बाईमाणूस), शिंदळ (वाकड्या चालीची बाई), 'हुनहुनीत' (गरम), 'शिटकोन' (चुकार), 'कुडी' (शरीर), 'कुचाळक्या' (निंदानालस्ती), 'सुद वगडायल्लो' वरून चंदगडीत 'सुद सांडणे' असा शब्द प्रयोग. त्याचा अर्थ 'अक्कल गहाण ठेवणे' असा होतो. 'भायल्यान' (बाहेरच्याने) परंतु, या शब्दाचे अंतर्गत अर्थ वेगळे आहेत. 'भायले' या शब्दामध्ये संकटे निर्माण करू शकणारे सर्व येते. 'भूत' असे न म्हणता 'भायली अरिस्ट' असे म्हणण्याचीही पद्धत आहे. त्याचबरोबर चंदगडी बोलीत आढळणारे 'यल्लो' (आलेलो), 'गेल्लो' (गेलेलो) 'जाऊल्लो', 'यऊल्लो' अशी उच्चारणे मोठ्या प्रमाणात वापरली जातात. ही सर्व उच्चारणे कोकणीच्या प्रभावातूनच चंदगडीत आलेली आहेत.

### मालवणी-कुडाळी बोलीचा प्रभावातील शब्द

कोकणी भाषेच्या संपर्कातून चंदगडी बोलीत आलेल्या शब्दांबाबत आपण सविस्तर चर्चा केली. आता मालवणी-कुडाळी बोलीतून चंदगडीत आलेले शब्द पाहू. चंदगड परिसरात तळकोकणातील माणसाला 'कोकणा' म्हटले जाते आणि

त्याच्या भाषेला कोकणी. तर कोकणी माणूस घाटावरच्या माणसांना ‘घाटी’ म्हणून ओळखतो. संपर्काच्या घनतेमुळेच परस्परांसाठी ही नावं रूढ झाली आहेत. घाटावर येणारे बांगडे, सुक्की मासळी, झिंगे आणि इतर समुद्री मासे घाटावरच्या माणसांचेही मुख्य खाद्य बनले आहे, ते केवळ कोकणाच्या शेजारपणामुळे. कोकणातून जशी मासळी घाटावर येते, तसे अनेक प्रकारच्या भाज्या, शेतातील उत्पादने घाटावरून कोकणात जातात. जनावरांचा परस्परांकडे होणारा बाजारही मोठा आहे. कोकणातून घाटावर चंदगड परिसरात आणि चंदगड परिसरातून कोकणात हा व्यापार चालतो. शिवाय शेकडो वर्षांपासूनची बंदरावरील मालवाहतूक चंदगडमधून जाणाऱ्या दोन घाटातूनही मोठ्या प्रमाणात चालत होती. अलीकडील काही वर्षांत बंदरातून होणारी मालवाहतूक कमी झालेली असली तरी, एका विशिष्ट काळात त्या माध्यमातून झालेला भाषासंपर्क महत्त्वाचा आहे.

येथे आपण या संपर्कामुळे झालेली भाषिक देवाण-घेवाण चर्चेला घेतल्यानंतर या संपर्काचे संपूर्ण स्वरूप लक्षात येऊ शकते. चंदगडी बोलीत या संपर्कात आलेले शेकडो शब्द आहेत. ‘अखेरीस’ (शेवटी), ‘अखेरशिट्टी’ (शेवटी), ‘अचरट’, ‘अडना’ (आगळ), ‘अड्डा’ (बैलगाड्या थांबवायचे ठिकाण), ‘अदलामदला’ (कोणताही), ‘अर्धली’ चंदगड परिसरात ‘अर्धली’ने म्हैस, शेत घेण्याची प्रथा आहे. म्हैशीचे ‘रेडकू’ (चारपाच महिने वय) सांभाळायला घ्यायचे आणि दोन ते तीन ‘विते’ (म्हैशीची तीन बाळंतपणे) दूध आणि नवी रेडके आपण घ्यायची आणि म्हैस मूळ मालकाला परत करायची, अशी ही प्रथा आहे. शेतही असेच मूळ मालकाची गरज म्हणून पाच दहा हजार द्यायचे आणि त्या पैशांच्या व्याजात एखादे छोटे शेत करून खायचे. मूळ मालकाने पैसे परत केल्यानंतर शेत परत द्यायचे. यालाही अर्धलीन शेत घेणे असे म्हणतात. ‘अनायसे’ (सहजासहजी), ‘अन्याव’ (अन्याय), ‘अळा’ (दंड) चंदगडी बोलीत ‘आळ’ असा शब्द तयार झाला आहे. ‘आळ’ घेणे आरोप करणे, दंड घेणे आणि ‘आळ’ शब्दाचा दुसरा अर्थ ‘मजुरी’ असाही आहे. ‘आकडी’ (कच्चे, न उकळलेले दूध) चंदगड परिसरातील दिवाळीत म्हटल्या जाणाऱ्या एका ‘गीत्ती’त ‘आकडी दुधावरची पिवळी शायी, पिवळी शायी’ अशी एक ओळ आहे. त्यामुळे पिवळी शाई धरणारे आकडी दूध म्हणजे नुकताच गाय व्यालेली असल्यास निघणारे पहिले कोवळे दूध असाही या शब्दाचा अर्थ घेता येतो. ‘आकासने’ (आखूड होणे), ‘आगाव’ (आगावू आणि वेळेपूर्वी येणारे असे दोन्ही अर्थ) चंदगड हा पूर्ण भाताचा प्रदेश आहे. पेरलेल्या भातांच्या विविध जाती असतात. त्यातील काही जाती ‘आगोप’ किंवा ‘आगाव’ असतात. म्हणजे त्या लवकर कापायला येतात. ज्या शेतात पाणी टिकत नाही तेथे अशा पद्धतीच्या जाती लावल्या जातात. ‘आटपणे’ (काम संपणे, आवरणे), ‘आटव’ (जुन्या आठवणी), ‘आडनी’ (दरवाजाची आगळ), ‘आडमुठा’ म्हणजे दुसऱ्याचे न समजून घेणारा, आपले तेच खरे म्हणणारा आणि तसे करणारा. याशिवाय या अर्थाने ‘आरमूट’ हा एक शब्द चंदगडी बोलीत आहे. ‘आडसार’ (शहाळे), ‘आडाकणे’ (अडकणे), ‘आडोळ’ (संध्याकाळ), ‘आडाळी’ (विळती), ‘आडी’ हा शब्द दोन अर्थाने चंदगडी बोलीत आहे. एक अर्थ फळे पिकण्यासाठी ठेवण्याला ‘आडी’ घालणे म्हणतात. तर दुसरा अर्थ नदी, ओढे, नाल्यांवर पावसाळ्याच्या दिवसात जो साकव घातला जातो, त्यालाही चंदगडीत ‘आडी’ म्हणतात. या शब्दाची चर्चा कोकणी भाषेच्या प्रभावासंदर्भात झालेली आहेच.

‘आदान’ (चुलीवरचे भांडे), ‘आयल्याड’ (अलीकडे), ‘आवस’ (अमावस्या), ‘आसडणे’ (सुकणे), ‘आळुकेपिळुके’ हा शब्द आळस देण्यासाठी केल्या जाणाऱ्या हातांच्या आणि शरीराच्या हालाचालीसाठी वापरला जातो. त्याशिवाय ‘आंळांगे’ हा देखील एक शब्द याबद्दल वापरला जातो. ‘आंग’ (शरीर), ‘आंगलट’ (फसणे), ‘आंबेम्होर’ (आंब्याचा मोहोर आणि भात (धान) एक नाव), ‘इख’ (विष), ‘इट’ (बांधकामाची विट आणि कंटाळा येणे अशा दोन्ही अर्थाने), ‘इटाळ’ (विटाळ), ‘इडा’ (विडा), इदवास/इदवंस (नासाडी, इरजान (विरजन, नवे दही बनवण्यासाठी इरजन लागते), ‘इरड’ (प्रातर्विधी, त्याबद्दलची भावना होणे), ‘इरागत’ (लघवी), ‘इवाळने’ (ओरडणे), ‘इस्तव’ (विस्तव) हा शब्द ‘इस्तो’ असा चंदगडीत वापरला जातो. ‘इस्तो पडो तोंडार तुझ्या’ अशा खास चंदगडी शिव्या आहेत. ‘इस्तारी’ (पत्रावळी, विस्तारी, फणसवड्याच्या पानांपासून बनवेली), ‘इसरग’ (विसरण्याची सवय), ‘इसवान’ (अंघोळीसाठी गरम पाण्यात ओतण्यासाठीचे पाणी), ‘इळका’ (विळखा), ‘ईत’ (आंगठा व करंगळीतील अंतर), ‘ईन’ (विहिन), ‘इसाड’ (नांगरीतील एक



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

लाकडी पट्टी), उजवड (प्रकाश), 'उबाळा' (धग), 'उंडा' हा तांदळापासून बनलेला एक खाद्य पदार्थ. कोकणात पिकणाऱ्या तांदळाच्या मुख्य पिकामुळे असे तांदळलाचे अनेक पदार्थ कोकणात. त्यापैकी हा एक. चंदगडलाही तांदूळ मुख्य पीक. पर्यायाने असे अनेक पदार्थ येथील खाद्य संस्कृतीत. उंडे बेंदूर सणालाल केले जातात. बैलांच्या गळयात बांधायची माळही उंड्यांची असते. बैलांना नैवैद्यही उंड्यांचा असतो. 'ओटा' (कट्टा, ओटे ही कोकणातील घरांच्या संस्कृतीतील महत्त्वाची गोष्ट आहे. ओघा नसलेले घर कोकणात क्वचित असेल. अतिवृष्टीमुळे निमुळत्या छपरांची घरे आणि समोर शेणाने सारवलेला ओटा हे तेथील रमणीय दृश्य) या शब्दावरून चंदगडी बोलीत 'वट्टी' हा शब्द तयार झाला आहे. ही वट्टी प्रत्येक घराच्या सुखदु:खाची सोबती असते. घरातील सर्व बरेवाईट प्रसंग या वट्टीवरच होतात.

'औंदा' (यावर्षी), 'ककरात' (किक्रांत), 'कडदान' (कडधान्य), 'कडेर' (एका बाजूला, कडेला), 'कनग' (कणंग), नाचणी ठेवण्याचे चिव्याच्या बेळापासून बनवलेली वस्तू), 'कनया' (कन्या), 'कनावने' (कन्हणे/दमल्यानंतर येणारा आवाज), 'करंद' (करवंदे), 'कराड' (डोंगरातील गवत), 'कराप' (हजामत) 'कुडाळी' बोलीत मात्र हा शब्द 'लोहाराच्या भट्टीतील अशुद्ध धातू' या अर्थाने वापरला जातो, 'कवाट' (अंडे), 'कळखोचरा' (कळी काढणारा), 'कळवळा' (दया), 'कायली' (रखरख किंवा गरम होणे), 'काकर' (पेरलेल्या पिकाची एक सर चंदगडीत काकरी), 'काटूक' (सुकलेल्या लाकडाच्या काटक्या), 'काडू' (गांडूळ), 'कातर' या शब्दाचा एक अर्थ कापणे असाही होतो. परंतु, 'कातरयळ' हा शब्द मात्र खूप महत्त्वाचा. 'कातरयळ' म्हणजे संध्याकाळ, 'कातरयळ' म्हणजे संध्याकाळची वेळ. ही वेळ चंदगड परिसरात घरी लक्ष्मी येण्याची वेळ मानली जाते. त्यामुळे यावेळी झाडू मारण्याला, झोपण्याला सक्त विरोध होतो.

'कानसूल' (कान, कानाखालची जागा), 'कानुले' (हरबरे, भाजलेले), 'कानेर' (आवाज), 'कामीन' (काविळ), 'कार' या शब्दाचा मालवणी बोलीतील अर्थ सेंद्रिय खत असा आहे. तर चंदगडी बोलीत हा शब्द 'डोक्याला ताप' या अर्थाने येतो. 'त्यंचा कार नको जाऊदे तिकडी' अशा वाक्यांमध्ये हा अर्थ ध्वनित होतो. 'कारीट' (एक कडू फळ) हे फळ दिवाळीत आरती करण्याच्या विधीसाठी वापरले जाते. 'किटान' हा शब्द मालवणीत लोहाराच्या भट्टीतील विस्तव या अर्थाचा आहे. त्यातील 'किट' हा शब्द विस्तवातून उडणारी राख या अर्थाने चंदगडीत आहे. तर 'किटान' म्हणजे उकीर, केरकचरा. 'किडूक' (किरकोळ), 'किरटा' (सडपातळ) या अर्थासाठी चंदगडी बोलीत 'किरपण' हा अजून एक शब्द आहे. 'किरडावणे' (कुजणे), 'किरमा' (सर्दी), 'कुचमणे' (कुचंबणा होणे), 'कुनगा' (शेताचा एक लहानसा तुकडा), 'कुसका' (कुजगा), 'कुसडा' (कुजकट), 'कुसुरकीडा' (किसुरडा एक किडा), 'कूप' (कुंपण), 'केस्तोडी' (शरीरावरचा एक दुखरा फोड), 'कोडगा' (नासवणारा), 'कोतमीर' (कोथंबिर), 'कोना' (कोपरा), 'कोम' (कोंभ), 'कोय' (आंब्याची बी), 'कोयंडा' (दरवाजाची कडी), 'कंडका' (तुकडा), 'कंडा' (लाकडाचा ओंडका), 'कौंडाळ' (झाडावर पिकलेला आंबा), 'कांबरान' (पांघरून), 'कोंड' (नदीतील किंवा ओढ्यातील खोलगट जागा), 'कॉर' (तुकडा), 'खन' (खान), 'खदूळ' (गधूळ), 'खरकाटा' (उष्टवलेला), खरडना (घासणे), खरडी (बैलगाडीचा ब्रेक), 'खरबोडा' (डोक्यातील कोंडा), 'खवना' (एक शिवी), 'खागे' (पिकाला पाणी देण्यासाठी केलेल्या वाफ्याचे तोंड), 'खाडा' (खंड), 'खाप' (तुकडा), 'खापरी' (कौले), 'खारटान' (मटणाचे जेवण), 'खिदडणे' (घाबरवणे), 'खुर्दा' (सुट्टे पैसे), 'खून' (मासे मारायचे एक साधन), 'खेटे' (फेऱ्या), 'खेटार' (चप्पल), 'खॅप' (फेरी), 'खॉट' (दोष), 'खॉख' (पावसात भिजू नये म्हणून पोत्याची रचना), 'गिरान' (ग्रहण), 'गुघान' (खूप अस्वच्छ), 'घुट्टा' (गुट्टो), 'गोवर' (शेणखत), 'गोकला' (माती कोरण्याचे एक हत्यार), 'घष्टन' या शब्दाचे चंदगडी बोलीत दोन अर्थ आहेत. एक जमिनीचा उतार आणि दुसरा जवळीक. नात्याने, रक्ताने जवळीक असणे. त्यासाठी 'घष्टन' आणि 'घसंत' हे दोन्ही शब्द वापरले जातात.

'घळ' (मोठा खड्डा), 'घळन' (नैसर्गिक मोठी चर), 'घूडूप' (गायब), 'घोव' (नवरा), 'चट' (खाण्याची इच्छा), 'चाबरा' (गुप्त गोष्टी फोडणारा आणि त्या तिखटमीठ लावून सांगणारा), 'चाडगं' (चाड्या करणारे), 'चान्नी' (च्यान्नी-खार/खारूताई), 'चापार' (लाकडी 'पाचर'चा उच्चार), 'चिप' (दगडचा तुकडा), 'चिपकी' (दगडाचा चपटा तुकडा), 'चिम' (भाताचे फालपट), 'चिराकणे' (हागवण लागणे), 'चिरा' (जांभा दगड), 'चुरा' (मटणाचा तुकडा), 'चोटली' (लिंग),

‘चिंगळा’ (लहान, तडपातळ), ‘जडावणे’ (चिघळणे), ‘जाव’ (जाऊ), ‘जितवण’ (ज्या झाडाची फांदी जमिनीत लावल्यानंतर जिवंत राहते ती जितवण. बरीच फुलझाडे, वेली या पद्धतीने लावल्या जातात. त्यांना जितवण म्हणतात. ‘जित्राब’ (जनावरे), ‘झड’ (पावसाची), ‘झाझिवणे’ (तुकडे तुकडे करणे), ‘झाप’ (खोपीला पावसाच्या बाजूने लावण्यासाठी गवतापासून तयार केलेले संरक्षण), ‘टुमरूक’ (मार बसून डोक्यात येणारा टण्णू), डाम (लहान/नव्याने होत असलेले झाड), ‘डालगं’ (कोंबड्या झाकून ठेवण्याची चिव्याच्या बेळांपासून बनवलेली वस्तू), ‘डावरा’ (डावखुरा), ‘डाळी’ (चटई), ‘डिकीवणे’ (चिकटवणे), ‘डुचमळणे’ (विसळणे), ‘डोनी’ (खरकटे टाकण्याचे भांडे), ‘डंग’ (जंगल/घनदाट), ‘डांब’ (नव्याने लावलेले दोनतीन वर्षांतील झाड), ‘तटकी’ (तात्पुरता काट्यांनी बनवलेला दरवाजाच), ‘तलंग’ (अंडी देणारी मोठी कोंबडी), ‘ताटा’ (रुबाब), ‘तॉर’ (नवीन येणारी काजू), ‘तॉरान’ (तोरण), ‘थॅर’ (नखरा, नाटक), ‘थॉराड’ (मोठा), ‘दडना’ (लपणे), ‘दळ’ चंदगड हा पावसाळी प्रदेश असल्याने अनेक घरांमध्ये पावसाळ्यात ओल येते. या ओलीला ‘दळ’ म्हणतात. तर मातीलच्या भिंतीतून पाणी आत झिरपते. या झिरपण्याला ‘दरावणे’ म्हणतात.

‘दळान’ (दळप), ‘दादरा’ (फट), ‘दिश्टावणे’ (दृष्ट लागणे), ‘दुतोंडं’ (दोन्ही बाजूने बोलणारा), ‘दूक’ (दु:ख किंवा जखम), ‘देवचार’ (भूत), ‘धावणे’ (अंगावर येणे), ‘धुमी’ (आग), ‘धुवान’ तांदुळ धुतल्यानंतर आलेले पाणी, कोकणात या पाण्याची आमटी बनवतात. त्यालाच धुवान. चंदगड परिसरातही काही वर्षांपूर्वीपर्यंत ही आमटी बनवली जात होती. या आमटीवरून आमटीत डाळ कमी पडली तर काय धुवान केल्याशीत काय? असा प्रश्न जेवणाऱ्यांकडून येऊ शकतो. ‘नड’ (अडचण), ‘नरामलय’ (थंड पडलाय. ‘नरम’ या हिंदी शब्दापासून बनलला शब्द), नागवणे (फसवणे), ‘नाट’ (लाकडाचा मोठा ओंडका, चंदगडीत ‘कंडा’), ‘निव्हने’ (थंड होणे), ‘निंबार’ (दुपार, दुपारचे ऊन), ‘नॅम’ (खांबे रोवण्यासाठी मारलेला निमूळता खड्डा), ‘पगळणे’ (पसरवणे), ‘पडसार’ (अनेक दिवसांपासून पड पाडलेली जागा), ‘परकेपान’ (परकेपणा), ‘परडा’ (घरामागची जागा), ‘परमळ’ (गंध), ‘परान’ (प्राण), ‘परास’ (पेक्षा), ‘पिट्टी’ म्हैस व्याल्यानंतर जे पहिले दूध येते त्याला ‘चिक’ म्हणतात. या चिकानंतरचे काही दिवस येणाऱ्या दुधाला ‘कवळे (कोवळे) दूध’ म्हणतात. या दुधापासून बनवलला खिरीसारखा खाद्य पदार्थ म्हणजे ‘पिट्टी’.

‘पिरगाळणे’ (तिडा पडणे), पुनवस (पौर्णिमा,) ‘फडा’ (दगड), ‘फुडे’ (समोर यासाठी चंदगडीत ‘म्होरे’ हा अजून एक शब्द), ‘बरबाटं’ (घाणेरडं), ‘बरबाटणे’ (घाण होणे), ‘बाटगा’ (बाटलेला. एक शिवी), ‘बावटा’ (दंड), बावला (मोवाळणे), ‘भोवड’ (शिकार), ‘भॉक’ (होल, छिद्र), ‘मद्यानरात’ (मध्यरात्र), ‘मातेरा’ (खळ्यावरील माती मिसळलेले धान्य), ‘मावळन’ (मामी), ‘मावळा’ (मामा), ‘मावाळणे’ (अस्ताला जाणे / कोमेजणे), ‘मिरशेंगा’ (मिरची), ‘मुराम’ (जमीन करण्यासाठी आणून टाकलेली माती किंवा खडी मिश्रित माती), ‘मुरांबा’ (लोंच्यासाठी मीठ घालून ठेवलेला आंबा), मंडपी (गणेश चतुर्थीला फुलारा बांधण्यासाठी गणपतीच्या डोक्यावर तयार केलेले अंतराळी मंडप), ‘मोवाळणे’ (कोमेजणे), ‘म्हामदे’ (पंढरपूरहून आल्यानंतर घालावयाची पूजा), ‘यवजना’ (ठरवणे), ‘यवार’ (व्यवहार), ‘येरवान’ (दही लावण्यासाठी बाजूला ठेवलेले शिळे दही), ‘येरवाळी’ (सकाळी), ‘रेच लागणे’ (दृष्ट लागणे), ‘वट’ म्हणजे ‘हुकमत’ आणि ‘अजिबात’. चंदगडी बोलीत ‘वट’ आणि ‘वट्टात’ असे दोन शब्द आहेत. ‘ह्ये मी वट दिसकी न्हाय’ म्हणजे ‘हे मी अजिबात देणार नाही’ या वाक्यात ‘वट’ शब्द अशा पद्धतीने येतो. ‘वस’ (वंश), वायंगान (कापलेले भात पीक पुन्हा उगवून येते त्याला वायंगान म्हणतात), ‘व्हकाल’ (नारळ फोडल्यानंतर जे दोन भाग होतात त्यांना ‘व्हकाल’ म्हणतात). ‘व्हलपाटा’ (झाडावरचे फळ पाडण्यासाठीची फेकाटची काठी), ‘सांद’ (फट), ‘सोस’ (तहान), ‘सोमाळं’ (कोमट), ‘हून’ (गरम) अशा पद्धतीने मालवणी-कुडाळी बोलीचा प्रभाव तेथील भाषासंपर्कातून पडलेला आहे. हे केवळ काही निवडक शब्द उदाहरणासाठी दिलले आहेत. हा प्रभाव केवळ शब्द स्तरावरचा नाही तर बोलीतील उच्चार विशेष, खाद्यपदार्थ, शिव्या, म्हणी, वाक्प्रचार अशा अनेक स्तरावर दाखवता येतो.

**परकीय भाषासंपर्क**

शेजार भाषांच्या संपर्काने चंदगडी बोलीने किती मोठ्या प्रमाणात ऋण घेतले आहेत हे लक्षात येते. चंदगडच्या प्रदेशाचा विचार करताना येथील परकीय लोकांचा वावर चर्चेत घेतला आहे. व्यापारी आणि सत्ताधारी म्हणून इंग्रजांचा असलेला घनिष्ठ संबंध या भूमीशी होताच. शिवाय गोव्यापासून खूप जवळचा प्रदेश असल्याने पोर्तुगीजांचाही जवळचा संबंध होता. पोर्तुगीज भाषेचा गोमंतकीय भाषेवर खूप खोलवरचा प्रभाव पडला आहे. अशी प्रभाव पडलेली भाषा घेऊन अनेक गोमंतकीय लोक चंदगड परिसरात पोर्तुगीजांच्या धर्मछळामुळे येऊन स्थायिक झाले आहेत. येथील धर्मप्रसाराचे कार्यही उल्लेखनीय आहे. त्यातून पोर्तुगीज भाषेचाही प्रभाव चंदगडी बोलीवर आणि काही शब्दांच्या उच्चारांवर जाणवतो. येथे काही शब्दांचा विचार करू. प्रथम इंग्रजीतील शब्द पाहू.

इंग्रजीतील Best (बेस्ट) हा शब्द चंदगडीत वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने वापरला जातो. चंदगडी बोलीतील या शब्दांचा उच्चार 'बेस' असा आहे. हा शब्द वयस्कर व्यक्ती जास्त वापरतात. कोणीही चांगले काम केल्यानंतर 'बेस केलेस लेका' (चांगले काम केलास.) असा सहज उद्गार त्यांच्या तोंडून निघतो. काही लोक 'बेसूच' असेही म्हणतात. need (नीड) हा गरज या अर्थाचा शब्द 'नड' असा वापरला जातो. 'नीड'चे 'नड' झाले आहे. 'येवढी नड काढ बाबा माझी' म्हणताना 'यावेळी माझी गरज पूर्ण कर' असेच म्हणायचे असते. estate (इस्टेट) हा शब्द 'इस्टन' असा उच्चार करून वापरला जातो. 'भीक मागेत फिरोलय त्यची इस्टन काय जळ्ळे' असे म्हणताना 'भीक मागत फिरतोय त्याची संपत्ती काय जळले?' अशा पद्धतीने हा शब्द वापरला जातो. Soak (सोक) हा शब्द चंदगडी बोलीत विविध पद्धतीने वापरला जातो. 'सोक', 'सोकने', 'सोकावणे' 'सोकावलय' असे या शब्दाचे अनेक प्रकार आहेत. 'सोकने' म्हणजे कोरडा होणे. 'सोकलय का बग' म्हणजे कोरडे झालेय का पाहा. तर 'सोकावलय' म्हणजे, 'वाईट अर्थाने सवयीचे होणे.' 'त्ये चोऱ्या करून सोकावलय' या वाक्यात त्याला चोऱ्या करायची सवय जडलेय, असे म्हणायचे आहे.

soldier (सोल्जर) हा शब्द ब्रिटिश कालखंडात खूप वापरला जात असेल. या काळात सर्वसामान्यांना सैन्यांची सर्वसामान्य लोकांना एक भितीही वाटत असेल. ब्रिटिश अधिकारी रंगाने गोरे एकदम लाल असल्याने हा 'सोल्जर' शब्द चंदगडी बोलीत अशा दिसणाऱ्या व्यक्तीला वापरला गेला. परंतु, या शब्दाचे उच्चारण 'सोजर' असे झाले. गोऱ्या व्यक्तीला 'सोजर' म्हणण्याची पद्धतच त्यातून रूढ झाली. moody 'मुडी' हा शब्द स्वभावासंदर्भात आहे. हा शब्द चंदगडीत 'माँड' किंवा 'मोंड' असा दोन भिन्न उच्चारणात परंतु, एकाच अर्थाने वापरला जातो. 'मोंड' म्हणजे मनाने निबर बनलेला. यासाठी 'थुकमारा' असा एक शब्द आहे. ripe (राईप) हा शब्द 'राप' अशा उच्चारणाने वापरला जातो. pure (प्युअर) चा उच्चार पिव्वर, loose (लूज) चा उच्चार 'लूज'च आहे. 'गाट आवळ लूज पडो नव्हे ब.' (चांगली घट्ट गाठ मार ती सुटू नये.) अशा पद्धतीने हा शब्द अशिक्षित व्यक्तीकडूनही वापरला जातो. cutting 'कटिंग' या शब्दाबद्दल थोडे सांगत येईल. चंदगड हा जंगलाने व्यापलेला प्रदेश आहे. ब्रिटिशांनी अनेक कारणांसाठी जंगले तोडण्याचेही काम हाती घेतले होते. जंगल तोडलेली जागा ब्रिटिशांच्या बोलण्यातून अनुकरण केल्यानंतर 'कटिन' झाले. पुढे त्या ठिकाणी शेतीही सुरू झाली. मग त्या परिसरातील शेतीला 'कटिनात' असे नाव पडलेले दिसते. lubber (लुब्र) हा शब्द चंदगडीत आहे असा वापरला जातो. थापाड्या व्यक्तीला 'लुब्र' म्हटले जाते. या शिवाय या अर्थासाठी 'बातरं' हा देखील एक शब्द आहे. हा शब्द मात्र हिंदी भाषेच्या प्रभावातून बनला आहे हे स्पष्ट दिसते. straight (स्ट्रेथ) हा शब्द 'स्टेट' अशा उच्चारातून वापरला जातो. fail फेल हा शब्दही जुन्या चंदगडी बोलीत दिसतो. जुन्या शिक्षणाचा प्रसार आजच्या इतका नसलेल्या काळातील चंदगडी बोली. आज शिक्षणाच्या सर्वदूर प्रसारामुळे नवीन शिकलेल्या मुलांकडून इंग्रजी शब्द वापरले जातात. परंतु, काही शब्द चंदगडी बोलीत ब्रिटिश काळातच भाषेत प्रविष्ठ झाले आहेत. त्याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे sick (सिक) हा शब्द होय. चंदगड परिसरातील जुन, जाणती माणसं आजारपणाला 'शिक' काही वेळा 'न्हगंड' म्हणतात. परंतु, नवी पिढी 'आजारी' हाच शब्द वापरते. त्यामुळे अशा काही निवडक शब्दांवरून चंदगडी बोलीतील शतकापूर्वी शिरलेल्या परकीय शब्दांचा शोध घेता येतो.

sober (सोबर) हा शब्द आहे असा वापरला जातो. एखादी गोष्ट 'फिट' बसते. तंतोतंत किंवा शोभणारी असते आणि प्रतही चांगली असते तेव्हा 'सोबर हाय' हा शब्दप्रयोग होतो. ill (इल) हा शब्दही स्वभावाशी निगडीत वापरला जातो. 'इल न्हाय त्यास' किंवा 'इल्ला न्हाय तिस' ही वाक्य नेहमी ऐकायला मिळतात. येथे 'इल' किंवा 'इल्ला' म्हणजे स्वभावाची शिस्त किंवा संस्कार असे अभिप्रेत आहे. jar (जार) हा शब्द आहे असा वापरात आहे. keen (कीन) हा शब्द मात्र वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने वापरात आहे. मूळ अर्थ कायम ठेऊन 'कानेरकीन' किंवा 'कीनहाळ' असे चंदगडी बोलीत शब्द तयार झाले आहेत. 'कानेरकीन' म्हणजे 'प्रचंड आवाज'. हा शब्द आवाजाच्या तीव्रतेबद्दल वापरला जातो. तर 'कीनहाळ' हा शब्द त्याच्या उलटा 'शांत' ठिकाणाबद्दल वापरला जातो. 'माळ कीनहाळ पडलाय', 'नको बाई कीनहाळ हाय तिकडी' अशा वाक्यांमध्ये 'निर्मनुष्यता' असाही अर्थ अभ्रिप्रत आहे.

Nasty (नॅस्टी) हा शब्द 'नस्ट' असा वापरला जातो. चंदगडी बोलीत प्रमाण मराठीतील 'नष्ट' या शब्दाचा 'नस्ट' शी काही संबंध नाही. 'नस्ट भाड्या हाय तो' असे म्हणताना नस्ट म्हणजे कुजका, वाईट करणारा असा अर्थ अभिप्रत आहे. neat (नीट) हा शब्द 'व्यवस्थित' या अर्थासाठीच वापरला जातो. dismiss (डिसमिस) मधील चंदगडीत केवळ 'डिस' राहिला आहे. 'डिसमिस'हा पूर्ण शब्द फार क्वचित वापरला जातो. परंतु, या शब्दावरून तयार झालेला 'डिस' अनेक वेळा वापरला जातो. त्याचा अर्थही काढून टाकणे असा आहे. खेळातून, कामातून डिस करणे असा अर्थ अभिप्रेत आहे., dram (ड्रम) हा शब्द 'डरम' असा वापरात आहे. cut (कट) हा शब्दही वरील 'डिस' शब्दासारखा 'कटाप' असा बदलून वापरात आहे. bet (बेट) हा शब्दही चंदगडीत एकजीव होऊन गेला आहे. त्याचा उच्चार 'बीट' असा झाला असून तो 'पैज' या अर्थासाठीच वापरला जातो. trick (ट्रिक) हा शब्द थोडा उच्चार बदलून कल्पना या अर्थासाठीच 'टिरीक' असा वापरला जातो. trick (ट्रीप) हा शब्द 'टिरिप' असा वापरात आहे. इलेक्ट्रिक पंप आल्यानंतर कदाचित हा शब्द चंदगडी बोलीत प्रविष्ठ झालेला असावा. हा पंप किंवा मोटर बंद पडते तेव्हा ती 'टिरीप' झालेली असते. heinous (हीनस) हा शब्द 'हीनकस' असा वापरला जातो. 'हीनकस' म्हणजे वाईट. चंदगडी बोलीमध्ये या अर्थाचा 'व्हलस' हा अजून एक शब्द आहे.

hook (हूक) आणि double (डब्बल) हे दोन्ही शब्द आहेत या मूळ उच्चारानुसार वापरात आहेत, howl (हाऊल) हा शब्द 'हाऊळ' असा उच्चार बदलून वापरात आहे. 'हाऊळ' म्हणजे दंगा, गोंधळ होय. chance (चान्स) हा शब्द 'चानस' असा; तर basket चा बास्केट, pellet चा पिलेट, rough चा 'रफ' किंवा 'रप' असे थोडे फार उच्चार बदलून चंदगडीत वापरले जातात. इलेक्ट्रिक दिवे नसलेल्या काळात बोलीत शिरलेला lighten (लाईटन) हा शब्द चंदगडीत आज 'लाटन' असा वापरला जातो. plot (प्लॉट) चा उच्चार 'पलाट' होतो. परंतु, आज शहरांमधून ज्या अर्थाने हा शब्द वापरला जातो त्या अर्थासाठी हा शब्द नाही. तर शेतासंबंधी आहे. नवी शेते तयार करण्याच्या दिवसात हा शब्द बोलीत आला. 'पलाट पडली' म्हणजे नवीन शेत तयार झाले, असा त्याचा अर्थ आहे. loose (लूज) हा शब्द आहे य अर्थासाठी वापरात आहे. reel (रिल) हा 'रिळ', fell (फेल) हा शब्द मात्र नापास या अर्थापेक्षा 'वाया जाणे' या अर्थाने वापरला जातो. hole (होल) म्हणजे 'भोक', leak (लीक) म्हणजे 'गळती', loan 'लोन' चे रिन झाले आहे. तर 'डोकेलिटी', 'हास्पिटल', 'डाक्टर', 'सलायन', 'सिव्हिल', 'आडमिट', 'पिलेर', 'बुकं', 'फुटू', 'बरस', 'डिक्टो', 'इस्टो', 'पिकास', 'म्होरे' असे अनेक शब्द इंग्रजीच्या संपर्कातून चंदगडी बोलीत आज वापरले जातात.

या बरोबर इंग्रजांच्या आधीच्या मुसलमानी सत्तांमुळे अनेक अरबी, फारसी शब्द मराठीत आले आहेत. वास्तविक मुस्लिम राजवटींनी राज्यव्यस्थेत ज्या भाषा वापरल्या त्या मूळच्या पंजाब प्रांतापासून उत्तर भारतातील बोलीच होत्या. त्या भाषांमध्ये आपल्या अरबी, इराणी, पुश्तू भाषांचे बेमालूम मिश्रण करून नव्याच भाषा पुढे आणल्या. या भाषांचा भारतीय समाजजीवनावर खोलवरच प्रभाव रुजला. तो राज्यव्यवहाराच्या भाषेतही मोठा होता. तो दूर करण्याचा पहिला प्रयत्न छत्रपती शिवाजी महाराजांनी रघुनाथ पंडितांमार्फत तयार केलेल्या राजव्यवहार कोश च्या माध्यमातून केला. पुढे इंग्रज भारतात आले त्यांनी इंग्रजी ही भाषा भारतात आणली. तिचाही व्यापक परिणाम मराठीवर घडला. हे दोन्ही प्रभाव झुगारून देण्यासाठी विनायक दा. सावरकर, अ. स. भिडे, माधवराव पटवर्धन आणि महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी श्री सयाजी शासन शब्द

कल्पतरू या कोशाच्या माध्यमातून केले. परंतु, भाषा मूलत:च भाषासंपर्कातून आणि वेगवेगळ्या भाषांपासून ऋण घेत विकसित होत असतात. त्यामुळे अशा पद्धतीचे प्रयत्न काहीएक प्रमाणात प्रभाव थोवपत असतील. परंतु, भाषेने इतर भाषांपासून ऋण घेऊन स्वत:ला घडवलेले असते. ते ऋण भाषा सहजासहजी झुगारत नाही. समाज तसे करत नाही. कारण शब्द येतानाच एक सोय म्हणून आणि व्यवहार सुलभतेचा भाग म्हणून आलेले असतात. त्यामुळे समाज वापरातले, रूढ झालेले शब्द असे पूर्णत: झुगारून देत नाही.

मुस्लिम राजवटीत मराठीबरोबर अनेक भारतीय भाषा, बोलींमध्ये अरबी, फारसी पुढे उर्दू आणि नंतर हिंदी या भाषांचा प्रभाव पडलेला आहे. चंदगडी बोलीही याला अपवाद नाही. या बोलीत 'बात' वरून 'बातरं' म्हणजे 'थापा मारणारा' असा शब्द तयार झाला आहे. 'भितर' वरून 'भूत्तूर' (आत), 'अलग' या शब्दचा उच्चार 'अलक' असा केला जातो. शिवाय या शब्दावरून म्हणजे 'अलग करण्यावरून' 'आळंग' (वरच्यावर, हलकेच) हा शब्द तयार झाला आहे. 'गम' (दु:ख) आणि 'गम पडो नको?' या प्रश्नार्थक वाक्यात 'गम' म्हणजे चैन न पडणे. अशा दोन्ही अर्थासाठी हा शब्द व्यवहारात आहे. 'घसंत' हा शब्द आहे या उच्चाने वापरला जातो. 'त्यांची आमची दांडगी घसंत हाय' असा या शब्दाचा वापर होतो. 'लुच्चा' हा शब्द जवळजवळ शिवीसारखा वापरला जातो. 'समजून सवरून' हा शब्द हिंदीच्या प्रभावात तयार झालेला शब्द आहे. 'खबर' हा शब्द बातमी अशा अर्थापेक्षा तो अनेक वेळा वेगवगळ्या पद्धतीने व्यवहारात येतो. उदाहरणार्थ, 'त्यला निम्म्या गावची खबर न्हाय', 'तुला काय खबरबात कळली काय?' अशी वाक्य चंदगडीत सर्रास ऐकू येतात. या वाक्यांमधील 'खबर' हा शब्द 'बातमी', 'माहिती', 'घटना' अशा अर्थाने येतो. 'खबरबात' हाही अशाच पद्धतीने चंदगडीत आलेला शब्द आहे.

'हिकमती' म्हणजे चंदगडी बोलीत 'हेकेखोर'. 'हिकमती भाड्या हाय ह्यो' असे म्हणताना ज्याच्या विषयी बोलायचे आहे, त्याच्या स्वभावाचे वर्णन अपेक्षित आहे. याबरोबरच 'पीडा', 'ताबेदार', 'आंगतुक' हे शब्द मूळ अर्थाने आहेत असे वापरले जातात. 'आगे' या शब्दचा चंदगडीत तयार झालेला उच्चार 'आगोप' असा आहे. 'कपडालत्ता', 'आड' 'सोब' (सोभ), 'लोदी' (पठाणांची एक जात) हा शब्द चंदगडी बोलीत आळशी व्यक्तीसाठी वापरला जातो. पठाणांची ही जात आळशी होती की नाही, याबद्दल मात्र माहिती उपलब्ध होत नाही. 'मुटका', 'बहाद्दूर' वरून 'भाद्दर', 'बोलचाल' वरून 'बोलाचाली' असा शब्द तयार झाला आहे. एखाद्याबरोबर संबंध चांगले आहेत का? हे विचारताना तुमची 'बोलाचाली' हाय नव्हे? असे विचारले जाते.

या संदर्भाच एक वाक्य विचारात घेता येईल. 'त्यो मला नजरेस देको सकन्नाय.' या वाक्यातील 'नजरेस देखो सकन्नाय' हे तिन्ही शब्द उर्दू, हिंदी संपर्कातून तयार झालेले आहेत. अशा पद्धतीने या बोलीतील अनेक शब्द या संपर्कातून आलेले दिसतात. उदाहरणार्थ, 'खवीस' हा शब्द वापरून तयार होणारे 'पार दांगड खवीस हाय', असे म्हणताना 'खूप आगावू' असे म्हणायचे असते. तर काही शब्द उच्चारात बदल होऊन वापरले जातात. उदाहरणार्थ, 'बेईमान' या शब्दावरून 'बेमान' (बेईमान) आणि 'बयमाल' (संकट) असे शब्द तयार झाले आहेत. 'अदमास', 'अवसान', 'आसवं', 'उघड', 'उघडीप', 'नकरा', 'तारीफ', 'कदर', 'खुद्द'वरून 'खुद', 'खेरीज', 'खैर', 'गुलामा', 'जुलूम', 'तलाश'वरून 'तलास', 'अद्दल', 'मनाई', 'लवाजमा' या शब्दाचा अर्थ 'परिवार' परंतु, चंदगडीत 'तयारी', 'साहित्य' असा आहे. त्याबरोबरच 'हयात', 'हद्द', 'हजामत', 'हवापाणी', 'तंटा', 'थारा', 'तगादा', 'तलफ', 'तलास', 'तंगी', 'चित्त', 'तड', 'खडक', 'गर्दन', 'खजाळ' वरून 'खजाळी', 'किट्ट', 'कोटगा' वरून 'केडगा', 'सोट्टा' (दंडा), पथ्थर वरून 'फातर', 'जालिम', 'दुजाभाव', 'खिन' वरून 'खिनहाळ', 'भय', 'तरस', 'तरास', 'मलामत', 'बलामत', 'नकरा', 'हट्टमोरा', 'निलाजरा', 'निबर', 'कौर' (तुकडा), 'कब्जा' असे अनेक शब्द या भाषासंपर्कातून चंदगडी बोलीत आलेले आहेत.

या संपर्काबरोबर शेवटी पोर्तुगीज भाषेशी झालेल्या संपर्काचा उल्लेख महत्त्वाचा आहे. पंधराव्या शतकात जगात अनेक महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या. त्यातील दोन महत्त्वाच्या घटनांचा उल्लेख करू. पहिली घटना म्हणजे, भारताच्या शोधात निघालेला इटलीचा नाविक क्रिस्टोफर कोलंबस अमेरिकेत जाऊन पोहोचला आणि त्याला अमेरिकेचा शोध लागला.

दुसरी घटना वास्को द गामा पोर्तुगलमधून आफ्रिका खंडाला वळसा मारून भारतात कालिकतला पोहोचला. या दोन घटनांनी जगातील व्यापाराची गती बदलली. जगभरातील गोष्टी परपस्परांना परिचित होऊ लागल्या. यामध्ये पिके आणि वनस्पतीचा प्रवास मोठ्या प्रमाणात जगभर झाला. या नव्या व्यापारी मार्गानंतर युरोपियन लोकांसाठी भारत ही महत्त्वाची बाजारपेठ बनली. प्रारंभी युरोपियन व्यापाऱ्यांचा भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोन कच्चा माल पिकवणारी भूमी असा होतो. ते त्यांना आवश्यक असलेल्या कच्च्या मालाच्या उत्पादनासाठी भारताच्या सुपीक जमिनीचा वापर करू लागले. त्यामध्ये तंबाखू, ताग, कापूस, चहा, कॉफी, मसाल्याचे पदार्थ या पिकांचा समावेश आहे. युरोपियन लोकांच्या व्यापारी दृष्टिकोनातूनच नव्या जगातून अनेक पिके भारतात आली. अनेक प्रकारच्या वनस्पती आल्या. अनेक बीबियाणे आली. पुढे ब्रिटिशांनी भाताच्या आणि पोर्तुगीजांनी आंब्याच्या अनेक जाती आणल्या. अननस, पपई, काजू, बटाटे, रताळी हे सारे पोर्तुगीज लोक भारतात घेऊन आले. याबाबत इरफान हबीब आपल्या The Cambrige Economic History Of India या ग्रंथामध्ये लिहितात ‘The Portuguese succeeded in producing the well-known grafted variety of mango, the Alphonso, but the practice of mango-grafting seems to have reached northern India only in the eighteenth century. Three new fruits were received from the New World, namely, the pineapple, papaya and cashew nut. The guava came later.’ (पृष्ठ क्रमांक २१८) गोव्यात आलेल्या पोर्तुगीजांना सर्वात जवळचा प्रदेश चंदगड होता. त्यामुळे पोर्तुगीजांनी आणलेली पिके चंदगडमध्ये लवकरच सर्वत्र पसरली. कारण गोव्यातील सत्ताधारी पोर्तुगीज धर्मप्रसारासाठी चंदगडच्या प्रदेशात फिरत असल्याचे पुरावे आहेत. आज अनेक गावांमध्ये स्थापन झालेले चर्च, धर्मांतरित होऊन ख्रिश्चन झालेला समाज फार मोठा आहे. त्याचबरोबर पोर्तुगीजांनी गोव्यात सुरू केलेला धर्मछळ तर इतिहास प्रसिद्ध आहे. या धर्मछळात अनेक हिंदू कुटुंबे गोव्यातून चंदगड परिसरात येऊन स्थायिक झाली. गोव्याच्या कोकणी बोलीत पोर्तुगीज भाषा खूप खोलवर मिसळली होती. त्यामुळे या लोकांच्या संपर्कातून अनेक शब्द चंदगडी बोलीत प्रविष्ठ झाले आहेत. उदाहरणार्थ, ‘काजू’ (काजवा, मुरटे), ‘अननस’ (आननस), ‘बटाटा’ (गड्डे), ‘कोबी’, ‘हापूस’, ‘पपई’ (पोपय, पप्पय), ‘पेरू’ (पेरवं), ‘फणस’, ‘भोपळा’ (घोपळा), ‘बोंबिल’, ‘घमेले’, ‘तंबाखू’, ‘बिंजागर’, ‘चावी’, ‘पगार’, ‘पाव’, ‘जुगार’, ‘काडतूस’, ‘पायरी’, ‘लोणचे’, ‘मेज’, ‘अलमारा’, ‘तुरुंग’, ‘तिजोरी’, ‘परात’, ‘बशी’, ‘इस्तरी’, ‘साबण’, ‘बटवा’, ‘बंब’, ‘टिकाव’, ‘लिलाव’, ‘फालतू’, ‘मेज’, ‘बाक’, ‘माय’, ‘टोमाटो’, ‘कमीज’, ‘खिडकी’, ‘चमचा’, ‘आशीर्वाद’, ‘मुस’, ‘अलमारी’, ‘कंपू’, ‘काज’, ‘तुरुंग’, ‘पुरावा’, ‘फालतू’, ‘फीत’, ‘बाल्टी’, ‘बालडी’, ‘बिस्कूट’, ‘बूच’, ‘मेस्त्री’, ‘वरांडा’ इत्यादी अनेक शब्द प्रमाण मराठी बरोबर चंदगडी बोलीतही प्रविष्ठ झाले आहेत.

अशा पद्धतीने एखादा प्रदेश भौगोलिकदृष्ट्या लहान असला तरी, त्या प्रदेशाचा इतिहास, तेथील व्यवहार आणि संपर्कप्रक्रिया गुंगागुंतीची असते. महाराष्ट्राच्या एका टोकाला जंगलझाडीत लपलेला चंदगडी बोलीचा प्रदेश अनेक दृष्टीने महत्त्वाचा आहे. तो अशा पद्धतीने मुख्य प्रवाहापासून दूर जंगलझाडीत लपलेला राहिल्यामुळे स्वत:ची भाषा घडवू शकला. भौगोलिकदृष्ट्या समुद्रापासून जवळ असल्याने आणि काही वर्षांपूर्वीपर्यंत समुद्रीमार्गच गतीमान व्यापारी मार्ग असल्याने चंदगडच्या लोकांचा परकीय लोकांशी संपर्क लवकर आला. या प्रदेशात आणि पूर्वेकडील बेळगाव, खानापूर परिसरात झालेला ख्रिस्तीधर्म प्रसार, परकीय लोकांनी विकसित केलेल्या वस्त्या, उभालेले चर्च पाहता ही गोष्ट लक्षात येते. गोव्यात बोलली जाणारी गोमंतकीय कोकणी बोली, बेळगावपासून पूर्वेकडे बोलली जाणारी कन्नड भाषा, तळकोकणातील अनेक जाती-जमातींच्या विविध कोकणी बोली, विशेषत: मालवणी-कुडाळी बोली अशा भिन्न भाषा बोलींच्या संपर्कातून आकाराला आलेली बोली म्हणून चंदगडी बोली वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

एका प्रदेशाला ऐवढ्या वैविध्यपूर्ण प्रदेशांचा शेजार क्वचित लाभत असेल. अशा शेजारामुळे तेथील भिन्न भिन्न भाषा आणि बोली यामुळे चंदगडी बोलीच्या निर्मितीला मोठा हातभार लागला आहे. वरील प्रभावाच्या चर्चेवरून हे सहज लक्षात येते. कोकणी आणि मालवणी-कुडाळी यामध्ये अनेक साधर्म्य आहेत. कधी काळी ही मराठीच्या संपर्कातील एकच बोली असावी. पुढे तिच्या संपर्कक्षेत्रातील भिन्नत्व, राजकीय प्रभाव, नव्या भाषांचा संपर्क, भिन्न भूगोल यामुळे आज ही दोन



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

भिन्न रूपे दिसतात. गोमंतकीय कोकणीवर पोर्तुगीज भाषेचा खोलवरचा प्रभाव पडला. ख्रिश्चन धर्म प्रसारकांनी तेथील बोलीला वेगळे आणि नवे रूप दिले. मालवणी-कुडाळी हा मराठी मुलूख असल्याने आणि येथील सत्ताधारी मराठी राहिल्याने येथील उच्चार, प्रभाव वेगळे राहिले आहेत. तथापि, या दोन्ही रूपांचा चंदगडी लोकांशी सारखाच संपर्क येत राहिल्याने चंदगडी बोलीवर दोन्ही रूपांचा खोलवरचा प्रभाव दिसून येतो. या प्रभावाचा अभ्यास करताना सर्वच निरीक्षणे बरोबर आहेत असेही नाही. शब्दांचे वहन कोठून कोठे झाले, कधी झाले, याबद्दल ठाम मते नोंदवता येत नाहीत. भाषा, बोलींचा ऐतिहासिक परिप्रेक्ष्यात धांडोळा घेत असताना बऱ्याचदा विश्वसनीय पुराव्याच्या आधारे अंदाज बांधावा लागतो. तो कधीकधी चूकूही शकतो. या सर्व शक्यता गृहीत धरून चंदगडी बोलीच्या निर्मितीबाबतचा अंदाज व्यक्त करता येतो. परस्परांच्या संपर्कातून शब्दांची देवाणघेवाण आणि नव्या शब्दांची निर्मिती, शब्दांना नवे अर्थ देणे अशा गोष्टी भाषेत सतत सुरू असतात. तथापि, प्रभावाच्या अभ्यासातून बोलीची निर्मिती आणि घडण समजून घेता येते.

❑❑❑

॥ सहा ॥

# चंदगडी बोली : उच्चारण आणि व्याकरण

चंदगडी बोली भौगोलिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण प्रदेशात बोलली जात असल्याने तिची उच्चारणेही वैशिष्ट्यपूर्ण आहेत. तिच्या व्यवहाराचा विचार करताना स्पष्ट दाखवता येतील अशी किमान चार प्रदेशातील भिन्न भिन्न उच्चारण वैशिष्ट्ये आपण चर्चिली आहेत. ही भिन्न उच्चारणे कन्नड, कोकणी, बारदेस्करी, कुडाळी-मालवणी अशा भाषा, बोलींच्या संपर्काने चंदगडी बोलीत तयार झालेली आहेत. वास्तविक ही बोली मराठीच्या खूप जवळची आहे. तरीही तिची वाक्य तयार करण्याची स्वत:ची पद्धत आहे. त्यामुळे मराठीच्या व्याकरणशी तुलना करताना अनेक अडचणी जाणवतात. तंतोतत तुलना होत नाही. तरीही या बोलीची काही उच्चारणे आणि व्याकरणिक विशेष नोंदवण्याचा प्रयत्न केला आहे.

**उच्चार विशेष**

कोणत्याही बोलीचे उच्चारण हे तिचे वेगळेपण स्पष्ट करणारे महत्त्वाचे वैशिष्ट्य असते. स्वत:ची वैशिष्ट्यपूर्ण उच्चारणे हे चंदगडी बोलीचे महत्त्वाचे विशेष आहे. प्रमाण भाषेपेक्षा बोली जिवंत आणि अधिक प्रवाही असतात. कारण बोलीची उच्चारणे व्यक्ती, प्रदेशानुसार बदलत राहतात. त्यामुळेच एखाद्या विस्तृत प्रदेशातील बोली सर्वत्र एकसारखी आढळत नाही. चंदगडी बोलीचा प्रदेशही त्याला अपवाद नाही. ही बोलीही प्रदेश, व्यवसाय, भौगोलिक, सांस्कृतिक परिस्थितीनुसार बदलत राहते. त्याचबरोबर बोली वापरामध्ये रूढी महत्त्वाची ठरते. बोलीतील शब्दांचे उच्चार, हेल, बलाघात यांची तुलना प्रमाण भाषेशी करता बोलीचे वेगळेपण ध्वनीत होते. बोलीतील एखादा वाक्यप्रयोग प्रमाण मराठीच्या तुलनेत चुकीचा वाटत असला तरी, विशिष्ट पद्धतीने बोलणे समाजात रूढ होऊन गेलेले असते. उदाहरणार्थ, चंदगडी बोलीमध्ये स्त्रिया 'मिय्या जेवलो', 'मिय्या बाजारास गेल्लो' असे बोलतात. या वाक्यातील क्रियापदे पुलिंगी आहेत. परंतु, असे बोलणे या बोलीत रूढ होऊन गेलेले आहे. तर वाक्याच्या प्रारंभी 'बायले', 'भणंन्हुन', 'सुकान' असे शब्द वापरण्याची सवय अनेकांना आहे. त्याशिवाय 'खरंतरबी', 'खरं' हे शब्दही वारंवार वापरण्याची पद्धत रूढ होऊन गेली आहे. त्यामुळे बोली विचारात रूढीचाही विचार महत्त्वाचा ठरतो.

चंदगडी बोलीमध्ये आपण पश्चिम विभाग आणि पूर्व विभाग असे दोन मुख्य विभाग आणि इतर अल्प उच्चार भेदाचे अजून दोन असे एकून चार प्रकारची उच्चारणे कल्पून व्यवहार नमुन्यांचा विचार नोंदवला आहे. चंदगडी बोलीतील शब्दसंग्रहाच्या येथील समाजाच्या संपर्क प्रक्रियेनुसार विचार पुढील प्रकरणात करणारच आहोत. वरील बोलीचे सर्व नमुने बोलीचे वेगळेपण आणि बोली भाषकांचा व्यवहार ध्यानात येण्यासाठी विचारात घेतलेले आहेत. चंदगडी बोलीचा शब्दसंग्रह विपुल आहे. संपूर्ण शब्दसंग्रहाचा आणि इतर वैशिष्ट्यांसंदर्भातील विस्तृत विचार येथे केलेला नाही. तसा करता येणे शक्यही नाही. शब्दसंग्रहाचा विचार भौगोलिक, सामाजिक संदर्भात करणे हे समाजभाषावैज्ञानिक अभ्यासात फार महत्त्वाच आहे. त्यानुसार अनेक शब्दांचा विचार भाषिक संपर्काची प्रक्रिया नोंदवताना थोडा विस्ताराने केलेला आहे.

चंदगडी बोलीचे वैशिष्ट्यपूर्ण उच्चारण समजून घेण्यासाठी काही उदाहरणांची चर्चा थोडक्यात करू.

**हेल आणि सुरावट**

चंदगडी बोली एका विशिष्ट उच्चाराचे हेल काढून बोलली जाते. उदाहरणार्थ, 'जाऊलेसाय...' हा एक शब्द वाटत असला तरी, हा शब्दप्रयोग 'तू जात आहेस?' या अर्थाने वापरला जातो. या शब्दातील 'ऊ' 'सा' आणि शेवटी 'य' या तीन ध्वनींचा उच्चार सुरावटीत केला जातो. अशा प्रकारे या बोलीमधील जवळजवळ प्रत्येक शब्दात ही सुरावट दिसून येते. त्यामुळे व्यवहारात या बोलीलाच एक सुरावट प्राप्त होते. 'तिया यल्लीस' हे वाक्य प्रश्नार्थक आहे. परंतु ही प्रश्नार्थकता या बोलीच्या सुरवटीतून, सूर ओठण्याच्या पद्धतीतून प्राप्त होते. 'तू आलेली होतीस का?' हे प्रश्नार्थक वाक्य वरील केवळ दोन शब्दातून विशिष्ट सुरावटीमुळे बोलता येते. 'यल्लीस' या शब्दातील 'ई' आणि 'स' या दोन्ही ठिकाणी सूर ओढला जातो. 'ई' ची सुरावट दीर्घ आहे. ही सुरावट दीर्घ असली तरी शेवटी पुन्हा 'स' उच्चारण्यापूर्वी 'ई' वर जोर दिला जातो. 'तिय्या जाऊललीसाय' या वाक्यामध्ये 'तू' हे सर्वनाम 'तिय्या' असे होते. शिवाय 'तिय्या'चा उच्चार पुन्हा 'आ'ची 'री'ओढून खास सुरावटीमध्ये होतो. ही सुरवाट, उच्चारविशेष कोकणीच्या जवळची आहे. अशी विशिष्ट सुरावटीमध्ये बोलली जाणारी बोली तालुक्याच्या पश्चिम विभागात दिसते.

पूर्व विभागात बोलीची सुरावट कन्नडच्या प्रभावाने तयार झालेली आहे. तन्न (त्याने), कन्न/ कव्वा (केव्हा), कास (कशाला), खट्टे (कोठे), गसली (गेल्यावर्षी), तण्ण (तेव्हा), तवरस्क (तोपर्यंत), चकोट (चांगले), बळ्यान (खोटे), माज (मला), मिय्या (मी) असे उच्चार पूर्वविभागात दिसतात. 'कासणी ते' 'खट्टे गेल्ल्यास', 'कण्णच्चान सोदूलोय मसोटीत गेल्ल्यास काय' अशी वाक्ये प्रत्यक्ष ऐकणे हा एक अनुभव असतो. या विभागात तूज, माज, त्यास, तिण्ण, मिण्ण, त्यण्णाणी, हयणाणी अशी सर्वनामे वापरली जातात. याबाबत थोडी चर्चा वरती नमुना विश्लेषणात येऊन गेली आहे.
अशा पद्धतीने चंदगडी बोलीतील लोकांचा भाषिक व्यवहार विचारात घेता येईल. चंदगडी बोली भाषकांचा संपर्क मर्यादित परंतु, भिन्न भाषिकांशी होत असतो. त्याची सविस्तर चर्चा संपर्कप्रक्रियेचा विचार करताना पुढील प्रकरणात येईलच. तथापि, चंदगडची संस्कृती, शेती, उद्योगव्यवसाय याचा विचार केल्यानंतर येथील लोकांचा भाषिक व्यवहार लक्षात येतो.

**व्याकरण**

बोलीचा व्यवहार लक्षात येण्यासाठी येथे आपण नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, क्रियाविशेषण अव्यये, काळविचार, लिंगविचार, वचनविचार, विभक्तीविचार आणि पुढे बोलीचे उच्चारण विशेष समजून घेऊ. या विचारानंतर चंदगडी बोलीतील व्यवहाराचे स्वरूप लक्षात येण्यास अधिक मदत होईल.

**नाम**

ज्या प्रत्यक्ष आणि कल्पनेने जाणलेल्या वस्तू किंवा त्यांच्या गुणधर्मांना दिलेली नावे आहेत, त्यांना नाम ही संज्ञा वापरली जाते. नामाचा विचार करताना ही शब्दजाती कोणते कार्य करते, तिचे स्वरूप कसे असे हा विचार महत्त्वाचा असतो. नामाचे वर्गीकरण करताना मराठी व्याकरणात धर्मिवाचक आणि धर्मवाचक नाम असे दोन मुख्य भेद केले जातात.

**धर्मिवाचक :** ज्या नामांनी प्राणी अथवा पदार्थांचा किंवा त्यांच्या समुदायांचा बोध होतो ती नामे. यातील बहुतांश सामान्य नामे प्रमाण मराठी प्रमाणेच चंदगडी बोलीत आहेत. धर्मिवाचक नामाचे सामान्यनाम आणि विशेषनाम असे दोन भेद होतात.

**सामान्य नाम**

एकाच जातीच्या पदार्थातील सामान्य गुणधर्मामुळे त्या वस्तूला सर्वसामान्य नाव दिले जाते. उदाहरणार्थ, उदाहरणार्थ, पॉर (मुलगा), पोर (मुलगी), नद (नदी), राकस (राक्षस) इत्यादी.

**सामान्यनामाचे प्रकार**

समुदायवाचक : घोळका, मेळा, ढिग, व्हळी

स्थलवाचक : पटकी, कटीन, राई, लंबर, मारग

प्रदेशवाचक : किणीकर्याद, कोकणी, कानडी मुलूक

पदार्थविषयक :  खारटान, गोडं, खारं, गोडसं, गुळमाट, आबंटचार, गोडधम्मक, तिकटजाळ
तर सोने ऐवजी सोनं, रान, शेती ऐवजी शेतं असे उच्चारात फरक दिसतात.

**विशेषनाम**

ज्या नामाने जातीतील एका विशिष्ट व्यक्तीचा, प्राण्याचा किंवा वस्तूचा बोध होतो त्यास विशेषनाम म्हणतात.

उदाहरणार्थ,

शिवाजी, संभाजी, तानाजी, अर्जुन, दशरथ, रामू, शंकर ही नावे पुरुषांमध्ये; स्त्रियांच्या नावांमध्येही लक्ष्मी, सरस्वती, पार्वती ही नावे मोठ्या प्रमाणात दिसतात. शेजारी कन्नडच्या प्रभावाने मायाप्पा, इराप्पा, मऱ्याप्पा, देवाप्पा, यलाप्पा, रुकमाण्णा, बडकू, देवाप्पा, यल्लव्वा, मल्लवा, यल्लुबाई, रेणूका अशी नामे आहेत. तर येथील स्थानिक देवदेवतांवरून रवळू, रवळनाथ, भैरू, मारुती, महादेव, वैजनाथ अशी व्यक्तीनामे विशेषत्त्वाने दिसतात. या नावांमागे येथील इतिहास, देवदेवता आणि कन्नड भाषेतील नावांचा प्रभाव दिसून येतो. हा प्रभाव नातेवाचक नावांमध्येही दिसतो. उदाहरणार्थ, बहिनीसाठी आक्का, भावासाठी आण्णा, आप्पा ही नावे या प्रदेशात बरीच लोकप्रिय आहेत.

विशेषनामांचा उल्लेख चंदगडी बोलीत वैशिष्टपूर्ण रितीने होतो.

उदाहरणार्थ, रवळ्या, मारोती, गणपा (गणपती ), शंकऱ्या, म्हाद्या, म्हादू (महादेव), संभा, संभ्या (संभाजी), यल्ल्या (यल्लाप्पा), दसऱ्या (दशरथ), चंद्री (चंद्रभागा), शिरमी, शिरमंती (श्रीमंता), सुंदरी (सुंदरा) इत्यादी. ही नावे विशेषत्वाने दिसतात. अर्थात नवीन पिढीमध्ये ही नावे ठेवण्याचे प्रमाण जवळजवळ नाही.

चंदगडी बोली प्रदेशात नावांना उपनाम जोडण्याची पद्धत मोठी आहे. ही पद्धत वैशिष्ट्यपूर्ण दिसते.

उदाहरणार्थ, गिड्डीचा मसन्या, झिलू गावड्याचा राम्या, जनकीचा बाळया, रवळू गावड्या, पडवीतला राम्या, जकानगावड्याची रंगू इत्यादी.

चंदगडी बोलीत भाववाचक किंवा धर्मवाचक नामे वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

**भाववाचक नाम :** ज्या नामाने वस्तू किंवा प्राण्यांतील गुणधर्म आणि भावनांचा बोध होतो, ती नामे होय. अशी नामे प्रत्येक भाषेत मोठ्या प्रमाणात वापरली जातात.

उदाहरणार्थ, गुळमाट (गोडी), खारटान (मौसाहार), गोडं (शाकाहारी), गोडधम्मक (गोड), कडूइक (कडू), राकस (राक्षस), हैवानी (वाईट), जनावर (पशुत्व), खेरडं (म्हातारा), खेरडी (म्हातारी) इत्यादी.

भाववाचक नामे गुणदर्शक असल्याने विशेषणासारखी वाटतात. परंतु, ती विशेषणे नाहीत. भाववाचक नाम स्वतंत्र काल्पनिक वस्तू असते. यासंदर्भात काही वाक्ये पाहता येतील, चंदगडच्या रवळनाथाची म्हाई दांडगी भरंली. (चंदगडची यात्रा खूप मोठी भरली होती.), पारबतीची पोर लईच गिड्डी हाय. (पार्वतीची मुलगी खूपच बुटकी आहे.)

प्रमाण मराठीत सामान्यनामे, विशेषनामे, धातू व विशेषणे यांना आई, ई, की, गिरी, ता, त्व, पण, पणा, य, वा असे प्रत्यय लावून भाववाचक नामे तयार होतात. असे सूत्र चंदगडी बोलीबाबत सांगता येत नाही. उदाहरणार्थ, नवल (नवलाई) या शब्दासाठी चंदगडीत 'आपरूप' असा शब्द आहे. दांडगाई (थोरपान), चपळाई (चल्लाक) असे शब्द आहेत.

नामाचे अजून दोन प्रकार मराठी व्याकरणात सांगितले जातात. ते म्हणजे, समुदायवाचक नाम आणि पदार्थवाचक नाम. यासंदर्भात काही उदाहरणे चंदगडी बोलीसंदर्भाने पाहता येतील. घोळका (कळप), जथ्था (जुडी), बिंडा (पेंडी), भारा, मेळा, टोळी (ऊसाच्या फडात ऊस तोडणीसाठी (ग्रुप) मेळा तयार करणे या अर्थानेच) अशी समुदायवाचक नामे आहेत. तर त्याल (तेल), नाचना (नाचणी), जुंधळा (ज्वारी), भात (धाण), खरवेस (खरवस), दिवशी (तांदळाचा एक खाद्यपदार्थ), निवरी (करंजी) अशी वैशिष्ट्यपूर्ण पदार्थवाचक नामे आहेत.

**नामाचे विकरण**

नामांचा व्यवहारात वापरत होताना रूपात बदल होत असतो. हा बदल लिंग, वचन आणि विभक्तीमुळे होत असतो. त्याला नामाचे विकरण असे म्हणतात. चंदगडी बोलीत हे विकरण कसे होत ते पाहू. यासाठी खालील वाक्ये लक्षात घेता येतील.

१. पॉर यल ग?

२. पोरं यल्ली?

३. पोरया खलेटे गेल्या?

४. पोरासन खाऊस कायतर आण ग.

या वाक्यांमध्ये 'मुलगा' या शब्दासाठी पॉर, पोरं, पोरया, पोरं अशी रूपे झालेली दिसतात. 'पॉर', 'पोरया' हा बदल लिंगामुळे, 'पोरं' हा बदल वचनामुळे, तर 'पोरासन' हा विभक्तीमुळे बदल होतो.

**लिंग**

बोलीत लिंग कसे वापरले जाते हे पाहणे महत्त्वाचे असते. लिंगाचा वाक्यात उपयोग करताना नामांच्या रूपात बदल होत असतात. चंदगडी बोलीत नामांच्या रूपात लिंगबदलामुळे कसे बदल होतात ते पाहू.

१. कुत्रं भोडीस जाताय./कुत्रं भोवड करताय.

२. म्हस दूध देताय.

३. मिय्या पुस्तक वाचूलोय.

या वाक्यांमध्ये 'कुत्रे शिकारीला जाते' हे पहिले वाक्य 'कुत्रं भोडीस जाताय' असे बोलले जाते. 'म्हैस दूध देते' हे वाक्य 'म्हस दूध देताय' असे होते. त्यामुळे चंदगडी बोलीत लिंगवापराची स्वत:ची पद्धत दिसते. व्यवहारात स्त्रिया मिय्या जेवलो, मिय्या गेलो, कल राती जरा लवकर झोपलो. अशी पुरुषवाचक क्रियापदे वापरताना दिसतात. ही पद्धत जवळजवळ कोल्हापूर जिल्ह्यात सर्वत्रच दिसते. त्यामुळे लिंगांचा फार काटेकोर वापर ही बोली बोलणारे निजभाषक करताना दिसत नाहीत. यासाठी अजून काही वाक्य पाहता येतील.

१. मिय्या आयतवारी बाजारास **गेल्लो.**

२. मिय्या यरवाळी **उठतोय**.

ही वाक्यं स्त्रिया आणि पुरुष एकसारख्याच पद्धतीने बोलताना दिसतात.

मराठीतील काही शब्दांचे चंदगडीत लिंग बदललेले दिसते. उदाहरणार्थ, वेल (स्त्री.) चे 'याल' (पु.) होते.

**वचन**

चंदगडी बोलीत वचन प्रमाण मराठी प्रमाणेच येते. वचन म्हणजे नामाच्या ठिकाणी संख्या दर्शवणारा धर्म. एकवचन आणि अनेकवचन अशी दोन वचने आहेत.

उदाहणार्थ, कुत्रं (एकवचन) - कुत्री (अनेकवचन) अशा पद्धतीने घोडा-घोडी, बगळा-बगळे, गादा-गादे, यळ-यळा, इट- इट्टा, भित-भित्ती, डोचकं-डोचकी, मांडव-मंडपं अशी वापरली जातात.

नामाच्या रूपावरून त्याने दर्शविलेल्या वस्तू एक आहेत की अनेक, याविषयीचा जो बोध होतो, त्यास वचन असे म्हणतात. लिंगभेदामुळे नामाच्या रूपात बदल होतो, तसा तो वचनभेदामुळेही होतो. चंदगडी बोलीत हा बदल कसा होतो ते पाहू.

उदाहरणार्थ,

१. मिय्या चिन्न आणलो.

२. मिय्या चिन्नी आणलो.

३. तिनं भाकरी आणलीन.

४. तिनं भाकऱ्या आणलीन. इत्यादी.

चंदगडी बोलीत अनेक वचनी शब्द वरीलप्रमाणे वापरला जातो. किंवा बहुतांश वेळा 'पुस्तक'चे 'पुस्तकं', 'काजू'चे 'काजवा', 'रोप'चे 'रोपा' (रोप म्हणचे चिखलरोप. धाणाची लागण या अर्थाने), असे बदल होतात. याबाबत अजून काही उदाहरणे पाहता येथील. वचनांप्रमाणे क्रियापदाची रूपे कशी कशी बदलतात हे खालील वाक्यावरून ध्यानात येईल.

उदाहरणार्थ,

**एकवचन :** मिय्या शेंग खाल्लो.

तिनं भाकरी खालीन.

**अनेकवचन :** त्यनं शेंगा खाल्यान.

तिनं भाकऱ्या खालीन.

आणखी काही वचनांची उदाहरणे,

| **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|
| बैल | बैलं |
| पॉर | पोरं |
| काजू | काजवा |
| याल (वेल) | यली |
| मिरची | मिरसेंगा |
| टामाटू | टामाटे |
| भाव (विहीर) | भावी |

आदरार्थी बहुवचन : यवा गा, यवा मास्तर, सायेब यवा, उदे भेटशिला घेवा, तुम्हास्नी, त्यनास्नी (सायबास्नी) अशी वापरली जातात.

## विभक्तिविचार

लिंग, वचन यातील बदलामुळे शब्दांची रूपे बदलतात तशी ती विभक्तीमुळेही बदलतात. वाक्यातील शब्दांचे परस्परांशी संबंध येताना त्यांच्या रूपात बदल होतात. यासाठी कोणतेही एक वाक्य पाहता येईल. 'बैल जोर धाव' असे म्हटले तर त्यातून कोणताही नेमका अर्थ सूचित होत नाही. परंतु, बैलं जोरात धावले. असे म्हटले तर मात्र नेमका अर्थ ऐकणाऱ्यापर्यंत पोहचतो. म्हणजेच, परस्परांशी संबंध येताना वाक्यातील शब्दांमध्ये जे बदल होतात, ते विभक्ती प्रत्ययांनी दर्शविले जातात.

चंदगडी बोलीमध्येही प्रमाण मराठीप्रमाणे विभक्तीच्या आठ प्रकारांच्या आधारे विचार करता येऊ शकतो.

## विभक्तीचे प्रत्यय

| | **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|---|
| **प्रथमा** | प्रत्यय नाहीत. | प्रत्यय नाहीत. |
| **द्वितीया** | स, ला | सनं |
| | पोरग्यास, पोरगीस | पोरासनं, पोरयासनं |
| | भावास, त्यला, ह्यला | भावासनं, त्यासनं, ह्यासनं |



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

| | | |
|---|---|---|
| **तृतीया** | न, | नी, |
| | राम्यान, कुत्र्यान, | पोरांनी, कुत्र्यानी, |
| **चतुर्थी** | स, ला | सनं |
| | (द्वितीयेप्रमाणे) | (द्वितीयेप्रमाणे) |
| **पंचमी** | पासनं, परास, कडणं | पासनं, परास, कडणं |
| | घरापासनं, फुलापरास | झाडांपासनं, फुलांपरास |
| | गावाकडणं, शेताकडणं | गावांकडणं, शेतांकडणं |
| **षष्ठी** | चा, ची, चे. | चा, ची, चे, च्या. |
| | पोराचा, पोरीची, पोराचे | पोरांचा, पोरींचा, पोरांचे |
| | झाडाचे, घराचे इत्यादी. | पोरांच्या, झाडांच्या इत्यादी. |
| **सप्तमी** | त, आ. | तनं, आ. |
| | गावात, घरात, | गावातनं, फुलातनं, दारातनं |
| | आ (घरा) (अप्र.) | आ (अप्र.) |
| **संबोधन** | नू | |
| | पोरांनू, | देवचारांनू |

या चर्चेनंतर विभक्तीप्रत्ययांची शेवटी संक्षिप्तने चर्चा करू. चंदगडी बोलीत द्वितीयेच्या स, ला, ते या प्रत्ययांमध्ये स, ला, ऐवजी ‘स’ हा एकच प्रत्येय सर्वाधिक वापरला जातो. उदाहरणार्थ, जायला - जाऊस, खायला - खाऊस, सभेला - सभेस इत्यादी. तृतीयेच्या ‘ने’ या प्रत्ययाऐवजी ‘नं’ हा प्रत्यय येतो. उदाहरणार्थ, त्याने - त्यानं, मनाने - मनानं (त्यो आपल्या मनानं गेलाय) किंवा ‘पायने लंगडा’ हे वाक्य ‘पायनं लंगडं’ असे बोलले जाते. प्रमाण मराठीतील ‘शी’ हा प्रत्यय चंदगडी बोलीत दिसत नाही. त्याऐवजी शी प्रत्ययाचे शब्द खिडकीशी (खिडकीबरबर), बैलाशी (बैलाबरबर), गाडीशी (गाडीबरबर) असे बोलले जातात. चतुर्थीच्या ‘ला’ या प्रत्यया ऐवजी ‘स’ हाच प्रत्यय वापरला जातो. उदाहरणार्थ, रुपयाला चार = रुपईस चार. अनेकवचनातील ‘शी’ या प्रत्ययाऐवजी ‘बर’ हा प्रत्यय येतो.

उदाहरणार्थ,

तो मित्राशी भांडला - त्यो मित्राबरबर भांडला.

तो त्याच्याशी प्रमाणिक आहे - त्यो त्येचेबरबर ईस्वासान ऱ्हालाय .

पंचमीच्या ‘ऊन’ या प्रत्ययाऐवजी ‘सनं’, ‘परास’, कडणं असे प्रत्यय वापरले जातात.

गावाहून - गावासनं, त्याचेहून - त्याचेपरास, माहेराहून - माहेरासनं असे प्रत्यय येतात. तर षष्ठी, सप्तमी या प्रत्ययात विशेष फरक दिसत नाही. परंतु, संबोधन ‘नो’ ऐवजी ‘नू’ या प्रत्ययाचा वापर या बोलीत केला जातो. उदाहरणार्थ, मुलांनो - पोरानू.

**सर्वनाम**

सर्वनाम म्हणजे वाक्यात नामाऐवजी येणारा शब्द होय. चंदगडी बोलीत ‘मी’ ऐवजी ‘मिय्या’, ‘तू’ ऐवजी ‘तिय्या’, ‘तो’ ऐवजी ‘त्यो’, ‘हा’ ऐवजी ‘ह्यो’ अशी वैशिष्ट्यपूर्ण सर्वनामांची रूपे दिसून येतात. चंदगडच्या पश्चिमेकडे मला, तुला ऐवजी माज, तूज; तर किणीकर्यात भागात आणि पूर्वेकडील काही गावांमध्ये मला, तुला ऐवजी मिण्ण, तुण्ण अशा पद्धतीची सर्वमाने ऐकायला मिळतात. याबद्दल पुरेशी चर्चा भाषाव्यवहार या प्रकरणात केली आहे. काही गावांमध्ये व्यवहारात



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

पुरुषवाचक  सर्वनामे सर्वाधिक वापरात दिसतात. चंदगडी बोलीतील सर्वनामांची चर्चा प्रथम पुरुषवाचक, द्वितिय पुरुषवाचक आणि तृतीय पुरुषवाचक अशा तीन भेदांमध्ये करू.

**पुरुषवाचक सर्वमाने**

चंदगडी बोलीत सर्वनामे वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने वापरली जातात. याची चर्चा पुरुषवाचक सर्वनामांपासून करता येईल. वक्ता, श्रोता आणि वक्ता ज्याच्याबद्दल बोलतोय तो अशा सृष्टीतील तीन स्वरूपांना व्याकरणात 'पुरुष' ही संज्ञा वापरली जाते. बोलणाऱ्याच्या दृष्टीने जगातील सर्व वस्तूंचे तीन वर्ग पडतात. १. बोलणाऱ्याचा, २. ज्याच्याशी बोलतो त्याचा आणि ३. ज्याच्याविषयी बोलतोय त्या व्यक्तीचा किंवा वस्तूचा. तर व्याकरणात यासाठी पुरुष अशी संज्ञा वापरली जाते.

**प्रथम पुरुषवाचक** : मिय्या, आमी (प्रथम पुरुषी)

उदाहरणार्थ, मीय्या भोवोस गेल्लो. (मी फिरायला गेलो होतो.)

आम्मी लगनास जाऊलावात. (पश्चिम विभाग) (आम्ही लग्नाला जात आहोत.)

तर पूर्व विभागात मिय्या ऐवजी मिण्ण (मला), आम्ही ऐवजी आमाणी, आमासनं (आम्हाला) अशी रूपं दिसतात.

**द्वितीय पुरुषवाचक** : तीय्या, तुमी

उदाहरणार्थ, तीय्या खलेटे व्हतेस.(तू कोठे होतास?)

तुमी सांचं भिगीनं यवा. (पश्चिम विभाग) (तुम्ही संध्याकाळी लवकर या.)

तर पूर्व विभागात ही रूपे तूण्ण (तुला), तूमाणी, तुमासंन (तुम्हाला) अशी दिसतात.

**तृतीय पुरुषवाचक :** त्यो, ती, त्ये, त्या, ती

उदाहरणार्थ, त्यो ह्यंडोरं हानूस गेलाय. (तो ह्यंडोरं (शेतीतील एक औजार) आणायला गेला आहे.)

त्या ऊसातभांगलूस आल्यात. (पश्चिम विभाग) (त्या ऊसामध्ये खुरपायला आलेल्या आहेत.)

पूर्व विभागात ही सर्व नामे त्यणांणी (त्यांना), ह्यणी (यांना), ह्यणांणी, ह्यासंन (यांना) अशी दिसतात.

**आत्मवाचक सर्वनाम**

चंदगडी बोलीत आपणु (स्वत:) असे एकच सर्वनाम आहे. हे सर्वनाम आपण आणि स्वत: अशा दोन्ही अर्थाने ते वापरले जाते.

उदाहरणार्थ, १. त्ये काम आपणु करुचं.,

२. आपलं श्यात आपणु करुचं. इत्यादी.

**दर्शक सर्वनामे**

जवळची किंवा दूरची वस्तू दर्शवणाऱ्या शब्दांना दर्शक सर्वनामे म्हणतात. ही सर्वनामे चंदगडी बोलीत 'ह्यो' आणि 'त्या' अशी आहेत.

'ह्यो'ची, ह्यो, ही, व्हयतो, ह्यनी अशी रूपे होतात.

'त्यो'ची, त्यो, ती, त्ये, त्यनी अशी रूपे होताना दिसतात.

उदाहरणार्थ, ह्यो गादा आवंदू पडच हाय. (हे शेत यावर्षी पडून (वापराविना) आहे.)

त्यनी व्हयत्या वावरात गसाली भात केल्ल्यांनी. (त्यांनी ह्या शेतात मागील वर्षी धान लावले होते.)

व्हयतो काईच खरं सांगेसका न्हाय. इत्यादी. (हा काहीही खरं सांगत नाही.)

**संबंधी सर्वनामे**

वाक्यातील दर्शक सर्वनामाशी संबंध दाखवणाऱ्या शब्दांना संबंधी सर्वनामे म्हणतात.

चंदगडी बोलीत जो, ज्ये, ज्या, जी ही संबंधी सर्वनामे आहेत.

उदाहरणार्थ, तिया ज्ये व्हयते सांगोलेसाय त्ये काय पटतलं न्हवे. (तू जे सांगतोहेस ते पटत नाही.)

शिरमीन ज्या मिरसेंगा न्हेलीन त्या चकोट नव्हत्या. (श्रीमंतीने ज्या मिरच्या नेल्या त्या चांगल्या नव्हत्या.)

जो तो आपल्या जिवान श्यानं असताय. (जो तो आपण शहाणा असतो.)

काही वेळेला संबंधी सर्वनाम येतेच असे नाही. अशा वेळी अनुसंबधी सर्वमानाने वाक्य पूर्ण होते किंवा काम भागते.

उदाहरणार्थ, कडाडताय त्यो काय पडणाय, खळी राखी त्यो दाना चाखी इत्यदी.

**प्रश्नार्थक सर्वनामे**

प्रश्न विचारण्याच्या कामी ज्या सर्वनामांचा उपयोग होतो, ती प्रश्नार्थक सर्वनामे होय. चंदगडी बोलीत प्रमाण मराठी प्रमाणे असलेली कोन आणि काय या प्रश्नार्थक सर्वनामांची चर्चा करू.

‘कोण’ची कुणी, खल्यान अशी रूपे या बोलीत आहे.

उदाहरर्णार्थ, ह्ये काम खल्यान केल्यानाय? (हे काम कोणी केले आहे?)

ह्ये कुणी केलय गा? (हे कोणी केलेय हो?) इत्यादी.

आश्चर्य किंवा विलक्षणपणा दाखवताना कोण आणि काय दोन्ही सर्वनामे वापरात आहेत.

उदाहरणार्थ, श्यानी काय खुळी तू? (शहाणी काय वेडी तू?)

काय मर्दानी तिय्या?(काय तू?)अशी वाक्ये केली जातात.

तुच्छता किंवा तिरस्कार दाखवताना कोण च्या ठिकाणी काय योजले जाते.

उदाहरणार्थ, ह्यो काय श्याना लागोन गेलाय घे? (हा किती शहाणा आहे, ते माहिती आहे.)

ह्यो नी काय लागोन गेलाय? (हा आणि कोण?)

ह्यास काय इयाट म्हायीत हाय? (त्याला अजिबात काहीही माहिती नाही.)अशी वाक्यं केली जातात.

स्त्री किंवा पुरुषांबद्दल विशेष प्रश्न करताना, प्रश्न कोणाबद्दल करायचा हे माहिती नसेल तर,‘कोण’चा प्रयोग नपुसकलिंगी होतो.

उदाहरणार्थ, खल्याण (कोणी) पाणी सांडल्यान हिते?, कुणी सांगितलय ते पयलं सांग? इत्यादी.

काही वेळा सर्वनामाची द्विरुक्ती केली जाते. त्यावेळी त्याचा वापर, ‘भोडीस खली खली यल्ली?’ असा होतो.

तर काही वेळा सर्वनामाचा उपयोग अव्ययासारखा होतो. त्यावेळी प्रश्न, आश्चर्य किंवा असंभवता दर्शवली जाते.

उदाहरणार्थ, त्यो पटकीत (परसं) गेल्ला काय? (प्रश्न)

काय दांडगं (मोठे) झाड हाय! (आश्चर्य)

त्यच्या हातनं (हातून) काय व्हताय (होतेय). (असंभव)

**अनिश्चित सर्वनामे**

‘कोण’ (चंदगडीत ‘खलं’) आणि ‘काय’ ही सर्वनामे वाक्यात प्रश्न विचारण्यासाठी न येता ती कोणत्या नामाबद्दल आलेली आहेत हे निश्चित सांगता येत नाही. म्हणजे या सर्वनामांनी कोणत्याही विशेष व्यक्तीचा किंवा पदार्थांचा बोध होत होत नाही, तेव्हा त्यास अनिश्चित सर्वनामे म्हणतात.

उदाहरणार्थ, कुणासबी सांगा. (कोणालाही सांगा)

काय गावेल ते घेवा. (काय सापडेल ते घ्या)

या वाक्यांमध्ये स्त्री किंवा पुरुष यापैकी कोण विवक्षित आहे हे निश्चित नाही. तेव्हा ‘कोणी’ (चंदगडीत ‘कुणी’) या रूपाचा वापर केला जातो.

उदाहरणार्थ, खलं सांगताय तसं कर. (कोण सांगते आहे, तसे कर.)

घराडे खलं यल त सांगोस य. (घराकडे कोणी आले तर सांगायला ये)

काही वेळा वैचित्र्य किंवा विविधता दाखवण्यासाठी याचा उपयोग होताना दिसतो.

उदाहरणार्थ, खलं खुळ, खलं श्याणं कळोस तयार न्हाय. (कोण वेडं, कोण शहाणे कळायला मार्ग नाही.)

खलं खरं, खलं खोटं कळेना झालय. (काय खरे, काय खोटे कळायला मार्ग नाही.)

काही वेळा 'काय' हे सर्वनाम 'काही' या अर्थाने येताना दिसते.

उदाहरणार्थ, खलं कायबी म्हणूदे आइकन्‍नाय घे मी. (कोणी काहीही सांगूदे मी ऐकणार नाही.)

कायबी कर खरं य यगदं. (काहीही कर पण ये एकदा.)

तर काही वेळा या सर्वनामांचा संबंधी किंवा अनुसंबंधी सर्वनामासारखा वापर होतो.

उदाहरणार्थ, ती काय वाट्टेल त्ये सरापते. (ती खूप वाईट शिव्या देतेय.)

त्यो काय म्हणील त्ये खरं असताय. (तो जे म्हणतोय ते खरं असते.)

**विशेषण**

चंदगडी बोलीमध्ये मराठी प्रमाणेच विशेषणांचे प्रकार पाडून विश्लेषण करता येईल. विशेषणे अभ्यासल्याखेरीज या बोलीचे स्वरूप लक्षात येणार नाही. या बोलीतील विशेषणांचा स्वतंत्र शब्दसंग्रह आहे. नामांबद्दल विशेष माहिती सांगणारे आणि नामाची व्याप्ती मर्यादित करणारे शब्द चंदगडी बोलीत वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने वापरले जातात.

उदाहरणार्थ, दांडगा (मोठा), व्हलस (घाणा), बुरसा (घाणेरडा), आंबरसुका (ओलासर), कळकोटा (भांडणे काढणारा), कळखोचरा (भांडणे उकरून काढणारा), काटकोळा (बारीक), धबला (जाडा), हुसभुरक्या (लाज नसलेल्या), व्हळके (होय होय म्हणणारे), गिड्डा (ठेंगणा)

ही विशेषणे केवळ या बोलीमध्येच सापडतात.

रंगवाचक विशेषणेही अभ्यसनीय आहेत.

उदाहरणार्थ, तांबूस, हिरवट, तांबडाभडक, मातकट, तपकीरी, पिवळाधम्मक इत्यादी.

अशी ही रंगवाचक विशेषणे आहेत. तर सहज बोलतानाही हिजडा, देवचार, जोगता, जोगती सारखी शिवीसदृश्य विशेषणे वापरली जातात.

चंदगडी बोलीतील साधित विशेषणेही वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

उदाहरणार्थ, वयल्याअंगास (वरील बाजूस), खायल्याअंगास (खालील बाजूस), भायल्याअंगास (बाहेरच्या बाजूला), मंगलीमळीक (मंगल सारखी), मागल्यामळीक (मागील प्रमाणे), तवंम्हेरेन (तेव्हापासून) अशा विशेषकांचाही या बोलीसंदर्भात स्वतंत्र विचार करता येतो.

**गुणविशेषणे :** चंदगडी बोलीत गुणविशेषणेही वैशिष्ट्यपूर्ण दिसतात.

उदाहरणार्थ, बुरसा (घाणेरडा), तांबडालाल (खूप गोरा), उजळ (गोरा), कडूईक (कडू), गुळमाट (गोड), धबला (जाड), किरपण (बारीक) इत्यादी.

या विशेषणांचा सविस्तर विचार करता येईल यासाठी काही वाक्ये आधाराला घेऊ.

१. खळयावर बारकी पाखरं भरोन पडल्यात.

२. बघता बघता काळयाकुट्ट ढगांनी काळवांडोन यलय.

३. शंकऱ्यास आवंदू धाव्ये वरीस लाले.

४. ती गुरवांची आरास बघून मन भरलं.

या वाक्यांमध्ये 'बारकी पाखरं', 'काळयाकुट्ट ढगांनी', 'धाव्ये वरीस', 'गुरवांची आरास' असे काही शब्द आले आहेत. यामध्ये 'बारकी', 'काळयाकुट्ट', 'धाव्ये', 'ती' हे शब्द म्हणजे या वाक्यांमध्ये आलेल्या नामांची विशेषणे आहेत. विशेषणाचे गुणविशेषणे, संख्याविशेषणे आणि सार्वनामिक विशेषणे असे तीन प्रकार पडतात. या तिन्ही प्रकारांची चंदगडी बोलीच्या संदर्भाने चर्चा करू.

## गुणविशेषणे

वस्तूचा आकार, गुण, स्वभाव इत्यादींचे ज्ञान गुणविशेषणामुळे होते. ही विशेषणे विशेष्याच्या लिंगवचनाप्रमाणे विकार पावतात. चंदगडी बोलीत जांभळा, हाळदुळा, वल्लंकिच्च, भिजकं, तांबडं, लांबडं, गिड्डं यासारखी गुणविशेषणे सर्रास वापरली जातात. उदाहरणार्थ, हाळदुळा आंबा, भिजकं घोंगडं, गिड्ड पॉर इत्यादी. यावरून ही विशेषणे मराठी भाषेतील विशेषणांपेक्षा पूर्णत: भिन्न असल्याचे सहज लक्षात येते. आकार, गुण, चव, रंग, गंध, स्थितीवरून मराठी, कानडी व कोकणी भाषेच्या प्रभावातून चंदगडी बोलीची स्वतंत्र अशी गुणविशेषणे तयार झालेली बघायला मिळतात. ती पुढीलप्रमाणे,

**आकार :** सैलसरगाट (सैलसर), दांडगाझेट (मोठा), गुळगुंडा (गोलाकार)

**काळ :** परवं (परवा), मागलेंदी (मागील वर्षी), आवंदु (या वर्षी), आयल्याड (अलीकडे), पयल्याड (पलीकडे)

**गुण :** चकोट (चांगला), केडगा (भांडखोर), बुळगा (दुबळा), किडकिड्डा (बारीक अंगाचा), छातीचा (धाडशी)

**चव :** पाणीपच्चक (अळणी), तिकटजार (तिकट), आंबटकोळ (आंबट), कडूइक (कडू)

**रंग :** काळाकुट्ट (काळा), सोजर (गोरापान), हाळदुळा (पिवळा), पांडराफक्क (पांढरा), ताबंडाभडक (लाल)

**वास :** व्हलस (घाण), चकोट (चांगला), घमटमाट (चांगल्या वासासंर्भात), हिनकस (वाईट)

स्थान, दिशा : चवरस (चौकोनी), हमचौक (चौकोनी), हुबुती (पूर्व), वयली (वरची), खायली (खालची), भोतेभोर (सभोवताली), मावळती (पश्चिम)

**स्थिती :** वल्ला, वलसर (ओला), पातळफणाक (पातळ), दाटधम्मक (दाट), मुग्गी (गर्दी), हाऊळ (दंगा), सोम्माळं (कोमट), तापलं, हूनहूनीत (गरम), सोमाळं (कोमट)

**स्पर्श :** खरबोरा/खरबोडा (खरखरीत), बिळगा (अगदी मऊ), मउसूत (मऊ), बिळबिळीत (खूपच मऊ)

**संख्याविशेषणे :** यामध्ये पुन्हा क्रमवाचक, आवृत्तीवाचक, पृथक्त्ववाचक, अनिश्चित अशी विभागणी करता येईल.

**क्रमवाचक विशेषणे :** यक, धा, इस, विस, पयला, पाचवा, धाव्वा, इसावा इत्यादी.

**आवृतीवाचक :** दुपट, चवपट, धापट, बारापावटी, चारपावटी, धापावटी इत्यादी. या बोलीत पट साठी पावटी असा प्रत्यय लावला जातो.

**पृथक्त्ववाचक :** हरघडी, हरपावटी, माणसी, परतेक, परत्येकखेपेस इत्यादी.

**अनिश्चित :** शेवटास (शेवटीचा), दांडगी (खूप), लई (बरीच), हूचेतेवढी (भरपूर), ढीगबर (भयंकर संख्येने) इत्यादी.

**सार्वनामिक विशेषणे :** त्ये, त्या, ह्या, त्यो, त्यनी, ह्यनी इत्यादी.

## क्रियापदविचार

क्रियापद ही महत्त्वाची शब्दजाती आहे. क्रियापद हे पद आहे, शब्द नव्हे. मूळ शब्दजाती धातू असून तिला काही विकार होऊन जे रूप तयार होते त्याला 'क्रियापद' म्हणतात. म्हणजेच धातूचा विचार क्रियापदाच्या संदर्भातच करावा लागतो. भाषेतील क्रियावाचक मूळ शब्दाला धातू म्हटले जाते. मराठी व्याकरणात धातूचा उल्लेख क्रियापद असा केला जातो. धातू ही शब्दजाती विकारी असून तिला लिंग, वचन, पुरुष, काळ आणि अर्थ असे पाच विकार होतात. धातूस विकार होऊन जे रूप तयार होते ते क्रियापद होय. म्हणजे क्रिया अर्थपूर्ण करणारे शब्द क्रियापदे म्हणून ओळखले जातात.

उदाहरणार्थ, म्हस दुद देताय (म्हैस दुध देते.), आमी इनवनी करतावात (आम्ही विनंती करतो.), त्यंनी गप्पुच यवूचं (त्याने गप्प यावे.), पांडबान कुसती जिकली (पांडूने कुस्ती जिंकली.) या वाक्यांमधील देताय (देते), करतावात (करतो), यवूचं (यावे), जिकली (जिंकली) ही क्रियापदे आहेत. कारण हे शब्द वाक्यातील क्रिया दाखवतात आणि वाक्याचा अर्थ पूर्ण करतात. चंदगडी बोलीत क्रियापदे वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

उदाहरणार्थ, १. राजबा शेताडे जाऊलाय.

२. पोरं दांडगी हाऊळ घालुल्यात.

३. पांडू आजूच शाळेत गेल्ला.

या वाक्यांतील 'जाऊलाय', 'घालुल्यात', 'गेल्ला' ही क्रियापदे आहेत. चंदगडी बोलीतील क्रियापदांचे सकर्मक व अकर्मक असे दोन प्रमुख प्रकार दाखवता येतात. तर काळावरून भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ असे पडणारे प्रकार दाखवता येतील. चंदगडी बोलीत जाऊलावात (जात आहे), यऊलावात (येत आहे), खाऊलावात (खात आहे), जेऊलावात (जेवत आहोत), गावोल्यात (गात आहेत) अशी वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने क्रियापदे तयार झालेली आहेत. क्रियापदाचे काही प्रकार चचेला घेऊ.

**सकर्मक क्रियापद**

वाक्यातील क्रियापदाचा अर्थ जेव्हा कर्माशिवाय पूर्ण होत नाही, तेव्हा ते क्रियापद सकर्मक असते.

उदाहरणार्थ, 'यल्लूप्पान आम्हासनी गादा दावल्यान.'

या वाक्यातील 'दावल्यान' या क्रियापदाचा अर्थ 'गादा' या कर्माशिवाय पूर्ण होऊ शकत नाही.

उदाहरणार्थ, 'रामून श्यात नांगरून सपीवल्यान.'

'रामून शिवारतली नांगरट करून दिल्यान.' (पश्चिम विभाग)

'त्यण्णाणी नांगरट करून दिल्यानात.' (पूर्व विभाग)

'बाबा सांच खाऊस घून यत्तला.' (पश्चिम विभाग),

'ह्यणाणी यताताय' (पूर्व विभाग)

या वाक्यांमधील सपीवल्यान, दिल्यान, दिल्यानात, यत्तला ही क्रियापदे सकर्मक आहेत.

**अकर्मक क्रियापद**

वाक्यातील क्रियापदाचा अर्थ जेव्हा कर्माशिवाय पूर्ण होतो, म्हणजे क्रियापदाचा अर्थ पूर्ण होण्यास कर्माची जरुरी नसते, तेव्हा ते क्रियापद अकर्मक असते.

उदाहरणार्थ, १. गणपा येला.

२. चंद्या गेलं.

३. मिया लिवलो.

४. तिया शिवलेस.

या वाक्यांमध्ये अर्थ पूर्ण होण्यास कर्माची गरज नाही.

उदाहरणार्थ, 'आऊ यल्ली' (पश्चिम विभाग)

'मिय्या गेल्लो'

'आऊ यताय' (पूर्व विभाग),

'मिय्या जाऊलाव' इत्यादी.

तर या मुख्य क्रियापदांबरोबर चंदगडी बोलीतील क्रियापदे पश्चिम आणि पूर्व विभागांनुसार भिन्न भिन्न दिसतात.



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

**द्विकर्मक क्रियापदे**

काही वाक्यांमध्ये क्रियापदे सकर्मक असून त्यांना दोन कर्मे असतात. अशा क्रियापदांना द्विकर्मक क्रियापदे म्हणतात.

उदाहरणार्थ,

मास्तर पोरास्न गाणी शिकीवत्यात.

गौरीन नातीस गीत्ती सांगितलीन.

त्यनं गणप्यास पैसे दिल्यान.

या वाक्यांमधील शिकीवत्यात, सांगितलीन, दिल्यान ही क्रियापद सकर्मक असून त्यांना दोन कर्मे आहेत. मास्तर हा कर्ता पोरांच्यावर आणि गाण्यावर क्रिया करतो आहे. या वाक्यांमधील गाणी, गीत्ती, पैसे ही प्रत्यक्ष कर्मे आहेत. तर पोरास्न, नातीस, गणप्यास ही अप्रत्यक्ष कर्मे आहेत. प्रत्यक्ष कर्माची विभक्ती प्रथमा आणि चतुर्थी (स,सनं, स्न) असते.

**उभयविध क्रियापदे**

काही क्रियापदांचा सकर्मक आणि अकर्मक असा दोन्ही प्रकारे उपयोग होतो, म्हणून त्यांना उभयविध क्रियापदे असे म्हणतात. मराठीत १. त्याने घराचे दार उघडले. २. त्याच्या घराचे दार उघडले. या दोन्ही वाक्यांमध्ये ‘उघडले’ हे एकच क्रियापद आहे. पहिल्या वाक्यात ते सकर्मक वापरले आहे. या वाक्यात ‘त्याने’ कर्ता असून ‘दार’ हे कर्म आहे. म्हणजे ही क्रियापद सकर्मक आहे. दुसऱ्या वाक्यात हेच क्रियापद आहे. येथे ‘उघडणारे कोण’ या प्रश्नाचे उत्तर ‘दार’ येते. म्हणजे उघडण्याची क्रिया दारावर घडली. याचा अर्थ येथील ‘उघडले’ हे क्रियापद अकर्मक आहे. मात्र चंदगडी बोलीची वाक्य तयार करण्याची पद्धत वेगळी असून या बोलीतील क्रियापदांचे स्वरूप त्यामुळे बदलताना दिसते.

उदाहरणार्थ,

१. त्यनं घराचं दार उघडल्यान.

२. त्यच्या घराचं दार उघाडलं.

येथे वरील अर्थाच्या वाक्यांमध्ये अनुक्रमे उघडल्यान, उघाडलं अशी क्रियापदे येतात.

१. रामान धनुष्य मोडल्यान

२. ते लाकडाचं धनुष्य मोडलं

अशी नवी वाक्ये तयार केली तरी अनुक्रमे त्याच पद्धतीने ल्यान, ल असे भिन्न प्रत्यय येताना दिसतात. त्यामुळे मराठी प्रमाणे येथे एकच प्रत्यय दिसत नाही.

**संयुक्त व सहायक क्रियापदे**

या क्रियापदांच्या बाबतीतही मराठी आणि चंदगडी बोलीत काही भिन्नता दिसते. ती थोडक्यात चर्चा करू. मराठीत १. क्रीडांगणावर मुले खेळू लागली., २. आपणही आता खेळू. अशी वाक्य केली जातात. पहिल्या वाक्यात ‘खेळू’ हा शब्द खेळण्याची क्रिया दर्शवितो, परंतु, तो वाक्याचा अर्थ पूर्ण करीत नाही. तर दुसऱ्या वाक्यातील ‘खेळू’ या क्रियावाचक शब्दांने वाक्याचा अर्थ पूर्ण होतो, म्हणून त्याला क्रियापद म्हणतात. पहिल्या वाक्यातील केवळ ‘लागली’ या शब्दाने क्रियेचे अर्थ पूर्ण होत नाही. ‘खेळू लागली’ या संयुक्त शब्दांत ‘खेळू’ हे धातूसाधित आणि ‘लागली’ या क्रियावाचक शब्दाने क्रिया पूर्ण होते. क्रियापदाचे रूप सिद्ध होण्यास ‘लागली’ शब्दाने साहाय्य केले म्हणून ते ‘सहायक क्रियापद’ आहे. परंतु चंदगडी बोलीत वरील वाक्यांची रचना मराठी प्रमाणे न होता स्वतंत्र होते.

उदाहरणार्थ, १. मैदानात पोरं खेळोली. (खेळू लागली) क्रियापदावर जोर देऊन ‘खेळोल्ली’ (भूतकाळी रूप)

२. आम्हीबी आत्तं खेळोव्वा. (खेळू)

अशा पद्धतीने वाक्यांची रचना चंदगडीत होत असल्याने मराठी व्याकरणाच्या आधारे या वाक्यांचे विश्लेषण करताना अडचणी येतात. त्यासाठी या वाक्यांचे विश्लेषण स्वतंत्रपणेच करावे लागते. पहिल्या वाक्यातील 'खेळोली' हा उच्चार चालू वर्तमानकाळ आहे. तर शेवटच्या उच्चारणावर थोडा जोर दिल्यास 'खेळोल्ली' वाक्य एकदम भूतकाळी होते. दुसऱ्या वाक्यातही 'खेळोव्वा' हा उच्चार जोर न देता नैसर्गिक केला तर 'खेळू' असा अर्थ होतो. तर 'व्वा'वर थोडा जोर दिला तर वाक्य प्रश्नार्थक होऊन जाते.

मराठीतील संयुक्त क्रियापदे चंदगडीत खालील प्रमाणे होतात.

१. राहूल पुस्तक वाचत आहे. (राहूल पुस्तक वाचूलाय.)

२. गणपत शेताकडे जात आहे. (गणपा शेताडे जाऊलाय.)

काही वेळा संयुक्त क्रियापदे वापरात येतात.

१. त्याने सर्व काजू देऊन टाकली. (त्यनं सगळया काजवा दुन टाकल्यान.)

अशा वाक्यांमध्ये संयुक्त क्रियापद येते. परंतु, अशा पद्धतीने वाक्य तयार करण्याची पद्धत फार क्वचित दिसते. त्याऐवजी हे वाक्य 'त्यनं सगळया काजवा दिल्यान.' असे म्हणण्याकडेच येथील लोकांचा कल दिसतो.

**सिद्ध क्रियापदे**

मराठीत जा, ये, कर, ऊठ, बस असे जे मूळ धातू आहेत. त्यांना 'सिद्ध धातू' म्हणतात. या सिद्ध धातूंना प्रत्यय लावून बनविलेल्या क्रियापदांना सिद्ध क्रियापदे म्हणतात. चंदगडी बोलीत हीच क्रियापदे कशी तयार होतात ते पाहता येईल.

१. मी खेळायला जातो. (जा - मूळ धातू)

चंदगडी : मिय्या खेळोस जातो.

२. गावात हत्ती येईल. (ये - मूळ धातू)

चंदगडी : गावात हत्ती यईल.

३. मी उद्यापासून लवकर उठेन. (उठ - मूळ धातू)

चंदगडी : मिय्या उदेपासनं भिगिनं उटेन.

३. ती फळे खाईल. (खा - मूळ धातू)

चंदगडी : त्यी फळं खाईल.

**साधित क्रियापदे**

क्रिया साधणारी क्रियापदे म्हणजे साधित क्रियापदे होय. हात, पाणी या अशा नामांपासून ती बनतात.

उदाहरणार्थ, १. माझ्या कपाटातील वस्तू तो नेहमी हाताळतो.

२. आज्जीच्या आठवणीने त्याचे डोळे पाणावले.

ही वाक्ये चंदगडी बोलीत वेगळ्या पद्धतीने बनतील. कारण वरील वाक्यातील नेहमी, हाताळतो असे प्रमाण मराठीतील शब्द बोलीत दिसत नाहीत. 'पाणावले' ऐवजी 'भरले' किंवा 'डबडबले' असे शब्द वापरात आहेत. त्यामुळे वरील वाक्यांचे शब्दश: रूपांतर करायचे म्हटल्यास, १. माझ्या कपाटातल्या वसतू त्यो सारखं घेताय. २. म्हातारीच्या आटवणीन त्यचे डोळे डबडबले. अशी करता येतील.

**इतर क्रियापदे**

मराठीत क्रियापदांचे विश्लेषण करण्यासाठी याव्यतिरिक्त प्रयोजक व शक्य क्रियापदे, अनियमित क्रियापदे, भावकर्तृक क्रियापदे याशिवाय करणरूप आणि अकरणरूप, धातुसाधिते असे केले जाते.

वरती म्हटल्याप्रमाणे चंदगडी बोलीची वाक्य निर्माण करण्याची पद्धत बऱ्याचवेळा स्वतंत्र पद्धतीने होत असल्याने क्रियापदांच्या विश्लेषणात मराठीशी तंतोतंत तुलना करता येत नाही. काही वेळा किरकोळ उच्चारणे बदलतात. उदाहरणार्थ,

झाड पडले. (झाड पडलं.), झाड पाडले. (झाड पाडल्यान/पाडलं) अशी किरकोळ उच्चारणे बदलतात. चालवतो, बसवतो ही क्रियापदे अनुक्रमे चालिवताय, बसिवताय अशी होतात.

मराठीतील शक्य क्रियापदाप्रमाणे करवते, बसवते, चालवते अशी क्रियापदे चंदगडीत दिसत नाहीत. उदाहरणार्थ, ही क्रियापदे काम करावताय, बसावताय, चालावताय अशी होतात. 'आई मुलांना खेळवते' हे वाक्य 'आई पोरास्न खेळिवताय.' असे होईल. याचा अर्थ प्रत्यय बदलतील. मराठीत आहे, नाही, नव्हे, पाहिजे, नको, नलगे, नये ही अनियमित क्रियापदे सांगितली आहेत. ही क्रियापदे चंदगडीत न्हाय, पायजे, नवे, नको, न्हवे अशी थोडी उच्चारदृष्ट्या बदलतात.

**भूतकाळी क्रियापदे**

पश्चिम विभागात 'मायलेंदी मिरगात पाऊसच दांडगा व्हत्ता.' (मागील वर्षी मिरगामध्ये पाऊस खूप होता.)

'तुमची रोपेत चार जोतं यल्ली.' (तुमची रोप लावणी वेळी चार जोते आली होती.)

तर पूर्व विभागात, 'तण्णा नाचोनाचोन सेवटास पाय धरल्यान.' (खूप नाचला पण शेवटी त्याने पाय धरले.) अशा पद्धतीने क्रियापदे वापरली जातात.

या शिवाय व्हत्ता (होता), खेळे (खेळत होता), जाई (जात होता), गेल्ला (गेला होता), ययी (येत असे), जायी (जात असे) यासारखी भूतकाळातील क्रियापदे वापरली जातात.

**वर्तमानकाळी क्रियापदे**

चंदगडी बोलीच्या पश्चिम विभागातील रूपामध्ये 'आमी मिरसेंगा काडूलावात.' (आम्ही मिरची काढतोय.), 'आयी न्हंगडयास पडले.' (आई आजारी आहे.) अशी क्रियापदे आहेत. तर पूर्व विभागात 'सर्री माणसं आल्याताय.', (सर्व लोक आलेत.), 'त्यण्णाणी कामात गुत्तोन गेल्याताय.' (ते कामात गुंतलेले आहेत.) तर 'खेळोललाय' (खेळतो आहे), 'जाऊललाय' (जात आहे), 'खाऊललाय' (खात आहे), 'बघूललाय' (बघतो आहे) इत्यादी वर्तमान काळातील क्रियापदे वापरली जातात.

भविष्यकाळी क्रियापदे

**पश्चिम विभागात**

'कमळी सुगीत बाळत व्हईल.' (कमळा सुगीच्या दिवसात बाळंत होईल.)

'आयतवारी जॉत यतलं.' (रविवारी जोत येणार आहे.)

**पूर्व विभागात**

'आयतारी सक्कळ गाडी न्हूस यण्णाराय.' (रविवारी सकाळी गाडी न्यायला येणार आहे.)

'बक्कळ मतान निवडोत येऊसेत.' (प्रचंड मतानी निवडून यायला हवा.)

शिवाय 'हाय' (आहे), 'जाऊस पायजे' (जाणार आहे), 'देणार हाय' (देणार आहे) इत्यादी भविष्य काळातील क्रियापदे वापरली जातात.

**क्रियाविशेषण अव्यये**

क्रियाविशेषणे क्रियापदाबद्दल अधिक माहिती देतात. क्रियापदाने जी क्रिया दर्शवली जाते ती केव्हा, कोठे, कशी, किती वेळा आणि किती प्रमाणात घडली अशा पद्धतीची माहिती देणाऱ्या शब्दांना क्रियाविशेषणे म्हणतात. चंदगडी बोलीतील क्रियाविशेषणे ही प्रमाण मराठीपेक्षा निराळी आहेत. लिंग किंवा वचन बदलले तरी ज्यात काहीही बदल होत नाही, असा शब्द म्हणजे अव्यय. या शब्दास 'अविकारी शब्द' (म्हणजे ज्याला कोणताही विकार होत नाही असा शब्द) असेही म्हणतात. क्रियाविशेषण अव्यय हा असा अविकारी शब्द आहे. क्रियापदाबद्दल विशेष माहिती सांगणाऱ्या अविकारी शब्दाला क्रियाविशेषण अव्यय असे म्हणतात.

उदाहरणार्थ,      १. ती भांगलूस इथे यते.

२. ते रोजच बागेडे जाताय.

३. राम्या गापल्यान काम आटीपताय.

वरील वाक्यांमध्ये 'यते', 'जाताय', 'आटीपताय' ही क्रियापदे असून, 'इथे' (येथे), 'बागेडे' (बागेकडे), 'गापल्यान' (अचानक) या शब्दांनी त्या क्रिया कुठे आणि कशा घडतात हे दर्शविले आहे. म्हणजेच 'इथे', 'बागेडे', 'गापल्यान' ही क्रियाविशेषण अव्यये आहेत.

क्रियाविशेषण अव्ययांचे चार प्रकार आहेत.

१. कालवाचक, २. स्थलवाचक, ३. रीतिवाचक, ४. संख्यावाचक/परिमाणवाचक.

याबरोबरच क्रियाविशेषण अव्ययांचे याखेरीज प्रश्नार्थक, निषेधार्थक असे आणखी काही प्रकार असून, त्यांच्या स्वरूपावरून त्यांचे सिद्ध आणि साधित असे प्रकार केले जातात.

**क्रियाविशेषण अव्ययांचे प्रकार**

चंदगडी बोलीत क्रियाविशेषण अव्ययांच्या कालवाचक, स्थलवाचक, रीतिवाचक, संख्यावाचक अव्ययांची काही उदाहरणे पाहू.

**कालवाचक**

क्रियापदाने दर्शविलेली क्रिया केव्हा घिडते हे दर्शविणाऱ्या शब्दास कालवाचक क्रियाविशेषण अव्यय म्हणतात. उदाहणार्थ, शिरमी रोचं काम यरवाळीच करताय, तरवा उदे पेरुवा, कावळे सकळी सकळी इवळोल्यात. इत्यादी वाक्यांमध्ये येणारे रोचं, उदे, सकळी, सकळी ही कालवाचक अव्यये आहेत. रोचं (रोज), आज, कल (काल), उदे (उद्या), परवं (परवा), सकळी (सकाळी), राती (रात्री), दुपारान, दुपरी (दुपारी), सारकं (नेहमी), परतपरत (वारंवार) इत्यादी. अशी कालदर्शक अव्यये चंदगडी बोलीत दिसतात.

**स्थलवाचक**

क्रियापदाने दर्शविलेली क्रिया कुठे घडते हे दर्शविणाऱ्या शब्दास स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय म्हणतात. उदाहरणार्थ, १. हिकडी दांडगा पाऊस वतोलाय., २. तिकडी पेरा आवारला., ३. ह्याअंगानं काळवांडोन यलय. इत्यादी वाक्यांमधील 'हिकडी', 'तिकडी' आणि 'ह्याअंगान' ही स्थलवाचक अव्यये आहेत. तसेच चंदगडी बोलीत 'हिकडी', 'तिकडी', 'आयल्याड', 'पयल्याड', 'इथे', 'तिथे', 'दूर', 'जवळ', 'ह्याअंगास', 'त्याअंगास' इत्यादी कालवाचक अव्यये दिसून येतात.

**रीतिवाचक**

क्रियापदाने दर्शविलेली क्रिया कशी घडते हे दर्शविणाऱ्या शब्दास रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय म्हणतात. उदाहरणार्थ, १. शिरमंतीन मागल्याबरबर चाटल्यान घागर दिलीन., २. ह्यांचं तसं आतं बरं हाय., ३. राजू सकळी भिगीनं उठताय. इत्यादी वाक्यांतील 'चाटल्यान', 'तसं', 'भिगीन' हे रीतिवाचक अव्यये आहेत. तसेच 'असं', 'तसं', 'कसं', 'आसा', 'तसा', 'कसा', 'सारका', 'पाटल्यान' यासारखी काही रीतिवाचक अव्यये चंदगडी बोलीतील सांगता येतील. घाटल्यान (गटागटा), सवकास (सावकाश), टापल्यान (चटकन) अशी काही अव्यय अजून सांगता येतील.

**संख्यावाचक**

जो शब्द क्रियापदाने दर्शविलेली क्रिया किती वेळा घडली हे दर्शवितो किंवा त्या क्रियेचे परिमाण दर्शवितो त्या शब्दास संख्यावाचक किंवा परिमाणवाचक क्रियाविशेषण म्हणतात. उदाहरणार्थ, १. त्यनं पाच यळा फेऱ्या मारल्यान., २. रामान चवदा वरस वनवासात काढल्यान., ३. मागलेंदी इस पोती भात झाल्लं इत्यादी. या वाक्यांमधील 'पाच', 'चवदा' आणि 'इस' ही संख्यावाचक अव्यये प्रमाण मराठी प्रमाणेच आहेत. तसेच मायंदळ (बक्कळ), हूचीतवडी (चिक्कार), वायची (थोडी), नक्काडी (थोडी), रग्गड (भरपूर), जरासकी (थोडी) अशी अजून काही सांगता येतील.

**शब्दयोगी अव्यय**

शब्दाला जोडून येणाऱ्या व दोन शब्दांमधील संबंध जोडणाऱ्या अविकारी शब्दाला शब्दयोगी अव्यय असे म्हणतात. चंदगडी बोलीमध्ये प्रमाण मराठीहून स्वतंत्र अशी शब्दयोगी अव्यये बोलण्यातील सहजपणातून योजली जातात. उदाहरणार्थ, १. याल मांडवावर चढला (वर), २. बुट्टीबुडी कोंबड्या हाईत (बुडी), ३. मिया मारुतीसाठणं यल्लो (साठणं), ४. त्यच्येबदलास मिया यलोय. (बदलास) इत्यादी. या वाक्यांमध्ये 'मांडवा', 'बुट्टी', 'मारुती', 'त्यच्ये' या शब्दांना 'वर', 'बुडी', 'साठणं', 'बदलास' सारखी शब्दयोगी अव्यये आलेली दिसतात. चंदगडी बोलीत कधी कधी वाक्यात एकापेक्षा अधिक शब्दयोगी अव्यये असू शकतात. उदाहरणार्थ, 'सुट्टीदिसी पोरं दिसध्याड देवळामागल्या वडावर हुरयाळेत ऱ्हात्यात.' या वाक्यामध्ये दिसी, ध्याड, मागल्या, वर ही काही शब्दयोगी अव्यवये आलेली आहेत. शब्दयोगी अव्ययांचे सर्व पाच प्रकार चंदगडी बोलीत दर्शविता येतील. उदाहरणार्थ,

**१. कालवाचक :** मागलेंदी (मागील वर्षी), गसाली (मागच्या वर्षी), मागणं (नंतर), आजुपत (आजपर्यंत), भिगिणं (लवकर), आवंदू (यावर्षी), कल (काल) इत्यादी.

**२. स्थलवाचक :** हित्ये (येथे), तित्ये (तेथे), जवळ, लागोलाग, खेटोन (लागून), भुत्तूर (आत), भाईर (बाहेर) इत्यादी.

**३. हेतुवाचक :** साठणं (साठी), निमतास (निमित्ताने), निमित (निमित्त), बिगार (शिवाय) इत्यादी.

**४. संग्रहवाचक :** ही, सुदीक, तीबी, हीबी (ही देखील) इत्यादी.

**५. साहचर्यवाचक :** बरबर, वांगडास (सोबत), गुणं (शिवाय) (त्यच्येगुणं = त्याच्याशिवाय) इत्यादी.

**उभयान्वयी अव्यये**

चंदगडी बोलीत नि (आणि), आनि (आणि), की (काय), पण (खरं), म्हणून, म्हंजे, कारण, तर ही उभयान्वयी अव्ययेच वापरली जातात. परंतु, या अव्ययांचा उच्चार प्रमाण मराठीतील उच्चाराहून भिन्न आहे. उदाहरणार्थ, त्यंन नि काय केल्यानाय? या वाक्यात 'आणि' च्या जागी 'नि' हे अव्यय येते. तर 'तुला खोरं पायचे काय न्हाय' आणि 'पढंरीस जातलं व्हतं खरं जमोस न्हाय' अशा वाक्यांमध्ये प्रमाण मराठीत नसलेली 'काय', 'खरं' अशी उभयान्वयी अव्ययेही चंदगडी बोलीत दिसतात.

**केवलप्रयोगी अव्यये**

केवलप्रयोगी अव्ययातून आपल्या मनातील भावना किंवा वृत्ती व्यक्त केल्या जातात. केवलप्रयोगी अव्ययांचे नऊ प्रकार प्रमाण मराठीत सांगितले आहेत. बहुतेक तशीच केवलप्रयोगी अव्यये चंदगडी बोलीतही वापरली जातात. परंतु त्यांच्या उच्चारणामुळे, हेलामुळे ती प्रमाण मराठीपेक्षा वेगळी ठरतात.

**१. हर्षदर्शक :** वा, मस्तच, बेस्टूच, बेसच (छानच)

**२. शोकदर्शक :** आगागा, बाई गं, देवा रे

**३. प्रशंसादर्शक :** शब्बास, वा, पट्या

**४. आश्चर्यदर्शक :** बाबारे, आगई, आगागा, बायल्यान

**५. संमतीदर्शक :** बरं हाय, बघूया, बघतोच, हूंघे (ठिकाय)

**६. विरोधदर्शक :** छया, छयाट, ह्या, ह्याट, ह्यं

**७. तिरस्कारदर्शक :** व्हलस, शी, छया, ह्याट

**८. संबोधनदर्शक :** अगं ए, ए, आगा, आगं, आरे, आगागा, व्हयगा

**९. मौनदर्शक :** चुप्, गप्

**समास**

चंदगडी बोलीतील व्यक्ती व्यहारात बऱ्याच वेळा शब्दांची काटकसर करताना दिसते. शब्दांची काटकसर हे कोणत्याही बोलीचे महत्त्वाचे वैशिष्ट असते. चंदगडी बोलीत प्रमाण मराठीतील अनेक वाक्यं एखाद्या शब्दात व्यक्त करण्याची पद्धती दिसून येते. तू येत आहे का? हे वाक्य 'यऊलेसाय' तर ते जात आहेत हे वाक्य 'जाऊल्यात' अशा एका शब्दांतच व्यक्त करण्याची पद्धत आहे. बोलीत व्यवहार पूर्ततेला महत्त्व असते. त्यामुळे या बोलीतही अशा पद्धतीने शब्दांची काटकसर मोठ्या प्रमाणात दिसेल. दोन किंवा दोनपेक्षा अधिक शब्दांऐवजी एकाच शब्दाचा उपयोग करण्यावर त्याचा भर असतो. अशावेळी या शब्दाच्या एकत्रीकरणातून काही शब्द मराठीपेक्षा भिन्न तर काही मराठी प्रमाणेच असे सामासिक शब्द चंदगडी बोलीत तयार झालेले दिसतात. उदाहरणार्थ, लालभडक, पिवळाधम्मक, हिरवागार, हिरवाचार, काळेकुट्ट, पांढराफट्ट, कडूइक, आंबटकोळ, ध्याडभर, म्हादेव, हरवक्तास इत्यादी तर काही शब्द मराठी प्रमाणेच चंदगडीतही वापरले जातात. धरबंद, कामधंदा, देवपूजा, दारोदार इत्यादी. प्रमाण मराठीतील सामासिक शब्दांसाठी चंदगडीत काही स्वतंत्र शब्द दिसतात. उदाहरणार्थ, 'स्वर्गवास'साठी 'सर्गास', 'अग्रेसर'साठी सदापुढे, म्होरे इत्यादी. तर 'पोटशूळ' साठी पोटात दुकोलय असेल, 'जातीभ्रष्ट'साठी 'बाटकं', 'उपासमार'साठी आळोन पडलय असेल अशा पद्धतीने वेगळे शब्द बनवण्याची पद्धती चंदगडीत दिसते.

**संधी**

एकमेकांमध्ये दोन शब्द मिसळून एक जोडशब्द तयार होतो त्यास संधी म्हणतात. संधीचा अर्थ सांधणे किंवा जोडणे होय. मराठीत कवीश्वर, सर्योदय, सुर्यास्त असे शब्द संधी आहेत. आपण सहजपणे बोलत असताना अनेक शब्द एकापुढे एक अशा क्रमाने उच्चारत असतो. अशावेळी सुलभीकरणाच्या हेतून आपण दोन शब्दांतील एकमेकांशेजारील दोन वर्ण एकमेकांत मिसळून एक नवीनच जोडशब्द तयार करत असतो. चंदगडी बोलीमध्ये असे जोडशब्द मोठ्या प्रमाणात वापरले जातात. चंदगडी बोलीमधील बहुतेक क्रियापदाची रूपे संधीतून तयार झालेली पाहावयास मिळतात. उदाहरणार्थ, जाऊलेसाय (जात आहेस काय), घेऊलेयास (घेत आहेस काय), देण्णाईस (देत न्हाईस काय), यण्णाईस (येत नाहीस काय) शिवाय चंदगडी बोलीत संधी म्हणून दाखवता येथील असे इतरही पुष्कळ शब्द आहेत. उदाहरणार्थ, झाडपाला, शिनहाळ, दुकणंन्हंगड, आयकेन्हंगडं, देखेन्हंगडं, बघवेन्हंगडं, दिक्कोमाळ, चेडूमाणूस, कामगती, कामगत, ध्याडबर, मघांच्यान इत्यादी.

**काळ**

चंदगडी बोलीतील क्रियापदांचा काळ व अर्थ (आख्यातविचार) हा जवळजवळ प्रमाण मराठी सारखाच आहे. वाक्यातील क्रियापदाने दर्शविलेली क्रिया कोणत्या काळात घडत आहे, त्याविषयीचा जो बोध क्रियापदावरून होतो, त्याला काळ असे म्हणतात. चंदगडी बोलीतील वाक्याची काळव्यवस्था जरी प्रमाण मराठीसारखीच असली तरी क्रियापदांची रूपे मात्र बदललेली दिसतात. खालीली काही वाक्यातील क्रियापदांची रूपे पाहिली तर ही सत्यता ध्यानात येईल.

**भूतकाळ**

**साधा :** मिया काम केलो., मिया गावास गेल्लो.

**अपूर्ण/चालू :** मिय्या कामास जाई.

**पूर्ण :** मिय्या काम गेल्लो.

**रीती :** मिय्या भांगलण करी.

**वर्तमानकाळ**

**साधा :** मिय्या दूध काढूललोय

**अपूर्ण/चालू :** मिय्या दूध काढुललोय.

**पूर्ण :** मिय्या भांगलण सपीवलो.

**रीती :** मिय्या ज्यॉत धरतोय की.

**भविष्यकाळ**

**साधा :** मिय्या श्यात करीन.

**अपूर्ण/चालू :** मिय्या भावीतला गाळ काढीत आसतलो.

**पूर्ण :** मिय्या सगळा गाळ काढला अशेल.

**रीती :** मिय्या शेताडे जातलो.

**काळविचार : क्रियापदांचे अर्थ**

कोणत्याही क्रियापदावरून वाक्याच्या काळाचा बोध होत असतो, तसेच काही अर्थाचेही सूचन होत असते. त्यावरून व्याकरण व्यवस्थेत क्रियापदाचे चार अर्थ मानले जातात. चंदगडी बोलीमध्येही प्रमाण मराठी प्रमाणे चार भागात क्रियापदांच्या अर्थाच्या आधारे काळविचार करता येईल. प्रकारानुसार काही उदाहरणांची चर्चा करू.

**स्वार्थ**

जेव्हा क्रियापदाद्वारे आज्ञा, कर्तव्य, शक्यता, इच्छा किंवा संकेत असा कुठलाही अर्थ व्यक्त न होता फक्त त्याचा स्वतःचा अर्थ व्यक्त होतो तेव्हा त्या क्रियापदास स्वार्थी क्रियापद म्हणतात. चंदगडी बोलीत उदाहणार्थ, १. त्यो शेताडे जाताय., २. मिया काजवा आणूस जाईन., ३. राम्या गावाडे गेला., अशी काही केवळ स्वत:चा अर्थ व्यक्त करणारी क्रियापदे आहेत. क्रियापदाची सर्व काळांतील रूपे ही स्वार्थीच असतात.

**आज्ञार्थ**

जेव्हा क्रियापदाद्वारे आज्ञा, विनंती किंवा उपदेश असा अर्थ व्यक्त होतो तेव्हा त्या क्रियापदास आज्ञार्थी क्रियापद म्हणतात. चंदगडी बोलीतील काही आज्ञार्थ उदाहरणे पुढीलप्रमाणे, १. राजाराम दिल्ल काम कर.(आज्ञा), २. सुपल्लांच्यात कामास यतेस? (विनंती), ३. पोरांनू गावास जाऊसेत यरवाळी उठोस पाजे. (उपदेश) इत्यादी.

**विध्यर्थ**

जेव्हा क्रियापदाद्वारे कर्तव्य, शक्यता किंवा इच्छा व्यक्त केली जाते तेव्हा त्या क्रियापदास विध्यर्थी क्रियापद म्हणतात. उदाहरणार्थ, १. सासरा येवडं करताय तर द्रुपदान गप नांदोस पाजे. (कर्तव्य), २. पाऊस यईल तर बरं हुईल. (शक्यता), ३. शंकऱ्या यळेवर यला तर आज भिगिणं काम सपेल. (अपेक्षा, इच्छा) इत्यादी.

**संकेतार्थ**

जेव्हा क्रियापदाद्वारे संकेतरूप अर्थ सुचविला जातो तेव्हा ते क्रियापद संकेतार्थी असते. उदाहरणार्थ, १. तिय्या बरबर यलेस तर मिळोन म्हादेवास जाइतो., २. यवढं राबलं तर रीन कव्वच फारीक व्हईल., ३. मिरशेंगासणं दर आठ दिसानं पाणी मिळाल्यार लईच बेस. इत्यादी.

वरील उपप्रकारातील क्रियापदाची रूपे ही पूर्णत: चंदगडी बोलीतील स्वतंत्र रूपाची आहेत.

**लिंगविचार**

बोलीत लिंग कसे वापरले जाते हे पाहणे महत्त्वाचे असते. लिंगाचा वाक्यात उपयोग करताना नामांच्या रूपात बदल होत असतात. लिंग, वचन व विभक्ती यामुळे हे बदल होत असतात. चंदगडी बोलीत नामांच्या रूपात लिंगबदलामुळे कसे बदल होतात ते पाहू. उदहरणार्थ, १. कुत्रं भोडीस जाताय. / कुत्रं भोवड करताय., २. म्हस दूध देताय., ३. मिय्या पुस्तक वाचूलोय. या वाक्यांमध्ये 'कुत्रे शिकारीला जाते' हे पहिले वाक्य 'कुत्रं भोडीस जाताय' असे बोलले जाते. 'म्हैस दूध देते' हे वाक्य 'म्हस दूध देताय' असे होते. त्यामुळे चंदगडी बोलीत लिंगवापराची स्वत:ची पद्धत दिसते. व्यवहारात स्त्रिया मिय्या जेवलो, मिय्या गेलो, कल राती जरा लवकर झोपलो. अशी पुरुषवाचक क्रियापदे वापरताना दिसतात. ही पद्धत जवळजवळ



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

कोल्हापूर जिल्ह्यात सर्वत्रच दिसते. त्यामुळे लिंगांचा फार काटेकोर वापर ही बोली बोलणारे निजभाषक करताना दिसत नाहीत.

**वचनविचार**

नामाच्या रूपावरून त्याने दर्शविलेल्या वस्तू एक आहेत की अनेक, याविषयीचा जो बोध होतो, त्यास वचन असे म्हणतात. लिंगभेदामुळे नामाच्या रूपात बदल होतो, तसा तो वचनभेदामुळेही होतो. चंदगडी बोलीत हा बदल कसा होतो ते पाहू. उदाहरणार्थ, १. मिय्या चिन्न आणलो., २. मिय्या चिन्नी आणलो., ३. तिनं भाकरी आणलीन., ४. तिनं भाकऱ्या आणलीन. इत्यादी.

चंदगडी बोलीत अनेक वचनी शब्द वरीलप्रमाणे वापरला जातो. किंवा बहुतांश वेळा 'पुस्तक'चे 'पुस्तकं', 'काजू'चे 'काजवा', 'रोप'चे 'रोपा', असे बदल होतात. याबाबत अजून काही उदाहरणे पाहता येथील. वचनांप्रमाणे क्रियापदाची रूपे कशी कशी बदलतात हे खालील वाक्यावरून ध्यानात येईल.

उदाहरणार्थ, एकवचन : मिय्या शेंग खाल्लो., तिनं भाकरी खालीन.

अनेकवचन : त्यनं शेंगा खाल्यान, तिनं भाकऱ्या खालीन.

आणखी काही वचनांची उदाहरणे,

| **एकवचन** | **अनेकवचन** |
|---|---|
| बैल | बैलं |
| पॉर | पोरं |
| काजू | काजवा |
| यल (वेल) | यली |
| मिरची | मिरसेंगा |
| टामाटू | टामाटे |

आदरार्थी बहुवचन : यवा मास्तर, सायेब यवा, उदे भेटशिला घेवा, तुम्हास्नी, त्यनास्नी (सायबास्नी) अशी वापरली जातात. अशा पद्धतीने या बोलीची उच्चारण वैशिष्ट्ये आणि व्याकरण नोंदवता येईल. अर्थात हे विश्लेषण परिपूर्ण नाही. केवळ या बोलीचे वेगळेपण अभ्यासकांच्या लक्षात यावे यासाठी मराठी व्याकरणाच्या आधारे हे विश्लेषण केले आहे. त्यातून या बोलीची वाक्य, क्रिरयापदे तयार करण्याच्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीबरोबर उच्चारणांचे स्वरूप लक्षात येण्यास मदत होईल.

❑❑❑

॥ ८ ॥

# उपसंहार

भाषा आणि बोलींबाबत समाजात सजगता आणि आस्था नाही. पर्यायाने फार मोठे सांस्कृतिक नुकसान झाले आहे. भारत बहुभाषिक देश आहे. येथे हजारो वर्षांपासून अनेक भाषा आणि बोली एकत्र नांदताहेत. हे भाषाबोलींचे साहचर्य आपल्या समाजाने दाखवलेल्या सांस्कृतिक प्रगल्भतेचे उदाहरण आहे. येथील सांस्कृतिक जीवन जेवढे समृद्ध आहे. तेवढ्याच येथील भाषा आणि बोली समृद्ध आहेत. परंतु, अलीकडील काही वर्षांत विशेषत: ब्रिटिशांची सत्ता भारतात दृढमूल झाल्यानंतरच्या काळात भाषा, बोली, संस्कृती याबद्दलचे नवे दृष्टिकोन रुजायला सुरुवात झाली. अनेकांनी इंग्रजी भाषा आपलीशी केली. शिक्षणाच्या प्रसारानंतर बोलींचे महत्त्व कमी होऊन एका प्रमाणभाषेला महत्त्व प्राप्त झाले. त्यातून भाषांबाबतचे नवे चित्र समोर आले. बिटिशांनी आपल्या राज्यकारभारासाठी केलेल्या प्रांतरचना, पुढे यथावकाश स्वातंत्र्यानंतर झालेली भाषावार प्रांतरचना यामुळे भाषांबाबतचा सहानुभाव संपून खूप संकुचित दृष्टी रुजू लागली. त्याचे बरेवाईट परिणाम अनुभवायला मिळतात. एका प्रांतात एखाददुसऱ्या भाषेला मिळालेले महत्त्व आणि बोलींची झालेली भरड यातून देशभरातील बोली झपाट्याने कमी होऊ लागल्या. अनेक बोली नष्ट झाल्या. काही नष्ट होण्याच्या मार्गाला लागल्या. या भाषांच्या नष्ट होण्याच्या प्रक्रियेला जेष्ठ भाषावैज्ञानिक गणेश देवी यांनी वंशसंहाराच्या धर्तीवर 'शब्दसंहार' असा शब्द वापरला आहे.

भारतातील भाषांची झपाट्याने कमी होणारी संख्या पाहून देवी असे म्हणतात, 'एकंदरीत भारताचा भाषिक नकाशा एका मोठ्या विस्मृतीपर्वात प्रवेश करीत आहे. हे विस्मृतीपर्व जेव्हा संपेल तेव्हा भारतातील शेकडो भाषा नाश पावलेल्या असतील हे सांगण्यासाठी कोणत्याही विशेष गणिती सूत्राची जरूर असू नये.'(गणेश देवी, २०१२ : तीस) भाषा नष्ट होण्याने होणारे नुकसान ताबडतोब लक्षात येत नाही. त्यासाठी अनेक वर्षे जावी लागतात. तेव्हा वेळ गेलेली असते आणि पश्चातापाशिवाय माणूस काही करू शकत नाही. हजारो वर्षांची मानवी संस्कृती आणि बौद्धिक संपदा भाषांच्या नष्ट होण्यातून विस्मृतीत जाते. या सर्व प्रक्रियेत एखाद्या प्रदेशातील मानवाचा इतिहासच नष्ट होतो. भाषा, बोलींच्या अभ्यासातून हा इतिहास जतन करून ठेवण्याचे एक मोठे सांस्कृतिक कार्य घडत असते. कोणत्याही बोलीच्या अभ्यासातून ती बोली बोलणाऱ्या लोकांचे दैनंदिन जीवन, त्यांचे व्यवहार, उद्योगव्यवसाय, परस्पर नातेसंबंध, संपर्कक्षेत्रे, त्यातून परस्परांवर पडलेला प्रभाव आणि घडलेली सांस्कृतिक देवाणघेवाण, समाजातील विधी, रूढी, समजुती एकूणच त्यांच्या जीवनधारणा अशा अनेक बाबी बोलीच्या अभ्यासातून हाती लागतात.

मानवी जीवनव्यवहारातून आकाराला आलेल्या समाज, संस्कृती, भाषा या सामाजिक संस्थांचा अभ्यास करण्यासाठी एकच एक अभ्यासशाखा उपयुक्त ठरत नाही. या संस्थांची गुंतागुंत पाहता, त्यांचा अभ्यास आंतरविद्याशाखीय पद्धतीने करणे अधिक सयुक्तिक ठरतो. मानवाची एक सर्वश्रेष्ठ निर्मिती असलेली भाषा ही सामाजिक संस्था अभ्यासण्यासाठी तर अशा पद्धतीचा अभ्यास अधिक फलदायी ठरतो आहे. भाषाभ्यासातील 'समाजभाषाविज्ञान' ही अभ्यासशाखा अशी आंतरविद्याशाखीय अभ्यासाची पद्धती आहे. ती समाजशास्त्र, भाषाविज्ञान, मानववंशविज्ञान, मानसशास्त्र अशा अनेक विद्याशाखातील संज्ञा, संकल्पनांचा आधार घेऊन वाटचाल करताना दिसते. समाजभाषाविज्ञानाच्या परिप्रेक्ष्यामुळे भाषा-बोलींच्या सामाजिक संदर्भांना महत्त्व आले. यातूनच भाषा जो समाज घडवतो त्या समाजाच्या संदर्भातच ती तपासावी लागते; हा विचार पुढे आला. समाजात भाषा घडण्याची प्रक्रिया अनेक वर्षे सुरू असते. त्यामध्ये तेथील समाजाची वाटचाल, परंपरा,

रीतीरिवाज, त्या समाजावरील सत्ताकेंद्रं, समाजाचा आर्थिक, सामाजिक स्तर, त्यातून विकसित झालेली त्यांची संपर्क व्यवस्था, सांस्कृतिक प्रभाव, भूगोल, त्यातून तयार झालेले उद्योगधंदे अशा अनेक कारणांनी भाषा घडत जाते. प्रस्तुत अभ्यासात समाजभाषावैज्ञानिक अभ्यासपद्धतीतील संज्ञा संकल्पनांच्या आधारे या गोष्टी अभ्यासल्या आहेत.

कोणत्याही समाजाची बोली एक सामाजिक-सांस्कृतिक संचित असते. बोलीतूनच त्या समाजाच्या परंपरा, श्रद्धा, रीतिरिवाज पुढील पिढीकडे संक्रमित होतात. त्यामुळे समाजभाषाविज्ञान अभ्यासपद्धती बोलीच्या महत्त्वपूर्ण ठरू शकते. बोलीचा अभ्यासक भाषाविज्ञानाचा जाणकार असल्यास बोलीचा अभ्यास भाषाशास्त्रीय, व्याकरणिक किंवा संरचनावादी पद्धतीने केल्यानंतर भाषेचे यथायोग्य संकलन होते. त्या बोलीची योग्य पद्धतीने नोंद घेता येते. परंतु, ती घेताना काही अडचणींचा समाना करावा लागतो. त्यातील सर्वात महत्त्वाची अडचण उच्चारणलेखनाची आहे. देवनागरीत उच्चारप्रक्रिया नोंदवण्यासाठी स्वतंत्र सोय नसल्याने काही प्रश्न उपस्थित होतात. वास्तविक बोलीचे वेगळेपण उच्चारातून अधोरेखित होत असते. ते उच्चार लिहिताना देवनागरी लिपीतील अक्षरांचे पाय मोडून आणि काही उपलब्ध चिन्हे वापरून कसरत करावी लागते. मराठीत झालेल्या बोलीअभ्यासाला अशा काही मर्यादा आहेत. तरीही यातील अनेक अभ्यास बोलीची नोंद म्हणूनच पाहावे लागतात. समाजभाषावैज्ञानिक अभ्यासपद्धतीमुळे बोलीचा समाज, संस्कृतीचा अभ्यास ठरतो. शब्दांची, उच्चारणांची सामाजिक चिकित्सा होत असल्याने शब्द समाजाच्या अभ्यासाचे साधन बनतात. पर्यायाने या अभ्यासाला एक परिमाण लाभते.

बोलीतून समाजाची बौद्धिक ज्ञानसंपदा, त्यांच्या परंपरा, श्रद्धा आणि समजुती एका पिढीकडून पुढील पिढीकडे चालत आलेल्या असतात. यासंदर्भाने बोलीतील म्हणी फार उद्बोधक ठरतात. चंदगडी बोलीतील अनेक म्हणी डोंगराळ, जंगल परिसरातील लोकांचे ज्ञानसंचित सांगतात. समाजाचे अनुभव भाषेत कसे गोठवलेले असतात तेही या अभ्यासातून पाहता येते. अनेक शब्द केवळ व्यवहारातील विशिष्ट संकेत नसतात. काही शब्दांमधून समाजातील परंपरा, श्रद्धा किंवा विधी विषयक महत्त्वपूर्ण माहिती मिळते. त्यामुळे बोलीचा अभ्यास केवळ माहिती संकलन ठरत नाही. तर तो समाजाच्या अभ्यासाचे साधन बनू लागतो. माणूस विशिष्ट पर्यावरणात जगत असतो. ते पर्यावरण त्याच्या जगण्यावरच प्रभाव टाकत असते. त्यामुळे बोलीवरील बाह्य पर्यावरणाचा खोलवर प्रभाव अधोरेखित करता येतो. व्यक्ती उपजिविकेसाठी एखादा व्यवसाय स्वीकारते. बऱ्याच वेळा व्यवसाय परंपरागत चालत आलेला असतो. अशा व्यवसायात, त्यातून निर्माण झालेल्या पर्यावरणात त्या व्यक्तीची वाढ होत असते. खेडोपाडी शेती हाच अनेकांचा मुख्य व्यवसाय असतो. त्या अनुषंगाने शेतीपर्यावरणाचा व्यक्तीच्या भाषेवरील प्रभाव अभ्यासता येतो. चंदगडी बोलीवर प्रभाव टाकणारे अजून काही महत्त्वाचे घटक आहेत. चंदगडी बोली बोलल्या जाणाऱ्या प्रदेशाचा शेजार, तेथील भाषा-बोली आणि संस्कृती याचा प्रभावाच्या अंगाने विचार फार महत्त्वाचे आहे. त्या विचारातून चंदगडी बोलीतील शब्दसंपत्तीचा वेध घेतल्यानंतर या शेजार भाषा-बोलींचा खोलवरचा प्रभाव अधोरेखित होतो. त्याशिवाय येथील भूगोल हाही बोलीवर प्रभाव टाकणारा आणि तिच्या निर्मितीत योगदान देणारा महत्त्वाचा घटक आहे. या अनुषंगाने येथील समज, संस्कृती आणि भाषेचे अनुबंध तपासणे अनेक दृष्टीने महत्त्वाचे आहे. कन्नड, कोकणी आणि मालवणी-कुडाळी अशा भिन्न भाषा बोलल्या जाणाऱ्या प्रदेशांच्या त्रिकोणी कात्रीत सापडलेला हा वैशिष्ट्यपूर्ण प्रदेश आहे. त्यामुळे या प्रदेशातील समाजाची वाटचाल वैशिष्ट्यपूर्ण बनली आहे. कोकणच्या आणि कानडी लोकांच्या संस्कृतीचा प्रभाव येथील संस्कृतीवर स्पष्ट दिसतो.

चंदगडचे सांस्कृतिक जीवन फार समृद्ध आहे. कन्नड आणि कोकणी लोकांच्या संपर्कामुळे दोन्ही संस्कृतींच्या प्रभावासह काही स्वतंत्र सांस्कृतीक प्रथा या परिसरात रुजल्या आहेत. येथील सांस्कृतिक वैविध्यता सहज नजरेत भरते. चंदगडीच्या भाषिक प्रदेशात कर्नाटक, तळकोकण आणि महाराष्ट्रातील अनेक प्रथा-परंपराचे एकत्रिकरण झालेले आहे. या परिसरात कर्नाटकी आणि महाराष्ट्रीय बेंदूर असे दोन्ही सण साजरे केले जातात. शिमगोत्सवाचा संस्कार तळकोकणातून या परिसरात रुजला असावा. किणीकर्यात भागात साजरा केला जाणारा कर्नाटकी बेंदूर वैशिष्ट्यपूर्ण असतो. गावातील गल्लीगल्लीतून बैल पळवण्यापासून या निमित्ताने अनेक स्पर्धांचे आयोजन केले जातात. तर उर्वरित प्रदेशात महाराष्ट्रीय बेंदूर

साजरा केला जातो. येथील भात हे मुख्य पीक असल्याने प्रत्येक सणाला तांदळाचे खाद्यपदार्थ पाहायला मिळतात. बेंदराला तांदळापासून बनवलेले उंडे आणि उंडऱ्या फार लोकप्रिय आहेत. या दिवशी उंड्यांची माळच बैलांच्या गळयात माळून त्याला भरवली जाते. या परिसरातील या सणाप्रमाणेच काही विशेष नोंदवता येतील. या प्रदेशात वर्षानुवर्षे दिवाळीच्या सणाला अविवाहित मुली घरोघरी जाऊन 'गीत्ती' गातात. अपाल्याच गावाबरोबर आजूबाजच्या 'पंचक्रोशीत' त्या फिरतात. या गित्ती म्हणताना मुलं 'कारीट' नावाचं कडू फळ त्यांना मारतात. हे फळ या सणात विशेष महत्त्वाच असून घरी होणाऱ्या सामुदायिक ओवाळणीच्या कार्यक्रमात ओवाळणी सुरू असताता उजव्या पायाच्या अंगठ्यात धरून ठेवावे लागते. ओवाळणी झाली की ते त्याच अंगठ्याने फोडून त्याचे चाटण घ्यावे लागते. तर शिमग्यातील 'खेळे' हे खास चंदगडचे सांस्कृतिक वैभव आहे. या पद्धतीच्या प्रथा महाराष्ट्रात इतरत्र दिसत नाहीत. महाराष्ट्रात इतरत्र न दिसणाऱ्या शिमग्यातील खेळयांसारख्या पुरुषप्रधान लोककलाप्रकारातून येथील समाजजीवानचे दर्शन घडते.

बोलीतून अशा पद्धतीने अनेकविध प्रकारचे समाजवास्तव, प्रथा, परंपरा अनुभवता येतात. त्यांचा अभ्यास करता येतो. प्रत्येक समाजाची एक संस्कृती विकसित झालेली असते. ही संस्कृती त्यांच्या भाषेतून व्यक्त होते. भाषेतून समाज आणि समाजाच्या निरीक्षणातून भाषाभ्यास असा दुहेरी अभ्यास या अभ्यासपद्धतीतून सिद्ध होतो. त्यामुळे भाषेचा अभ्यास त्यांच्या संस्कृती आणि समाजजीवनाच्या संदर्भाधारे कसा परिपूर्ण होतो हे या अभ्यासाचे फलित आहे. ठिकठिकाणी वास्तव्य करून असणाऱ्या समाजगटांचा नीट परिचय करून घ्यायचा असेल तर त्यांच्या बोलींचा अभ्यास करायला हवा. चंदगडी बोलीच्या अनुषंगाने येथे आपण ही बोली बोलली जाणाऱ्या प्रदेशाचा सविस्तर विचार केला आहे. चंदगडी बोली, ती बोलणारा समाज आणि त्यांची संस्कृती याचा एकत्रित विचार केल्यानंतर चंदगडी बोलीच्या निर्मितीची प्रक्रिया कशी घडली असेल याची कल्पना येते. समाजभाषाविज्ञानामध्ये अशा पद्धतीच्या समाज, संस्कृती आणि भाषेच्या सहसंबंधाचा अभ्यास केला जातो.

शिवाय कोणत्याही प्रदेशाचा इतिहास आणि भूगोल तेथील भाषेला जन्म देत असतो. चंदगडी बोली याचे उत्तम उदाहरण ठरेल. चंदगडचा मागील काही शतकांचा इतिहास पाहता, येथील विविध राजवटी, त्यांच्या भाषा या येथील समाजजीवनावर कसा प्रभाव पाडत होत्या ते समजून येते. शिवाय चंदगडीच्या भाषिक प्रदेशापासून जवळच असणारी बंदरे कधीकाळी व्यापाराची मुख्य ठिकाणे होती. त्यामुळे या प्रदेशातून तयार झालेले व्यापारी मार्ग येथील भाषेला आकार देत होते. येथील इतिहास हा अनेक सत्तांचा इतिहास आहे. तो सर्व इतिहास चंदगडी बोलीच्या लहान प्रदेशाच्या अनुषंगाने व्यवस्थित अभ्यासता येत नाही. तत्कालीन सत्तांच्या सीमा लवचिक आणि सतत बदलत्या राहिल्याने त्याबद्दल ठोस विधाने करता येत नाहीत. तथापि, राजवटींवरून भाषाघडणीचा धांडोळा घेता येतो. चंदगडचा पंधराव्या शतकापासूनचा इतिहास समोर ठेऊन पोर्तुगीज, मुघल, छत्रपती शिवरायांचे स्वराज्य आणि ब्रिटिश सत्तेधारे येथील भाषाघडणीची प्रक्रिया उलघडून पाहता येते. या सर्व सत्तांचे ठोस पुरोवे चंदगडी बोलीत दाखवता येतात. भूगोलाचेही तसेच आहे. भूगोल बोलीला आकार देतो. चंदगडी बोलीला येथील भूगोलच घडवतो. भौगोलिकदृष्ट्या येथील स्थान, जमीन, हवा, पाणी यामुळे घेतली जाणारी पिके, वनक्षेत्र यामुळे येथे तयार झालेली भाषा पाहता चंदगडचा भूगोलच चंदगडी बोली घडवताना दिसतो. येथील वने, भौगोलिक परिस्थितीत रुजलेली पीकपद्धती, पिके यातून घडलेली चंदगडी बोली याचे उदाहरण ठरावे.

चंदगडी बोलीचा प्रदेश पूर्णता ग्रामीण, डोंगराळ भाग असल्याने लोकांच्या कामधंद्याला खूप मर्यादित क्षेत्रे उपलब्ध आहेत. पर्यायाने येथील लोकांचा भाषिक व्यवहार मर्यादित क्षेत्रांशी सीमित आहे. चंदगडी बोली भाषकांचा संपर्क मर्यादित परंतु, भिन्न भाषिकांशी होत असतो. त्यामुळे तो साधारणत: चार प्रकारच्या भेदांनी दर्शविता येतो. चंदगडी बोलीचे दोन भेद स्पष्ट दिसतात असे मागे नोंदवले आहेत. त्यातील एका भेदाला पूर्व विभागातील आणि दुसऱ्या रूपाला पश्चिम विभागातील बोलीरूप असे विश्लेषणाच्या सोयीसाठी नावे दिली आहेत. तथापि, अजून सूक्ष्म निरीक्षण केल्यानंतर अजून काही भेद स्पष्टपणे नोंदवता येतात. हे भेद काही शब्द, उच्चार आणि वाक्य बनवण्याच्या पद्धतीनुसार दिसून येतात. आज कर्नाटकात असलेल्या मार्कंडेय नदीच्या आजूबाजूच्या परिसरात बोलीचा एक वैशिष्ट्यपूर्ण नमून आहे. ही बोली 'बेळगावी बोली' म्हणून ओळखली जाते. बेळगावचा परिसर, खानापूर, हुक्केरी, चंदगड परिसरातील अनेक गावांमध्ये ही बोली थोड्याफार फरकाने


मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

सर्वत्र बोलली जाते. या बोलीचे दुसरे रूप ‘किणीकर्यात’ परिसरातील गावांमध्ये बोलले जाते. या दोन्ही रूपांवर कानडीच्या उच्चार विशेषांचा प्रभाव आहे. तर हलकर्णी परिसरातील मध्यवर्ती गावांमधील लोक वेगळ्या पद्धतीची चंदगडी बोलतात. ही बोली प्रमाण मराठीकडे अधिकांश प्रमाणात झुकली आहे. येथील साखर कारखाना, बेळगाव-वेंगुर्ला रस्त्यावरील सर्वाधिक रहदारी असलेला हा परिसर आहे. येथे गतीने बाजारपेठ विकसित झाली. महाविद्यालय, साखर कारखान्याच्या उत्पादनातील उपपदार्थापासूनचे निर्मिती उद्योग अशा अनेक कारणांनी हा परिसर गतीने बदलला. त्यामुळे या परिसरात बोली प्रमाण मराठीकडे झुकली. तरीही जुन्या लोकांच्या बोलीचे सूक्ष्म निरीक्षण केल्यास या परिसरात बोलल्या जाणाऱ्या बोलीवर कोकणी आणि कानडी दोन्हीचा संमिश्र प्रभाव दाखवता येतो. तर चंदगडच्या पुढील पश्चिमेकडे म्हणजे वेंगुर्ल्याला जाणाऱ्या रस्त्यावरील आणि तिलारीकडील गावे जी बोली बोलतात, त्या बोलीवर कोकणी, मालवणी-कुडाळी या बोलींचा स्पष्ट प्रभाव आहे. ज्या-त्या परिसरातील लोकांच्या संपर्कानुसार हे प्रभाव दिसून येतात.

चंदगडची संस्कृती, शेती, उद्योगव्यवसाय याचा विचार केल्यानंतर येथील लोकांचा भाषिक व्यवहार लक्षात येतो. सण, विधी, कुटुंब, विवाहासारख्या सामाजिक संस्था, शेतीसारखा येथील मुख्य व्यवसाय, दैनंदिन बाजार करण्यासाठी बाजार गावातील लोकांशी आणि व्यापाऱ्यांचा होणारा संपर्क यातूनच येथील भाषाव्यवहार घडताना दिसतो. या अभ्यासात बोलीचे विविध क्षेत्रातील नमुने पाहता, चंदगडी बोलीच्या संभाषणपद्धती, निवेदनाची पद्धत, इत्यादी मधून बोलीचे साक्षात दर्शन घडते. शिवाय ही बोली प्रत्यक्ष कशी बोलली जाते याचा अंदाज येतो.

बोलीतून चालणाऱ्या भाषा व्यवहाराचे स्वरूप सूक्ष्मपणे लक्षात येण्यासाठी बोलीचे व्याकरण अभ्यासने आवश्यक असते. तसे येथे अभ्यासले आहे. बोलीच्या व्याकरणातून तिच्या व्यवहाराचे सूक्ष्म पदर उलघडता येतात. त्यासाठी व्याकरणातील नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, क्रियाविशेषण अव्यये, काळविचार, लिंगविचार, वचनविचार, विभक्तिविचारासह बोलीची उच्चारणे अभ्यासल्यास व्यवहाराचा अंदाज येतो. त्यातून भाषेची संरचनाही कळते. या व्याकरणिक विशेषांचे विश्लेषण केल्यास बोलीचे भिन्न संपर्क, पर संस्कृतीचा प्रभाव, भौगोलिक वेगळेपण, ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात येते. या अभ्यासावरून बोलीतील व्यवहार प्रमाण भाषेपेक्षा नैसर्गिक, जिवंत आणि रसरशीत असल्यानचे लक्षात येते.

चंदगडी बोलीचा स्वत:चा स्वतंत्र शब्दसंग्रह कसा घडला हे पाहण्यासाठी बोलीभाषकांची संपर्क व्यवस्था समजून घेणे महत्त्वाचे आहे. चंदगडी बोलीवर कोकणी, कन्नड या भाषांचा आणि मालवणी-कुडाळी बोलीचा प्रभाव अतिशय घनिष्ठ आहे. संपर्काचे घनिष्ठत्व आणि व्यापकता लक्षात येण्यासाठी बोलीभाषाकांच्या संपर्कप्रक्रियेचा शोध अतिशय महत्त्वाचा ठरतो. त्या दृष्टीने चंदगडी बोलीच्या संपर्क प्रदेशाचा सूक्ष्म आणि सविस्तर विचार केलेला आहे. त्यातून भाषा आणि संस्कृतीच्या प्रभाव शोधलेला आहे. चंदगडी ही व्यक्तिबोली, शेजारभाषा, परकीय भाषा अशा सर्व स्तरातील प्रभाव पोटात घेऊन घडलेली महाराष्ट्रातील एक वैशिष्ट्यपूर्ण बोली आहे.

मराठीच्या इतर बोलींच्या तुलनेत चंदगडी बोलीचा भाषिक प्रदेश फार विस्तृत नाही. चंदगड परिसरातील दिडशेच्या आसपास गावे, वाड्या आणि वस्त्यांवर ही बोली वेगवेगळ्या पद्धतीतीने बोलली जाते. हा प्रदेश भौगोलिकदृष्ट्या लहान असला तरी, या प्रदेशाचा इतिहास, तेथील भाषिक व्यवहार आणि संपर्क प्रक्रिया गुंगागुंतीची आहे. हा प्रदेश महाराष्ट्राच्या एका टोकाला सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये जंगलझाडीत लपलेला आहे. तो अशा पद्धतीने मुख्य प्रवाहापासून दूर जंगलझाडीत लपलेला राहिल्यामुळे स्वत:ची बोली घडवू शकला. भौगोलिकदृष्ट्या समुद्रापासून जवळ असल्याने आणि काही वर्षांपूर्वीपर्यंत समुद्रीमार्गच गतीमान व्यापारी मार्ग असल्याने चंदगडच्या लोकांचा परकीय लोकांशी संपर्क येत राहिला. या प्रदेशात आणि पूर्वेकडील बेळगाव, खानापूर परिसरात ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराची मोठी चळवळ झाली. त्यातून अनेक गावांमधील लोक ख्रिस्ती झाले. अशा ख्रिस्ती झालेल्या लोकांनी अंगिकारलेली ‘बारदेस्करी बोली’ येथील लोकांच्या संपर्कात येत राहिली. बेळगावमध्ये ब्रिटिशांनी उभारलेल्या आपल्या वस्त्या, ब्रिटिशांचा सैन्यतळ अशा अनेक कारणांनी येथील भिन्न भाषासंपर्क विस्तारशील राहिला. त्यातूनच इंग्रजी, पार्तुगीज या परकीय भाषांसह गोव्यातील गोमंतकीय कोकणी


मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

बोली, बेळगावपासून पूर्वेकडे बोलली जाणारी कन्नड भाषा, तळकोकणातील अनेक जाती-जमातींच्या विविध कोकणी बोली, विशेषत: मालवणी-कुडाळी बोली अशा भिन्न भाषा बोलींच्या संपर्कातून आकाराला आलेली बोली म्हणून चंदगडी बोली वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

एका प्रदेशाला ऐवढ्या वैविध्यपूर्ण प्रदेशांचा शेजार क्वचित लाभत असेल. अशा शेजारामुळे तेथील भिन्न भिन्न भाषा आणि बोली यामुळे चंदगडी बोलीच्या निर्मितीला मोठा हातभार लागला आहे. चंदगडी बोलीवर प्रभाव टाकणाऱ्या कोकणी आणि मालवणी-कुडाळी या बोलींमध्ये अनेक साधर्म्य आहेत. कधी काळी ही एकच बोली असावी एवढे साधर्म्य या बोलींमध्ये आहे. पुढे तिच्या संपर्कक्षेत्रातील भिन्नत्व, भिन्न राजकीय प्रभाव, नव्या भाषांचा संपर्क, भिन्न भूगोल यामुळे आज स्पष्टपणे ही दोन भिन्न रूपे दिसतात. पोर्तुगीज लोकांच्या सत्तेमुळे गोमंतकीय कोकणीवर पोर्तुगीज भाषेचा खोलवरचा प्रभाव पडला. ख्रिश्चन धर्म प्रसारकांनी तेथील बोलीला वेगळे आणि नवे रूप दिले. मालवणी-कुडाळी हा मराठी मुलूख असल्याने आणि येथील सत्ताधारी मराठी भाषिक राहिल्याने येथील उच्चार, प्रभाव वेगळे राहिले आहेत. तथापि, या दोन्ही रूपांचा चंदगडी लोकांशी सारखाच संपर्क येत राहिल्याने चंदगडी बोलीवर दोन्ही रूपांचा खोलवरचा प्रभाव दिसून येतो. या दोन भाषाबोलींच्या प्रभावासंदर्भात नोंदवलेली निरीक्षणे अंतिम आहेत असे नाही. कारण शब्दांचे वहन कोठून कोठे झाले, कधी झाले याबद्दल ठाम मते नोंदवता येत नाहीत. भाषा, बोलींचा ऐतिहासिक परिप्रेक्ष्यात धांडोळा घेत असताना बऱ्याचदा विश्वसनीय पुराव्याच्या आधारे अंदाज बांधावा लागतो. तो कधीकधी चूकूही शकतो. या सर्व शक्यता गृहीत धरून चंदगडी बोलीच्या निर्मितीबाबतचा विचार करता येतो. परस्परांच्या संपर्कातून शब्दांची देवाणघेवाण आणि नव्या शब्दांची निर्मिती किंवा शब्दांना नवे अर्थ देणे अशा गोष्टी भाषेत सतत सुरू असतात. त्यामुळे अशा पद्धतीने केलेल्या भाषा-बोलीच्या प्रभाव अभ्यासातून बोलीची निर्मिती आणि घडण समजून घेता येते.

समाजभाषावैज्ञानिक अभ्यास पद्धतीने बोलीचे अंतरंग आणि तिचे सांस्कृतिक संदर्भ उलघडायला मदत होते. शिवाय तिच्या निर्मितीप्रक्रियेबद्दलची नेमकी माहिती हाती लागते. त्याबरोबर त्या प्रदेशाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भूगोल, संपर्कव्यवस्था याबद्दल, बोलीवर प्रभाव टाकणारे घटक यांचा अभ्यास होतो. एकूणच त्या प्रदेशातील लोकांचा जीवनव्यवहाराचा सविस्तर अभ्यासता येतो. बोलीच्या अशा व्यापक अभ्यासातून महाराष्ट्राची सांस्कृतिक विविधता, चालीरीती, जीवनपद्धती, भौगोलिक विविधता इत्यादीच्या अनुषंगाने नवी माहिती उपलब्ध होते.

❑❑❑

परिशिष्ट : एक

# संदर्भ ग्रंथ सूची


**मराठी**

कणेकर, प्रतिभा (संपा.), २००९. *पालघर तालुका : बोली, समाज व संस्कृती*, मुंबई : राज्य मराठी विकास संस्था.

काजरेकर, गोविंद २०१४, *कोकणातील कृषिसंस्कृती आणि लोकगीते*, पुणे : दर्या प्रकाशन.

कालेलकर, ना. गो. १९६२, *भाषा आणि संस्कृती*, मुंबई : मौज प्रकाशन गृह.

कालेलकर, ना. गो. १९९९, *भाषा आणि संस्कृती*, मुंबई : मौज प्रकाशन गृह.

कुलकर्णी, सु. बा. १९८१, *भाषा आणि साहित्य : संशोधन* (खंड पहिला) (संपा. वसंत जोशी), पुणे : महाराष्ट्र साहित्य परिषद.

केळकर, गुरुनाथ १९९४, *इंग्लीश-कोंकणी शब्दकोश*, बेंगलोर : फोकस प्रेस प्रा. लि.

कोलते, वि. भि. १९४४, *गोविंदप्रभु चरित्र*, मलकापूर : अरुण प्रकाशन.

गडकरी, नारायण २०१८, *पारगड चंदगडची भ्रमंती*, हलकर्णी : स्वच्छंद प्रकाशन.

गावडे, गोपाळ २०१५, *बाई शेवंता फुललेयी* (चंदगड परिसरातील लोकगीतं), इस्लामपूर : मनोरमा प्रकाशन.

चौधरी, कि. का. १९८९, *कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर*, मुंबई : महाराष्ट्र शासन.

चौधरी, सुधाकर २०१५, *समाजभाषाविज्ञान : बोलीचा अभ्यास* (अहिराणी), धुळे : अथर्व पब्लिकेशन्स्.

जाखडे, अरुण (संपा.) २०१३, *भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण महाराष्ट्र*, पुणे : पद्मगंधा प्रकाशन.

जोगळेकर, गं. ना. २००५, *मराठी भाषेचा इतिहास*, पुणे : श्रीविद्या प्रकाशन.

जोशी, लक्ष्मणशास्त्री (संपा.) १९५८, *राजवाडे लेखसंग्रह*, नवी दिल्ली : साहित्य अकादेमी.

दळवी, विजयकुमार २०१०, *आंतरीचा बोल, बेळगाव* : नवसाहित्य बुकस्टॉल.

देवी, गणेश आणि जाखडे, अरुण (संपा.) २०१३, *भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण*, पुणे, पद्मगंधा प्रकाशन.

देशमुख, उषा (संपा.) १९९५, *संशोधनाचार्य प्रा. अ. का. प्रियोळकर*, मुंबई : मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ आणि पुणे : मंजुल प्रकाशन.

धोंगडे, रमेश २००६, *सामाजिक भाषाविज्ञान*, पुणे : दिलीपराज प्रकाशन.

धोंगडे, रमेश २००६, *भाषा आणि भाषाविज्ञान*, पुणे : दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.

नेमाडे, भालचंद्र २०१५, (आ. तिसरी), *टीकास्वयंवर*, औरंगाबाद : साकेत प्रकाशन.

पगारे, म. सु. आणि पाटील, आशुतोष २०१२, *बोलीभाषा संशोधनाच्या नव्या दिशा* , जळगाव : प्रशांत पब्लिकेशन्स्.

पाटील, एस. वाय. २००३, *ॲड. व्ही. एस. पाटील : व्यक्ती आणि कार्य*, बेळगाव : भाई व्ही. एस. पाटील जन्मशताब्दी समिती.

प्रियोळकर, अ. का. १९६६, *ग्रांथिक मराठी भाषा आणि कोकणी बोली*, पुणे : पुणे विद्यापीठ.

भवाळकर, तारा २०२०, *लोकसंस्कृतीच्या पाऊलखुणा*, पुणे : मनोविकास प्रकाशन.

माटे, श्री.म. १९६४, *साहित्यधारा*, पुणे : ठोकळ प्रकाशन.

मालशे, मिलिंद २००४, *आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन*, मुंबई : लोकवाङ्मय गृह.
माहुलकर, दिनेश २०००, *वृद्धि : भाषा आणि भाषाभ्यासाचे विकसन*, मुंबई : राज्य मराठी विकास संस्था.
मोरे, शामकांत २०१८, *मालवणी बोली शब्दकोश,* डोंबिवली : सुमेरू प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स.
राजवाडे, वि. का. १९५८, *राजवाडे-लेखसंग्रह* (संपा. लक्ष्मणशास्त्री जोशी), नवी दिल्ली : साहित्य अकादेमी.
वरखेडे, रमेश २००१, *समाजभाषाविज्ञान प्रमुख संकल्पना,* श्रीरामपूर : शब्दालय प्रकाशन.
वाकोडे, मधुकर आणि करोगल, सुषमा २००१, मौखिकता आणि लोकसहित्य, दिल्ली : साहित्य अकादेमी
सरवदे, औदुंबर २०२०, *बोलीविज्ञान,* कोल्हापूर : भाषाविकास संशोधन संस्था.

**इंग्रजी**

Bowman, J. B. १९५५, *Census of India १९५१ Language Handbook*, Bombay : Government Central Press.
Campbell, James M.१८८४, *Gzetteer of Bombay Presidency, Volume XXI (Belgaum)*, Bombay : Government Central Press
Grierson, G. A., १९०५, *Linguistic Survey of India, Volume VII, Indo-aryan family, Southern group/Speicmens of the Marathi Language*, Caluctta : Office of the superintendent of Govt. Printing, India
Kelkar N. C. & Apte D. V. (Secretaries) १९३१, *English Records on Shivaji* (१६५९- १६८२), Poona : Shiva Charitra Karyalay

❑❑❑

परिशिष्ट :  दोन

## वाक्प्रचार

**अ-आ**

आंग शिवशिवणे - उत्साह संचारणे

अंगारा उचलणे - शपथ घेणे.

आटणीस लावणे - नेटास लावणे

आंड मारणे - ताळ्या◌ावर आणणे

आंडावर गुंडा घालणे - वर्मी घाव घालणे

आंडू-पांडू असणे - क्षुल्लक असणे

आडणा लावणे - आडवणूक करणे

आडवा होणे - निवांत झोपणे

आयके हंगडे होणे - न ऐकल्यासारखे करणे

आळंग्यापिळांग्या देणे - आळस देणे

**इ-ई**

इगडाचा धगड करणे - होत्याचे नव्हते करणे

इदरणा काढणे / इदरणी करणे - अब्रु काढणे, बेईज्जत करणे

**उ-ऊ**

उचभुरका असणे - उतावीळ असणे

उत्यानी चलणे - अहंकारी होणे

उपडी पडणे - अती करणे

उर बडवून घेणे - खूप दु:ख होणे

उरी जाळ पेटणे - तिरस्कार करणे

उळग्या बडीवणं - उसाबरी करणं

**ए-ऐ**

एका गांडीन हागणे - एकत्र येणे

एके न्हंगडे होणे - ऐकण्यापलिकडची गोष्ट असणे

**क**

कंडका पाडणे - सोक्षमोक्ष लावणे

कडू बियाचं - जन्मत: दुष्ट

कनोटा मोडणे - सामर्थ्यहीन बनवणे

करा फुटणे - अपशकून होणे
कळ खोचरं - त्रास देणारा
काईच्या काईच होणे - बेचैन होणे
कागाळी सांगणे - चहाडी सांगणे
काचबारोण उठणे - घाबरून जाणे
कानात मुतणे - मोठी चूक करणे
कानेर करणे - गोंगाट करणे
कारबार करणे - मनाविरुद्ध एखादे काम करणे
कालवा करणे - गोंधळ घालणे
काशीत घालणं - सोडून देणे
किंकाळीवर न मुतणे - कंजुशी दाखविणे
किच येणे - त्रासून जाणे
किचकिच करणे - सतत अंगावर खेकसत रहाणे
किरी लागणे - रोग होणे
किस्पाट समजणे - क्षुल्लक समजणे
कुच्चाळक्या करणे - टिंगलटवाळ्या करणे
कुट्टा काडणे - बदडून काढणे
कुत्र्यास गोते नको होण - खूप हाल होणे
कुलत्या लावणं - कळ लावणे
केडगेपणा करणं - वात्रटपणा करणे
केसावर फुगे येणं - फुगून चालणे
कोडीपणा करणे - द्वेष करणे
कोंबरा कोचणे - निर्वंश करणे
कोल्यासारखं बसणे - गुमान गप्प बसणे

**ख**

खांजळीत बसणे - वश होतो का पाहणे
खुट्ट्यावर बसवणे - फसवणे
खुडूक असणं - निरुपयोगी असणं
खेव पडणे - खराब होणे

**ग**

गंडा घालणे - फसवणे
गवदाळौन येणे - उलटी येणे, उमळून येणे
गळगळ्या पडणे - गयावया करणे
गांड खांजळूस सवड नसणे - अजिबात सवड नसणे
गांड खाजवणे - निर्णय न देणे
गांड धरून बसणं - पीच्छा न सोडणे, चिकटून बसणे

गांड फाटोन गळ्यास येणे - दमणूक होणे/ बरबाद होणे
गांड भरणे - मस्ती येणे
गांड मारून पोतं करणे - फसवणे
गांडभर बोलणे - अवास्तव बोलणे
गांडीत पैसे होणे - श्रीमंती येणे
गांडीत पाणी घालणे - फसवणे
गांडीत बुर असणे - घमेंडी असणे
गांडीत बोट घालणे - अति काटकसर करणे / कंजुष वागणे
गांडीत बोट घालून हुंगणे - ऐपत असताना जिकीरीने खर्च करणे
गांडीत माती घालून घेणे - बरबाद होणे
गांडीवर लाथ मारणे - अद्दल घडवणे / शिक्षा करणे / हकलून देणे
गांडीस कळ लागणे - एखादी गोष्ट मनाला लागणे
गांडीस पाय लावणे - घाबरून पळून जाणे
गाडगूड झोपणे- गाढ झोपणे
गाबनं करणे - कार्यभाग साधून घेणे
गायर भरणे - नुकसान करणे
गायरेची भर करणे - अन्न वाया घालवणे
गु कालवणे - वाईट काम करणे
गुर्मीत राहणे - अहंकार येणे
गोकरा करणे - कचरा करणे / निरुपयोगी बनविणे / चुराडा करणे
गोटणीस टाकणे - उपेक्षित ठेवणे
गोटास ठेवणे - उपेक्षा करणे
गोते खाणे - हाल हाल होणे
गोळणी करणे - थूंकून टाकणे/सोडून देणे

**घ**

घालून घेटल्यागत करणे - अस्वस्थ होणे
घुडोण बसणे - तयार होणे
घोट्या गळ्यात येणे - खूप घाबरणे

**च**

चंवडी करणे - अबू्र घालणे
चळाळा कापणे - खूप घाबरून थरथरणे
चिटपाखरू नसणे - कोणीही नसणे
चित्ती येणे - बुरशी येणे
चेचून काढणे - खूप मारणे
चोळगटून सोडणे - कुस्करणे
चौकटीतनं न जाणे - अहंकारी होणे

**छ**

छाती देणे - धीर देणे

छाती न होणे - हिम्मत न होणे

छाती फुटणे - खूप घाबरणे

छाती बसणे - धीटपणा येणे

छातीवर बसणे - मातणे

**ज**

जित्ते गाढणे - जिवंतपणी क्लेष देणे

जीवास लागणे - मनाला चटका लागणे

जोडणा करणे - जुळणी करणे

**झ**

झवला मारणे - जोराचा धक्का मारणे

झडती घेणे - खूप त्रास देणे

झांजड असणे - अडगळ असणे

झेजरून काढणे - खूप बदडणे

**ट**

टाच असणे - कामाला धाडशी आणि मेहणती असणे

टांबरणे - खूप फायदा घेणे

टाळवेवर मुतणे - कृतघ्न होणे

टाळूवर हागणे - गैरफायदा घेणे

**ठ**

ठपराक बसणे - चपराक बसणे.

**ड**

डगमगून घाम फुटणे- घामाघुम होणे

डबरा भरणे - मातीत घालणे

डेंगोन येणे - मोडकळीला येणे

डोचकं न चालणे - काही न सुचणे

डोचक्यात डीम चढणे - डोकं दुखणे

डोंबलावर पडणे - वाटणीला जाणे

डोळे परातणे - मोह होणे

डोळे फुटणे - नजर लागणे

डोळ्यात कोक्या वाढणे - डोळ्याने काही न दिसणे

डोळ्यानं न बघणे - तिरस्कार करणे

डोळ्यावर चरबी येणे - उपकार विसरणे

डोच्चं खांजळणे - विचार करणे

**ढ**

ढेंगाखालणं जाणे - नामुष्की स्विकारणे

**त**

तरकेत ठेवणे - ध्यानात / लक्षात ठेवणे

तिरपटून घालणं - परतून लावणे / माघारी पाठवणे

तोंड सोडणे - खूप भांडणे

**थ**

थुकमारं होणं - निर्लज्ज होणे

**द**

दणका दाकीवणे - अद्दल  घडवणे

दाटनित देवारा होणे - नको असणे

दातकुडीस आवळणे - मनात नसताना एखाद्याला वस्तू देणे

दातखिळी बसणे - काहीच न बोलणे

दाना मारणे - जबरीने संबंध ठेवणे

दाब दाकिवनं - तोरा दाखवणे

दिक्कोमाळ होणे - उध्वस्त करणे

दिवा लावणे - नाव कमविणे (वाईट अर्थाने)

दुष्यंग करणे - द्वेष करणे

देको न सकणे - तिरस्कार करणे

देक शिकविणे - शहाणपणे शिकवणे

**ध**

धरम सोडणे - चुकीचं वागणे

धाही फुटणे - घाबरणे

धुंबड करणे - गर्दी करणे

धुगधुगी लागणे - काळजी वाटणे

धुमडा/धुंबडा घालणे - गोंधळ घालणे

धुमडा पाडणे - काम संपवणे

धुसपटून घालने - पळवून लावणे

ध्यायीत रडणे - खूप दु:ख होणे

**न**

नजरेत न धरणे- शुल्लक माणणे

नदरेत धरणे - डावा धरणे

नांगर फिरीवण - बरबाद करणं

नाकात पाणी येणे - दमणूक होणे

नावावर हागणे - बदनामी करणे

**प**

पचांइत करणे - आडवणूक करणे

पडोन असणं - लाचारित जगणे

पदरास आवळणे - आपली वस्तू कोणीतरी चोरणे

पल्ल्यास लावणे - शेवट करणे

पाड पडणे - बाद होणे

पाटकुळीस लावणं - पाठीवर घेणे / मागे लागणे

पिजूळ्ळा असणे - नेभळट असणे

पुढ्यात पडणे - लाचार होणे

पोगमी काढणे - गुप्त माहिती काढणे

पोटात आग पडणे - खूप भूक लागणे

पोटात इस्तो पडणं - खूप भूक लागणे

उरीजाळ पेटणे - द्वेष करणे

पोटात चावणं - हेवा वाटणे

**फ**

फंदात न पडणे - संकटात न सापडणे

फाम नसणे - माहीत नसणे

फुटक्या डोळ्याचं असणे - लक्षात न येणे

फुड्यात पडणे - लाचार होणे

फोदरीवर हात मारणे - मोठे धाडस दाखवणे

**ब**

बघावे न्हंगडे होणे - न पाहण्यासारखे

बावचा करणे - फजिती करणे

बाज बगून बाळंत होणं - वेळ येईल तसे वागणे

बाणीत मुतणे - गद्दारी करणे.

बेंबाटणे - शेफारणे

**भ**

भिरकटून देणे - सोडून देणे

भोवाडा पडणे - वायफळ फेरा पडणे

भोसडीत घालणे - वाया घालवणे

**म**

मढं बसिवणे - अशुभ अपेक्षिणे

मढं साजरं करणे - दुसऱ्याच्या दु:खाचा आनंद घेणे

मिंत्या करणे - विनंती करणे

मुग्गी पडणे - गर्दी होणे
मुरकासोन पडणे - मनासारखे घडल्याने आनंदीत होणे
मोडता / मोडा घालणे - विघ्न आणणे / काम बिघडवणे
मोसबा दाखवणे - मोठेपणा दाखवणे
मोसब्यास झावणे - वायफळ मोठेपणा मिरवणे
म्याक मारणे - कोणताच मार्ग न ठेवणे

**य**

यडे घालणे - फेरे घालणे

**र**

रांबाळा करणे - कामात आळस करणे
राडरट्ट करणे - घाण करणे

**ल**

लवड्यावर बसवणे - फसवणे
लवण्या फोडणे - खूप मारणे
लागो बागो दिवाळी - बेफिकीर असणे
लोणी लावणे - वशिला लावणे

**व**

वटकून ठेवणे - लवकर काम न करणे
वडवान करून घेणे - स्वार्थ साधणे
वडदाडणे - मेहनत करणे
वळचणीला पडणे - दुसऱ्याची आशा करत जगणे
वायटावर टपणे - अहितासाठी संधी शोधणे
विल्हेवाट लावणे - नुकसान करणे
व्हणा उडीवणे - चोप देणे, मारहाण करणे

**श**

शिपारस दाखवणे - शेफारून जाणे
शिब्यासारखे नाचणे - धडपड करणे
शिरं पडणे - वाईट होणे
शेजारधरम पाळणे - शेजाऱ्याशी चांगले वागणे
शेटं पिकोन शेंगा होणे - खूप वय होणे
शेटाणं आंबे पडणं - आपसूक काम होणे
शेटावर बसिवणं - फसवणे
श्याट वाकडं न करणं - प्रयत्न करूनही काहीही नुकसान न करू शकणे
श्यानपणा दाकीवणे - शहाणपन/हुशारी दाखवणे

**स**

संदेसरी असणे - सुखरूप असणे / नामानिराळं असणे

सपाराम होणे - नष्ट होणे

सप्पय करणे - सरळ करणे

सातपयल्या असणे - वरचढ असणे

सारापावटी जाणे - वारंवार जाणे

सिरं पडणे - व्यर्थ जाणे

सुपडा शाप करणे - बेदम मारणे / गलितगात्र करणे

सुप्पातला पशात घेणे - बदला घेणे

सेफरोन जाणे - हुरळून जाणे

सोमाळं असणे - मवाळ असणे

**ह**

हागरी पातळ होणं- खूप घाबरणं, फजिती करणे

हागूण सारवणे - मोठ्यात मोठी चूक करणे

हातपाय गोळंकार होणे - खूप घाबरणे

हातपाय राहून येणे - खूप अशक्त होणे / त्रासणे

हिंगलुस नसणे  - किमत न देणे.

हिणती घालणे - विनंती करणे

होंबाडं असणे - अविचारी असणे

ह्यपलणे - भोगणे / जबरीने संबंध ठेवणे

❑❑❑

परिशिष्ट : तीन

# नकाशे

## ☐ चंदगड तालुक्याचा नकाशा

(चंदगडी बोलीचा प्रदेश)







मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

❑ **बेळगाव जिल्ह्याचा नकाशा** (१८८४)

(सन १९५४ पूर्वी चंदगडी बोलीचा प्रदेश तत्कालीन बेळगाव जिल्ह्यात समाविष्ट होता ते दर्शवणारा नकाशा)




❑❑❑



मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था

परिशिष्ट : पाच

## बोली संकलन प्रश्नावली

# चंदगडी बोली

### संकलन प्रकल्प प्रश्नावली

क्रमांक :

संकलकाचे नाव :

**सूचना : सदर संकलन प्रश्नावली आपल्या घरातील / गावातील वडीलधाऱ्या मंडळींकडून माहिती घेऊनच भरावी.**

---

1. **आपल्या गावचे/समाजाचे वैशिष्ट्यपूर्ण सण आणि ते साजरे करण्याची पद्धत लिहा.** (चंदगड तालुक्यात दिवाळी, होळी, धुळवड, शिमगा हे सण वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने साजरा केले जातात. दिवाळीत मुली गित्ती म्हणतात, धुळवडीत खेळे असतात, शिमग्यात सोंगे. तर या सणांविषयी माहिती संकलित करा.)
2. **आपला गाव/समाज तसेच व परिसरातील रूढी आणि परंपरा लिहा.** (गावात लक्ष्मीची यात्रा, जत्रा (म्हाई) याशिवाय काही सार्वजनिक रूढी व प्रथा परंपरा असतील तर त्याविषयी माहिती. याशिवाय गावच्या म्हाईविषयी गावात रुढ असलेली एखादी कथा किंवा समजूती लिहा.)
3. **गावातील स्थानिक देव, देवतांची नावे लिहा. शिवाय या देवदेवतांविषयी अधिकची काही माहिती असल्यास सांगा.** (उदाहरणार्थ : म्हसोबा, भूतनाथ, रवळनाथ, चाळोबा अशा देवतांविषयी माहिती)
4. **तुम्ही घरात कोणत्या भाषेत बोलता?**
5. **तुम्ही बोलता ती चंदगडी बोली आणि तुमचे आई-वडील, आजी-आजोबा बोलतात त्या चंदगडी बोलीतील फरक सांगा?** (हा फरक शब्द, वाक्य व उच्चार या पातळीवर नोंदवावा.)
6. **तुम्हाला चंदगडी बोलीत बोलताना जास्त बरं वाटते की प्रमाण मराठीत? का?**
7. **तुम्हाला माहिती असलेले किंवा तुमच्या घरातील वडीलधाऱ्या लोकांना विचारून चंदगडी बोलीतील जास्तीत जास्त शब्द लिहा.** (उदा. भोसका, कांबळ, वसनुक, धुंबड, सुदगेडा, बुरसं, कळखोचरं, बातरं, बांबार, व्हईक, दिक्कोमाळ अशा प्रकारचे पूर्ण चंदगडी शब्द संकलित करा.)
8. **खालील प्रमाणे शब्दांची वर्गवारी करून शब्द संकलित करा.**
   १. **शेतीविषयक शब्द :** उदाहरणार्थ, घुट्टा, खुरपण, भांगलण, औत इत्यादी
   २. **स्वयंपाक घर :** उदाहरणार्थ, आयदान, भानोशी, गुळांब, डिचकं, बेल्ला
   ३. **कपडे :** उदा. आंगी, पाटलोन
   ४. **सण-उत्सव :** उदा. म्हाई, शिमगा, बेंदर, घुघुळ
   ५. **नातीवाचक शब्द :** उदा. व्हन्नी, मावसा, व्हंजी

६. **स्त्रीजीवनाशी संबंधित शब्द :** उदा. गवळण, होळी, थोरली

9. **तुमच्या परिसरातील फळ-फळावर, झाडांझुडपांची व वेलींची नावे सांगा?** (उदा. : आंबा फळाची नावे-चिक्याळा, गुंडगुळा, कवंडाळ इ.)

10. **तुमच्या घरात सण-उत्सवांना केल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांची नावे लिहा.** (उदा. निवरी, उंडे, दिवसी, घवणं)

11. **तुमच्या परिसरातील शेतकरी कोणती पिके घेतात?** (येथे पिकांची नावे लिहा.)

12. **चंदगडी बोलीतील किमान पाच लोकगीते/गाणी लिहा.** (येथे जागा अपुरी पडल्यास स्वतंत्र कागदावर लिहावीत) (येथे लग्नातील, दिवाळीच्या सणातील गीते लिहिणे अपेक्षित आहे. गीते लिहायची नसतील तर एखादी रूढ लोककथा लिहा.)

13. **चंदगडी बोलीतील शिव्या सांगा?** (उदा. बोडकीच्या, उंडगीच्या, व्हयमाली, हुसभुरकी इत्यादी)

14. **चंदगडी बोलीतील किमान पाच म्हणी सांगा?** (उदा. हागरीस घुगरीचं निमित्त, थुकलं तर धुतलं म्हणणे, भांबावलं भूत झाडास उदं घाली)

15. **चंदगडी बोलीतील वाक्प्रचार** (किमान दहा)

(उदा. घर भईरणं, वटकोण हुबे ऱ्हाणे, कुत खाणे, ठारा पडोस न देणे, सरपोन धुळळा करणे, नजरेसमोर देको न सकणे, फानोफान व्हणे, इदरणी करणे, खेव पडो)

16. **चंदगडी बोलीत वापरली जाणारी विशेषणे आणि क्रियापदे लिहा.** (उदा. विशेषणे : जनीचा म्हसण्या, डगरी बाळया, घोळबा, गड्डीचा राम्या, सोजर बाब्या इत्यादी. क्रियापदे : जाऊलोय, येऊलोय, खाऊलोय इत्यादी)

17. **चंदगडी बोलीची तुम्हाला जाणवलेली दोन वैशिष्ट्ये सांगा?** (उदा. उच्चारवैशिष्ट्ये, शब्दसंग्रह इत्यादी बाबतीत)

18. **चंदगडी बोलीत इतर भाषेतून व इंग्रजीतून येऊन स्थिरावलेले शब्द सांगा.**

(उदा. सोल्जर = सोजर, टाईमावर = टायमार, बेस्ट = बसे, सिक = शीक इत्यादी)

19. **चंदगडी बोलीभाषेचा एखादा नमुना लिहा.** (नमुना कल्पनेने रचला तरी चालेल किंवा चंदगडी बोली बोलणाऱ्या लोकांचा संवाद शब्दबद्ध करा.) उदाहणार्थ,

**शिरमंता :** पोरानी दांडगा कानेर केल्यानीत. सक्कळधरणं डोसकं उठिवल्यानीत भाड्यानी.

**पारबती :** आऊ, आतं ह्यंची सुट्टी सपेसकोळ आसचं. घर डोचक्यावर घेत्यात नुसतं. कितीबी सांग. थुकमारी जात ही. आपलं तेच खरं करत्यात.

**शिरमंता :** दुकणं पडो ह्यंच्यावर. ह्यंचा कानेर आईकन्यापरास चल उदरास वट्टीवर बसोया.

**(टीप : या प्रश्नावली व्यतिरिक्त चंदगडी बोलीबद्दल आणखी काही सांगायचे असल्यास त्याचे स्वागत आहे.)**

❑❑❑

परिशिष्ट : सहा

# परीभाषासूची

(मराठी-इंग्लिश)

आदिबंध - Archetype
आधुनिक भाषाविज्ञान - Modern linguistics
आधुनिक संरचनावादी अभ्यासपद्धती - Modern structuralist study
आधुनिकता - Modernity - Homogeneous linguistic system
एकजिनसी भाषिक व्यवस्था - Homogeneous linguistic system
एकभाषिक समाज - Monolingual society
ऐतिहासिक-तौलनिक भाषाभ्यासपद्धती - Historical linguistics /philology
ऐतिहासिक भाषाभ्यासपद्धती - Historical linguistics /philology
कथनपरंपरा - Narratology
कुटुंबसंस्था - Family System
खाद्यसंस्कृती - Food culture
गुप्त व सांकेतिक बोली - argot, code language
जननशील बोलीविज्ञान - Reproductive dialectics
जागतिकीकरण - Globalization
तत्त्वज्ञान - Philosophy
दृकश्राव्य माध्यम - Audio-visual medium\
द्वैभाषिक समाज - Bilingual
धार्मिक छळाचा काळ - Inquisition period
नागरिकीकरण - Citizenship
नागरीकरण - Civilization
निजभाषा - Native language
निजभाषिक - Native speaker
निवेदक - Narrator
निवेदन - Narrative
पारंपरिक बोली - Traditional dialect
पिजिन-क्रिऑल भाषा - Pidgin-Creole dialect
पिजिन भाषा - Pidgin Language
पुरुषसत्ताक समाजव्यवस्था - Patriarchal Society
पोटभाषा - Sub language / Dialect
प्रभाव - Influence
प्रमाण बोली - Standard dialect
प्रमाणभाषा - Standard language

प्रभावक्षेत्र - Influence area / Sphere of Influence
प्रतिमा - Image
प्रतीक - Symbol
बडबडगीते - Nursery Rhymes
बहुभाषिक - Multilingualism
बहुभाषिकता - Multilinguality /Multilingualism
बहुसांस्कृतिक - Multiculturalism /Multicultural
बोली - Dialect
बोलीविज्ञान - Dialectology
बोली निर्मिती - Dialect formation
बोली प्रदेश - Dialect region
बोली भूगोल - Dialect Geography
बोली संकलक - Dialect compiler
भाषाकुल - Language family
भाषाजनत्व - Language origin
भाषापरिवर्तन / भाषिक परिवर्तन / भाषाबदल - Code Switching
भाषामिश्रण - Code mixing
भाषालघुत्व - Language minority
भाषाविज्ञान/ भाषाशास्त्र - Linguistics
भाषावैज्ञानिक - Linguist
भाषा संपर्क - Language contact
भाषाद्वित्व - Diaglossia
भाषा दंडक - Language benchmarks
भाषा निर्मिती - Language formation
भाषा प्रदूषण - Language pollution
भाषा प्रयोग - Language experiment
भाषिक अंतर - Linguistic distance
भाषिक कोश - Language dictionary
भाषिक गट - Linguistic group
भाषिक नकाशा - Linguistic atlas
भाषिक नियोजन - language planning
भाषिक पाहणी - Linguistic survey
भाषिक प्रभाव क्षेत्रे - Linguistic influence region
भाषिक प्रभाव - Linguistic influence
भाषिक प्रयोग - Linguistic experiment
भाषिक भांडार - Linguistic repertoire
भाषिक लिंगभेद - Linguistic sexism
भाषिक वर्तन / भाषिक व्यवहार - Parole
भाषिक व्यवस्था - langue

भाषिक संरचना - linguistics  structure
भाषिक समाज - linguistics community
भाषिक समूह - linguistics group [sociolect]
भाषिक सापेक्षतावाद - linguistics relativism
भाषिक सुगमता - mutual linguistic intelligibility
भाषिक क्षमता - linguistics capability / linguistics ability
भाषेचा बहिवर्ती अभ्यास - Extrinsic study of language
भाषेचे समाजविज्ञान - Sociolinguistics
भोगोलिक चिन्ह - Geographic symbol
भौगोलिक नकाशा - Geographic map / Altus
भौगोलिक क्षेत्र - Geographic region
मनोविज्ञान - Psychology
मातृभाषा - Mothertongue / Native language
मानववंशशास्त्र / मानववंशविज्ञान - Anthropology
मानववंशशास्त्रीय भाषाविज्ञान - Ethno linguistics
मौखिक वाङ्मय/लोकसाहित्य - Folklore
रोमन लिपी - Latin script
लघुक्षेत्र - Domain
लिंगभेद - sexism
लोककथा - Folktale
लोककला - Folk art
लोकगीते - Folk song
लोकनीती - Public policy
लोकरीती -  Custom
लोकसाहित्य - Folklore
वसाहतवाद - Colonialism
वाक्यस्तर - Sentence stratum
वाक्स्वास्थचिकित्सा  - Speech Therapy
विवाहसंस्था - Marriage Institution
व्यक्तिबोली -  Idiolect
व्यवसायबोली - domain dialect / Business language
व्यवसायविशिष्ट शब्द - Treding communities specific words
व्यवहार भाषा - Functional language
शब्दनिधी - lexicon, lexis
शब्दस्तर - word stratum
शिक्षणशास्त्र - Pedagogy
शेजार भाषासंपर्क -  Contact of Neighbour language
शैलिका / भाषिक वैशिष्ट्ये - Register
संकलन - Compilation

संकल्पना क्षेत्र - Concept Area
संदेशवहन क्षमता - Spech Community
संदेशवहनक्षमतेची संकल्पना - Communicative Competence
संदेशव्यवहार - Code, Communication system
संदेशवहनात्मक क्षमता - (संदेशनात्मक क्षमता - Communicative competence)
संपरीक्षण - Audit
संपर्कक्षेत्र - Contact region
संप्रेषण अभियांत्रिकी - Communication Engineering
संरचना - Construction
संरचनावाद - Structuralism
संरचनावादी बोली अभ्यास - Structural Dialect study
संरचनात्मक बोलीविज्ञान - Structural Dialectology
संरचनावादी भाषाविज्ञान - Structural linguistics
समाजभाषाविज्ञान - Sociolinguistics
समाजभाषावैज्ञानिक अभ्यासपद्धती - Sociolinguistics Methodology
समाजभाषावैज्ञानिक बोलीविज्ञान - Sociolinguistics Dialectology
समाजव्यवस्था - Society, social system
समाजशास्त्र - Sociology
समाजीकरण - Sociolization
सापेक्षतावाद - Relativaty
सामाजिक बोलीविज्ञान - Sociol Dialectology
सामाजिक भाषाविज्ञान - Social linguistics
सीमावर्ती भाषा - cross border language
स्थानिक भाषा - Local / Native Language
क्षेत्रविशिष्ट बोली - Region specific dialect
क्षेत्रिय सर्वेक्षण - Field Survey

❑❑❑